# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN, MUMBAI

३०वा वार्षिक अहवाल २०१४-२०१५

30th Annual Report 2014 - 2015






यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार विजेते श्री. रतन टाटा यांच्या वतीने प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना टाटा कॅपिटल लि. चे कार्यकारी संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. प्रवीण कडले. सोबत राष्ट्रीय पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, दैनिक लोकसत्ताचे संपादक श्री. गिरीश कुबेर, डॉ. जयंत लेले, कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे व कोषाध्यक्ष श्री. हेमंत टकले.




डॉ. जयंत लेले यांच्या Yashwantrao Chavan Reflects on India : Society and Politics या पुस्तकाचे प्रकाशन करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार, सोबत डॉ. अनिल काकोडकर, श्री. गिरीश कुबेर व डॉ. जयंत लेले.

# ३० वा वार्षिक अहवाल २०१४ – २०१५

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

जन. जगन्नाथराव भोसले मार्ग,
मुंबई - ४०० ०२१
दूरध्वनी क्र. २२०२८५९८, २२०४५४६०, २२८५२३४५.
फॅक्स : २२८५२०८१, २२८५२०८२
**Email: ybchavan100@gmail.com**
**Visit us: ybchavanpratishthan.org**

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## वार्षिक अहवाल २०१४-२०१५

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे विश्वस्त मंडळ, कार्यकारिणी मंडळ, कार्यकारी समिती, प्रतिष्ठानचे विभाग प्रमुख, प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्राचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापन | ३-५ |
| २ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्रातील उपक्रम | ५-७ |
| ३ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या केंद्रात झालेले महत्वाचे कार्यक्रम | ७ |
| ४ | यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक, राष्ट्रीय पुरस्कार व इतर उपक्रम | ७-८ |
| ५ | विशेष कार्यक्रम | ८-९ |
| ६ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | १०-१२ |
| ७ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर कार्यक्रम / उपक्रम | १२-१३ |
| ८ | प्रतिष्ठानमार्फत देण्यात आलेली व मिळालेली अनुदाने | १३ |
| ९ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या विभागांमार्फत झालेले कार्यक्रम / उपक्रम | १४-५० |
| १० | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईची विभागीय केंद्रे | ५०-८७ |
| ११ | प्रतिष्ठानची प्रकाशने व व्हि.डी.ओ. कॅसेटस् | ८८ |
| १२ | प्रतिष्ठानच्या वैधानिक लेखा परीक्षकाचे प्रमाणपत्र | ८९ |
| १३ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची हिशोबपत्रके व संबंधित परिशिष्टे | ९०-१०० |

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि.नं.एफ.१०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि.नं.एम.एम.एच/बी.ओएम-५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१

**विश्वस्त मंडळ सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. | मा. सौ. सुप्रिया सदानंद सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर | |
| ७. | मा. श्री. राम प्रधान | |
| ८. | मा. श्री. वसंतराव कार्लेकर | |
| ९. | मा. श्री. दिलीप वळसे-पाटील | |
| १०. | मा. श्री. अजित निंबाळकर | |
| ११. | मा. श्री बी. के. अग्रवाल | |
| १२. | मा. श्री. अमित डहाणूकर | |
| १३. | मा. डॉ. समीर दलवाई | |
| १४. | मा. ना. धो. महानोर | |
| १५. | मा. श्रीमती प्रभा कुलकर्णी | |
| | **महाराष्ट्र शासन प्रतिनिधी** | |
| १६. | मा. श्री. नितीन करीर<br>प्रधान सचिव, नगर विकास विभाग | |
| १७. | रिक्त | |

**कार्यकारिणी मंडळ सदस्य**

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरुण गुजराथी
३. मा. सौ. सुप्रिया सदानंद सुळे
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धो. महानोर
९. रिक्त
१०. मा. श्री विनायकराव पाटील
११. मा. श्री. के. बी. आवाडे
१२. मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१३. मा. श्री जीवनराव गोरे
१४. मा. श्री विजय शिर्के
१५. मा. श्री. जयराज साळगांवकर
१६. रिक्त
१७. मा. श्री. अंकुशराव टोपे
१८. मा. श्री. शामराव पा. पाटील
१९. मा. श्री. चंद्रकांत घुले - पाटील
२०. मा. श्री. यशवंतराव गडाख पाटील
२१. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिध्द)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

२२. मा. श्री. नितीन करीर,
प्रधान सचिव, नगर विकास विभाग

**कार्यकारी समिती**

१ मा. श्री. शरदराव पवार
२ मा. श्री. अरुण गुजराथी
३ मा. सौ. सुप्रिया सदानंद सुळे
४ मा. श्री. श. गं. काळे
५ मा. श्री. हेमंत टकले
६ मा. श्री. अजित निंबाळकर
७ मा. श्री जीवनराव गोरे
८ मा. श्री. यशवंतराव गडाख

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

**प्रतिष्ठानचे विभाग**

| | | |
|---|---|---|
| १. सृजन | सृजन प्रमुख | सौ. सुप्रिया सुळे |
| २. वसुंधरा कक्ष (पर्यावरण संवर्धन अभियान) | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| ३. कृषी व सहकार व्यासपीठ | निमंत्रक | श्री. अजित निंबाळकर |
| ४. कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. म. बा. पवार |
| ५. यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडीअर श्री. सुशील गुप्तन |
| ६. महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजिका | श्रीमती ममता कानडे |
| ७. नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| ८. सांस्कृतिक विभाग | निमंत्रक | श्री. विनय नेवाळकर |
| ९. यशवंतराव चव्हाण ग्रंथालय | ग्रंथपाल व संदर्भ अधिकारी | श्री. अनिल पाझारे |
| १०. यशवंतराव चव्हाण केंद्र सभागृहे | व्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| ११. वार्तापत्र | मानद संपादक | श्री. दत्ता बाळसराफ |
| १२. शिक्षण विकास मंच | प्रमुख संयोजक | श्री. वसंत काळपांडे |
| १३. अपंग हक्क अभियान | संयोजक | श्री. विजय कान्हेकर |

**प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्रांचे अध्यक्ष :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | विभागीय केंद्र कराड | अध्यक्ष | श्री. बाळासाहेब उर्फ शामराव पाटील |
| २) | विभागीय केंद्र पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| ३) | विभागीय केंद्र नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| ४) | विभागीय केंद्र नाशिक | अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| ५) | विभागीय केंद्र औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. नंदकिशोर कागलीवाल |
| ६) | विभागीय केंद्र लातूर | अध्यक्ष | श्री. जनार्दन वाघमारे |
| ७) | विभागीय केंद्र कोंकण | अध्यक्ष | श्री. राजाभाऊ लिमये |
| ८) | विभागीय केंद्र अमरावती | अध्यक्ष | रिक्त |

**इतर**

| | | |
|---|---|---|
| १) | मानद वास्तुविशारद | मे. शशी प्रभु अँड असोशिएटस् |
| २) | संविधिक लेखा परीक्षक | मे. सी.व्ही.के. अँड असोशिएटस् |
| ३) | अंतर्गत हिशेब तपासनीस | मे. संजय राणे अँड असोसिएटस् |

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचा सन २०१४-२०१५ चा वार्षिक अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

**१. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे व्यवस्थापन :**

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा व कार्याचा प्रसार करण्यासाठी प्रतिष्ठानतर्फे विविध प्रकारचे उपक्रम प्रतिवर्षी राबविण्यात येतात. उपक्रमांची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी नेमलेल्या कार्यकारी समितीच्या १२ बैठका घेण्यात आल्या व विविध विषयांवर सांगोपाग चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. या आर्थिक वर्षात विश्वस्त मंडळाच्या व कार्यकारिणी मंडळाच्या प्रत्येकी पुढीलप्रमाणे ३ बैठका झाल्या. दिनांक २३ ऑगस्ट २०१४, दिनांक २५ नोव्हेंबर २०१४ व दिनांक १२ मार्च २०१५.

तसेच कार्यकारी समितीच्या दिनांक ५ एप्रिल २०१४, ३ मे २०१४, ७ जून २०१४, ५ जुलै २०१४, २ ऑगस्ट २०१४, ६ सप्टेंबर २०१४, ४ ऑक्टोबर २०१४, १ नोव्हेंबर २०१४, ६ डिसेंबर २०१४, ३ जानेवारी २०१५, ९ फेब्रुवारी २०१५ व ७ मार्च २०१५ अशा एकूण १२ बैठका झाल्या.

प्रतिष्ठानच्या हिशेबाची तपासणी प्रत्येक महिन्याला अंतर्गत हिशेब तपासनीस मे. संजय राणे अँड असोसिएटस्, यांचेमार्फत करण्यात आली व त्यांचे अहवाल कार्यकारी समितीपुढे ठेवण्यात आले. वार्षिक हिशेबाची तपासणी सांविधिक हिशेब तपासनीस मेसर्स सी.व्ही.के. असोसिएटस्, चार्टर्ड अकाउटंट यांच्याकडून झाली असून त्याचा अहवालही विश्वस्त मंडळ व कार्यकारिणी मंडळासमोर ठेवण्यात आला. वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास आधीन राहून प्रत्येक विभागीय केंद्रासाठी व मुख्य कार्यालयातील विविध विभागांना खर्चाचे अंदाजपत्रक दिले असून त्यांच्याकडून खर्चाचे तिमाही अहवाल मागवून तपासण्यात आले व कार्यकारी समितीपुढे सादर करण्यात येऊन त्रुटींची पूर्तता करुन घेण्यात आली. प्रतिष्ठानची वेबसाईट ybchavanpratishthan.org असून ती वेळोवेळी अद्ययावत करण्यात येत आहे. तसेच प्रतिष्ठानचा ई-मेल ybchavan100@gmail.com हा आहे.

**सभासद संख्या:** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईची निरनिराळया प्रकारच्या सभासदांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

१. संस्थापक सदस्य - ३५
२. आजीव सदस्य - २५०
३. संस्था सदस्य - २८

महाराष्ट्र शासनाचे दोन प्रतिनिधी विश्वस्त मंडळावर नेमलेले आहेत. त्यापैकी मा. श्री. नितीन करीर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांची कार्यकारिणी मंडळावरही नियुक्ती केलेली आहे.

## २. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्रातील उपक्रम :

### २.१ सभागृहे

**१.११ मुख्य सभागृह:** यशवंतराव चव्हाण केंद्रातील सभागृहाचा वापर, प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांसाठी तसेच निरनिराळया सामाजिक संस्था, शासनातर्फे आयोजित केलेल्या सभा, संमेलने, चर्चा, परिषदा, चित्रपट, सांस्कृतिक कार्यक्रम यासाठी करण्यात आला. सभागृहामध्ये मराठी, हिंदी, गुजराती व इंग्रजी नाटके, संगीत, सभा आदि कार्यक्रमही झाले.

**१.२ सांस्कृतिक व रंगस्वर सभागृह:** सांस्कृतिक सभागृह व रंगस्वर सभागृह या दोन्ही सभागृहात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. ही दोन्ही सभागृहे सर्व सोयींनी युक्त व अद्ययावत करण्यात आली आहेत.

## २.२ यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय :-

**२.१ ग्रंथालयाविषयी माहिती :-** जगातील ज्ञानामध्ये दरवर्षी भर पडत आहे. त्यामुळे ग्रंथ, ज्ञान साधने मोठया संख्येने प्रसिध्द होत आहेत. ग्रंथालयातील वाचक वर्गाचे समाधान होण्यासाठी आपण तशा प्रकारच्या ग्रंथालयातून सेवा दिल्या जातात. गेल्या वीस वर्षात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने झेप घेतली आहे. या क्षेत्रात लक्षणीय परिवर्तन झाले आहे. सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे आहे. तंत्रज्ञानाचा झपाटयाने विकास होत आहे. सध्या सर्वत्र ग्रंथालयाचे व माहिती केंद्रे स्थानिक, प्रादेशिक आणि जागतिक पातळीवर स्थापन झाली आहेत. ती ज्ञान प्रसाराच्या क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. शास्त्रीय व इतर संशोधनाचा वेगाने विकास होत आहे.

ग्रंथपेटी मा. यशवंतराव चव्हाण यांची पुस्तके विक्रीकरिता ठेवण्यात आली आहेत. ग्रंथालयाने कांही महत्त्वाच्या विषयाची वृत्तपत्रीय कात्रणे काढून वाचकाना हाताळता यावी याकरिता व्यवस्थित बांधणी करुन ग्रंथालयामध्ये संदर्भाकरिता ठेवण्यात आली आहेत. विद्यार्थी, संशोधक यांच्याकरिता अद्यावत माहितीकरिता नियतकालिकांची बांधणी करुन संदर्भाकरिता ठेवली आहेत. ग्रंथालयात विविध नियतकालिके, समाजशास्त्र, शेती, इतिहास, कायदा, संस्कृती इ. विषयांवरील पुस्तके, आत्मचरित्रे, धर्मकोश, विश्वकोष, गॅझीटीयर, अॅटलास, इअरबुक, डिक्शनरी, निरनिराळया कायद्याचे ग्रंथ उपलब्ध आहेत. वेळोवेळी ग्रंथालयाला अनुसरुन नवीन पुस्तके खरेदी करण्यात येतात. ग्रंथालयीन नियमानुसार ग्रंथालयाची मांडणी केली आहे. ग्रंथालयाचा वाचकारिता जास्तीत जास्त वापर व्हावा यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. तसेच पुस्तके शोधण्याकरिता मशीन कॅटलॉगच्या सहाय्याने वाचकांना मदत होते. डिडिसी-२३ (डेव्ही डेसियल क्लासीफिकेशन) नुसार ग्रंथाचे वर्गीकरण केले आहे. मुख्य वर्गांक आणि त्याचे उपवर्ग यानुसार ग्रंथाची मांडणी केलेली आहे. सर्व ग्रंथ याच पध्दतीप्रमाणे कपाटात ठेवण्यात आले असून त्यामुळे संगणकीय सहाय्याने साहित्य शोध जलद गतीने व अचूक घेता येतो. विशेष ग्रंथालयीन नेटवर्क उदा. डेलनेटच्या माध्यमातून ऑनलाईन ग्रंथालयीन सेवा दिली जाते.

**२.२ ग्रंथालयाचे नियम :-** यशवंतराव चव्हाण ग्रंथालयाचे सभासद होण्याकरिता नमुना अर्ज तयार केला आहे. या अर्जामध्ये स्वतःच्या हस्तक्षरात परिपूर्ण माहिती भरुन त्यासोबत पुढीलप्रमाणे वर्गणी भरणे आवश्यक आहे.

**विद्यार्थी सभासद :-** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना नाममात्र वार्षिक वर्गणी रु.५०/- व अनामत रक्कम रु.१००/- घेऊन सभासदत्व दिले जाते. तसेच रु.५०/- भरुन एक आठवडा ते एक महिना या कालावधीकरिता सभासदत्व दिले जाते.

**२.३ सर्वसाधारण सभासद :-** यशवंतराव चव्हाण ग्रंथालय संदर्भ ग्रंथालय असून ग्रंथ ग्रंथालयात वाचण्याची किंवा घरी घेऊन जाण्याची सुविधा आहे. याकरिता वार्षिक वर्गणी रु.५००/- व अनामत रक्कम रु.५००/- आहे. सभासदाना एकावेळी एक पुस्तक/ग्रंथ देण्यात येईल. ते आठ दिवसात परत करणे आवश्यक आहे. तसेच संदर्भग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातच करता येईल; संदर्भ ग्रंथ घरी नेता येणार नाही. पुस्तकाची किंमत भरलेल्या अनामत रक्कमेपेक्षा जास्त असेल तेव्हा अधिक अनामत रक्कम किंवा त्या पुस्तकांच्या किंमती एवढी अनामत रक्कम भरुन पुस्तक घरी नेता येईल. महाविद्यालयीन व उच्चशिक्षण घेणारे विद्यार्थी / संशोधक यांना ग्रंथ, नियतकालिके ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी / संदर्भासाठी देण्यात येतात. घरी /ग्रंथालयाबाहेर नेण्याकरिता देण्यात येणार नाही. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र यांच्या नियमाप्रमाणे ग्रंथालयाचे व्यवस्थापन संगणकीकरण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे वृत्तपत्रात प्रसिध्द होणा-या महत्त्वाच्या घडामोडींची कात्रणे ठेवण्यात आली आहेत. सन २०१३-२०१४ मध्ये ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाकडून रु.९६,०००/- इतके अनुदान मिळाले आहे. सन २०१४-२०१५ वर्षाकरिता प्रतिष्ठानने एकूण रु.३ लाख इतकी रक्कम मंजूर केली होती व प्रत्यक्ष खर्च रु.१७,९०,६०६/- इतका झाला आहे. या रकमेतून वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, ग्रंथ, संदर्भ ग्रंथ खरेदी करण्यात आले. त्यामध्ये ६११ ग्रंथ / पुस्तके खरेदीचा समावेश आहे.

२.४ **दिनांक ३१.३.२०१५ रोजी प्रमाणे ग्रंथालयाची सभासद संख्या पुढीलप्रमाणे.**

१. सन २०१४-२०१५ मध्ये सभासद झालेले महाविद्यालयीन विद्यार्थी / संशोधक / सभासद यांची संख्या ४५५ व सन २०१४-२०१५ मध्ये सभासद वर्गणी/अनामत रक्कम म्हणून रु.७०,१५०/- इतकी रक्कम मिळाली आहे.

२. २०१४-२०१५ सर्वसाधारण सभासद संख्या १५५ आहे व सन २०१४-२०१५ या वर्षात सभासद वर्गणी व अनामत रक्कम म्हणून रु.३९,०००/- इतकी रक्कम मिळाली आहे.

२.३ **मा. न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड यांच्या नावाने 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुरस्कृत न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड पारितोषिक':** भारताचे भूतपूर्व सरन्यायाधीश मा. न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुरस्कृत न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड परितोषिक' प्रत्येक वर्षी देण्याचे मान्य झाले. त्यानुसार मुंबई विद्यापीठाच्या मार्चच्या एल.एल.एम.च्या अंतिम परीक्षेत विद्यापीठात पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांस देण्यात येतो. त्यामुळे सन २०१४ या वर्षाचे पारितोषिके विद्यापीठाने कळविल्यानुसार कर्नल अभिजित जी. कदम (निवृत्त) यांना मा. चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथीदिनी मा. अध्यक्षांच्या हस्ते देण्यात आले. रु.१०,०००/- रोख असे पारितोषिकाचे स्वरुप आहे.

## ३. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या केंद्रात झालेले महत्वाचे कार्यक्रम :

३.१ **मा. चव्हाणसाहेबांची पुण्यतिथि व जयंती:** मा. चव्हाणसाहेबांच्या ३० व्या पुण्यतिथीनिमित्त दिनांक २५ नोव्हेंबर २०१४ रोजी यशवंतराव चव्हाण केंद्र इमारतीच्या मुख्य सभागृहात झालेल्या कार्यक्रमास प्रतिष्ठानचे अध्यक्ष व माजी केंद्रीय कृषीमंत्री मा. श्री. शरदराव पवार उपस्थित होते. या कार्यक्रमात 'यशवंतराव चव्हाण कृषि औद्योगिक समाज रचना / व्यवस्थापन प्रशासन राज्यस्तरीय पारितोषिक २०१४' सुप्रसिध्द शेतकरी नेते व कृषि क्षेत्रातील विचारवंत श्री. शरद जोशी यांना प्रदान करण्यात आले व 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१४' सुप्रसिध्द उद्योगपती श्री. रतन टाटा यांना देण्याचे जाहीर करण्यात आला.

## ४. यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक, राष्ट्रीय पुरस्कार व इतर कार्यक्रम :

४.१ **यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक:** प्रतिष्ठानच्या उद्दिष्टांतील एक भाग म्हणून खालील क्षेत्रात भरीव कार्य करणा-या मान्यवर व्यक्ति वा संस्थेला चक्रीयपध्दतीने पारितोषिक व सन्मानपत्र देण्यात येते.

१) यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक समाजरचना/व्यवस्थापन प्रशासन पारितोषिक
२) यशवंतराव चव्हाण सामाजिक एकात्मता/विज्ञान तंत्रज्ञान पारितोषिक
३) यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास पारितोषिक
४) यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य संस्कृती/कला व क्रीडा पारितोषिक

सन २०१४ यावर्षीचे पारितोषिक 'यशवंतराव चव्हाण कृषि औद्योगिक समाज रचना / व्यवस्थापन प्रशासन पारितोषिक - २०१४' या क्षेत्रासाठी होते. सालाबादप्रमाणे याही वर्षी पारितोषिकासाठी वर्तमानपत्रात प्रगटन करण्यात आले होते. या क्षेत्रामध्ये भरीव पथदर्शी कार्य करणा-या व्यक्ती अगर संस्था यांना शिफारस करण्याचे आव्हान करण्यात आले होते. त्या आव्हानाला प्रतिसाद देऊन अनेक प्रस्ताव प्राप्त झाले होते. या प्रस्तावावर निवड समितीत विचार होऊन सुप्रसिध्द शेतकरी नेते व कृषि क्षेत्रातील विचारवंत श्री. शरद जोशी यांना देण्याचे जाहीर करण्यात येऊन सदर पारितोषिक दिनांक २५ नोव्हेंबर २०१४ रोजी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी दिनी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते देण्यात आले. पारितोषिकाचे स्वरुप रु.२ लाख रोख, शाल, मानपत्र व श्रीफळ असे आहे.

४.२ **यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार :** मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय एकात्मता, लोकशाहीमूल्ये, सामाजिक-आर्थिक विकास या क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्य करणा-या नामवंत व्यक्तीला 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार व सन्मानपत्र' देण्यात येते. रक्कम रुपये ५ लाख व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

सुयोग्य व्यक्तीची निवड करण्यासाठी डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली आहे. या समितीमध्ये (१) मा. श्री. चार्ल्स कुरिआ, प्रख्यात आर्किटेक्ट व राष्ट्रीय नागरी आयोगाचे भूतपूर्व अध्यक्ष, (२) मा. डॉ. आरमायटी देसाई, माजी अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, (३) मा. डॉ. रघुनाथ माशेलकर, माजी महानिदेशक वैज्ञानिक तथा औद्योगिक अनुसंधान परिषद, (४) मा. डॉ. रुपा शहा, माजी कुलगुरु, एस.एन.डी.टी. विद्यापीठ (५) मा. डॉ. राजन् एम. वेळुकर, कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, (६) मा. डॉ. नरेंद्र जाधव, सदस्य, योजना आयोग याचा समावेश आहे.

या निवड समितीच्या शिफारशीनुसार मा. चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथी दिनी दि. २५ नोव्हेंबर २०१४ मध्ये जाहीर करण्यात आलेला यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार सुप्रसिध्द उद्योगपती श्री. रतन टाटा यांच्या वतीने त्यांच्या टाटा कॅपिटल लि. चे कार्यकारी संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. प्रविण कडले यांना मा. श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते सन्मानपूर्वक देण्यात आला. या समारंभास प्रतिष्ठानचे विश्वस्त व सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते.

## ५. विशेष कार्यक्रम / उपक्रम :

५.१ **'यशवंत' आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - दिनांक १७ ते २३ जानेवारी २०१५:-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व पुणे फिल्म फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आणि महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने दि. १७ जानेवारी ते २३ जानेवारी २०१५ या दरम्यान चव्हाण सेंटर, मुंबई येथे 'पाचवा यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' आयोजित केलेला होता. या महोत्सवाचे उद्‌घाटन प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते व हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ कलाकार श्री. अनुपम खेर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या प्रसंगी श्री. अनुपम खेर यांना हिंदी चित्रपट क्षेत्रातील योगदानाबद्दल प्रतिष्ठानच्या वतीने पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला यशवंत आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टीव्हलचे संचालक डॉ. जब्बार पटेल उपस्थित होते. या चित्रपट महोत्सवात विविध देशातील सुमारे ७५ निवडक चित्रपट दाखविण्यात आले. या चित्रपट महोत्सवाच्या उद्‌घाटन प्रसंगी श्री. तौफिक कुरेशी यांचा दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या चित्रपट महोत्सवात केंद्रातील मुख्य सभागृह, रंगस्वर सभागृह व सांस्कृतिक सभागृहात डीसीपी, ब्ल्यू रे, डीव्हीडी व डीजीबीटा याद्वारे दिवसाला प्रत्येकी ५ चित्रपट दाखविण्यात आले. महोत्सवाच्या उद्‌घाटन प्रसंगी पुणे फिल्म फेस्टीव्हलमध्ये प्रथम क्रमाकांने आलेली फिल्म दाखविण्यात आली. चित्रपट महोत्सवात ग्लोबल सिनेमा ४०, रिट्रॉस्पेक्टिव्ह ५, कंट्री फोकस ७, इंडियन सिनेमा ५, मराठी सिनेमा ५, स्टुडंट कॉम्पिटीशन १० दाखविण्यात आले. याशिवाय यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई ने निर्माण केलेली मा. चव्हाणसाहेबांच्या जीवनावरील चित्रपट 'यशवंतराव चव्हाण : बखर एका वादळाची' या चित्रपटाने महोत्सवाचा शेवट करण्यात आला.

५.२ **मा. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मघर देवराष्ट्रे, तालुका कडेगांव, जिल्हा सांगली:-** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागामार्फत मा. यशवंतराव चव्हाण यांच्या देवराष्ट्रे, तालुका कडेगांव, जिल्हा सांगली येथील जन्मघर प्राचीन व ऐतिहासिक स्मारक असल्याचे घोषित केलेले आहे. या स्मारकाची यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईने महाराष्ट्र वैभव राज्य संरक्षित स्मारक संरक्षण योजने अंतर्गत पालकत्व घेण्याबाबत शासनाच्या पुरातत्व विभागाकडे विनंती केली. त्यानुसार पुरातत्व विभाग व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांचेमध्ये दिनांक ११.३.२०१३ रोजी करार झालेला आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडून पुरातत्व विभागाच्या निवड समितीवर असलेल्या वास्तुविशारद यांचेकडून आराखडा मागविण्यात आला होता. त्यानुसार मे. गजबर ॲन्ड असोसिएटस यांना आराखडा तयार करण्याबाबत मान्यता देण्यात आली. त्यामध्ये सर्वसाधारण मा. यशवंतरावांच्या जन्मापासून ते उप-पंतप्रधान काळापर्यंतच्या कालावधीची छायाचित्रे लावण्यात आली असून तेथे मा. चव्हाणसाहेबांची भाषणे ऐकविण्यात येत आहेत. या ऐतिहासिक स्मारकाचे उद्‌घाटन प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते दि. २६ जून २०१४ रोजी झाले.

त्यापूर्वी दिनांक २४ जून २०१४ रोजी दुपारी चार वाजता यशवंतराव चव्हाण ग्रंथालय, देवराष्ट्रे येथे नवीन इमारतीचे उद्‌घाटन प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे यांच हस्ते करण्यात आले. या प्रसंगी ग्रंथालयात 'ग्रंथाली' मुंबई यांनी दि. २४

जून ते २६ जून २०१४ पर्यंत भव्य ग्रंथप्रदर्शन आयोजित केले होते. या कार्यक्रमाला देवराष्ट्रे येथील सरपंच, उपसरपंच, शाळेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक तसेच गांवातील प्रतिष्ठीत व्यक्ती व नागरिक, विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते. या ग्रंथप्रदर्शनात ही पुस्तके सवलतीच्या दरात विक्रीसाठी उपलब्ध केली होती.

दि. २५.६.२०१४ रोजी देवराष्ट्रे व पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी स्मारकात विद्यार्थ्यांना देणेसाठी प्रतिष्ठानच्या वतीने स्पर्धा परीक्षेच्या पुस्तकांचे दोन संच मा. सरचिटणीस श्री. शरद काळे यांच्या हस्ते स्मारकास भेट देण्यात आली. या पुस्तकांचा लाभ देवराष्ट्रे व पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांनी घ्यावा असे मा. सरचिटणीसांनी सूचित केले.

दि. २६ जून २०१४ रोजी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या देवराष्ट्रे येथील जन्मघराचे उद्‌घाटन प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सिक्कीमचे राज्यपाल श्री. श्रीनिवास पाटील, वनमंत्री श्री. पतंगराव कदम, गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील, ग्रामविकास मंत्री श्री. जयंत पाटील, सहकार मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील, पाटबंधारे मंत्री श्री. शशिकांत शिंदे, कामगार मंत्री श्री. हसन मुश्रीफ, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष अरुण गुजराथी, कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे, सरचिटणीस श्री. शरद काळे, श्री रावसाहेब शिंदे, आमदार श्री बाळासाहेब पाटील उपस्थित होते. या संस्मरणीय कार्यक्रमास जवळ जवळ ८००० लोक उपस्थित होते. याप्रसंगी श्री. मोहनराव कदम, श्री. पृथ्वीराज देशमुख व श्री. अरुण लाड व श्री. बाबासाहेब शिंदे यांनी कार्यक्रमाला मोलाची मदत केली.

५.३ **ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा - २०१४:-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्यातर्फे दरवर्षी ऑक्टोबरमध्ये एका विशिष्ट क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघटनांच्या व फेस्कॉमच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा केंद्र इमारतीच्या मुख्य सभागृहामध्ये आयोजित केला जातो. त्या मेळाव्यामध्ये दोन पुरुष व दोन महिला ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात येतो. सत्काराचे स्वरुप शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व गौरव पत्र असे असते. तसेच प्रवासासाठी रु.१५००/- दिले जातात. सत्कार समारंभाच्या आधी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. कार्यक्रम सर्वसाधारणपणे सकाळी ९.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत चालतो. त्यानुसार यावर्षी रविवार दि. १६ नोव्हेंबर २०१४ रोजी चव्हाण केंद्रामध्ये कुलाबा ते माहिम - सायन या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघटनांचा मेळावा भरविण्यात आला. मेळाव्याचे अध्यक्ष श्री. शरद काळे हे होते व प्रमुख अतिथी म्हणून मा. श्रीमती नीला सत्यनारायण उपस्थित होत्या. अंदाजे ४०० पेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिक मेळाव्याला उपस्थित होते.

सत्कारासाठी महिला व पुरुष ज्येष्ठ नागरिकांनी आपले अर्ज पाठविले होते. सरचिटणीस श्री. शरद काळे व विश्वस्त श्री. बी. के. अग्रवाल यांच्या समितीने सत्कारासाठी खालील दोन पुरुष ज्येष्ठ नागरिक व दोन महिला ज्येष्ठ नागरिक यांची निवड केली. त्यानुसार त्या ज्येष्ठ नागरिकांचा समारंभामध्ये सत्कार करण्यात आला.

**पुरुष ज्येष्ठ नागरिक**

१. श्री. नंदकुमार वि. सोनसुरकर, माहिम, मुंबई

२. श्री. भास्कर शंकर रोकडे, चुनाभट्टी, मुंबई

**महिला ज्येष्ठ नागरिक**

१.श्रीमती अश्विनी अंकुश गावडे, सातरस्ता, मुंबई

२. सौ. माधवी सदानंद आपटे, दादर (पश्चिम), मुंबई

अर्ज केलेल्या अनेक महिला व पुरुष ज्येष्ठ नागरिकांचे काम चांगले व स्पृहनीय होते. परंतु वयाची ज्येष्ठता व कामाची व्यापकता आणि सातत्य लक्षात घेऊन नावांची निवड करण्यात आली होती. सत्कार हा समाजातर्फे ज्येष्ठ नागरिकांचा केलेला कृतज्ञतेचा नमस्कार आहे. अनेक लोक चांगले काम करतात त्यातूनच निवड करावी लागते. निवड करणे म्हणजे इतरांना नाकारणे नव्हे, त्या नावांचा विचार पुढील वेळीही केला जाऊ शकतोच अशी प्रतिष्ठानची धारणा आहे.

६. **यशवंतराव चव्हाण माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनी :-**

अॅकेडमीने नवीन सुरु केलेल्या कोर्सेसचा विद्यार्थ्यांना चांगला उपयोग झाला. प्रबोधिनीमध्ये सी-डॅक पुणेचे मान्यताप्राप्त अभ्यासक्रम (कोर्सेस) चालतात. यातील कांही कोर्सेस पूर्णतः प्रोग्रॅमिंग कोर्सेस आहेत. त्याचप्रमाणे DIT आणि DMC सारखे मुलभूत संगणकीय कोर्सेसही आहेत.

यावर्षी अॅकेडमीने विद्यार्थ्यांच्या पसंतीचे आणि आवडीचे उपक्रम हाती घेतले. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १० वी आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी खास उन्हाळी सुट्टीचे वर्ग आयोजित करण्यात आले. उन्हाळी सुट्टीच्या हया वर्गांना विद्यार्थ्यांचा चांगलाच प्रतिसाद मिळाला. ब-याच विद्यार्थ्यांनी मुलभूत संगणक आणि मुलभूत मल्टिमिडीया कोर्सेसमध्ये भाग घेतला. मूलभूत प्रशिक्षणाच्या अंतर्गत विद्यार्थ्यांनी संगणकाची सामान्य माहिती त्याचप्रमाणे Microsoft Windows (MS. Word, MS Excel, MS Power Point, MS Access etc.) व इंटरनेटची माहिती दिली जाते. कांही विद्यार्थ्यांनी त्यांच्या कल्पनाशक्ती आणि कल्पकतेचा वापर होईल या उद्देशाने मुलभूत मल्टिमिडीया कोर्सची निवड केली. हया कोर्समध्ये Graphic Designing, Print Media. Web and Animation हे घटक वर्ग घेतले गेले.

वरील प्रमाणेच प्राथमिक शाळा विद्यार्थ्यांकरिता सुध्दा वेगवेगळे संगणकीय शिक्षण व उपक्रम राबविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार काही खास वर्ग पुढीलप्रमाणे भरविण्यात आले. (१) Advanced MS Excel (२) Advanced MS. Power Point (३) Computerized Accounting व इतर. संगणकाचा वापर सहज आणि सोपा करुन दाखवण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांच्या खास वर्गाचे आयोजन केले गेले. इंटरनेटचा वापर त्याचप्रमाणे रेल्वे रिझर्व्हेशन, पेन्शन, Online Chat, सोशल नेटवर्कींग Online ग्रूप बनविणे हया गोष्टी शिकविण्यात आल्या. हा कोर्स लोकप्रिय होण्याचे कारण म्हणजे ज्येष्ठ नागरिकांना कालानुरुप हवा असलेला बदल मिळाला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन लिमिटेड MKCL च्या संयुक्त विद्यमाने नवीन कोर्सेस जून २०१३ मध्ये सुरु केले. MKCL च्या WAVE कार्सेसना चांगला प्रतिसाद मिळाला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने MS-CIT चे कोर्स घेण्यासाठी अधिकृत केंद्र म्हणून मान्यता मिळविली आणि जानेवारी २०१४ पासून आपण MKCL चा MS-CIT कोर्स सुरु केला. शालेय मुलांमध्ये हा कोर्स अतिशय लोकप्रिय ठरला. तसाच तो तरुणांनाही गमला. MKCL च्या अंतर्गत Klic Certificate Courses किंवा Klic Diploma कोर्सना चांगला प्रतिसाद मिळाला. MKCL च्या मदतीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी Practice Test च्या वर्गाचे आयोजन केले. हा उपक्रम साधारण फेब्रुवारी ते मे २०१५ दरम्यान संपन्न झाला.

C-DAC ने मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी मोफत PG-DAC अभ्यासक्रमाची व्यवस्था केली. अॅकेडमीने ती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली. PG-DAC : Post Graduate Diploma in Advanced Computing, C-DAC तर्फे या कोर्सेसमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना AIT ने ट्रेनिंग दिले. या कोर्सेसचे वैशिष्टय म्हणजे हे कोर्सेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च आणि ट्रेनिंग इन्स्टिटयूटकडून राबविण्यात आले. C-DAC आणि BARTI यांच्या विद्यमाने PG-DAC कोर्सची फी रु.८९,०००/- असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च आणि ट्रेनिंग इन्स्टिटयूटच्या विद्यार्थ्यांना ती फी माफ करण्यात आली. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना शिक्षण भत्ता रु.६,०००/- प्रती महिना दिला गेला. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना नोक-या मिळवून देण्याचा उपक्रम अॅकेडमहने चालविला. त्यातील जवळ जवळ सर्व विद्यार्थ्यांना वेगवेगळया कंपनीमध्ये नोकरी मिळाली. PG-DAC कोर्सची फेब्रुवारी २०१५ ची बॅच १९ फेब्रुवारी २०१५ ला सुरु झाली आणि ३० जुलै २०१५ ला संपणार आहे. सप्टेंबर ते डिसेंबर २०१४ आणि नोव्हेंबर ते डिसेंबर २०१४ मध्ये Common Admission Test (C-CAT) च्या तयारीसाठी मोफत अभ्यासक्रम देण्यात आला. Certificate Course in Advanced Computer ARTS (CCACA) च्या कोर्सची बॅच ७ मे २०१४ रोजी सुरु झाली असून ७ मे २०१५ ला संपणार आहे. अॅक्सिस बँक कर्मचा-यांकरिता दि. ३ एप्रिल २०१४ रोजी व्याससायिक कार्यशाळा आयोजित केली. लाईफ इन्शुरन्स कार्पोरेशनच्या कर्मचा-यांकरिता नोव्हेंबर आणि डिसेंबर २०१४ मध्ये व्यावसायिक कार्यशाळा आयोजित केली. जानेवारी २०१५ ला आपण Rotary Club च्या संयुक्त विद्यामाने महानगरपालिकेच्या शाळेमध्ये शिकणा-या मुलींना प्रशिक्षण दिले. टाटा कंपनीतर्फे घेतल्या जाणा-या व्यावसायिक परीक्षा आपण आपल्या केंद्रात आयोजित केल्या.

a) JEE Assessment
b MPSC
c) State Bank of India
d) Reserve Bank of India
e) IDBI Bank

वेलटेक या दक्षिणी विद्यापीठाद्वारे एम. टेक च्या अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा सी-डॅक तर्फे आपल्या केंद्रात दि. २५ जून २०१४ रोजी आयोजित करण्यात आली.

प्रशांत धोर्डा, व्हाईस प्रेसिडंट, Tech Unido Software Pvt. Ltd., यांचे व्याख्यान "IT INDUSTRY ENVIRONMENT" या विषयावर दि. २२.५.२०१३ ला आयोजित केले होते. या व्याख्यानात विद्यार्थ्यांना "How to crack JAVA Interview" या या विषयावर माहिती देण्यात आली. AIT च्या सर्व विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला. त्याचप्रमाणे HR of Kewle Tech कंपनीचे प्रमुख अतिथी श्री. निलेश मीर व्याख्यानमालेसाठी २८ नोव्हेंबर २०१४ ला उपस्थित राहिले व त्यांनी व्याख्यानात विद्यार्थ्यांना "How to crack HR Interview" या विषयाची मांडणी केली.

Android Technology ची मोफत एक दिवसीय कार्यशाळा Bhavan College, ARMIET College, Asangaon, Dnyansadhana Colege, Thane, ivekanand College, Chembur, LaLIT College, Badlapur डिसेंबर २०१४ आणि जानेवारी २०१५ ला घेण्यात आली. कॉलेजमध्ये दि. १९ व २० जानेवारी २०१५ या दोन दिवसात ची कार्यशाळा घेण्यात आली.

S.I.W.S. कॉलेजमध्ये दि. १९ व २० जानेवारी २०१५ या दोन दिवसात Android Technology ची कार्यशाळा घेण्यात आली.

PG-DAC च्या विद्यार्थ्यांसाठी दि. २४ ते २६ जानेवारी २०१५ च्या दरम्यान Business Intelligence Using Oracle Reports and Graphics चे प्रशिक्षण आयोजित केले. विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. महिलांसाठी विशेष प्रशिक्षण मार्च २०१५ ला आयोजित करण्यात आले. महिलांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

गरजू आणि अपंग विद्यार्थ्यांना माफक दरामध्ये शिक्षण उपलब्ध करुन देण्याची संधी AIT ने दिली. अनेक कोर्सेसमध्ये अशा प्रकारच्या विद्यार्थ्यांना पडताळणीनंतर माफक दरात प्रवेश देण्यात येतो. AIT (YCP) तर्फे लष्कर आणि पोलीस खात्यातील व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय यासाठी फीमध्ये सवलत दिली जाते. इच्छुक आणि शैक्षणिक पात्रता असणा-या विद्यार्थ्यांसाठी हप्त्याने फी भरण्याची सुविधा देण्यात येते. AIT तर्फे PG DAC कोर्ससाठी मोफत कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. जे विद्यार्थी हा कोर्स उत्तीर्ण झाले. त्यांना नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. AIT मध्ये माहिती तंत्रज्ञान अंतर्गत भरतीसाठी आलेल्या कांही कंपनींची नांवे खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| • C-DAC Mumbai | • KPIT Technologies |
| • Mu-sigma | • Amdocs |
| • Rediff | • Manhattan |
| • IGate Patni | • 3DPLM |
| • L & T Infotech | • 3i Infotech |
| • NOKIA (HERE) | • Cybage |
| • Saint Gobain | • M Phasis |
| • Axis Bank | |

पुढील कार्यक्रमाचा आराखडा.

अ) डॅक बॅचच्या विंद्यार्थ्यांसाठी सहलीचे आयोजन.

ब) नवीन आर्टस बॅचची घोषणा व अंमलबजावणी

क) इंजिनिअरिंग कॉलेजेसमध्ये निशुल्क कार्यशाळा व भाषणे

ड) MKCL चा Klic कोर्स मोठया प्रमाणावर प्रचलित करणे व चालविणे हा पार्ट टाईमा कोर्स विद्यार्थ्यांना अतिशय उपयुक्त कारकीर्द देऊ शकतो.

AIT मध्ये २०१४-१५ या वर्षात खालील कोर्सेस घेण्यात आले.

a) C-Dac Courses = 20
b) MKCL Courses = 20
c) Corporate Training = 05
d) YCP Courses = 38

**उद्देश:** वेगवेगळया मार्गाने व कार्यक्रमाद्वारे तसेच इतर संस्थांच्या सहाय्याने अधिकाधिक संगणकीय प्रशिक्षणे चालविणे.

## ७. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर कार्यक्रम/उपक्रम:

७.१ **प्रथम - मुंबई शिक्षण उपक्रम:** मुंबईत शहरात झोपडपट्टीवासियांच्या मुलांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून बालवाडया चालविणे, संगणकांचे प्रशिक्षण देणे, झोपडपट्टीतील स्थानिक रहिवाशांमधून उपक्रमाकरिता शिक्षक - शिक्षिका तयार करणे इत्यादी महत्वपूर्ण कामे प्रथम - मुंबई शिक्षण उपक्रम मार्फत डॉ. माधव चव्हाण व श्रीमती फरिदा लांबे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठया प्रमाणावर केली जातात. संस्थेच्या उपक्रमास प्रतिष्ठानकडून सहकार्य करण्यात येते. या संस्थेस प्रतिष्ठाने केंद्र इमारतीच्या चौथ्या मजल्यावर जागा दिली आहे.

७.२ **युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स:** युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या भारतीय विभागाचे सहकार्य प्रतिष्ठानच्या उपक्रमांना लाभत असून महाराष्ट्रातील व्यापार, उद्योग व सहकार या सामाजिक क्षेत्रांच्या भरीव वृध्दीसाठी ते फार महत्वाचे आहे. युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स इन इंडियाद्वारे निरनिराळया क्षेत्रात प्रकल्प उभारण्यासाठी आर्थिक मदत कशी उपलब्ध करुन घेता येईल, याची माहिती प्रसिध्द केली जाते. या संस्थेस प्रतिष्ठानने केंद्र इमारतीच्या तिस-या मजल्यावर जागा दिली आहे.

७.३ **महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ:** महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ या संस्थेची स्थापना प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी सन १९५७ मध्ये केली. ही संस्था महाराष्ट्राचा आर्थिक व औद्योगिक विकास वेगाने आणि संतुलितपणे होण्यासाठी संशोधनाचे कार्य करते. महाराष्ट्रामध्ये उद्योग सुरु करण्यासाठी इच्छुक असणा-या उद्योजकांना सांख्यिकीय माहिती पुरविणे, योग्य निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयांची माहिती देणे, चिकित्सक पध्दतीने अधिकृत आकडेवारी पुरविणे तसेच महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या उद्योगसंधीविषयी माहिती देण्याचे काम ही संस्था करते. संस्थेतर्फे उद्योजकांसाठी परिसंवाद, परिषदा व कार्यशाळा आयोजित केल्या जातात. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व सदरची संस्था परस्पर सहकार्याने काम करतात. या उपक्रमासाठी महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाला केंद्र इमारतीतील तिस-या मजल्यावरील जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

७.४ **बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाउंडेशन (बॉम्बे फर्स्ट):** बॉम्बे फर्स्ट ही संस्था बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रिज आणि बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाउंडेशन या संस्थांच्या पुढाकाराने व औद्योगिक / वाणिज्य क्षेत्रातील अनेक आस्थापनांच्या आर्थिक पाठबळावर १९९५ मध्ये अस्तित्वात आली. या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट मुंबई शहरातील वाढत्या लोकसंख्येचे आव्हान स्वीकारुन येथील पायाभूत सुविधामध्ये विकास करुन नागरिकांच्या राहणीमानाची पातळी उंचावणे, काम करण्याच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे आणि भांडवली गुंतवणूकदारांना आकर्षित करणे हे आहे. मुंबई शहराच्या विविध

प्रश्नांवर विचार करण्यासाठी शासन, महानगरपालिका व इतर स्वयंसेवी संस्था यांचे समन्वयक म्हणून ही संस्था कार्य करते. संस्थेचा वाढता व्याप लक्षांत घेऊन प्रतिष्ठानने या संस्थेला केंद्र इमारतीतील तिस-या मजल्यावर जागा दिली आहे.

## ८. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई मार्फत देण्यात आलेले अनुदान :-

**८.१ सार्वजनिक उत्सव समिती, नवी दिल्ली:-** सार्वजनिक उत्सव समिती, नवी दिल्ली ही संस्था मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रत्येक वर्षी नवी दिल्ली येथे यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह कार्यक्रम आयोजित करीत आहे. यावर्षी मा. चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त दि. ८ व ९ नोव्हेंबर २०१४ रोजी मराठी नाटय महोत्सव दि. १५ ते १७ नोव्हेंबर २०१४ रोजी फिल्म फेस्टीव्हल व दि. २२ व २३ नोव्हेंबर २०१४ रोजी संगीताचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईतर्फे रु.१,००,०००/- इतकी आर्थिक मदत केली आहे.

**८.२ मुंबई विद्यापीठाच्या सिव्हीक्स अँन्ड पॉलिटीक्स विभागाच्या कार्यक्रमास आर्थिक मदत:-** मुंबई विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ सिव्हीक्स अँन्ड पॉलिटिक्स विभागाकडून आयोजित केलेल्या परिसंवदास आर्थिक मदत मुंबई विभागाकडून दि. १८.९.२०१४ ते २०.९.२०१४ पर्यंत विद्यानगरी, सांताक्रूझ, मुंबई येथे 'इंडियाज नॅशनल सेक्युरिटी : की कन्सर्न अँन्ड ब्रॉड पॉलिसीज' या परिसंवादासाठी प्रतिष्ठानने रु.१,००,०००/- अनुदान दिले. मार्शल ऑफ इंडियन एअर फोर्स श्री. अर्जन सिंग यांना यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१२ साली देण्यात आला. परंतु श्री. सिंग यांनी या पुरस्काराची रक्कम प्रतिष्ठानला परत केली. ती रक्कम प्रतिष्ठानने गुंतवणूक केली. त्यावर येणा-या व्याजातून दरवर्षी 'संरक्षण व सुरक्षा' यावर एक व्याख्यान आयोजित केले जाते. परंतु सन २०१३ मध्ये अशाप्रकारचे व्याख्यान आयोजित केले नसल्यामुळे मुंबई विद्यापीठाने वरील परिसंवाद आयोजित केला होता. त्याला वरील रक्कम अनुदान म्हणून दिली.

**८.३ महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांचे समग्र साहित्य इंटरनेटवर उपलब्ध:-** महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांचे समग्र साहित्याची एकूण ५२९० इतकी पाने आहेत. त्यांचे हे साहित्य दुर्मिळ संदर्भ ज्ञान हया निकषांवर आजही अत्यंत उपयुक्त आहे. अशी वैशिष्टयपूर्ण पार्श्वभूमी असलेले महर्षि शिंदे यांचे समग्र साहित्य संकेतस्थळावर युनिकोड तंत्राने डिजिटल मजकूराच्या स्वरुपात संकलित करुन virashinde.com या संकेतस्थळावर प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी दिनी दि. २५ नोव्हेंबर २०१४ रोजी उपलब्ध केले आहे. महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांनी सन १९२० ते १९४० या काळात लिहिलेली व आज दुर्मिळ झालेली पुस्तके मिळणे कठीण होते. ती पुस्तके डॉ. गो. मा. पवार यांच्या संग्रही होती. ती त्यांनी संकेतस्थळावर उपलब्ध करण्यासाठी दिली. तसेच महर्षि शिंदे हे रोजच्या रोज स्वहस्ताक्षरात रोजनिशी लिहित असत ती रोजनिशी डॉ. पवार यांच्याकडे होती. प्रतिष्ठानच्या विनंतीनुसार ती रोजनिशी त्यांनी संकेतस्थळावर उपलब्ध करण्यासाठी दिली. त्यानिमित्त डॉ. पवार यांचा सत्कार करण्यात आला.

**८.४ 'सेंटर फॉर इंटरनॅशनल स्ट्रॅटेजिक अँन्ड डेव्हलपमेंट स्टडीज' मुंबई शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या परिसंवादास आर्थिक मदत:-** 'सेंटर फॉर इंटरनॅशनल स्ट्रॅटेजिक अँन्ड डेव्हलपमेंट स्टडीज', मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या १२५ व्या जन्मदिनानिमित्त 'रिव्हीजिटींग पंडित जवाहरलाल नेहरु' या विषयावर दि. १६ व १७ फेब्रुवारी २०१५ रोजी दोन दिवस राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आला होता त्यास प्रतिष्ठानने रु.१,००,०००/- अनुदान दिले.

**८.५ मराठी अभ्यास केंद्र, ठाणे यांच्या वतीने सीमा आंदोलनाचे दस्तवंजीकरण करुन त्या आधारे या विषयावर पुस्तक आणि माहितीपट तयार करण्यासाठी प्रतिष्ठानकडून अनुदान:-** मराठी अभ्यास केंद्र, ठाणे यांच्या वतीने सीमा आंदोलनाचे दस्तवंजीकरण करुन त्या आधारे या विषयावर पुस्तक आणि माहितीपट तयार करण्यासाठी मराठी अभ्यास केंद्र, ठाणे या संस्थेला प्रतिष्ठानने रु.१,००,०००/- अनुदान दिले आहे. त्यांच्याकडून अहवाल प्राप्त व्हावयाचा आहे.

## ९. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या विभागांमार्फत झालेले कार्यक्रम / उपक्रम :-

### ९.१ कृषी व सहकार व्यासपीठ पुणे:-

प्रतिष्ठानच्या कृषी व सहकार व्यासपीठाचे कामकाज पुणे केंद्राचे अध्यक्ष श्री. अजित निंबाळकर, सचिव श्री. अंकुशराव काकडे व खजिनदार श्री. शांतिलाल सुरतवाला यांचे मार्गदर्शनाखाली चालते. कार्यालयीन कामकाज संयोजक श्री. शं. त्रिं. भिडे तसेच हिशोबनीस श्री. सुनिल कदम व श्री. रवि सरनाईक पाहतात.

**१.१ सहकारी गृहनिर्माण संस्था मॅन्युअलमध्ये ९७ व्या घटना दुरुस्तीनिमित्त बैठक:-** सहकारी हौसिंग सोसायटीज मॅन्युअलमध्ये ९७ व्या घटना दुरुस्तीचे अनुषंगाने काय सुधारणा कराव्यात यासाठी ८ सदस्यांच्या समितीस कृषी व सहकार व्यासपीठाने आपल्या शिफारशी पाठवाव्यात अशी विनंती सदर समितीचे सदस्य ॲडव्होकेट जयंत कुलकर्णी यांनी केली होती. त्यास अनुसरुन व्यासपीठाची सभा बुधवार दि. १६ एप्रिल २०१४ रोजी घेण्यात आली. त्यावर चर्चासत्रात विचारविनिमय करुन मॅन्युअलमध्ये करण्याच्या दुरुस्त्या / शिफारशी याबाबतचा प्रस्ताव मा. सहकार आयुक्तांना तसेच या विषयासाठी गठीत केलेल्या समितीचे अध्यक्ष श्री. रसाळ, विभागीय सहनिबंधक, इंडिया हाऊस, मुंबई यांना श्री. अंकुशराव काकडे यांचे सहीने दि. २६ एप्रिल २०१४ रोजी सादर केला.

दि. १६.४.२०१४ च्या चर्चेत मोकळया जागा ताबा चर्चेच्या वेळी सातारा जिल्हयातील संस्थांच्या कांही मोकळया जागेचा ताबा महसूल खात्याने ७/१२ वर नोंद करुन खात्याच्या नावावर परस्पर चढवलेची तक्रार केली. त्याबाबत माजी आयुक्त श्री. रत्नाकर कुलकर्णी यांचा सल्ला घेऊन योग्य त्या कारवाईसाठी सातारा जिल्हा हौसिंग सोयायटी फेडरेशन यांना कळविले.

**१.२ सहकारी ई निवडणूका:-** सहकारी संस्थांच्या निवडणूकांमध्ये व्होटींग मशिनचा उपयोग करण्याच्या दृष्टीने दि. २७ ऑगस्ट २०१४ चे पत्राने शासकीय इंजिनिअरिंग कॉलेज, पुणे यांनी तयार केलेल्या व्होटींग मशिन्सचा उपयोग करण्यासंबंधीचा एक प्रस्ताव श्री. मधुकरराव चौधरी, सहकार निवडणूक आयुक्त यांना केंद्रातर्फे सादर करण्यात आला आहे. त्यास अनुसरुन डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे, संचालक, शासकीय इंजिनिअरिंग कॉलेज पुणे यांचे वतीने डॉ. आहोळ, सहकार निवडणूक आयुक्त, सचिव सहकार निवडणूक प्राधिकरण श्री. जोगदंड, सहनिबंधक सहकारी संस्था, श्री. वाडेकर, व्यासपीठाचे श्री भिडे व ५ संबंधित विद्यार्थी यांची एक बैठक शासकीय इंजिनिअरिंग कॉलेज, पुणे यांचे कॉन्फरन्स रुममध्ये दि. ११.९.२०१४ रोजी भरली होती. ज्या विद्यार्थ्यांनी व्होटींग मशिन्स तयार केली आहे. त्यांनी व्होटींग मशिन्सचे बैठकीतील सदस्यांना प्रात्यक्षिक दाखवून सदर मशिन्समध्ये शासनाचे जनरल इलेक्शनमध्ये वापरण्यात येणा-या मशिनपेक्षा जास्त कोणत्या सुविधा आहेत त्या दाखविल्या. मा. सहकार निवडणूक आयुक्त यांनी आता त्यामध्ये कांही सुधारणा सुचविल्या. श्री. भिडे यांनीही सदर मशिनमध्ये आधार कार्डाची माहिती भरुन मतदाराची ओळख स्वतःच तपासू शकतील अशी व्यवस्था करणेस सुचविले. जेणेकरुन निवडणूक यंत्रणेसाठीचे मनुष्यबळ मोठया प्रमाणावर कमी होवू शकेल आणि निवडणूकीतील गैरप्रकारांना मोठया प्रमाणात आळा बसू शकेल. तसेच निवडणूक खर्चही मोठया प्रमाणात कमी होण्यास मदत मिळू शकेल. आता शासन अशा प्रकारे मतदार याद्या व आधारकार्ड यांची जोडणी करणेचे कामास चालना देत असल्याचे दिसते.

**१.३ सहकारी संस्था निवडणूक नियम २०१३:-** शासनाने ९७ व्या घटना दुरुस्तीचे अनुषंगाने सहकारी निवडणूक प्राधिकरणाची तरतूद सहकारी संस्था कायदा दुरुस्ती दि. १४.२.२०१३ ने करण्यात आली. त्या अनुषंगाने सहकारी संस्था निवडणूक नियम दि. २६.८.२०१३ चे राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले होते. त्या अनुषंगाने शासनास अलहिदा सादर केलेल्या त्याबाबत दुरुस्तीच्या प्रस्तावाची एक प्रत श्री. अंकुशराव काकडे, सचिव यांचे सहिने मा. सहकार निवडणूक आयुक्तांना पाठविण्यात आली होती. त्यामध्ये निवडणूक नियमात ८२ सुधारणा (दुरुस्त्या) सुचविल्या आहेत. त्यावर निवडणूक आयुक्त यांचे सूचनेनुसार त्यांचेशी व सर्वश्री ओऊळकर, वाडेकर, खडके इ. सहकार खात्यातील अधिका-यांशी चर्चा करण्यात आली.

**१.४ सहयोगी सभासद आणि सहसभासद:-** वरील विषयाबाबत शासनाने सहयोगी सभासद (Associate Member) आणि सहसभासद (Joint Member) याबाबत शासनाचा आणि मा. सहकार आयुक्त कार्यालयाचा गैरसमज झाल्यामुळे सहकारी हौसिंग संस्थांना येण-या अडचणींचा पाढा हौसिंग मॅन्युअलसाठी व्यासपीठाने घेतलेल्या सभेत जिल्हा सहकारी हौसिंग फेडरेशन, नवी मुंबई व अन्य फेडरेशन यांनी दि. १६.४.२०१४ मध्ये वाचला. त्यांचे अडचणीचा आढावा मा. सहकार आयुक्तांनी काढलेले परिपत्रक क्र. गृह/डी-३/हौसिंग मॅन्युअल/तरतूद वगळणे/२०१३, दि. २४.१२.२०१३ यातील सहसभासदांची तरतूद सहकारी कायदा कानूनमध्ये ९७ घटना दुरुस्तीनंतर कोठेच नाही अशा प्रकारचा शासनाचा चुकीचा समज आणि प्रत्यक्षात सहकारी संस्था नियम १६५(२)चा(९) मधील त्याबाबत स्पष्टपणे असलेली तरतूद व त्याचा सहकारी संस्था नियम क्र. २० शी असलेला संबंध इत्यादी बाबतचा व्यासपीठाचा दृष्टीकोन मा. सहकार आयुक्त श्री. मधुकरराव चौधरी यांना पत्र क्र.यचप्र/कृवस, दि. १९.४.२०१४ ने सादर करण्यात आला आहे. याबाबतची सूचना खात्याने न ऐकल्याने सदर विषय आता नव्याने स्थापन झालेल्या सहकार परिषदेकडे घेण्यात येणार आहे.

**१.५ बॉटल गार्डनिंग स्पर्धा:-** कृषी व सहकार व्यासपीठ, वनराई व नित्यूंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान यांचे संयुक्त विद्यमाने बॉटल गार्डनिंग स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये करण्यात आले होते. यासाठी रेणुकास्वरुप प्रशालेच्या शिक्षिका सौ. प्रज्ञा पवार यांनी शिक्षक व शिक्षिकांना दि. २२.८.२०१४ रोजी एका हॉलमध्ये मार्गदर्शन केले त्यावेळी भिडे प्रतिष्ठान तर्फे १०० शाळांना बियाणांचे वाटपही करण्यात आले. दि. १९.१२.२०१४ रोजी वनराईचे सभागृहात या स्पर्धा पार पडल्या. परीक्षक म्हणून वनराईचे सचिव श्री. गोमरकर व आणंद कृषी विद्यापीठाचे पहिले गोल्ड मेडॅलिस्ट प्रा. प्र. त्र्य. पंडीत यांनी परीक्षक म्हणून काम केले. या स्पर्धेमध्ये अनेक शाळातील १००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यशस्वी शाळांना नित्यूंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानतर्फे रु.५,०००/- ची रोख पारितोषिके वाटण्यात आली.

**१.६ कृषी व्याख्याने व चर्चासत्रे:-** बळीराजा शेतकरी मंडळाच्या सहकार्याने प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी कृषी विषयावरील व्याख्याने व्यासपीठाच्या पुणे कार्यालयात आयोजित करण्यात येतात.

| तारीख | विषय | वक्ता |
|---|---|---|
| ५.४.२०१४ | बदलत्या हवामानाचा कृषी क्षेत्रावर होणारा परिणाम | डॉ. साबळे, माजी हवामान शास्त्रज्ञ, कृषी खाते |
| ३.५.२०१४ | आंबा लागवडीची अडचण व त्यावर उपाय | डॉ. भुजबळ |
| ७.६.२०१४ | औषधी वनस्पती | डॉ. खासेराव गलांडे |
| ५.७.२०१४ | जल शुध्दीकरणाचे नवे तंत्रज्ञान व जल जागृती | श्री. गोपाळ जोशी |
| २.८.२०१४ | ब्राझिलचे शेतकरी | श्री. प्र. बा. भोसले |
| ६.९.२०१४ | शेतक-यांच्या आत्महत्त्या | डॉ. प्रतिमा इंगोळे |
| ४.१०.२०१४ | जे. एम. पिके, शेतक-यांसाठी व ग्राहकांसाठी साधक की बाधक? | श्री. अजित नागेंद्र नरदे |
| ८.११.२०१४ | नॅशनल डेअरी योजना | डॉ. रामनाथ सडेकर (कर्नल डेअरी प्रोजेक्ट) |
| ६.१२.२०१४ | दाभोळकर प्रणीत परिवार पध्दती | श्री. प्रभाकर ठाकूर |
| ३.१.२०१५ | शेतीतील अंधश्रध्दा, शेतीसाठी शास्त्रीय विचार | श्री. मनोहर खके |
| ७.२.२०१५ | सेंद्रिय शेती काळाची गरज | श्रीमती वसुंधरा सरदार |
| ७.३.२०१५ | केंद्राचा भूमी अधिग्रहण कायदा महर्षी वाल्मिकी मंदिर वाल्हे | श्री. शं. त्रिं. भिडे यांचा प्रबंध वाचन व चर्चा |

**१.७ सहकारी संस्था निवडणुका:-** या विषयावर दि. २ जानेवारी २०१५ रोजी एक चर्चासत्र आयोजण्यात आले. त्यातील चर्चेस अनुसरुन श्री. अंकुश काकडे यांचे स्वाक्षरीने खालील प्रस्ताव मा. सहकार निवडणूक आयुक्त श्री. मधुकरराव चौधरी, भा.प्र.से. यांना सादर केला.

१) क व ड वर्गातील आर्थिकदृष्टया कमजोर संस्थांना निवडणूक फी माफीची तरतुद निवडणूक नियमांत करणे.

२) निवडणुकीच्या क व ड वर्गातील ज्या संस्थांच्या निवडणुका बिनविरोध होतात व गृहनिर्माण संस्थांमध्ये सभासदांना मिनतवारी करुन व्यवस्थापक समितीवर काम करणेसाठी राजी करावे लागते. त्या संस्थांमध्ये वार्षिक साधारण सभेतील वैधानिक लेखा परीक्षकाचे उपस्थितीत वैधानिक लेखा परीक्षकाने शिफारस केलेला बिनविरोध निवडणुकीचा ठराव मान्य व्हावा व त्यापोटी रु.५००/- फक्त निवडणूक निधी फी म्हणून आकारावी.

३) मा. सहकार निवडणूक आयुक्तांचे दि. १५.१.२०१५ चे परिपत्रकीय सूचनामध्ये ड वर्गाने निवडणुकीबाबत कलम १५२-अे चा उल्लेख नाही त्याबाबत मार्गदर्शन व्हावे.

**१.८ ९७ वी घटना दुरुस्ती** :- दि. २ फेब्रुवारी २०१५ रोजी '९७ व्या घटना दुरुस्तीचे सहकारी संस्थांवरील परिणाम' या विषयावर श्री बी. बी. माने, चार्टर्ड अकाऊंटस असोसिएशनचे माजी संयोजक टास्क फोर्स यांचे व्याख्यान आयोजिण्यात आले.

**१.९ मानीव हस्तांतरण स्टॅम्प डयूटी सूट**:- अनेक ठिकाणी व शासकीय कार्यालयातही चौकशी करता योग्य ती माहिती न मिळाल्यामुळे कणकवली, जिल्हा सिंधुदूर्ग येथील सिंधु प्रथमेश को. ऑप. हौसिंग संस्थेने कृषी व सहकार व्यासपीठाकडे चौकशी केली असता शासकीय आदेशांची प्रत संस्थेस उपलब्ध करुन दिली. त्यामुळे संस्थेस एक लक्ष एकतीस हजार एवढी रक्कम स्टॅम्प डयूटी माफ म्हणून मिळू शकली.

**१.१० उपविधी मार्गदर्शन**:- संयोजक, कृषी व सहकार व्यासपीठ यांनी महाराष्ट्र राज्य संवर्गीकरण सहकारी सोसायटी मर्यादित या संस्थेचे उपविधी कशाप्रकारे ९७ व्या घटना दुरुस्तीचे अनुषंगाने दुरुस्त करणेत यावेत याचे मार्गदर्शन सदर संस्थेचे अधिका-यांचे विनंतीस अनुसरुन दिले होते. त्याप्रमाणे सदर उपविधी दि. २९.११.२०१४ रोजी मान्य करण्यात आले आहेत त्याची एक प्रत प्रतिष्ठानला उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**१.११ आक्रोश अन्नदात्याचा**:- 'आक्रोश अन्नदात्याचा' या वैदर्भीय लेखिका डॉ. प्रतिमा इंगोले यांचे पुस्तकावर दि. ११.८.२०१४ रोजी कृषी व सहकार व्यासपीठाने चर्चा आयोजित केली होती. सदर पुस्तक म्हणजे लेखिकेने वेळोवेळी ग्रामीण जीवनातील वेगवेगळया बाजूने व संस्थांवर परखडपणे मांडलेले विचार ॲग्रोवनमध्ये प्रसिध्द झालेला लेखांचा हा संग्रहच आहे. त्यामध्ये शेतक-यांच्या हिताच्या अनेक योजना सुचविल्या आहेत. त्यांचा धांडोळा श्री. भिडे यांनी घेतला. त्यावर झालेल्या चर्चेत श्री. कोकरे, संचालक, कॉसमॉस बँक, श्री. खापरे, माजी व्यवस्थापकीय संचालक, सहकारी साखर कारखाने, आर्किटेक्ट श्री. पांडकर इत्यादी अनेकांनी सहभाग घेतला. समारोपाचे अध्यक्षीय भाषण प्रा. प्र. त्र्यं. पंडीत यांनी केले. त्यात त्यांनी लेखिकेच्या विचारांचे जोरदार समर्थन केले. सदर पुस्तक त्याच दिवशी डॉ. बुधाजीराव मुळीक यांचे हस्ते प्रकाशित झाले तर त्यावर साहित्य परिषदेचे सभागृहात डॉ. विवेक सावंत, मु. का. अधिकारी, महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन यांचे प्रमुख वक्ते म्हणून तर डॉ. विजय भटकर, परम संगणक प्रवर्तक यांचे अध्यक्षीय भाषणही झाले.

**१.१२ व्यासपीठामार्फत प्रसिध्द झालेले लेख**:- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कृषी व सहकार व्यासपीठाचे संयोजक श्री शं. त्रिं. भिडे यांचे सहकार विषयावरील लेख खाली दर्शविलेल्या वार्तापत्रात प्रसिध्द झाले आहेत.

| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | मासिकाचे नांव |
|---|---|---|
| १ | सहकारी संस्था निवडणुका | वास्तुदर्शन मासिक, एप्रिल २०१४ |
| २ | कामावरील महिलांची शोषणमुक्ती | बँकींग आशय अभिप्राय, एप्रिल २०१४ |
| ३ | महाराष्ट्र सहकारी संस्था नियम (दुरुस्ती) | बँकींग आशय अभिप्राय, फेब्रुवारी २०१४ |
| ४ | सहकारी संस्था लेखापरिक्षण कथा आणि व्यथा | महाराष्ट्र को. ऑप. क्रेडीट न्यूज, ऑक्टो.१४ |

| | | |
|---|---|---|
| ५ | सहकारी संस्था निवडणूक कांही यक्ष प्रश्न | बँकींग आशय अभिप्राय, डिसेंबर २०१४ |
| ६ | अडत गुंता कसा सोडवाल | ॲग्रोवन, ३१ डिसेंबर २०१४ |
| ७ | सहकारी संस्था निवडणूक नियम महत्वाच्या तरतुदी | पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक, जानेवारी २०१५ |

## ९.२ महाराष्ट्र महिला व्यासपीठ :-

महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या वतीने महिलांची शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक विविध दृष्टीने सक्षमता वाढावी यासाठी विविध उपक्रम, विविध कार्यशाभ आणि इतर कार्यक्रम यांच्या माध्यमातून कृतीशील प्रयत्न केले जातात. संयोजिका श्रीमती रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका श्रीमती ममता रमेशचंद्र कानडे महिला व्यासपीठाचे काम पाहतात.

**२.१ सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण :-** मुंबई शहरामध्ये २० ते ४० हजार सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. या सर्व संस्थांचे काम चांगले होण्यासाठी शासनाचे कायदे किंवा उपविधी लोकांना माहित असणे आवश्यक आहे. हे लक्षात घेऊन महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे २०१० सालापासून चव्हाण सेंटर, मुंबई मध्ये 'सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण' दिले जाते. या कार्यशाळेला श्री. प्रभाकर चुरी, ॲड. प्रमोद कुमार, श्रीमती देवयानी गोरे, श्री. विजय सामंत व सहकारी क्षेत्रातील इतर मान्यवरांचे मार्गदर्शन मिळते. या कार्यशाळेचे फायदे म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्थेत पूर्णवेळ / अर्धवेळ नोकरी मिळू शकते. तसेच हे प्रशिक्षणार्थी सल्लागार म्हणूनही चांगले काम करु शकतात व आपल्या स्वतःच्या राहत्या सोसायटीत मॅनेजिंग कमिटीत चांगले काम करु शकतात. आतापर्यंत २० ते अगदी ७० वर्षांच्या व ४०० च्या वर प्रशिक्षणार्थींनी हे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. या संदर्भात वेळोवेळी विनामूल्य व्याख्याने आयोजित केली जातात. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| दिनांक | प्रशिक्षण | वक्ते | विषय | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| २.६.२०१४ ते ८.७.२०१४ | सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन वर्ग क्र. ११ | | | २७ |
| १०.९.२०१४ | विनामूल्य व्याख्यान | श्री. प्रभाकर चुरी व श्री. विजय सामंत | प्रास्ताविक व्याख्यान, भाग प्रमाणपत्र, नाम निर्देशन, गाळा हस्तांतरण | १०० |
| १२.९.२०१४ | विनामूल्य व्याख्यान | श्री. चंद्रशेखर प्रभू | जुन्या इमारतींचा पुनर्विकास | ८२ |
| ११.९.२०१४ ते ३१.९.२०१४ | सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन वर्ग क्र. १२ | | | २२ |
| ९.९.२०१४ ते ११.९.२०१४ | ३ दिवसीय विनामूल्य व्याख्यानमाला | श्री. चंद्रशेखर प्रभू | जुन्या इमारतींचा पुनर्विकास | २७५ |
| २७.१.२०१५ ते २.३.२०१५ | सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन वर्ग क्र. १३ | | | २० |
| ७.२.२०१५ ते १५.३.२०१५ (शनिवार/रविवार) | सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन वर्ग क्र. १४ | | | ३८ |

सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन वर्ग क्र. १२ चा प्रमाणपत्र वितरण सोहळा दि. १४.११.२०१४ रोजी संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून निवृत्त सनदी अधिकारी श्री. यशवंत राजवाडे यांची उपस्थिती होती. खास लोकांच्या आग्रहास्तव

प्रथमच शनिवार / रविवार चा वर्ग क्र. १४ आयोजित करण्यात आला. वर्ग क्र. १३ व १४ चा एकत्रित प्रमाणपत्र वितरण सोहळा दि. १८.४.२०१५ रोजी करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. सुधीर गोयल, अतिरिक्त मुख्य सचिव, मंत्रालय यांची उपस्थिती होती. सर्व यशस्वी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र व पहिल्या चार क्रमांकांना रोख बक्षिस असे या पुरस्काराचे स्वरुप असते. या प्रमाणपत्र वितरण सोहळयाचे औचित्य साधून 'मृत्यूपत्र सहज व सुलभ' या विषयावर श्री. मिलींद मुंगळे यांचे व्याख्यान ठेवले होते. ७५ लोकांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला. विषयाची माहिती व प्रश्न उत्तरे असे या कार्यक्रमाचे स्वरुप होते. तसेच व्यासपीठातर्फे रांगोळी, हस्ताक्षरशास्त्र प्रशिक्षण, बोन्साय प्रशिक्षण, पाककला स्पर्धा अशा विविध कार्यशाळा व काव्यसंमेलन, कीर्तन असे सांस्कृतिक कार्यक्रम, मार्गदर्शनपर व्याख्यान वर्षभर राबविले जातात, याचा तपशील खालीलप्रमाणे.

| दिनांक | प्रशिक्षण व कार्यक्रम | प्रशिक्षक/वक्ते | विषय | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| एप्रिल २०१४ ते ऑगस्ट २०१४ | रांगोळी | श्रीमती मंजिरी प्रभुलकर | | १२३ |
| २१ ते २५ जुलै २०१४ | इकेबाना वर्ग ३ | श्रीमती नलिनी डुंगरसी | | १७ |
| १८.८.२०१४ | काव्यसंमेलन | अनुपमा उजगरे, गौरी कुलकर्णी, अनुराधा नेरुरकर, प्रतिभा सराफ, ज्योती कपिले | रुढी, परंपरा, निसर्ग आणि अध्यात्म याचप्रमाणे भावविश्वातील पाऊस | ५० |
| २६.९.२०१४ | हस्ताक्षर शास्त्र विनामूल्य व्याख्यान | श्री. अनल पंडित | | ६५ |
| ८.१०.२०१४ ते २०.१२.२०१४ (७ दिवस) | हस्ताक्षर शास्त्र प्रशिक्षण | श्री. अनल पंडित (महाराष्ट्र महिला व्यासपीठ व इन्स्टिटयूट ऑफ ग्राफलॉजिकल रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने) | | १२ |
| २४.११.२०१४ | कीर्तन | युवा पिढीच्या प्रसिध्द कीर्तनकार प्राची व्यास | स्वतंत्र सत्य समर्थ जीवन जगणारी सीता म्हणजेच जानकीची कथा | ५० |
| १८.१२.२०१४ | महिलांसाठी व्याख्यान (रमाबाई आंबेडकर उद्यान, घाटकोपर) | श्रीमती वीणा यार्दी | आहारातून कुटुंबाचे आरोग्य | २५ |
| ३१.१.२०१५ | विनामूल्य व्याख्यान | श्रीमती ज्योती पारेख | बोन्साय | ६५ |
| ३ मार्च ते ७ एप्रिल (५ दिवस) | बोन्साय प्रशिक्षण | श्रीमती ज्योती पारेख महाराष्ट्र महिला व्यासपीठ व बोन्साय स्टडी ग्रुप ऑफ द इंडो-जापनीज असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने | बोन्साय | १३ |
| ५.३.२०१५ | जागतिक महिला दिनानिमित्त पाककला स्पर्धा व व्याख्यान | श्रीमती वीणा यार्दी, श्रीमती अनुराधा मित्रा, श्रीमती सुनिता जैसवाल व श्रीमती शितल जोशी | धान्य व डाळी यांच्या मिश्रणातून गोड किंवा तिखट पदार्थ, व्याख्यान आहार **हाच आरोग्याचा आरसा** व **फास्ट फूड सकस कसे बनवाल.** | ६० |

२.२ **रांगोळी:-** रांगोळी म्हणजे प्रसन्नता, सकारात्मकता व भारतीय संस्कृतीचे कलात्मक प्रतिबिंब म्हणूनच महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे 'मंजिरीच्या झटपट रांगोळया व रांगोळी काढायच्या सोप्या व विविध पध्दती' या विषयाची कार्यशाळा दि. ५.४.२०१४ रोजी घेण्यात आली. या कार्यशाळेत ४० महिलांचा सहभाग होता. महिलांची आवड लक्षात घेता, महाराष्ट्र महिला व्यासपीठाकडून हीच कार्यशाळा पुन्हा दि. २५.४.२०१४ रोजी घेण्यात आली. या कार्यशाळेला २८ महिलांचा सहभाग होता. या कार्यशाळेच्या दोन वर्गाला मिळालेला भरघोस प्रतिसाद व खास आग्रहास्तव पुन्हा एकदा एकदिवसीय कार्यशाळा दि. ३.५.२०१४ रोजी आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत महिलांचाच नव्हे तर पुरुषांचाही सहभाग होता. या कार्यशाळेला एकूण ३८ प्रशिक्षणार्थींचा चांगला प्रतिसाद मिळाला. दि. २२.८.२०१४ रोजी या कार्यशाळेचे पुन्हा आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला एकूण १७ प्रशिक्षणार्थींचा सहभाग होता.

२.३ **इकेबाना:-** इकेबाना म्हणजे जपानी पध्दतीची फुलांची रचना या विषयावरील कार्यशाळेचा तिसरा वर्ग २१.७.२०१४ ते २५.७.२०१४ या कालावधीत घेण्यात आला. या कार्यशाळेला १५ महिला व २ पुरुष अशा एकूण १७ प्रशिक्षणार्थींचा सहभाग होता. वेगवेगळी फुले व इतर साहित्य वापरुन सजावट कशी करावी व इकेबाना या प्रशिक्षणाचे संपूर्ण मार्गदर्शन Bombay Chapter Ohara School of Ikebana च्या अध्यक्षा श्रीमती नलिनी डुंगरसी यांच्याकडून प्रशिक्षणार्थींना मिळाले. Yashwantrao Chavan Pratishthan व Bombay Chapter Ohara School of Ikebana, Japan यांच्या संयुक्त विद्यमाने इकेबाना ही कार्यशाळा महाराष्ट्र महिला व्यासपीठाकडून सतत राबविली जाते.

**काव्यसंमेलन:-** दि. १८.८.२०१४ रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठ आणि रंगस्वर यांच्या संयुक्त विद्यमाने काव्यरसिकांसाठी काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. रुढी, परंपरा, निसर्ग आणि अध्यात्म याचप्रमाणे भावविश्वातील पाऊस अशा अनेक विषयांतून हे काव्यसंमेलन रंगले या काव्यसंमेलनात अनुपमा उजगरे, गौरी कुलकर्णी, रेखा नार्वेकर, अनुराधा नेरुरकर, प्रतिभा सराफ इ. मान्यवर कवयित्री सहभागी होत्या.

**हस्ताक्षर शास्त्र कार्यशाळा:-** हस्ताक्षरावरुन माणसाचा स्वभाव जाणून घेणे शक्य आहे का ? Graphology हस्ताक्षर शास्त्राच्या साहयाने हे सहजसाध्य होते. माणसाच्या स्वभावाचा प्रत्येक पैलू उलगडून दाखवण्याची क्षमता हया शास्त्रात आहे. तुमच्या मनाच्या गाभा-यात लपलेल्या अनेक गोष्टी उलगडून तुमच्या स्वभावाचे कंगोरे आणि क्षमता जाणून घेण्याची क्षमता या शास्त्रात आहे. दि. २६.९.२०१४ रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठ व इन्स्टिटयूट ऑफ ग्राफलॉजिकल रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने हस्ताक्षर शास्त्र या विषयावर विनामूल्य व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. श्री. अनल पंडित यांचे मार्गदर्शन लाभले. ६५ ते ७० लोकांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला. लोकांच्या खास आग्रहास्तव दि. ८.११.१४ ते २०.१२.१४ या कालावधीत ७ दिवसांचे प्रति दिन ७ तास असे प्रशिक्षण घेतले. १२ प्रशिक्षणार्थींचा यात सहभाग होता.

**कीर्तन:-** महाराष्ट्र महिला व्यासपीठ आणि रंगस्वर आयोजित दि. २४.११.२०१४ रोजी सायं. ६ वाजता रंगस्वर सभागृह, चौथा मजला येथे युवा पिढीच्या प्रसिध्द कीर्तनकार श्रीमती प्राची व्यास यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. गतिमान कालप्रवाहात स्त्रीशक्तीच्या कार्यकर्तृत्वाचे ठसे उमटवणारी, स्वतंत्र - सत्य - समर्थ जीवन जगणारी सीता म्हणजेच जानकीची कथा कीर्तनातून त्यांनी मांडली. अनेक रसिकांनी या कीर्तनाचा लाभ घेतला.

२.४ **जनजागृती कार्यक्रम:-** दि. १८.१२.२०१४ रोजी संध्याकाळी ४.३० वा. रमाबाई कॉलनी, घाटकोपर या ठिकाणी महिलांसाठी एक दिवसीय शिबीर घेण्यात आले. 'आहारातून कुटुंबाचे आरोग्य' या विषयावर व्याख्यान देण्यात आले. निर्मला निकेतन कॉलेज ऑफ होम सायन्स च्या प्राध्यापिका श्रीमती वीणा यार्दी हया प्रशिक्षक म्हणून लाभल्या. २२ ते २५ महिलांनी याचा लाभ घेतला.

२.५ **बोन्साय:-** महाराष्ट्र महिला व्यासपीठ व बोन्साय स्टडी ग्रुप ऑफ द इंडो-जापनिज असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीमती ज्योती पारेख यांचे दि. ३१.१.२०१५ रोजी दुपारी ३ ते ४.३० या वेळेत बोन्साय या विषयावर विनामूल्य व्याख्यान आयोजित करण्यात आले. ६० ते ६५ लोकांची या विनामूल्य व्याख्यानाला उपस्थिती होती. लोकांच्या खास आग्रहास्तव पाच दिवसीय प्रशिक्षण मार्च महिन्यात आयोजित करण्यात आले. १३ प्रशिक्षणार्थींचा यात सहभाग होता. दोन दिवसांचे माहिती सत्र बेसमेंट सभागृहात व प्रात्यक्षिक शिकवणी बाबुलनाथ येथील रोपवाटीकेत झाली.

२.६ **पाककला स्पर्धा:-** जागतिक महिला दिनाच्यानिमित्ताने महाराष्ट्र महिला व्यासपीठ आणि महिला विकास मंडळ, कुलाबा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ५ मार्च २०१५ रोजी खाद्यपदार्थ स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. धान्य व डाळी यांच्या मिश्रणातून गोड किंवा तिखट पदार्थ असे स्पर्धेचे विषय होते. स्पर्धेचा निकष हा पदार्थाचा स्वाद, नावीन्य, पदार्थांचे स्वरुप व मांडणी या गोष्टीवर अवलंबून राहील असे ठरले. निर्मला निकेतन कॉलेज ऑफ होम सायन्स च्या प्राध्यापिका आहारतज्ज्ञ श्रीमती वीणा यार्दी, श्रीमती अनुराधा मित्रा, सुनिता जैसवाल व शितल जोशी यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. तसेच या निमित्ताने दोन मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आली होती. (१) 'आहार हाच आरोग्याचा आरसा' वक्ते श्रीमती वीणा वर्दी व (२) 'फास्टफूड कसे बनवाल' श्रीमती अनुराधा मित्रा. दोन्ही गटातून यशस्वी स्पर्धकांना पारितोषिके देण्यात आली.

## ९.३ नवमहाराष्ट्र युवा अभियान :-

नवमहाराष्ट्र युवा अभियानचे काम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, सहसंयोजक श्री. विश्वास ठाकूर, संघटक श्री. नीलेश राऊत पाहतात. श्री. विजय कान्हेकर आणि सहसमन्वयक श्रीमती वैशाली मोटे या समन्वयक आहेत.

३.१ **नवमहाराष्ट्र युवा अभियान पिनॅकल क्लब आणि गिर्यारोहण कार्यक्रम:-** दि. १६ आणि १७ एप्रिल २०१४ रोजी ओ.एन.जी.सी. अग्निशमन सप्ताहनिमित्त गिर्यारोहण प्रात्यक्षिके करुन दाखविण्यात आली. बांद्रा येथील कार्यालयाच्या उंच इमारतीवरुन ओ.एन.जी.सी.चे कर्मचारी रॅपलिंग करुन खाली उतरले. उपस्थित कर्मचा-यांनी सगळयांचे कौतुक केले. रेल्वे कर्मचा-यांच्या मुलांसाठी तीन दिवसीय साहस शिबीराचे आयोजन करण्यात आले. दि. १४ ते १७ मे २०१४ रोजी लोणावळा येथे झालेल्या या शिबिराचा लाभ सांताक्रूझ येथील ५४ बाल गिर्यारोहकांनी घेतला.

दि. २८.६.२०१४ रोजी गारबेट माथेरान पदभ्रमण मोहीम आयोजित करण्यात आली. त्याचा लाभ ३३ गिर्यारोहकांनी घेतला. दि. ८.७.२०१४ रोजी माहुली किल्ला, दि. १९.७.२०१४ रोजी नॅशनल पार्क, मेन गेट ते कान्हेरी गुंफा पदभ्रमण मोहीम, दि. २७.७.२०१४ रोजी सागरगड, दि. ९.८.२०१४ रोजी नाणेघाट, दि. १७.८.२०१४ रोजी ड्युक नोज (नागफणी) येथे पदभ्रमण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्याचा लाभ एकूण ७९ गिर्यारोहकांनी घेतला. दि. ४.८.२०१४ रोजी जव्हार येथील शाळेला संस्थेतर्फे वहया, पेन्सिल, रबर, पेन आणि गोष्टींची पुस्तके वितरण करण्यात आली.

३.२ **युवा स्वातंत्र्यज्योत रॅली:-** दि. १४ ऑगस्ट २०१४ रोजी स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्र पुरुषाना अभिवादन करण्यासाठी तरुणांमध्ये स्वातंत्र्य दिनाविषयी आदराची जाणीव व जागृती निर्माण व्हावी यासाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नवमहाराष्ट्र युवा अभियान आयोजित युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले. सहभागी तरुण-तरुणींचे व प्रमुख पाहुणे श्री. अजित राणे यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक करताना श्री. विजय कसबे यांनी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीविषयीचे महत्व विषद करण्यात आले. स्वातंत्र्य चळवळीमध्ये स्वातंत्र्य सैनिकांनी दिलेली आहुती, केलेला त्याग याबद्दल माहिती देऊन स्वातंत्र्यदिनाचे अनुभव असलेल्या स्वातंत्र्याचे महत्त्व व त्याचे फायदे सांगण्यात आले. श्री. सुरज भोईर यांनी गायलेल्या 'ये देश है वीरो जवानों का, अलबेलों का मस्तानों का इस देश का यारो क्या कहना....' या जोशपूर्ण गाण्याने रॅली मार्गस्थ झाली.

पुढे मा. प्रबोधनकार ठाकरे यांच्या पुतळयाला पुष्प अर्पण करुन त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेण्यात आला. पुढे सेनापती बापटांचा पुतळा, शिवाजी पार्कातील शिवाजी महाराजांचा पुतळा, सावरकर स्मारकातील स्वातंत्र्यवीर सावरकरांचा

पुतळा यांना अभिवादन करुन तरुण कार्यकर्त्यांनी या महान नेत्यांच्या कार्यकर्तृत्वावर भाषणे केली. पोवाडा गायला गेला. शेवटी चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यात येऊन त्यांच्या कार्याची माहिती श्री. अभिजीत देशमुख यांनी विषद केली. या ठिकाणी भारतीय राज्य घटनेचा सरनामा त्याचे सामुहिक वाचन करण्यात आले. आलेल्या पाहुण्यांचे तरुण-तरुणींचे कार्यकर्त्यांचे आभार मानण्यात येऊन सामूहिक राष्ट्रगीताने रॅलीची सांगता झाली. युवा स्वातंत्र्यज्योत रॅली यशस्वी करण्यासाठी यशवंत सामाजिक केंद्र या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. अकबर काझी यांनी मोलाचे सहकार्य केले. श्री. हनुमंत पन्हाळकर, श्री. राजन डॅनियल, श्री. गोपी यांनी विशेष सहकार्य केले. श्री. उमाकांत जगदाळे, श्री. अभिजीत देशमुख, श्री. मनोज टपाल, श्री. राकेश कांबळे, श्री. राहुल चव्हाण, श्री. दीपक पाटील यांनी दाखविलेला हुरुप वाखाणण्यासारखा आहे. रॅलीमध्ये २०० ते २५० कार्यकर्ते सहभागी झाले होते.

३.३ **दि. २१ ऑगस्ट २०१४:-** नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या वतीने 'चित्रपट चावडी' या उपक्रमात आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेला तसेच ऑस्कर पुरस्काराने सन्मानित असलेला Good will Hunting हा इंग्रजी चित्रपट यशवंतराव चव्हाण सांस्कृतिक सभागृहात सायं.५.०० वा. दाखविण्यात आला.

३.४ **समाज कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग:-** महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण हे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आहेत. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रातील महाराष्ट्राचा थोर वैचारिक वारसा यांनी पुढे नेला. सामान्य माणसांना जागविण्याचे आणि त्यांच्या जागृत संघटीत कर्तृत्वातून आधुनिक महाराष्ट्राची पाया उभारणी करण्याचे महान कार्य त्यांनी केले आहे. त्यांनी दिलेल्या दिशा आणि दृष्टी अनेक पिढयाना मार्गदर्शक ठरणा-या आहेत. त्यांचे हे विचार जनसामान्यापर्यंत पोहोचविण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईची स्थापना करण्यात आली आहे. वरील उद्दिष्टपूर्तीसाठी नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वतीने समाजकार्यकर्ता प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासवर्ग चव्हाण सेंटरमध्ये सुरु करण्यात आलेला आहे. हे वर्ग महिन्याच्या प्रत्येक रविवारी घेण्यात येतात. या कोर्ससचे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता हाताळले जाणारे विषय केवळ वैचारिक अथवा बौध्दिक पातळीवरचे नसून सध्याचे समाजस्थिती लक्षात घेता सदर विषयाची योग्य ती सांगड व्यावहारिक विषयांशी घातली जात आहे. तसेच केवळ ऐकण्यावर भर दिला जाणार नसून प्रशिक्षणार्थीकडून कार्यपाठ आणि प्रात्यक्षिकाच्या स्वरुपात कृती व त्याच्या प्रत्यक्ष सहभागावर भर दिला जातो.

३.५ **यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा सामाजिक पुरस्कार:-** दरवर्षी नवमहाराष्ट्र युवा अभियान, मुंबई यांच्या वतीने राज्यस्तरीय सामाजिक व क्रीडा युवा पुरस्कार दिले जातात. सामाजिक व क्रीडा विभागात एक युवक व एक युवती यांना विशेष कामगिरीसाठी हा पुरस्कार दिला जातो. 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा क्रीडा पुरस्कार' (युवक व युवती) व 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा सामाजिक पुरस्कार' (युवक व युवती) तसेच क्रीडा क्षेत्रातील विशेष कामगिरीबद्दल एक विशेष क्रीडा पुरस्कार दिला जातो व यावर्षीपासून सामाजिक क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल एक विशेष सामाजिक युवा पुरस्कार देण्यात आला असे एकूण सहा पुरस्कार दिले गेले. महाराष्ट्रातील उत्कृष्ट खेळाडूंच्या कार्याचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा आणि प्रोत्साहन मिळावे हे या क्रीडा पुरस्कारांचे उद्दिष्ट आहे. तसेच महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी युवा आंदोलनाच्या क्षेत्रात विधायक व भरीव कार्य करणा-या युवक-युवतीना हा पुरस्कार देण्यात येतो. पुरस्काराचे हे सोळावे वर्ष असून या पूर्वी श्रीमती पल्लवी रेणके, श्रीमती लतिका माने, श्री. वीरधवल खडे, श्रीमती कविता राऊत, श्री. कृष्णा पाटील, श्री. सागर बडवे, श्रीमती तेजस्विनी मुळे, श्री. अमोल बराटे यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. क्रीडा व सामाजिक क्षेत्रात भरीव कामगिरी करुन इतर युवांसमोर एक आदर्श ठेवणा-या युवा वर्गाच्या कर्तृत्वाची दखल घेऊन त्यांना सन्मानित करण्यात येते.

२०१५ सालचा यशवंतराव चव्हाण विशेष युवा क्रीडा पुरस्कार श्री. विदित गुजराथी यांना सर्वात लहान वयातील ग्रँड मास्टर व बुध्दिबळ मधील उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरुप रु.२५,०००/- रोख, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे आहे. २०१५ सालापासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विशेष सामाजिक युवा पुरस्काराची सुरुवात करण्यात आली. यंदाचा पुरस्कार श्रीमती शेवंता बाजीराव राठोड यांना बालविवाह रोखण्यासाठी केलेल्या कार्याबद्दल प्रदान

करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरुप रु.२५,०००/- रोख, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे आहे. या वर्षीचा यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा क्रीडा पुरस्कार या क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल श्रीमती श्रध्दा घुले (लांब उडी आणि तिहेरी उडी) व श्री. अमोल करचे (अंध क्रिकेटपटू) याना तर सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल श्री. संदीप गुंड (शिक्षक, शहापूर, ठाणे) व श्रीमती सुनंदा मांदळे (मुख्य प्रशिक्षक - यशदा राजीव गांधी महिला सशक्तीकरण) यांना यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा सामाजिक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सामाजिक व क्रीडा पुरस्काराचे स्वरुप प्रत्येकी रु.२१,०००/- रोख, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे आहे.

**३.६ नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि पिनॅकल क्लब यांची संयुक्त गिर्यारोहण मोहीम:-** कल्याण येथील शाळेत सप्टेंबर महिन्यात इयत्ता ८, ९ व १०वी च्या विद्यार्थ्यांना गिर्यारोहणत वापरण्यात येणा-या साहित्यांची माहिती देण्यात आली. तसेच शाळेच्या इमारतीतून रॅपलिंग, झुमारिंग आणि रिव्हर क्रॉसिंगचे प्रात्यक्षिके करुन दाखविण्यात आले. दि. ७.९.२०१४ रोजी कर्नाळा, दि. १४.९.२०१४ रोजी कोहोज किल्ला, दि. २८.९.२०१४ रोजी बळवंतगड, दि. ५.१०.२०१४ रोजी भैरवगड, दि. १९.१०.२०१४ अंकाई किल्ला, दि. ९.११.२०१४ घोसाळगड, दि. २३.११.२०१४ गंभीरगड, दि. ७.१२.२०१४ कामनदुर्ग, दि. १४.१२.२०१४ कवनाई, दि. २१.१२.२०१४ कोरलाई किल्ला, दि. २४.१२.२०१४ ते २८.१२.२०१४ राजगड ते तोरणा, दि. ११.१.२०१५ राजमाची, दि. १८.१.२०१५ इरशाल गड व दि. २५.१.२०१५ वसई टकमक अशी पदभ्रमणाची मोहीम यशस्वी करण्यात आली. संस्थेतील तीन सभासदांनी गरजुना रक्तदान केले. पदभ्रमण कार्यक्रमाचा लाभ एकूण ११४ गिर्यारोहकांनी घेतला. वरील सर्व कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये श्री. संतोष कल्याणपूर, श्री. सचिन आयरे, श्री. यतिन कोरे, श्रीमती ललिता टेंगळे यांनी पुढाकार घेतला.

**३.७ यशवंत चव्हाण राज्यस्तरीय महाविद्यालयीन नियतकालिक पुरस्कार:-** राज्यातील विद्यार्थ्यांच्या विचारांचे आणि भावनांचे प्रतिबिंब असंख्य महाविद्यालयीन नियतकालिकांमध्ये पडलेले पाहण्यास मिळते. या नियतकालिकांमध्ये आपले लेख, कविता लिहिणा-या विद्यार्थ्यांमधूनच उद्याचे साहित्यिक घडत असतात. युवांना आपले मत मांडायची संधी देतानाच त्यांच्यातील कलागुणांना वाव देणा-या नियतकालिकांचे महत्त्व लक्षात घेऊन राज्यातील उत्कृष्ट महाविद्यालयीन नियतकालिकांचा सन्मान करणारा 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय महाविद्यालयीन नियतकालिक पुरस्कार' हा महाराष्ट्रातील एकमेव उपक्रम आहे. २०१४ मधील 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय महाविद्यालयीन नियतकालिक पुरस्कार' विजेते खालीलप्रमाणे.

**विजेत्या महाविद्यालयांची नांवे**

| अ.क्र. | नियतकालिक | महाविद्यालयाचे नांव | क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | बांधिलकी | कर्मवीर रामरावजी आहेर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, देवळा | प्रथम |
| २ | पारिजात | लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालय, पंचवटी, नाशिक | द्वितीय |
| ३ | अक्षर | के.आर.टी. आर्टस, बी.एच. कॉमर्स ऑफ ए.एम. सायन्स कॉलेज, नाशिक | तृतीय |
| ४ | मानवता | कत्रुवार कला, रतनलाल काबरा विज्ञान आणि बी.आर. मंत्री वाणिज्य महाविद्यालय मानवत | उत्तेजनार्थ |
| ५ | सुभानमंगल | श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ | उत्तेजनार्थ |
| ६ | प्रेरणा | नूतन महाविद्यालय, सेतू, जिल्हा परभणी | उत्तेजनार्थ |

सदर पुरस्कार वितरण सोहळा दि. १२ जानेवारी २०१५ रोजी मत्स्योदरी महाविद्यालय, जालना येथे सौ. सुप्रिया सुळे, नवमहाराष्ट्र युवा अभियानचे संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, मा. आ. राजेश टोपे, श्री. निलेश राऊत, श्री. विजय कान्हेकर, श्री. सुहास तेंडुलकर, श्री. दिनेश शिंदे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

३.८ **यशवंत युवा फेलोशिप** :- घसरलेली शैक्षणिक गुणवत्ता, अपु-या शैक्षणिक सोयीसुविधा, शाळा गळतीचे वाढते प्रमाण, विद्यार्थी आत्महत्या, व्यावसायिक कौशल्यांचा अभाव, वाढती बेरोजगारी, ढासळलेले शारीरिक व मानसिक आरोग्य, अपु-या आरोग्य सुविधा, शेतकरी आत्महत्या, शेतमालाला न मिळणारा भाव, वाढती रासायनिक शेती, नष्ट होत चाललेली जैवविविधता, वाढते तापमान, पाणी व विजेचा अनावश्यक वापर, वाढती व्यसनाधीनता, जातीयता अशा एक ना अनेक समस्या आज आ वासून उभ्या आहेत. सध्या या समस्यांना अनेक सामाजिक संस्था, संघटना आपापल्या परीने उत्तरे शोधत आहेत. या संस्था संघटनांबरोबरच काही नव्या दमाचे युवकदेखील स्पर्धात्मक जगाच्या चाकोरीतून बाहेर पडून आपापल्या परीने धडपड करीत आहेत. ख-या अर्थाने सामाजिक बदलांची धुरा सांभाळणा-या या युवांना आर्थिक सक्षम करण्यासाठी पुरेसे ज्ञान, आर्थिक पाठबळ व योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. युवांची ही गरज ओळखून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या वतीने यशवंत युवा फेलोशिप २०१० पासून सुरु करण्यात आली आहे. समाजाला भेडसावणा-या प्रश्नांवर मात करण्यासाठी सामाजिक क्षेत्रात रचनात्मक कार्य सुरु केलेल्या युवांना मार्गदर्शन, आर्थिक पाठबळ व प्रोत्साहन देणे हा यशवंत युवा फेलोशिपचा उद्देश आहे.

यशवंत फेलोशिप २०१४-१५ - कार्यरत फेलो खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | फेलोचे नांव | विवरण |
|---|---|---|
| १ | श्री. सिध्दार्थ रा. खरात | सामाजिक क्षेत्रामध्ये स्वयंसेवक म्हणून गेली अनेक वर्षे कार्यरत, दलित इलेक्शन वॉच व एस.सी.एस.टी. सबप्लॅन अंमलबजावणीकरिता काम. बांधकाम मजदूर सभा, महाराष्ट्र या संघटनेचे श्री. नितीन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सातारा जिल्हयातील ११ पैकी ८ तालुक्यात असंघटीत कामगारासोबत काम सुरु आहे. असंघटीत कामगारांत त्यांचे हक्क आणि शोषणाबाबत प्रबोधन करणे, तसेच त्यांच्या न्यायिक आणि मूलभूत प्रश्नांवर काम. |
| २ | श्री. अमोल काटकर | मौजे किरकसाल या गावी आदर्श गाव योजनेमध्ये डॉ. अविनाश पोळ आणि श्री. पोपटराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत फेलोशिपच्या माध्यमातून वृक्षारोपण, जलसंधारण, मृद संधारण याबाबत जनजागृती करणे, किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक शिक्षण क्षेत्रात कार्य व प्रसार, ग्रामीण भागातील नागरिकांचे स्थलांतर थांबविण्यासाठी संस्थात्मक कामे उभी करणे. याशिवाय आदर्श गाव निर्मितीसाठी विविध उपक्रम राबविण्याचा मानस. मौजे किरकसाल या गावचा महाराष्ट्र शासनाच्या आदर्श गाव योजनेत समावेश होण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान. |
| ३ | कु. अमृता ढगे | 'आनंदनिकेतन' या नाशिकमधल्या प्रयोगशील शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत आनंदनिकेतन या शाळेची प्रयोगशील शिक्षण पध्दती समजून घेऊन सर्जनशील काम करण्यासाठी फेलोशिपच्या माध्यमातून काम करण्याची इच्छा. |
| ४ | श्री. कैलास मालखेडे | मुंबई विद्यापीठातून मास्टर ऑफ फाईन आर्ट ही पदवी सध्या तंबाखू नियंत्रणासाठी विविध प्रकारचे कार्य. फेलोशिपच्या माध्यमातून तंबाखूमुक्त गाव, परिसर, संस्था, कार्यालय इत्यादी मोहिमा राबवण्याचा मानस. तंबाखू नियंत्रण कायद्यात सुधारणा व्हाव्यात म्हणून प्रयत्नशील. ठाणे, जळगांव येथे विद्यार्थी शिक्षकांसाठी कार्यशाळा. स्पर्धा, प्रदर्शने या माध्यमातून जनजागृती. |

३.९ **तंबाखू नियंत्रण उपक्रम:-** तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाने आज खूप समस्या समाजात वाढत आहे व ही जागतिक समस्या दिवसेदिवस उग्र स्वरुप धारण करत आहे. याची झळ भारतासारख्या विकसनशील देशाला बसत आहे. प्रामुख्याने मुलांना, तरुण पिढीला बसत आहे. या समस्थेला नियंत्रित करणे किंवा अशा पदार्थांवर बंदी घालणे खूप गरजेचे झालेले आहे. ही समस्या लक्षात घेता संस्थेच्या तंबाखू नियंत्रण विभागामार्फत महाराष्ट्रात तंबाखूमुक्त अभियान राबविले जात आहे व तंबाखू विरोधी व्यापक चळवळ उभारलेली आहे. या उपक्रमाचे समन्वयक कॅप्टन आशिष दामले असून त्यांच्या सोबत श्री. कैलास मालखेडे, श्रीमती नीता मालखेडे हे सह-समन्वयक म्हणून काम पाहतात. या उपक्रमाला 'सलाम मुंबई फाऊंडेशन' यांचे मोलाचे सहकार्य लाभते. मुलांना तंबाखूच्या धोक्यापासून दूर ठेऊन, त्यांच्या जीवनामध्ये जीवन कौशल्याचा विकास करणे व त्या आधारे भविष्यातील सशक्त भारताच्या निर्मितीचे उद्दिष्ट संस्थेने ठेवले आहे. तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन आणि त्यामुळे निर्माण होणारी व्यसनाधीनता ही समाजापुढील फार मोठी समस्या आहे. तंबाखू हा तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनात दिवसेंदिवस वाढ होत असून प्रामुख्याने युवा वर्ग हा मोठया संख्येने व्यसनाधीनतेला बळी पडत आहे. व्यसनाधीनतेचे हे अतिशय गंभीर चित्र आहे. तंबाखू जीवघेणी आहे.

समाजातील विविध वयोगटासाठी काही सामाजिक संस्थांच्या सहकार्याने अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. ज्यात प्रामुख्याने प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, तंत्र शिक्षण देणा-या संस्था येथे शिक्षण, कर्मचारी व विद्यार्थ्यां सोबत कार्यशाळा, विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात. ज्या द्वारे सर्वांना तंबाखूजन्य पदार्थ व त्यांच्या सेवनाचे होणारे दुष्परिणाम कायदे, तंबाखूमुक्त संस्था अशा विषयावर मार्गदर्शन केले जाते. पोलीस, मजदूर, चालक-वाहक अशाही वर्गांसाठी विशिष्ट कार्यक्रम घेतले जातात. पथनाटये, पोस्टर प्रदर्शन, रॅली, गाणी, नाटिका, एकांकिका, कीर्तन, भजन अशाही कार्यक्रमातून समाज प्रबोधन केले जाते. त्यामुळे आजपर्यंत अनेक संस्था तंबाखूमुक्त झाल्या. विविध वयोगटातील अनेक जणांनी तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करणे बंद केले. परंतु अधिकाधिक लोक तंबाखूजन्य पदार्थाच्या अधीन होताना दिसतात. तंबाखूमुळे असंख्य लोकांचा जीव जात आहे जो आपण वाचवू शकतो. तंबाखू आणि धुम्रपानात ४००० हून अधिक घातक रसायने आहेत. ज्यात २०० विषारी तर ६० कर्कजन्य आहेत. तंबाखूमुळे कॅन्सरसोबत हृदयविकार, मेंदूचा धक्का, फुफ्फुसाचे आजार, अंधत्व, नपुसकत्व, वंध्यत्व आणि इतर अनेक रोग होतात. यात असंख्य लोक यापूर्वी बळी पडले आहेत आणि दिवसेंदिवस बळींची संख्या वाढत आहे याचा तपशील पुढीलप्रमाणे.

**जागतिक पातळी :** तंबाखूमूळे दरवर्षी जगात जवळ जवळ ५५ लाख व्यक्ती मरण पावतात आणि ही संख्या इतर कारणांमुळे म्हणजे एडस्, टी.बी., मलेरिया, दारुचे सेवन, आत्महत्या, अंमली पदार्थ सेवन आदींमुळे मरण्यापेक्षा अधिक आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार जगात २०३० पर्यंत तंबाखूमुळे मरणा-यांचे प्रमाण एक कोटी होईल ही चिंताजनक बाब आहे.

**भारत :** तंबाखूमुळे मरणा-यांपैकी जगातील ७० टक्के लोक विकसनशील देशातील आहेत, ज्यात भारताचा अंतर्भाव होतो. भारतात दररोज २२०० लोकांचा मृत्यू तंबाखूमुळे होतो. तर दरवर्षी ८ लाखांहून अधिक लोक तंबाखूमुळे होणा-या तोंडाच्या कॅन्सरचे सर्वाधिक रुग्ण भारतात आहेत. भारतात दर ३ सेकंदाला एक युवा पहिल्यांदा तंबाखू सेवन करतो. मोठया प्रमाणावर तरुण पिढी तंबाखूच्या आहारी जात आहे.

**महाराष्ट्र :** महाराष्ट्रात तंबाखूमुळे ३१.४ टक्के सेवन होते. महाराष्ट्रात तंबाखू सेवनामध्ये पुरुषांचे प्रमाण ४२.५ टक्के आहे तर स्त्रियांचे प्रमाण १९.९ टक्के आहे. शहरात २५.२ टक्के आणि ग्रामीण भागात ३६.९ टक्के प्रमाण आहे. महाराष्ट्रात मुलांमध्ये १३.२ टक्के तर मुलींमध्ये ११.१ टक्के प्रमाण आहे.

वरील आकडेवारीवरुन असे लक्षात येते की, जगात आणि खास करुन भारतात तंबाखू सेवनाची समस्या अत्यंत गंभीर आहे. भारतासारख्या विकसनशील देशात तंबाखूमुळे होणार व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, आरोग्य आणि पर्यावरण पातळीवरील नुकसान देशाच्या विकासासाठी हानिकारक आहे. तंबाखूमुळे मरणा-यांपैकी बहुतांश व्यक्ती प्रौढ आणि युवा वयोगटातील असल्याने हे राष्ट्राच्या दृष्टीनेही योग्य नाही. पाहणीत असे आढळून आले आहे की कुमारावस्थेत व यौवनावस्थेत तंबाखू सेवनाची सवय लागलेल्या व्यक्तीचेच मृत्यूचे प्रमाण जास्त आहे.

गडचिरोली जिल्हयातील मुड्झा नावाच्या एका गावात केलेल्या सर्वेक्षणात एक धक्कादायक अहवाल समोर आला आहे. ११०० लोकसंख्या असलेल्या या गावात जवळपास ५३ टक्के लोक विविध स्वरुपात तंबाखू अथवा तत्सम पदार्थांचे

सेवन करतात. वर्षाला अंदाजे १० लाख रुपये इतका खर्च तंबाखू सेवनावर होतो. जो या गावातील ग्रामपंचायतीच्या एकूण वार्षिक खर्चापेक्षाही जास्त आहे. तंबाखू सेवनामुळे आरोग्याच्या समस्यांवर होणा-या खर्चाचा भाग तर वेगळाच. खरं तर ही परिस्थिती फक्त या एका गावाची नाही तर महाराष्ट्रातील अनेक गावांची आहे. आपली युवा पिढी ही देशाचे भविष्य आहे. ती निरोगी, व्यसनमुक्त आणि सुदृढ हवी असेल तर त्यांना तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांपासूनया युवा पिढीला दूर ठेवले पाहिजे. या सगळयावर उपाययोजना म्हणून यासाठी या पदार्थांमुळे होणारे दुष्परिणाम समाजातील सर्व घटकांपर्यंत पोचविण्याची गरज आहे. तसेच विविध घटकांसोबत तंबाखू मुक्तीसाठी कायम मोठया प्रमाणावर होणे आवश्यक आहे. तंबाखू नियंत्रण अभियान राज्यभर राबविण्याची गरज आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने सामाजिक विधायक कामांसाठी कायम पुढाकार घेतला आहे. याच कार्यप्रमाणालीचा भाग म्हणून तंबाखू नियंत्रण अभियान आज महाराष्ट्रात राबविले जात आहे. तंबाखू आणि तंबाखूचे सेवन आपल्याला सर्रास दिसते. त्यासोबत तंबाखू सेवनाच्या घातक परिणामांची जाणीव करुन देणा-या जाहिरातीदेखील दिसतात. तंबाखूच्या विक्रीवर नियंत्रण असणारे कायदे झाले आहेत. मा. उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी महाराष्ट्रात गुटखाबंदीची घोषणा केली आणि लगेच ती अंमलात देखील आणली. इतक्या आघाडयांवर तंबाखू विरोधी मोहीम उघडून देखील महाराष्ट्रातील तंबाखू सेवनाचे प्रमाण कमी झालेले दिसत नाही. काही अभ्यासकांच्या मते १८ वर्षे वयापर्यंत एखादी व्यक्ती तंबाखूचे सेवन करीत नाही ती व्यक्ती तंबाखूपासून दूर राहते. १८ वर्षांखालील व्यक्तींना तंबाखूची विक्री करण्यावर कायद्याने बंदी असून देखील अनेक मुले लहान वयातच तंबाखूच्या आहारी गेलेली दिसतात. प्रौढांमध्ये देखील तंबाखू सेवनाचे प्रमाण वाढताना दिसत आहे. तंबाखू विरोधी कायद्यामधील दंडाची रक्कम वाढवणे, तसेच या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. शाळा कॉलेजच्या आसपास १०० यार्डाच्या परिसरात एकही तंबाखू विक्रीचे केंद्र असू नये, तसेच तंबाखू विक्री केंद्रावर तंबाखूजन्य पदार्थ प्रदर्शनाप्रमाणे मांडले जाऊ नये या गोष्टी काटेकोरपणे पाळल्या जाव्यात यासाठी प्रतिष्ठान तंबाखू नियंत्रण अभियान उपक्रमाद्वारे सतत पाठपुरावा करत आहे.

कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे झाली तरीही तंबाखूविरोधी व्यापक जनजागरण मोहिमेला पर्याय नाही. तंबाखूमुळे व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक आणि राष्ट्रीय असे कोणते दुष्परिणाम होतात. तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करण्यामागील कारणे तंबाखू सेवन दुष्परिणाम संदर्भातील काही सत्यता, तंबाखू निर्मूलनाबाबत होत असलेली राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कार्ये, तंबाखू नियंत्रणासाठी वेळोवेळी बनवलेले कायदे इ. माहिती तंबाखू नियंत्रण अभियानाद्वारे राज्यातील जनतेपर्यंत तसेच युवा पिढीपर्यंत पोहचवणे हे प्रतिष्ठानचे उद्दिष्ट आहे.

दि. ६ **सप्टेंबर २०१४** : या उपक्रमांतर्गत पार पडलेले कार्यक्रम पुढीलप्रमाणे.

कच्छ युवक संघाच्या संयुक्त विद्यमाने विक्रोळी येथे आयोजि केलेल्या रक्तदान शिबिरात पोस्टर प्रदर्शनाचे व माहितीपट दाखविण्याचे विभागातर्फे आयोजन करण्यात आले. लाभार्थी संख्या ४५०. दि. १ ऑक्टोबर २०१४ : **पोस्टर प्रदर्शन व स्लाईड शो** : शिरगांव बदलापूर (पूर्व) येथे कोल्हापूर मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात पोस्टर प्रदर्शन भरविण्यात आले व स्लाईड शो दाखविण्यात आला. लाभार्थी संख्या २५०. दि. १ डिसेंबर २०१४ : **शिक्षक कार्यशाळा** : स्थळ : जिल्हा परिषद शाळा, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा ठाणे लाभार्थी संख्या २५०. दि. १० डिसेंबर २०१४ : भारत कॉलेज, बदलापूर (पश्चिम) येथे पोस्टर प्रदर्शन भरविण्यात आले. तसेच माहितीपट दाखविण्यात आला. लाभार्थी संख्या ४००. दि. १२ डिसेंबर २०१४ : **पथनाटय मोहिम व पोस्टर प्रदर्शन** : स्थळ : जिल्हा रायगड, ठाणे व मुंबई - संस्थेचे अध्यक्ष आदरणीय श्री. शरदचंद्र पवार यांच्या अमृत महोत्सवी वर्षात पदार्पणानिमित्त राज्यात दि. १२ डिसेंबर २०१४ ते १२ जानेवारी २०१५ पर्यंत जिल्हा रायगड, ठाणे व मुंबई येथे पथनाटय सादरीकरण व पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे संयोजन राज्य समन्वयक श्री. कैलास मालखेडे, रायगड जिल्हा संघटक, अभिजित देशमु व सहकारी यांनी केले. दि. १३ डिसेंबर २०१४ : **पोस्टर प्रदर्शन** : स्थळ : साई चॅरिटेबल ट्रस्ट, शिवाजी नगर, गोवंडी. लाभार्थी संख्या ३००. दि. १५ डिसेंबर २०१४ ते १६ डिसेंबर २०१४ : **नॅशनल कॉन्फरन्समध्ये सहभाग** : तंबाखू नियंत्रण विभागाच्या वतीने श्री. कैलास मालखेडे, श्री. उमेश खाडे, श्रीमती निता घ्यार यांनी नॅशनल कॉन्फरन्स ऑन टोबॅको ऑर हेल्थ मध्ये सहभाग घेतला. विविध राज्यातील तंबाखूजन्य पदार्थांची विक्री, दुष्परिणाम, कायदे व पुढील काळात संस्थांची व शासनाची भूमिका यावर दोन दिवस

सविस्तर चर्चा करण्यात आली. या विषयावर आधारित मराठी भाषेत जनप्रबोधन करणारे काही प्रभावी पर्याय योजणे गरजेचे आहे. हे लक्षात घेऊन विभागाच्या वतीने त्यात पुढाकार घ्यावा असे ठरले.

दि. २८ डिसेबर २०१४ : **पोस्टर प्रदर्शन** : स्थळ : तरुण मित्र मंडळ, टिळक नगर, चेंबूर. लाभार्थी संख्या ४५०. दि. १२ जानेवारी २०१४ : **जागतिक युवा दिनानिमित्त, पोस्टर प्रदर्शन** : स्थळ : सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई. लाभार्थी संख्या ५५०. दि. १४ जानेवारी २०१४ : **पथनाटय सादरीकरण व पोस्टर प्रदर्शन** : तंबाखू नियंत्रणासंदर्भात जनजागृतीसाठी पोस्टर प्रदर्शन व पथनाटय आयोजित केले होते. कार्यक्रमास श्री. बी. आय. आजरी (प्रादेशिक परिवहन अधिकारी), श्री. अशोक दुधे (पोलीस उपायुक्त), श्री. संजय ससाणे, नव महाराष्ट्र युवा अभियानचे श्री. दत्ता बाळसराफ, श्री. विजय कान्हेकर, श्री. उमाकांत जगदाळे, श्री. कैलास मालखेडे, श्री. सुरज चव्हाण, श्री. रमेश मोरे इ. उपस्थित होते. स्थळ : वडाळा ट्रक टर्मिनल. लाभार्थी संख्या ५५०.

दि. २० ते २१ जानेवारी २०१५ : **तंबाखू मुक्त गाव मोहिम** : सांसद आदर्श ग्राम योजनेअंतर्गत समाविष्ट गाव (१) एनकुल, ता. खटाव, (२) मुर्टी, ता. बारामती, (३) गुळुंचे, ता. पुरंदर व (४) दापोली, ता. दौड येथे सदर संकल्पना मांडण्यासाठी सलाम मुंबई फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रत्येक गावात प्राथमिक सर्व्हे करण्यात आला. प्रत्येक गावातील ग्रामपंचायत, महिला बचतगट, शाळा, आरोग्य केंद्र यांच्या भेटी घेऊन आपले गाव तंबाखू मुक्त करण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला. गावात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री बंद व्हावी यासाठी ग्रामसभा घेऊन असा ठराव मांडावा असे ठरले. तसेच वर्षभर गावात विविध उपक्रमाद्वारे गाव तंबाखू मुक्त व्हावे यासाठी शपथ घेण्यात आली.

दि. २३ जानेवारी २०१५ : **जागतिक हस्ताक्षर दिनानिमित्त, निबंध व हस्ताक्षर स्पर्धा** : शाळांमध्ये तंबाखूजन्य पदार्थांची माहिती व त्यांचे दुष्परिणाम मुलांना माहिती व्हावी व हा विषय मुलांच्या मनावर बिंबवला जावा यासाठी स्पर्धा राबविण्यात आली. मालदाभाडी येथे ग्रामस्थांनी देखील स्पर्धेत सहभाग घेतला. स्थळ : एनकुल, तालुका खटाव, जिल्हा सांगली. मालदाभाडी, तालुका जामनेर, जिल्हा जळगाव.

दि. २६ डिसेंबर २०१५ : **शालेय वस्तू व बक्षीस वितरण सोहळा** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व सोशल डेव्हलपमेंट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या हस्ताक्षर व निबंध स्पर्धेची बक्षीस वितरण करण्यात आले. गरजू विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी वस्तूंची व गावातील अपंगाना व्हीलचेअरचे वाटप करण्यात आले. तंबाखू नियंत्रण कार्यक्रमात मुलांनी गीते व नाटिका सादर केल्या. गावातील सरपंच सौ. उषाताई परखड, एस.डी.एफ. चे अध्यक्ष श्री. दामू मालखेडे शाळांमधील मुख्याध्यापक व तंबाखू नियंत्रण विभागाचे समन्वयक श्री. कैलास मालखेडे व ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. लाभार्थी संख्या ५५०. तंबाखू नियंत्रण अभियान या उपक्रमाचे संयोजक श्री. दत्ता बाळसराफ यांच्या मार्गदर्शनाखाली कॅप्टन आशिष दामले, अभिजीत देशमुख, कैलास मालखेडे आणि सारिका देशमुख, नीता ग्यार हे समन्वयक म्हणून काम पाहतात.

दि. १ डिसेबर २०१४ : **शिक्षक कार्यशाळा** : स्थळ : जिल्हा परिषद शाळा, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा ठाणे. लाभार्थी संख्या ४२.

## ९.४ कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम :-

१९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना राबविण्याचे काम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत केले जाते. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रतिष्ठानने 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम' या विभागाची निर्मिती केली आहे. या विभागामध्ये अंदाजे ३५ वकील व समाजसेवक काम करीत असून ते आपली सेवा या योजनेसाठी देत आहेत.

### ४.१ फोरममार्फत सर्वसाधारणपणे खालील प्रकारचे काम केले जाते :-

१. समाजातील गोर-गरीब व तळागाळातील लोकांना कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता मोफत कायदेविषयक तोंडी सल्ला देणे.
२. प्रसंगी गुंतागुंतीच्या प्रश्नांसंबंधी सखोल अभ्यास करुन गरजू लोकांना कायदेविषयक सल्ला देणे.

३. काही वेळा पत्रव्यवहाराद्वारे गरजू लोकांना कायदेविषयक सल्ला देणे.
४. पक्षकारांच्या तंटयामध्ये सामोपचाराने आपसात समेट घडवून आणणे.
५. विधी विषयामध्ये संशोधन करुन प्रचलित कायद्यांमध्ये सुधारणा सूचविणे किंवा नवीन कायद्याचे प्रारुप तयार करुन वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.
६. विधी विषयामध्ये संशोधन करुन प्रचलित कायद्यानुसार बनविण्यात आलेल्या नियमांमध्ये सुधारणा सुचविणे किंवा नवीन नियमांचे प्रारुप तयार करुन वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.
७. सर्वसामान्य लोकांना वेळोवेळी कायद्यांची विशेष माहिती करुन देण्यासाठी तज्ज्ञांची विशेष व्याख्याने आयोजित करणे.
८. सामान्य लोकांना कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी वरचेवर विधी साक्षरता (Legal Awareness) कार्यशाळांचे आयोजन करणे.
९. विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मूट कोर्ट स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करणे. तसेच अशा विद्यार्थ्यांसाठी वकिलांची व्यावसायिक नीतिमत्ता या विषयावर परिसंवादांचे आयोजन करणे.
१०. संबंधित न्यायालयाच्या सहकार्याने व त्यांच्या संयुक्त विद्यमाने त्या न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या प्रकरणामध्ये तडजोड घडवून आणण्यासाठी लोक अदालतचे आयोजन करणे.
११. न्यायालयामध्ये मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर होण्यासाठी प्रयत्न करणे.

४.२ **फोरमच्या बैठका :-** कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजनेच्या अंमलबजावणीबाबत विचार करुन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी, झालेल्या कार्यक्रमांचा आढावा घेण्यासाठी, पुढील कार्यक्रमांची आखणी करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दरमहा दुस-या शुक्रवारी फोरमच्या मासिक बैठका घेतल्या जातात. या बैठकांना फोरमचे जास्तीत जास्त सदस्य उपस्थित राहतात. १ एप्रिल २०१४ ते ३१ मार्च २०१५ या आर्थिक वर्षामध्ये फोरमच्या (२४९ ते २६० क्रमांकाच्या) १२ मासिक बैठका झाल्या. या १२ बैठकांमध्ये एकूण अंदाजे २११ विषयांसंबंधी चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. या बैठकांना एकूण १३३ सदस्य उपस्थित होते. याप्रमाणे प्रत्येक बैठकीला सरासरी ११ सदस्य उपस्थित होते.

४.३ **फोरमच्या उपसमित्या :-** वेळोवेळी विविध विषयांचा सखोल अभ्यास करण्यासाठी फोरमच्या उपसमित्या घटित केल्या जातात. या समित्यांमध्ये सक्रिय सदस्यांचा समावेश केला जातो. अशा उपसमित्यांनी दिलेल्या अहवालानुसार फोरमचे निर्णय घेण्यात येतात.

(१) **विभागांची बैठक :** ऑक्टोबर २०१४ मध्ये ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा भरविण्यासंबंधी विचार करण्यासाठी प्रतिष्ठानच्या सर्व विभागांच्या प्रतिनिधींची बैठक मा. सरचिटणीस श्री. काळे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली दि. १२ ऑगस्ट २०१४ रोजी बोर्ड रुममध्ये संपन्न झाली. बैठकीला १६ प्रतिनिधी उपस्थित होते. अंदाजे ३७ बाबींसंबंधी विचार होऊन निर्णय घेण्यात आले.

(२) **ज्येष्ठ नागरिक संघांच्या प्रतिनिधींची बैठक :** ऑक्टोबर २०१४ मध्ये आयोजण्यात येणा-या ज्येष्ठ नागरिक आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यासंबंधी विचार करण्यासाठी कुलाबा ते माहिम - शीव या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघांच्या प्रतिनिधींची बैठक बीएमसी हेल्थ सेंटर, भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम), मुंबई येथे दि. ९ सप्टेंबर २०१४ रोजी (सायंकाळी ४ ते ६ पर्यंत) श्री. विजय औंधे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीला ३५ प्रतिनिधी उपस्थित होते. अंदाजे ९० पेक्षा जास्त बाबींसंबंधी विचार होऊन निर्णय घेण्यात आले.

४.४ **कायदेविषयक सल्ला केंद्र :-** गोरगरीब व गरजू लोकांना कायदेविषयक तोंडी सल्ला देण्यासाठी दर शुक्रवारी सायंकाळी ५.३० च्या नंतर प्रतिष्ठानच्या ग्रंथालयामध्ये कायदेविषयक मोफत सल्ला केंद्र चालविले जाते. गेल्या आर्थिक

वर्षामध्ये या सल्ला केंद्राच्या एकूण ४७ बैठका झाल्या. या बैठकामध्ये एकूण ८४ लोकांना (महिला व पुरुष) तोंडी सल्ला देण्यात आला. सल्ल्याचे विषय अंदाजे विवाह, घटस्फोट, हुंडा, पोटगी, वारसा हक्क, भागिदारी, कामगार कायदा, माहितीचा अधिकार, सेवा नियम, सहकारी कायदा, पंजीकरण, मुद्रांक, फौजदारी, कौटुंबिक अत्याचार, ग्राहक संरक्षण, भाडे नियंत्रण, मोफा कायदा, गृहनिर्माण इत्यादी विषयासंबंधी होते. आपली प्रकरणे न्यायालयामध्ये चालविण्यासाठी मोफत वकीलाची सेवा मागणा-या लोकांना शासनाचे संबंधित विधी सेवा प्राधिकरणाकडे पाठविण्यात आले.

४.५ **मोफत समुपदेशन व तडजोड केंद्र** :- दर मंगळवारी सायंकाळी ५.०० ते ७.०० या वेळांत समुपदेशन व समेट केंद्राचे आयोजन केले जाते. दोन वादग्रस्त पक्षकारांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न या केंद्रामध्ये केला जातो. या कामाला गती देण्यासाठी विशेष प्रयत्न चालू आहेत.

४.६ **आपल्या कायद्याची माहिती करुन घ्या (Know your Law Lecture Series)** :- या व्याख्यानमाले अंतर्गत दरमहा किंवा तीन महिन्यांतून एकदा कायदे पंडितांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. सध्या इमारतींचे पुनर्विकास व माहितीचा अधिकार आणि सायबर कायदा या कायद्यावर व्याख्याने आयोजित करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

४.७ **वकीलांची व्यावसायिक नीतिमत्ता या विषयावर चर्चासत्र** :- विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबविले जातात. त्यापैकी वकीलांच्या व्यावसायिक नीतिमत्ता (Professional Ethics of Lawyers) या विषयाबाबत नवीन होतकरु वकीलांना जाणीव करुन देण्यासाठी चर्चासत्राचे आयोजन केले जाते. विधी शाखेतील विद्यार्थ्यांना याचा चांगला उपयोग होतो. सध्या अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

४.८ **विधी साक्षरता कार्यशाळा** :- लोकांना सामाजिक किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधीत असलेल्या कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी विविध प्रकारच्या विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यासाठी समाजाच्या वेगवेगळया घटकांसाठी वेगवेगळे प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ - पौगंडावस्थेतील मुले व मुली, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सदस्य, सार्वजनिक न्यासाचे विश्वस्त, सार्वजनिक संस्थांचे सदस्य आणि सर्वसामान्य जनता इत्यादी. या घटकांसाठी विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. मागील आर्थिक वर्षामध्ये खालीलप्रमाणे १० कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

(१) फोरम व मैत्री संस्था, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व पुरुष कार्यकर्त्यांसाठी रविवार दि. १४ सप्टेंबर २०१४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत महाराष्ट्र हायस्कूल मैदान, करी रोड, मुंबई येथे एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भाषणाचे माध्यम मराठी होते. १०० पेक्षा जास्त महिला व पुरुष कार्यक्रमाला उपस्थित होते. श्री. सुरज भोईर हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

(२) फोरम व पोलीस उप आयुक्त परिमंडळ २, पनवेल, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीसांसाठी (महिला व पुरुष) झोन-२, पोलीस सभागृह पनवेल, नवी मुंबई येथे रविवार दि. २१ सप्टेंबर २०१४ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत) एक दिवशीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त पोलीस कार्यक्रमामध्ये उपस्थित होते. भाषणाचे माध्यम मराठी होते. श्री. संजय ऐनापुरे हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

(३) फोरम व राष्ट्रपिता महात्मा गांधी प्रतिष्ठान, बदलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व पुरुषांसाठी रविवार दि. ३० नोव्हेंबर २०१४ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत) एक दिवशीय विधी साक्षरता

कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भाषणाचे माध्यम मराठी होते. १०० पेक्षा जास्त महिला व पुरुष कार्यक्रमाला उपस्थित होते. श्री. अनिल चाळके हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

(४) फोरम व पोलीस उप आयुक्त, कळंबोली, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीसांसाठी (महिला व पुरुष) पोलीस प्रशिक्षण सभागृह, कळंबोली, नवी मुंबई येथे रविवार दि. १३ डिसेंबर २०१४ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत) एक दिवशीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त पोलीस (महिला व पुरुष) कार्यक्रमामध्ये उपस्थित होते. भाषणाचे माध्यम मराठी होते. श्री. महेश तरडे हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

(५) फोरम व रोटरी क्लब ऑफ डोंबिवली यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी रोटरी भवन, एमआयडीसी, डोंबिवली (पूर्व) येथे रविवार दि. २४ डिसेंबर २०१४ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत) एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिक कार्यक्रमामध्ये उपस्थित होते. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते. डॉ. डोंगरे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

(६) फोरम व प्रज्ञा विकास संस्था, बदलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श महाविद्यालय, बदलापूर येथे महिला व पुरुषांसाठी रविवार दि. ११ जानेवारी, २०१५ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत) एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी निवृत्त जिल्हा न्यायाधीश जी. डब्ल्यू. अवसरमल हे होते. १०० पेक्षा जास्त स्त्री पुरुष कार्यशाळेमध्ये उपस्थित होते. व्याख्यानांचे माध्यम मराठी होते.

(७) फोरम व ओरिएंटल कॉलेज ऑफ लॉ, सानपाडा, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी त्या महाविद्यालयामध्ये रविवार दि. १८ जानेवारी, २०१५ रोजी (सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानाचे माध्यम मराठी व इंग्रजी होते. १०० पेक्षा जास्त विद्यार्थी (मुले व मुली) कार्यक्रमाला उपस्थित होते. महाराष्ट्राचे पूर्वीचे मंत्री श्री जावेद खान हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. न्यायमूर्ती श्री. जे. एन. पटेल हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

(८) फोरम व मैत्री संस्था, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक कार्यकर्त्यांसाठी (महिला व पुरुष) गांधी बुक सेंटर, ग्रँट रोड, मुंबई येथे रविवार दि. ८ फेब्रुवारी २०१५ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत) दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भाषणाचे माध्यम मराठी व हिंदी होते. १०० पेक्षा जास्त महिला व पुरुष कार्यक्रमाला उपस्थित होते. श्रीमती मीना जोशी हया कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून उपस्थित होत्या.

(९) फोरम व मुस्लिम युवा विकास मंच, विरार यांच्या संयुक्त विद्यमाने मुस्लीम स्त्री पुरुषांसाठी जिल्हा परिषद उर्दू शाळा, बलूच नगर, विरार येथे रविवार दि. २२ फेब्रुवारी २०१५ रोजी (सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत) एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त उपस्थिती होती. मुस्लीम कायदे व इतर सामाजिक कायदे यांच्याबद्दल माहिती करुन देण्यात आली. माध्यम हिंदी होते. श्री. इमरान सय्यद खान हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. शमीम खान यांनी आभार प्रदर्शन केले. मुस्लीम तरुण व तरुणीना हा कार्यक्रम फारच आवडला.

(१०) फोरम व अनुराधा समाज विकास संस्था, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई महानगरपालिका शाळा, मस्जीद बंदर, मुंबई येथे महिलांसाठी रविवार दि. १५ मार्च २०१५ रोजी (सकाळी १० ते सायंकाळ ६ पर्यंत) एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. माध्यम मराठी होते. १०० पेक्षा जास्त महिला उपस्थित होत्या.

४.९ **ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा** - २०१४ :- रविवार दि. १६ नोव्हेंबर २०१४ रोजी प्रतिष्ठानच्या मुख्य सभागृहामध्ये झालेल्या ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळाव्याच्या आयोजनामध्ये फोरमच्या सदस्यांनी हिरीरीने भाग घेतला व सदर मेळावा यशस्वी करण्याच्या कामाला हातभार लावला.

४.१० **निबंधांना बक्षिसे** :- विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये भाग घेणा-या विद्यार्थ्यांसाठी फोरमची एक खास योजना आहे. त्या योजनेनुसार झालेल्या कार्यशाळेबाबत अथवा कार्यशाळेत शिकविण्यात आलेल्या एका किंवा अनेक विषयाबाबत विद्यार्थ्यांना निबंध लिहिता येतात व त्या निबंधाच्या गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना पुस्तकांच्या स्वरुपात बक्षिसे दिली जातात. बक्षिसे संबंधित विद्यालये किंवा महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पाठविली जातात. विद्यालयाच्या किंवा महाविद्यालयांच्या समारंभामध्ये संबंधित विद्यार्थ्यांना बक्षिसे दिली जातात.

४.१४ **कार्यशाळेमध्ये शिकविलेले कायदे** :- विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये अंदाजे ५० ते ६० कायद्यासंबंधी माहिती करुन देण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील कायद्यांचा समावेश होता. (१) भारतीय संविधान, (२) विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७, (३) हुंडाबंदी अधिनियम १९६१, (४) भारतीय दंड संहिता १८६०, (५) ग्राहक संरक्षण कायदा १९८६, (६) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३, (७) हिंदू वारसा हक्क कायदा १९५६ व इच्छापत्र कायदा, (८) गुंतवणूकीसंबंधीचे नियम, (९) कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५, (१०) माहितीचा अधिकार कायदा २००५, (११) हिंदू विवाह कायदा १९५५, (१२) मुस्लीम कायदा, (१३) पोटगी संबंधीचे कायदे, (१४) महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३, (१५) हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६, (१६) हिंदू दत्तक व पोटगी अधिनियम १९५६, (१७) संपत्ती हस्तांतरण अधिनियम १८८२, (१८) विशेष विवाह अधिनियम १९५४, (१९) बाल विवाह बंदी अधिनियम २००७, (२०) महाराष्ट्र विवाह मंडळ नियमन व विवाह नोंदणी अधिनियम १९९८, (२१) न्यायालयांची बहुस्तरीय व्यवस्था (तालुका न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंतची माहिती), (२२) स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण (प्रतिबंध) अधिनियम १९८६, (२३) विकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम १९९५, The Persons with Disabilities (Equal opportunities, Protection of Rights and Full Participation) Act, १९९५ (२४) स्वमग्न असलेल्या, मस्तिष्क घात झालेल्या, मतिमंद व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९, (The National Trust for Welfare of Persons with Autism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities Act, १९९९) (२५) अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ (The Immoral Traffic (Prevention) Act, १९५६ (२६) राष्ट्रप्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१, (२७) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, (२८) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७, (२९) महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९, (३०) महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणा-या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९८२, (३१) मुंबई विद्यापीठाचे अध्यादेश क्रमांक २२० (अनुचित प्रथा प्रतिबंध), (३२) मुस्लिम स्त्रिया (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम १९८६, (३३) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्रविकास) अधिनियम १९७१, (३४) भारतीय वारसा हक्क कायदा १९२५, (३५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, (३६) मुंबई मुद्रांक कायदा १९५८, (३७) गृहनिर्माण संस्थांचे विनियम, (३८) अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९, (३९) मुस्लिम व्यक्ती विषयक विधी (शरियत) प्रयुक्ती अधिनियम १९३७,

(४०) नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५, (४१) भारतीय मुद्रांक कायदा १८९९, (४२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, (४३) प्रसुती विषयक लाभ अधिनियम १९६१, (४४) सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०, (४५) अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५, (४६) मोटर वाहन अधिनियम १९८८, (४७) जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९, (४८) मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, (४९) महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९, (५०) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, (५१) माता पिता व ज्येष्ठ नागरिक यांची पोटगी व कल्याण अधिनियम २००७, (५२) मुंबई पोलीस अधिनियम, १९५०, (५३) जादूटोणा विरोधी कायदा २०१३, (५४) हिंदू मायनॉरिटी अॅन्ड गार्डीयनशिप अॅक्ट, १९५६, (५५) गार्डीयनशिप अॅन्ड वॉर्डस् अॅक्ट, (५६) कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, बंदी, तक्रार व निवारण) अधिनियम २०१३ (५७) The Sexual Harassment of Women at Work Place (Prevention, Prohibition and Redressal) Act, २०१३ (Act 14 of 2013).

या वक्त्यांनी विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन केले.

| | |
|---|---|
| (१) श्री. म. बा. पवार | (२) श्री. प्रमोद ढोकळे |
| (३) अॅड. श्री. निलेश पावसकर | (४) अॅड. श्री. हेमंत केंजाळकर |
| (५) अॅड. श्री. अजय केतकर | (६) अॅड. श्री. भूपेश सामंत |
| (७) डॉ. जे. बी. पाटील | (८) श्रीमती शिवानी शेलार |
| (९) प्रा. नारायण राजाध्यक्ष | (१०) अॅड. श्री. प्रकाश देशमुख |
| (११) श्री. दिलीप तळेकर | (१२) श्रीमती सुशिला मुंडे |

४.१५ पुढील आर्थिक वर्षामध्ये खालील कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे ठरले आहे.

१. पोलीसांसाठी ३ दिवसांची विधी कार्यशाळा.

२. विद्यार्थ्यांसाठी मूट कोर्ट स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन.

३. वकीलांची व्यावसायिक नीतिमत्ता यावर चर्चासत्र.

४. विधी शाखेच्या विद्यार्थ्यासाठी विधी साक्षरता कार्यशाळा

## ९.५ रंगस्वर - सांस्कृतिक विभाग :-

प्रतिष्ठानच्या रंगस्वरतर्फे नाटय, चित्रपट, गायन आदी कार्यक्रम होतात. रंगस्वरची वार्षिक वर्गणी पती- पत्नीसाठी रु.२,०००/-, वैयक्तिक रु.१,२००/-, अपंगासाठी रु.५००/- भरुन रंगस्वरचे सभासद होता येते. रंगस्वरच्या सदस्यांना तसेच प्रतिष्ठानच्या सदस्यांना कार्यक्रमाचा आस्वाद घेता येतो. जानेवारी २०१५ मध्ये यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव याचे आयोजन करण्यात आले. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या मुंबई येथील सभागृहात विविध सांस्कृतिक कार्यक्रम रंगस्वरच्या वतीने नियमितपणे सादर केले जातात. सर्व सभासद व रसिकांसाठी विनामूल्य प्रवेश दिला जातो. रंगस्वरसाठी सभासद नोंदणी सुरु आहे.

## ९.६ सृजन :-

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर 'सृजन' विभागामार्फत शालेय विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास आणि विविध कलांची तोंड ओळख करुन त्यांचे विद्यार्थी जीवन समृध्द व्हावे याकरिता सृजनचा हा अभिनव उपक्रम चालविण्यात येतो. सर्जनशीलतेचा अविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सुप्तकलागुणांना वाव देययाचा हा प्रयत्न आहे. सृजनच्या कार्यशाळेत प्रत्येक सत्रात १०० ते १५० च्या आसपास विद्यार्थ्यांचा सहभाग असतो.

सृजनची संकल्पना व संयोजन सौ. सुप्रियाताई सुळे यांची असून यामध्ये सुप्रसिध्द चित्रकार श्री. डग्लस जॉन आणि सुलेखनकार श्री. शुभानंद जोग सन्माननीय सल्लागार म्हणून काम पाहतात. श्री. विद्याधर खंडे या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम करीत आहेत.

एप्रिल ते जून या महिन्यात मुलांच्या वार्षिक परीक्षा आणि उन्हाळयाची सुट्टी यामुळे तीन महिने सृजन कार्यशाळा आयोजित करण्यात येत नाही.

६.१ ७ जुलै २०१४ रोजी श्री. आशुतोष आपटे यांनी 'नेपथ्य' या विषयाच्या कार्यशाळेत नाटकातील आशय लोकांपर्यंत पोचविण्याकरिता नैपथ्याची भूमिका काय असते. तसेच कुठल्याही प्रकारे साधनांचा वापर न करता मुलांच्या वेगवेगळया गटांमधून नैपथ्याची मानवनिमित्त मांडणी करण्याचे कौशल्य व समन्वयाचे महत्व मुलांना पटवून दिले.

६.२ ३ ऑगस्ट २०१४ 'मातीला पाय फुटतात' श्री. समक्या आहिरे यांनी मुलांना मातीपासून विविध प्रकारच्या वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण दिले. मुलांनी या कार्यशाळेत मातीच्या छोटया वस्तू व मातीचा गणपती इ. बनविले.

६.३ ७ सप्टेंबर २०१४ रोजी 'सफर आवाजाची' या कार्यशाळेत आवाजाचे विविध प्रकार कसे असतात, आवाजाची चढउतार कशी करावी, समोरच्या व्यक्तीशी संवाद साधताना आवाजाच्या पातळीचा योग्य उपयोग कसा करावा हे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासह दाखविले.

६.४ २१ ऑक्टोबर २०१४ रोजी श्रीमती रेखा दिवेकर यांनी 'आहार नियोजन' या विषयावर कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेत सकाळी शाळेत जाताना नाश्ता करुन जाणे किती महत्वाचे आहे हे विद्यार्थ्यांना पटवून दिले. स्वच्छतेच्या बेसिक गोष्टी पाळणे आवश्यक आहे. निरोगी राहण्याकरिता पोषक आहाराची गरज आणि जंक फूड खाण्याने होणारे शरीराची हानी याचा फरक समजावून सांगितला. निरोगी आणि सशक्त राहण्याकरिाा जेवणाच्या वेळा, सकस आणि स्वच्छ आहार याबाबत मुलांची चर्चात्मक कार्यक्रमामधून माहिती दिली.

६.५ २ नोव्हेंबर २०१४ रोजी 'पैजणांचे रुणूझूणू' या नृत्याच्या कार्यशाळेत श्रीमती रोशनी पालांडे आणि श्री. सिध्देश पालांडे यांनी मुलांना मॉब डान्स म्हणजे काय हे सांगितले. विद्यार्थ्यांकडून वेगवेगळया नृत्यांच्या विविध लकबीची प्रात्यक्षिके दाखवून करुन घेतली.

६.६ दि. ४ जानेवारी २०१५ रोजी 'ॲनिमेशन' या विषयावर श्री. विवेक तेटविलकर यांनी कार्यशाळा घेतली. ॲनिमेशन म्हणजे चालती बोलती काल्पनिक चित्रे ज्यांना मानवी हावभाव असतात आणि ते माणसासारखे वागतात. कॉम्युटर गेम, मोबाईल गेम्स किंवा स्वतंत्र गेम्स या गोष्टींकरिता ॲनिमेशनने तयार करता येतात. ॲमिमेशनमुळे व्यावसायिक क्षेत्रात काय काय संधी उपलब्ध आहेत या गोष्टी माहिती दिली. ॲनिमेशन फिल्म कशा तयार करताता हे प्रात्यक्षिकांसह दाखवली.

६.७ सृजन २०१४ या सृजनच्या वार्षिक कार्यक्रमांची सांगता ७ डिसेंबर २०१४ मध्ये श्री. राजीव राणे यांच्या पार्टी कार्यक्रमाने झाली. मुलांचे विविध सांघिक खेळ, नृत्य, गोष्टी आणि मिमिक्री अशा विविध मनोरंजनाच्या कार्यक्रमांचा सहभाग होता.

सौ. श्रृती दामले व सौ. श्वेता दामले यांनी 'अभ्यासाचे तंत्र' या विषयावर दि. १ फेब्रुवारी २०१३ रोजी कार्यशाळा आयोजित केली. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी अवघड या विषयाचा अभ्यास कसा करावा, परीक्षेच्या दरम्यान अभ्यासाचे नियोजन कसे करावे, विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या वेळी येणा-या अडीअडचणी या विषयावर चर्चात्मक व्याख्यान दिले. यावेळी विद्यार्थ्यांनी त्यांना अभ्यास करत असताना येणा-या समस्या आणि परीक्षेच्या अनुषंगाने अनेक प्रश्न विचारुन शंकासमाधान करुन घेतले.

## ९.७ शिक्षण विकास मंच :-

शिक्षण विकास मंचाने आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे हया शिक्षण विकास मंचच्या निमंत्रक म्हणून तर डॉ. वसंत काळपांडे, मुख्य संयोजक आणि श्रीमती बसंती रॉय विशेष सल्लागार म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. श्री. दत्ता बाळसराफ हे संयोजक म्हणून काम पहातात.

**७.१ विशेष बैठक दि. १८.२.२०१४ :-** दि. १८.२.२०१४ रोजी शिक्षण विकास मंचची स्थापना विशेष बैठक डॉ. वसंत काळपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. या बैठकीत प्रामुख्याने २५ नोव्हेंबर २०१३ रोजी 'शिक्षणात माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग' या विषयावर जी राज्यस्तरीय परिषद झाली त्याच्या फलनिष्पतीबद्दल चर्चा करण्यात आली. राज्यस्तरीय परिषदेत उपस्थित तज्ज्ञ, मान्यवर, शिक्षक, पालक यांच्याकडून ज्या सूचना आल्या आहेत त्याचा अहवाल तयार करुन शासन स्तरावर यांच्या अंमलबजावणीबाबत चर्चा करावी असे ठरले. आगामी शैक्षणिक वर्षात या विषयावर आपणास आणखी काय करता येईल याचीही चर्चा झाली. शिक्षण विकास मंचच्या मार्फत ज्या शाळा दत्तक घेण्यात आल्या आहेत त्यांना भेट देण्याबाबत चर्चा यावेळी करण्यात आली. मुंबई, पुणे येथे शिक्षण कट्टयाचे अतिशय प्रभावीपणे सध्या आयोजन करण्यात येत आहे. याप्रमाणे महाराष्ट्राच्या वेगवेगळया विभागात कट्टयाचे आयोजन कशारीतीने करता येईल याबाबतची चर्चा करण्यात आली. ई-लर्निंग कार्यशाळा एप्रिल २०१४ मध्ये रयत शिक्षण संस्था आणि शिक्षण विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने सातारा येथे आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीस श्रीमती बसंती रॉय, श्री. दत्ता बाळसराफ, श्री. सुरेश पाटील, श्री. माधव सूर्यवंशी यांची उपस्थिती होती.

**७.२ दि. २६ ते २८.४.२०१४ - सातारा :-** एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवडयात तीन दिवसीय ९ लर्निंग परिषद रयत शिक्षण संस्था आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या शिक्षण विकास मंचच्या संयुक्त विद्यमाने सातारा येथे पार पडली. या परिषदेला राज्यभरातून निवडक असे १५० प्रतिनिधी उपस्थित होते. शालेय शिक्षणात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन शिक्षण हे अधिक रंजक आणि आनंदी कसे करता येईल. यावर या परिषदेत प्रात्यक्षिकांसह चर्चा घडवून आणण्यात आली. माध्यम तज्ञ डॉ. केशव साठे यांनी मल्टीमिडीयाचा वापर करुन शालेय शिक्षण कसे दर्जेदार रंजक, कल्पक, प्रोत्साहनात्मक होते हे त्यांनी सांगितले. तंत्रज्ञान हाताशी घेऊन शिक्षकाने त्याचा वापर करावा. मात्र तंत्रज्ञानाचे गुलाम होऊ नयेत असे आव्हानही त्यांनी केले. त्याचबरोबर ई-लर्निंगचे महत्व विशद केले. परिषदेच्या दुस-या दिवशी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे यांनी परिषदेला भेट देऊन परिषदेतील कामकाजात सहभाग घेतला. अनेक शिक्षकांशी त्यांनी संवाद साधला. शिक्षकानी सद्यस्थितीत आपण माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन विविध उपक्रम कशारितीने शाळेत राबवित आहोत याबद्दलची माहिती दिली. रयत शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. अरविंद बुरुगुले यांनी रयत शिक्षण संस्थेच्या समुहातील शाळेत शिक्षण प्रक्रियेत माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग कसा केला जातो यांचे निवेदन केले. या परिषदेच्या समारोप सत्रात डॉ. वसंत काळपांडे यांनी तीन दिवसीय परिषदेचा अहवाल सादर करुन उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

**७.३ दि. १२.६.२०१४ - विशेष बैठक :-** दि. १२.६.२०१४ रोजी शिक्षण विकास मंचची विशेष आढावा बैठक डॉ. वसंत काळपांडे यांच्या उपस्थितीत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे झाली. सन २०१४-१५ या वर्षात कोणकोणते कार्यक्रम घ्यायचे व त्यासाठी लागणारा खर्च एकूणच या वर्षाचे अंदाजपत्रक व त्याची अंमलबजावणी याबाबतची प्रमुख चर्चा या बैठकीत झाली. या वर्षात जी राज्यस्तरीय शिक्षण परिषद होणार आहे यासाठी कोणता विषय ठेवण्यात यावा, त्याचे नियोजन काय असावे याचीही चर्चा या बैठकीत झाली.

**७.४ शिक्षण कट्टा दि. १९.७.२०१४ :-** शिक्षणावरील चर्चेचा 'शिक्षण कट्टा' हा कार्यक्रम दि. १९.७.२०१४ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईमध्ये घेण्यात आला. यावेळी 'सरकारी शाळांसमोरील आव्हाने' हा विषय ठेवण्यात आला

होता. या कट्टयावर मुंबईबरोबर राज्यातील विविध भागातील शिक्षकतज्ञ, शिक्षक, पत्रकार, पालक, संख्याचालक आदींनी सक्रियपणे आपला सहभाग नोंदविला व चर्चेत भाग घेतला. राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त होणा-या राज्यस्तरीय परिषदेत यावर्षी शिक्षण विकास मंचाकडून माहिती व तंत्रज्ञान या विषयावरील पुस्तक काढण्याबाबत चर्चा झाली. या पुस्तकातील लेख, लेखक याबाबतीत सखोल चर्चा व मंथन करण्यात आले. राष्ट्रीय तंत्रज्ञान धोरण, वैशिष्ट्ये अंमलबजावणी त्याचे परिणाम याबाबत सखोल चर्चा झाली.

७.५ **शिक्षण कट्टा दि. ९.८.२०१४ पुणे :-** गंभीरपणे पण तितक्याच हसत खेळत पध्दतीने काहीशी अनौपचारिक आणि काहीशा औपचारिक चर्चा करण्याचे ठिकाण म्हणजे 'शिक्षण कट्टा' होय. गेल्या काही वर्षापासून शिक्षणावरील ही चर्चा राज्यातील शिक्षणतज्ञ व त्याचबरोबर शिक्षणात काम करणारे शिक्षक, पत्रकार, पालक, विद्यार्थी यांना सोबत घेऊन अविरतपणे सुरु आहे. यावेळी हा शिक्षण कट्टा, पुणे येथे पार पडला. राज्यातील निवडक अशा २० तज्ञ अधिका-यांनी सिंगापूरचा अभ्यास दौरा केला. या अभ्यास दौ-यात सिंगापूरची शिक्षण पध्दती त्यांनी समजून घेतली. सिंगापूरची शिक्षण पध्दती आणि महाराष्ट्रातील शिक्षण पध्दतीचा तुलनात्मक अभ्यास करुन आगामी काळात महाराष्ट्रातील शिक्षण पध्दतीत याचा उपयोग होईल असे मत महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक श्री. मम्हाणे यांनी मांडले. या शिक्षण कट्टयाची सुरुवात श्रीमती बसंती रॉय यांच्या प्रास्ताविकाने झाली. श्रीमती रॉय यांनी शिक्षण कट्टयामागील भूमिका विशद करुन शिक्षण कट्टयावरील चर्चेचे महत्व अधोरेखित केले. आजच्या कट्टयावरील प्रमुख वक्ते जे आपल्या अभ्यास दौ-याचे अनुभव कथन करणार होते. त्यांचा परिचय डॉ. वसंत काळपांडे यांनी करुन दिला.

आपले अनुभव सांगताना श्री. म्हमाणे म्हणाले की, सिंगापूरची शिक्षण पध्दती नक्कीच आपल्यापेक्षा जास्त चांगली आहे. महाराष्ट्रातील शिक्षणपध्दतीला त्यात चांगले शिकण्यासारखे खूप आहे. त्याच्या अनुभव कथनानंतर उपस्थित असलेल्या शिक्षकांनी त्यांना विविध प्रश्न विचारले व आपल्या शंकेचे निरसन करुन घेतले. चर्चेचा प्रारंभ डॉ. वसंत काळपांडे आणि श्रीमती बसंती रॉय यांच्या प्रास्ताविकाने झाला. सरकारी शाळांसमोरील आव्हाने सांगताना उपस्थितांनी पुढील मुद्दयावर प्रामुख्याने चर्चा केली. शिक्षक, मुख्याध्यापक, प्रशिक्षण आणि मुख्याध्यापक निवडीची प्रक्रिया त्यातील सुधारणा आदीबाबतीत अतिशय टोकदार चर्चा यावेळी कट्टयावर झाली. अनुदानित शाळांचे देय अनुदान या धगधगत्या विषयावर वादग्रस्त चर्चा यावेळी कट्टयावर झाली.

सरकारी शाळेत सुधारणा होण्यासाठी उपाययोजना यावेळी अनेकांनी मांडल्या. मराठी शाळांना सेमी इंग्रजी पर्याय द्यावा असेही सुचविण्यात आले. मुंबई बोर्डाचे चेअरमन श्री. लक्ष्मीकांत पांडे यांनी काही नवीन उपक्रम सांगितले. सरकारी शाळांसमोर सध्या खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे आव्हान आहे. हे आव्हान मोठे आहे. यासाठी सरकारी शाळांना स्पर्धेत राहणे आवश्यक आहे असे मत मांडण्यात आले. या कट्टयावर डॉ. श्रीमती अय्यर, श्रीमती सुचिता भवाळकर, श्रीमती नजमा काझी, श्री. राज अलोनी, श्री. श्रीधर पाटील, श्री. विकास कांबळे, श्रीमती अर्चना घारे, श्री. गिरीश दिवाण, श्री. बाळासाहेब होडे, श्री. निलेश बोराळे व श्री. नंदकिशोर जाधव यांनी आपआपले विचार मांडले.

७.६ **'सुयश शैक्षणिक गुणवत्ता विकास प्रकल्प' आयोजित कृतिसत्र संपन्न :-** पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी विज्ञान केंद्र, माळेगांव, बारामती येथे दौंड, बारामती, इंदापूर, पुरंदर या तालुक्यातील निवडक प्राथमिक व माध्यमिक शाळातील मुख्याध्यापक, शिक्षकांचे २० व २१ सप्टेंबर २०१४ रोजी दोन दिवसीय कृतिसत्र संपन्न झाले. या कृतिसत्राचे प्रास्ताविक मुख्य संयोजक, डॉ. वसंत काळपांडे यांनी केले तर या कृतिसत्रामागील भूमिका श्रीमती बसंती रॉय, विशेष सल्लागार, शिक्षण विकास मंच यांनी विशद केली. सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन आणि कृतियुक्त शिक्षण या विषयावर सर्व शिक्षकांचे उद्‌बोधन श्री. शिवाजी तांबे, श्री. प्रकाश परब, श्री. संदीप वाकचौरे यांनी केले. कृतियुक्त शिक्षण देत असताना मुलांना याचा आनंद कसा देता येईल. याबद्दल सर्व सहभागी शिक्षकांनी स्वतःचे अनुभव सांगितले. शालेय जीवनात दहावीच्या परीक्षेचे महत्त्व ज्याप्रमाणे विद्यार्थ्यांना असते त्याप्रमाणे शाळेलाही असते. आपल्या शाळेचा निकाल १०० टक्के कसा लागेल याबद्दल ज्येष्ठ शिक्षण तज्ञ डॉ. अ. ल. देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. श्रीमती बसंती रॉय आणि डॉ. जयश्री

करंबे यांनी विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या व्यक्तिमत्व विकासाचे विविध पैलू आणि त्याबाबत काय करता येईल यांचे मार्गदर्शन केले. आपल्या शाळेचा परिसर हा पर्यावरणीय दृष्टया कसा सुशोभित करता येईल, आपल्या शाळेतच औषधी वनस्पतींची बाग कशी फुलवता येईल याबाबतची चर्चा श्री. प्रशांत शिंदे, श्रीमती सायली जगताप आणि पर्यावरणात काम करणा-या तज्ञांनी केली. यातून सर्वांना पर्यावरणीय संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

मुलांच्या शालेय जीवनात शिष्यवृत्ती परीक्षा आणि राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेला अनन्य साधारण महत्व असते हे ओळखून या कृतिसत्रात महाराष्ट्र शासनाचे शिक्षण सहसंचालक डॉ. सुनील मगर यांच्या उपस्थित चर्चा झाली. मुख्याध्यापक व शिक्षक यांनी हया परीक्षेची तयारी करत असताना त्यांना जे अनुभव येतात ते कथन करुन आपल्या अडचणी युक्त समस्या मांडल्या. यातून कसा मार्ग काढावा याबाबतचे मार्गदर्शन डॉ. सुनील मगर यांनी केले. इंग्रजी भाषेला आजच्या व्यवहारी व व्यावसायिक जगात असलेले महत्व लक्षात घेवून इंग्रजी भाषेतील विविध कौशल्य अवगत करावी याबद्दलची चर्चा डॉ. प्रशांत गावंडे आणि डॉ. श्रुती चौधरी, सदस्य इंग्रजी भाषा समिती, बालभारती यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. प्रामुख्याने शिक्षकास इंग्रजी भाषेचे अध्यापन करीत असताना येणा-या ज्या अडचणी आहेत यांचे कथन सर्वांनी केले. यावर काय मार्ग आहेत याबद्दलची चर्चा दोन्ही तज्ञांनी केली. इंग्रजीबद्दल शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या मनात जी न्यूनगंडाची भावना आज आहे ती दूर करण्यास या चर्चेचा उपयोग होईल असे सर्वांनी नमूद केले.

दोन दिवस अतिशय महत्त्वाच्या विषयावर झालेल्या चर्चेच्या आधारावर आगामी काळातील कृतिकार्यक्रम या ठिकाणी सादर करण्यात आला व त्याचे भविष्यकालीन नियोजनात्मक स्वरुप कसे राहील यांचे विवेचन डॉ. वसंत काळपांडे यांनी समारोपाच्या सत्रात केले. समारोपाच्या प्रसंगी मुख्याध्यापक, शिक्षक यांनी कृषिविज्ञान केंद्र निसर्गरम्य परिसरात झालेले हे प्रशिक्षण नक्कीच वेगळा अनुभव देणारे आहे. अशा भावना व्यक्त करुन याचा उपयोग नक्कीच विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासात होईल असे सांगितले.

७.७ **मुख्याध्यापक प्रशिक्षण** :- शालेय शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी मुख्याध्यापकाची भूमिका खूप महत्त्वाची ठरते. त्यास अनुसरुन बदलत्या काळात मुख्याध्यापकांची कर्तव्ये, जबाबदा-या आदीबाबत प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यासाठी दि. १० ऑक्टोबर ते ऑक्टोबर २०१४ या तीन दिवसाच्या कालावधीत रयत शिक्षण संस्था, सातारा व शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रयत शिक्षण संस्थेच्या सर्व विभागातील काही निवडक मुख्याध्यापकांचे प्रशिक्षण पुणे येथे आयोजित करण्यात आले होते. रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन ॲड. रावसाहेब शिंदे व मुख्य संयोजक डॉ. वसंत काळपांडे तसेच श्रीमती बसंती रॉय व इतर सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत प्रशिक्षण वर्गाची सुरुवात करण्यात आली. या प्रशिक्षण वर्गात मुख्याध्यापक व शाळा आणि विद्यार्थी यांचा संयुक्त सर्वांगीण विकास या अनुषंगाने चर्चा करण्यात आली.

शाळेचा मुख्य घटक विद्यार्थी आहे. त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शासन व संस्थेमार्फत आवश्यक ते बदल केलेले आहेत. त्या बदलाची नियमांची अंमलबजावणी मुख्याध्यापक व शिक्षकांनी कशा पध्दतीने करावी याबाबतचे मार्गदर्शन करण्यात आले. मुख्याध्यापक हा शाळेचा कणा आहे. त्यामुळे मुख्याध्यापकांमध्ये अनेक गुण व कौशल्ये असणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांचा विकास म्हणजे समाजाचा विकास असतो. त्या विद्यार्थ्यांतील त्रुटी, दोष दूर करुन त्यांना सकारात्मक विचार दिल्यास प्रगती साधता येऊ शकते. यासाठी मुख्याध्यापकांनी काय करावे याबाबतची चर्चा प्रामुख्याने या प्रशिक्षणात झाली.

७.८ **विशेष बैठक - दि. ३० सप्टेंबर** २०१४ :- दि. ३० सप्टेंबर २०१४ रोजी शिक्षण विकास मंचची विशेष बैठक डॉ. वसंत काळपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. या बैठकीत २०, २१ सप्टेंबर २०१४ रोजी सुयश शैक्षणिक गुणवत्ता विकास प्रकल्पाअंतर्गत दोन दिवसीय कृतिसत्र संपन्न झाले त्याबाबतची चर्चा करण्यात आली. कृतिसत्रास कसा प्रतिसाद मिळाला, कृतिसत्रानंतर गुणवत्ता विकास करण्यासाठी आणखी आपणास काय करता येईल. याबाबतची सांगोपांग चर्चा या विशेष बैठकीत करण्यात आली. दि. २५.११.२०१४ रोजी जिल्हा राज्यस्तरीय शिक्षण परिषद घेण्यात येणार आहे. त्यासंदर्भात पूर्वतयारीचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. या परिषदेसाठी निमंत्रण पाठविणे, तज्ञ वक्ते यांची निवड करणे, निमंत्रितांची

यादी करणे, शिक्षण परिषदेत शैक्षणिक विषयावरच्या पुस्तकास जे पुरस्कार देण्यात येणार आहेत याबाबतची चर्चा करण्यात आली. 'वाटचाल ई-शिक्षणाची' हे पुस्तक प्रकाशित करण्यात येणार आहे. यासंदर्भात योग्य ते निर्णय घेण्यात आले. या बैठकीस श्रीमती बसंती रॉय, श्री. दत्ता बाळसराफ, श्री. माधव सूर्यवंशी, श्री. विकास कांबळे, श्री. सुरेश पाटील व श्री. निलेश पुराडकर आदींची उपस्थिती होती.

७.९ **विशेष बैठक - दि. ६ नोव्हेंबर २०१४ :-** दि. ६ नोव्हेंबर २०१४ रोजी शिक्षण विकास मंचची विशेष बैठक ठेवण्यात आली होती. ही बैठक प्रामुख्याने २५.११.२०१४ रोजी जी राज्यस्तरीय शिक्षण परिषद आयोजित करण्यात आली आहे. यासंदर्भातील कामाचा आढावा घेण्यासाठी घेण्यात आली होती. या वर्षाची परिषद 'सरकारी आणि अनुदानित शाळापुढील आव्हाने' या विषयावर ठेवण्यात आली होती. या परिषदेसाठी विशेष निमंत्रितांची यादी निश्चित करण्यात आली. प्रमुख पाहुणे, उद्घाटक, सादरीकरण करणारे तज्ज्ञ यांच्याशी झालेला संवाद याबाबतची माहिती डॉ. वसंत काळपांडे यांनी सांगितली. आपणास याबाबतीत आणखी काय काम करावे लागेल यासाठीची सूचना त्यांनी संबंधितांना दिल्या. या परिषदेनिमित्त शिक्षण विकास मंचाकडून डॉ. कुमुद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथास दिला जाणारा पुरस्कार याबाबत चर्चा करण्यात आली याची जबाबदारी श्री. विकास कांबळे यांच्याकडे देण्यात आली. शिक्षण परिषदेत 'वाटचाल ई-शिक्षणाची' हे पुस्तक प्रकाशित करण्याचे ठरले होते. या पुस्तकाच्या संपादनाची मुख्य जबाबदारी श्रीमती बसंती रॉय यांच्याकडे होती. त्यांनी पुस्तकाबाबतीत सुरु असलेल्या कामाचा आढावा सर्वांना सांगितला. परिषद कशाप्रकारे यशस्वी होईल याची सर्वांगीण चर्चा होऊन कामाच्या जबाबदारीचे वाटप संबंधितांना यावेळी करण्यात आले.

७.१० **विशेष बैठक - दि. १२ जानेवारी २०१५ :-** डॉ. वसंत काळपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत 'आदर्श शाळा योजना' सुयश गुणवत्ता विकासासाठी ज्या शाळांची निवड झाली आहे तेथे कशी राबवता येईल यासाठी बैठकीत क्वॉलिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया या संस्थेचे मुंबई विभागाचे संयुक्त सचिव श्री. विजय लाड आणि श्री. जयेश यांना निमंत्रित करण्यात आले होते.

७.११ **राष्ट्रीय शिक्षण दिन - दि. २५ नोव्हेंबर २०१४ :-** भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ११ नोव्हेंबर रोजी शिक्षण विकास मंच राष्ट्रीय शिक्षण दिनाचे आयोजन करत आहे. यावर्षी ११ नोव्हेंबर हा दिवस दिवाळी सुट्टीच्या कालावधीत येत असल्याने हा कार्यक्रम यावर्षी दि. २५ नोव्हेंबर २०१४ या दिवशी रंगस्वर, यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता. २५ नोव्हेंबर हा दिवस मा. यशवंतराव चव्हाण यांचा स्मृतिदिन आहे.

दरवर्षी घेण्यात येणारी शिक्षण परिषद ही राज्यस्तरीय असते. यावर्षी परिषदेचा विषय 'सरकारी आणि अनुदानित शाळापुढील आव्हाने' हा होता. या परिषदेस राज्यभरातून शिक्षणावर काम करणारे कार्यकर्ते, शिक्षक, मुख्याध्यापक, संस्था चालक आणि शिक्षण तज्ञ यांना निमंत्रित करण्यात आले होते. गेल्या दहा वर्षात विनाअनुदानित शाळांचे प्रमाण दुपटीने वाढले आहे तर सरकारी आणि अनुदानित शाळांचे प्रमाण हळूहळू कमी होत आहे. इंग्रजी माध्यमांचे वाढते आकर्षण व शासनाचे धोरण यामुळे विनाअनुदानित शाळा वाढत आहेत. सरकारी आणि अनुदानित शाळाच्या अडचणी समजून घेऊन त्या समस्या सोडवून त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी बरेच काही करण्याची आणि तातडीची उपाययोजना करण्याची गरज आहे. या अनुषंगाने या परिषदेत दिवसभर विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. या परिषदेची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे होती.

१) सरकारी आणि अनुदानित शाळांच्या महाराष्ट्रातील सद्यस्थितीचा आढावा घेणे.

२) या शाळांपुढील अडचणी आणि आव्हाने यांचे त्यांच्याशी निगडित असलेल्या विवध गटांचे पुढील विषयांबाबतचे आकलन समजावून घेणे.

(१) शिक्षण हक्क कायदा, (२) राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, (३) अध्ययन - अध्यापन प्रक्रिया आणि विद्यार्थ्यांचे मूल्यमापन, (४) शिक्षकांच्या नेमणुका, (५) शिक्षक प्रशिक्षण, (६) भौतिक सुविधा आणि अनुदान, (७) शाळांशी संबंधित विविध कायदे आणि नियम, (८) सरकारी, अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांची तुलना, (९) विविध शिक्षण मंडळांच्या

शाळांची तुलना, (१०) शाळांची तपासणी आणि मूल्यांकन, (११) संस्थाचालक, पालक, लोकप्रतिनिधी, विविध संघटना (शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक आणि इतर), (१२) शिक्षणाचे भाषा माध्यम व (१३) शाळांशी संबंधित इतर विषय.

सरकारी आणि अनुदानित शाळा टिकवण्यासाठी आणि त्यांची गुणवत्ता उंचावण्यासाठी शाळा, शिक्षक, पालक, व्यवस्थापक आणि शासन यांच्या स्तरावर कोणती उपाययोजना करता येतील याबाबत शासनाला धोरणात्मक शिफारशी करणे. शिक्षण विकास मंचाने आतापर्यंत वेगवेगळया विषयावर सातत्याने पाच परिषदा घेऊन या विषयावरचे विचारमंथन संपूर्ण राज्यभर घडवून आणले आहे. आजची परिषद ही सहावी आहे. या परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी या परिषदेची भूमिका यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे यांनी स्पष्ट केली. तर प्रास्ताविक शिक्षण विकास मंचाचे प्रमुख संयोजक डॉ. वसंत काळपांडे यांनी केले. प्रास्ताविक करीत असताना शिक्षण विकास मंचाचे कार्य आणि आजची परिषद या विषयावर आयोजित करण्यात आली आहे हे सांगितले. शिक्षण विकास मंचाने विविध शिक्षणातील विषय घेऊन याच्या शिफारशी शासनाकडे सादर केल्याचे त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय दिनाचे औचित्य साधून शिक्षण विकास मंचाकडून दरवर्षी दिले जाणारे जे पुरस्कार आहेत. त्याचेही वितरण यावेळी करण्यात आले. मान्यवर पाहुणे व राज्याचे शिक्षणमंत्री ना. श्री. विनोद तावडे यांच्या हस्ते डॉ. कुमुद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार 'मनुष्य घडणीसाठी आव्हान' या ग्रंथासाठी लेखक श्री. गिरीश बापट, पुणे यांना देण्यात आला. 'ज्ञानरचनावाद एक कल्पवृक्ष' चे लेखक श्री. राजेश कोगदे यांना उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आला. आज शिक्षणात मोठया प्रमाणात तंत्रज्ञानाचा वापर सुरु झाला आहे. यास अनुसरुन शैक्षणिक विषयावर ब्लॉग लिहणा-यास उत्कृष्ट शैक्षणिक ब्लॉग हा पुरस्कार देण्यात येतो. या वर्षाचा पुरस्कार प्रथमिक शिक्षक श्री. बालाजी जाधव यांना देण्यात आला. याच सोबत ई-लर्निंग क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणारे श्री. शमशुद्दीन आत्तार यांनाही ई-लर्निंगवरील प्रकल्पासंदर्भात पुरस्कार देण्यात आला. रोख रक्कम, स्मृतीचिन्ह, ग्रंथ असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. मान्यवरांच्या हस्ते अतिशय पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम पार पडला.

आजच्या परिषदेचे उद्‌घाटक राज्याचे शिक्षणमंत्री ना. श्री. विनोद तावडे यांनी केले. उद्‌घाटनपर भाषणात त्यांनी शिक्षण हक्क कायदा आणि राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान याबाबत विचार व्यक्त करताना सांगितले की, हा कायदा राज्यास लागू करीत असतांना त्यात राज्यानुरुप बदल होणे आवश्यक होते पण ते झाले नाहीत. मात्र आगामी काळात यात योग्य ते बदल करण्यात येतील असे नमूद केले. शिवाय सरकारी आणि अनुदानित शाळांसमोरील आव्हानांबाबत बोलताना ते म्हणाले की, शासन म्हणून जी जबाबदारी शालेय गुणवत्तेखाली आवश्यक आहे ती आपण करणार आहोत. शिवाय शिक्षकांचे प्रशिक्षण अद्ययावत करण्यावर त्यांनी भर दिला. एकाही शिक्षकाची नोकरी जाणार नाही पण जेवढा पगार दिला जातो तेवढे काम शिक्षकांनी करावे असा चिमटाही काढण्यास ते विसरले नाहीत. दिवसभराच्या या परिषदेत जी चर्चा होईल, ज्या सूचना, शिफारशी येतील त्या आपण शासनाकडे सादर कराव्यात त्याचा आम्हास धोरण बनवितांना नक्कीच फायदा होईल हे सांगून परिषद यशस्वीतेसाठी शुभेच्छा दिल्या.

उद्‌घाटनपर सत्रास उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांचे आभार श्रीमती बसंती रॉय यांनी मानले. परिषदेचे उद्‌घाटन झाल्यानंतर परिषदेस मार्गदर्शन करण्यासाठी निमंत्रित करण्यात आलेल्या तज्ज्ञ मार्गदर्शकांचे सादरीकरण झाले. सरकारी आणि अनुदानित शाळा यावर शासनाची काय भूमिका आहे ? शासनाने आजपर्यंत बजावलेली कर्तव्ये या संदर्भात शासनाची भूमिका या विषयावरची मांडणी महाराष्ट्र शासनाचे माध्यमिक शिक्षण विभागाचे सहसंचालक श्री. दिनकर पाटील यांनी केली. शासनाने वेळोवेळी नवनवीन प्रयोग शिक्षण क्षेत्रात राबविले त्यामुळेच आज शिक्षणाच्या क्षेत्रात महाराष्ट्र एक पुढारलेले राज्य आहे असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. अजूनही सरकारी आणि अनुदानित शाळांच्या प्रश्नांच्या बाबतीत शासन संवेदनशील असल्याचे त्यांनी सांगितले. सरकारी आणि अनुदानित शाळा आणि शिक्षकांची भूमिका या विषयावरील सादरीकरणासाठी कोकण विभागाचे शिक्षक आमदार श्री. रामनाथ मोने यांना निमंत्रित करण्यात आले होते. शिक्षकांची भूमिका मांडतांना ते म्हणाले की, सरकारी शाळांतील शिक्षकांने आजपर्यंत शाळाबाहय कामाबरोबरच शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्याचे महत्त्वाचे काम केले आहे. सरकारी शाळेत येणारी मुले जरी भिन्न असली तरी त्यांना अध्ययनाची गोडी लावण्याचे काम शिक्षकांनी केले आहे हे सांगताना शिक्षकांनी परिवर्तनशील असावे. काळाबरोबर स्वतःला अपडेट ठेवावे असाही सल्ला त्यांनी उपस्थित शिक्षकांना दिला. शिक्षकांनी मुलांच्या भवितव्याबाबत विचार करुन त्यांना अध्यापनास उद्युक्त करावे. आपण शिक्षकांसाठी सरकारकडे भांडण्यास कमी पडणार नाही असेही ते म्हणाले.

श्री. आप्पा सावंत यांनी जिल्हा परिषदेच्या शाळेत गुणवत्तापूर्वक शिक्षण सध्या कसे दिले जात आहे याची काही उदाहरणे दिली. आज जिल्हा परिषद शाळांचा दर्जा सुधारत असल्याचे सांगितले. श्री. रमाकांत पांडे, उपाध्यक्ष व कायदेशीर सल्लागार, शैक्षणिक संस्था व्यवस्थापक मंडळ यांनी माध्यमिक शाळांचे व्यवस्थापन या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. शासन आज अनुदानित शाळांना शिक्षकेतर कसलेही अनुदान देत नाही व त्याचबरोबर शिक्षका व्यतिरिक्त शिपाई, लिपिक ही पदे भरण्याची परवानगी देत नाही याचा परिणाम मुलांच्या शिक्षणावर झाला आहे. अनुदान नसल्याने दैनंदिन खर्च भागविणे संस्था चालकांना गंभीर होऊन बसले आहे. आज बहुतेक अनुदानित शाळा हया आर्थिक संकटात सापडल्या आहेत. कोणत्याही पायाभूत सुविधा आर्थिक अडचणीमुळे व्यवस्थापक मंडळ शाळाना अर्थातच विद्यार्थ्यांस देऊ शकत नसल्याचे त्यांनी सांगितले व नवीन शासनाने त्वरित आमचे अनुदान द्यावे अशीही मागणी यावेळी त्यांनी केली. अनुदानित माध्यमिक शाळा या संदर्भात श्री. अरुण थोरात, अध्यक्ष, मुख्याध्यापक महामंडळ यांनी आपले विचार व्यक्त केले.

दुपारच्या सत्रामध्ये दोन तज्ज्ञांची सादरीकरणे झाली. त्यात पहिले सादरीकरण 'अल्पसंख्याकांच्या शाळा' या विषयावर अंजुमन इस्लाम संस्था समूहाचे चेअरमन श्री. जहीर काझी यांचे झाले. श्री. काझी यांनी आपल्या व्यासंगी आणि अभ्यासपूर्ण मांडणीत अल्पसंख्याकांच्या शाळांमधील आव्हाने यावर प्रमुख भर दिला. अल्पसंख्याक समाजात ख-या अर्थाने शिक्षणाची खूप गरज आहे. मात्र शासनाचे यासंदर्भातील धोरण धरसोड वृत्तीचे आहे यात बदल व्हायला हवा असे मत त्यांनी मांडले. विद्यार्थी आणि व्यवस्थापन मंडळ यासंदर्भात अनेक नियामक कायदे हे कालबाहय झाले असून नव्याने कायदे बनविण्याची गरज त्यांनी प्रतिपादन केली. महानगरपालिका शाळांची शैक्षणिक गुणवत्ता या विषयावर डॉ. श्रुती पानसे (शिक्षण क्षेत्रातील एक अध्यापक) यांनी मते मांडली. मनपा शाळामध्ये सुविधा असूनही ही मुले अभ्यासात का मागे पडतात असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मनपा शाळेतील शिक्षकांनी मुख्याध्यापकांनी यावर गंभीरपणे विचार करावा असेही आव्हान त्यांनी केले.

उत्साहात व तितक्याच गंभीरपणे चर्चा झालेल्या राज्यस्तरीय परिषदेच्या समारोपाच्या सत्रात दिवसभर झालेल्या चर्चेचा आढावा डॉ. वसंत काळपांडे यांनी घेतला. मात्र समारोपाचे सत्र ख-या अर्थाने लक्षात राहिले ते यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा आणि शिक्षण विकास मंचाच्या निमंत्रण सौ. सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनाने. त्यांनी या परिषदेचा समारोप करीत असताना राज्यभरातून आलेल्या शिक्षकांचे कौतुक केले पण त्याचबरोबर शालेय शिक्षणात शिक्षक इंग्रजीसारखा विषय चुकीच्या पध्दतीने कसा शिकवितात याचा त्यांना आलेला मजेदार अनुभव सांगितला. सरकारी शाळेत येणारी मुले ही गरीब घरातून आलेली असतात. त्यांचा विकास ख-या अर्थाने समाजाचा व देशाचा विकास आहे. यासाठी शिक्षकाने अतिशय जबाबदारीने त्यांच्याबरोबर अध्यापन प्रक्रियेत समाविष्ट झाले पाहिजे व त्यांना जीवनात उपयोगी पडतील असे अध्ययन अनुभव दिले पाहिजे असे त्यांनी नमूद केले. शिक्षणाच्या क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान येत आहे, त्याचा अंगीकार शिक्षकांनी करायला हवा व आपल्या ज्ञानात नवनवीन बाबीची भर टाकावी असे त्यांनी सांगितले. परिषदेत उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांचे, तज्ज्ञांचे, शिक्षकांचे आभार श्रीमती बसंती रॉय यांनी मानले.

७.१२ **पुस्तक परिचय - वाटचाल ई शिक्षणाची** :- आधुनिक काळात तंत्रज्ञानात झालेली प्रचंड प्रगती हे जागतिकीकरणाचे प्रमुख कारण आहे. हया प्रगतीमुळे आपले संपूर्ण सामाजिक जीवनसुध्दा ढवळून निघत आहे. नवनवीन रोजगार संधी निर्माण होत आहेत. आज तंत्रज्ञान जीवनातील प्रत्येक अंग व्यापत आहे. तरी देखील शिक्षण प्रणालीत तंत्रज्ञानाचा फार मोठा शिरकाव अगदी आतापर्यंत तरी झालेला नव्हता. आता शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल होण्यास सुरुवात झालेली आहे. वर्ष २०१२ मध्ये माहिती व दूरसंचार तंत्रज्ञानाच्या राष्ट्रीय धोरणानुसार आता शालेय शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आय.सी.टी. (माहिती, निवेदन व तंत्रज्ञान) चा कमाल उपयोग करण्यावर भर देण्यात आलेला आहे. त्यातून भविष्यामध्ये राष्ट्र उभारणीच्या प्रक्रियेत आय.सी.टी. बद्दल समाजात जागरुकता आणून आय.सी.टी. साक्षर समाज घडवण्याचे उद्दिष्ट साध्य करणे शक्य होणार आहे. आय.सी.टी. च्या राष्ट्रीय धोरणाबाबत झालेल्या परिषदेच्या निमित्ताने या विषयावरील माहितीपर लेख व शालेय स्तरावरील उपक्रमांचे संकलन 'वाटचाल ई-शिक्षणाची' पुस्तकामध्ये वाचावयास मिळेल. याच संदर्भात जॉन डयुई या शिक्षणतज्ज्ञाचे विचार उद्‌बोधक आहेत. 'काल शिकवित होतो तसेच आजही शिकवित राहिलो तर आपण आपल्या मुलांपासून त्यांचा भविष्यकाळ हिरावून घेऊ'.

## ९.८ अपंग हक्क विकास मंच :-

महाराष्ट्रातील अपंग व्यक्तींच्या विविध समस्या संवाद व समन्वयाच्या भूमिकेतून सोडविण्यासाठी अपंग हक्क विकास मंचाची निर्मिती करण्यात आली. मंचाच्या निमंत्रक सौ. सुप्रिया सुळे आहेत. मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर व श्री. दत्ता बाळसराफ हे काम पाहतात. या मंचामार्फत महाराष्ट्रातील विविध जिल्हयात शिबीराचे आयोजन करुन सर्व प्रवर्गातील अपंगांना त्यांच्या आवश्यकतेनुसार कृत्रिम अवयव व साहित्य साधनांसाठीचे मोजमाप घेऊन अपंगांना कृत्रिम अवयव व साधने मोफत उपलब्ध करुन दिली जातात. तसेच या मंचामार्फत प्रत्येक अपंगांना त्यांच्या अपेक्षेनुसार योग्य ती माहिती पुरविली जाते. तसेच अपंगांना मदत करण्याचा आपल्या स्तरावरुन योग्य ते सहकार्य करण्याचा मंचाचा सतत प्रयत्न असतो. महाराष्ट्रातील विविध जिल्हयात सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने आणि जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत महाराष्ट्रातील सर्व प्रवर्गातील अपंगांसाठी कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरांच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघ व अपंग हक्क विकास मंचाचे कर्मचारी वृंद व कार्यकर्ते आणि सहकारी यांनी परिश्रम घेतले. त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे.

८.१ **३० जून २०१४ : कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर** :- सांगली येथे आयोजित या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे सभापती श्री. राजेंद्र माळी, उपाध्यक्ष श्री. बसवराज पाटील, उपसभापती श्री. दत्तात्रय पाटील, श्रीमती वैशाली नाईक, वै.सा.का. श्री. किसनराव जंकर, वैद्यकीय सामाजिक अधिकारी श्री. सचिन कावळे, समाज कल्याण अधिकारी श्रीमती एस. एस. गायकवाड आणि अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात एकूण २८५ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली व तपासणी करुन त्यापैकी १७० गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेल कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महात्मा गांधी सेवा संघ व जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी वृंद उपस्थित होते.

८.२ **५, ६ व ७ जुलै २०१४ : कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर** :- नाशिक येथे आयोजित या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पी.डब्ल्यू.डी.चे आयुक्त श्री. ज्ञानेश्वर राजूरकर, वैसाका. श्री. पी. यु. पाटील, श्री. धीरज बिरजे, श्री. विनायक रानडे, श्री. विश्वास ठाकूर आणि अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात एकूण २०० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली व तपासणी करुन त्यापैकी १५२ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेल कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महात्मा गांधी सेवा संघ व जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी वृंद उपस्थित होते.

८.३ **मुंबई (उपनगर) दि. ८, ९ व १० जुलै २०१४ : कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर** :- मुंबई उपनगर येथे आयोजित या शिबिरास अध्यक्ष म्हणून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सरचिटणीस, मा. श्री. शरद काळे, अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, श्री. विजय कान्हेकर व श्री. सुहास तेंडुलकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात एकूण १०० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली. यापैकी ७२ गरजू अपंग लाभार्थ्यांना कृत्रिम साहित्याचे वाटप करण्यात आले. जयपूर फूट १०, महन चाकी सायकल २५, व्हिलचेअर १५, अंध काठी ७, गॉगल ३, कुबडी २ जोड इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात आले. तर उर्वरित २८ लाभार्थी प्रतिक्षा यादीत आहेत. सर्व उपस्थित लाभार्थ्यांना स्वयंरोजगार, शैक्षणिकविषयी, अपंगांच्या शासन निर्णयाविषयी, अपंगांच्या विविध योजना याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

८.४ **कोल्हापूर १६ जुलै २०१४ : कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर** :- कोल्हापूर येथे आयोजित या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा अध्यक्ष डॉ. विजय सुर्यवंशी, श्री. आनंदनाथ महाराज, श्री. शिंदे, वै.सा.का. श्री. पवन खेबुडकर, अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर आणि समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात एकूण १४५ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली व तपासणी करुन त्यापैकी ८१ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेल कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महात्मा गांधी सेवा संघ व जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी वृंद उपस्थित होते.

८.५ **रायगड १६ जुलै २०१४ : कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर** :- रायगड येथे आयोजित या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार श्रीमती मिनाक्षीताई पाटील, श्री. पंडीत शेठ पाटील, श्री. रमेश नागोणकर, श्री. मनोज भगत, श्रीमती प्रिती चाऊलकर, श्रीमती निता गिधी, श्री. विजय गिधी, समाजसेवक श्री. किशोर वेखंडे, श्री. वाणी, अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर आणि समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात एकूण ११० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली व तपासणी करुन त्यापैकी ७५ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेल कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महात्मा गांधी सेवा संघ व जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी वृंद उपस्थित होते.

८.६ **सोलापूर १६ जुलै २०१४ : कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर** :- सोलापूर येथे आयोजित या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार श्रीमती मिनाक्षीताई पाटील, श्री. पंडीत शेठ पाटील, श्री. रमेश नागोणकर, श्री. मनोज भगत, श्रीमती प्रिती चाऊलकर, श्रीमती निता गिधी, श्री. विजय गिधी, समाजसेवक श्री. किशोर वेखंडे, श्री. वाणी, अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर आणि समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात एकूण १४० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली व तपासणी करुन त्यापैकी ७५ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेल कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महात्मा गांधी सेवा संघ व जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी वृंद उपस्थित होते.

८.७ **जालना १७ व १८ जुलै २०१४ : कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर** :- जालना येथे आयोजित या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे सभापती श्रीमती आशाताई भुतेकर, मुख्य अधिकारी श्रीमती प्रेरणा देशभ्रतार, जालना जिल्हा वैद्यकीय सामाजिक अधिकारी श्रीमती संगीता मकरंद, श्री. पंडितदादा भुतेकर, वै.सा.का. पंकज वाघमारे, शिक्षक वृंद आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात एकूण २०० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली व तपासणी करुन त्यापैकी १५२ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेल कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महात्मा गांधी सेवा संघ व जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी वृंद उपस्थित होते.

८.८ **सातारा १७ व १८ जुलै २०१४ : कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर** :- सातारा येथे आयोजित या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. शिरीष यादव, श्री. डकरे, समाजकल्याण अधिकारी श्रीमती स्वाती इथापे, श्री. मोहन माळी, वे.सा.का. श्रीमती अनुराधा कानडे, अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर आणि समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात एकूण १५५ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी

करण्यात आली व तपासणी करुन त्यापैकी ७९ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेल कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महात्मा गांधी सेवा संघ व जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी वृंद उपस्थित होते.

८.९ जळगांव ३१ जुलै २०१४ : **कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर** :- जळगाव येथे आयोजित या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून वै.सा.का. भारत चौधरी, मिनाक्षी निकम, अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर आणि समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करुन गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेल कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महात्मा गांधी सेवा संघाचे श्री. संदिप शिरसाट, श्री. चांदोबा बिरगड, श्री. प्रभाकर वावरे व जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी वृंद उपस्थित होते.

८.१० पुणे दि. १९ व २० ऑगस्ट २०१४ : **पुणे जिल्हयातील श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिक व कर्णबधीर मुलांना मोफत आधुनिक डिजिटल श्रवणयंत्र वाटप शिबिर** :- स्टारकी फाऊंडेशन, अमेरिका, अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्हयातील १३०० श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिक व कर्णबधीर मुले यांना मोफत श्रवणयंत्र वाटप शिबीर निसर्ग मंगल कार्यालय, मार्केटयार्ड, पुणे येथे दि. १९ व २० ऑगस्ट २०१४ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी स्टारकी फाऊंडेशन, अमेरिका या संस्थेचे पदाधिकारी व स्वयंसेवक पुण्यात उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी पूर्व तयारी म्हणून सर्व स्वयंसेवकांना श्री. विजय कान्हेकर, श्री. सुहास तेंडुलकर, श्री. निलेश राऊत, श्री. सुबोध जाधव व टारकीचे समन्वयक श्री. सतिश निर्मळ यांनी मार्गदर्शन केले. दि. १९ ऑगस्ट २०१४ रोजी सकाळपासूनच पुणे जिल्हयातील श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिक आणि निवड केलेल्या विशेष शाळा व त्यांचे कर्णबधीर विद्यार्थी निसर्ग मंगल कार्यालयात येण्यास सुरुवात झाली. प्रत्येक शाळांनी त्यांचे विद्यार्थी ३ ते १४ वयोगटातील विद्यार्थी गट निहाय क्रमाने बसवले होते. आलेल्या प्रत्येक कर्णबधीर विद्यार्थ्याला व श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिकांना अगोदरच दिलेल्या व सविस्तर अशा फॉर्मसह त्यांच्या क्रमानुसार नोंदणी करण्यात आली.

नोंदणी झालेले विद्यार्थ्यांचे व ज्येष्ठ नागरिकांचे कान स्वच्छ आहेत किंवा नाहीत याची पडताळणी करण्यात आली. तपासणी केलेल्या विद्यार्थ्यांच्या कानामध्ये शिल्लक असलेला मळ देखील ऐनवेळी काढण्याची व्यवस्था करण्यात आली होती. स्वच्छ केलेल्या कानामध्ये अगोदरच मोजमाप घेऊन तयार करण्यात आलेले कानाचे मोल्ड (कर्णसाचे) बसविण्यात आले. मोल्ड बसविण्यात आलेले विद्यार्थ्यांना हॉलमध्ये क्रमानुसार बसवण्यात आले. विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी कार्टून फिल्मची व्यवस्था करण्यात आली. एक एक करुन विद्यार्थ्यांना स्टेजवर बोलावून त्यांना श्रवणयंत्र बसवण्यात येत होते. प्रत्येक श्रवणयंत्राची नीट तपासणी करुन विद्यार्थ्यांना दिले जात होते. या आधुनिक डिजिटल श्रवणयंत्राची निगा कशी राखावी त्याचा वापर कसा करावा, त्याची स्वच्छता कशी करावी, वापर नसताना ते कशाप्रकारे ठेवावे याची माहिती विशेष शिक्षकाच्या मदतीने विद्यार्थ्यांना देण्यात येत होती. संपूर्ण माहिती देऊन झाल्यावर विद्यार्थ्यांना शेवटी त्यांच्या श्रवणयंत्रासाठी आवश्यक असणारे पाऊच व पुढील सहा महिने पुरतील एवढे सेल त्यांना देण्यात आले होते. श्रवणयंत्र व्यवस्थित काम करत असलेल्याबद्दलची खात्री करुन पुस्तिका विद्यार्थ्यांना देण्यात येत होती. पुणे जिल्हयाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या विद्यार्थ्यांना जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. दूषित पाण्यामुळे कोणालाही त्रास होऊ नये याकरिता सर्वांना शुध्द पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. स्टारकीचे कर्मचारी असो वा शिक्षक, विद्यार्थी सर्वांना त्यांच्या जागेवर जेवण, चहा व पाणी मिळण्याची व्यवस्था सर्व स्वयंसेवकांनी यथोचित पार पाडली.

कार्यक्रमाच्या उद्‌घाटनासाठी खा. सौ. सुप्रिया सुळे आणि उच्च तंत्रशिक्षण मंत्री मा. श्री. राजेश टोपे उपस्थित होते. यावेळी पाहुण्यांचा यशवंतराव चव्हाणसाहेब लिखित 'कृष्णाकांठ' पुस्तकाची इंग्रजी आवृत्ती व स्मृतीचिन्हे देऊन सत्कार करण्यात आला. अपंग हक्क विकास मंच मुंबईचे राज्य संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, श्री. विजय कान्हेकर, श्री. निलेश राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस अपंग सेलचे राज्य प्रमुख श्री. सुहास तेंडुलकर, श्री. अभिजीत राऊत, डॉ. कल्याणी मांडके आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबादचे कर्मचारी वृंद, स्वयंसेवक, नागपूर, मुंबई, पुणे विभागाचे कार्यकर्ते, स्वयंसेवकांची टीम, अपंग हक्क विकास मंचाचे कार्यकर्ते आदींनी परिश्रम घेतले.

८.११ **बारामती (पुणे) २१ ऑगस्ट २०१४ : कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर** :- पुणे येथे आयोजित या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती सुमित्राताई पवार, श्री. संभाजीराव होडकर, नगरसेविका श्रीमती वनिता बनकर, रामेश्वरी जाधव - संस्था चालक, श्री. संदीप शिंदे विशेष शिक्षक कर्मचारी वृंद आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करुन ३६३ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेल कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महात्मा गांधी सेवा संघाचे श्री. जितेंद्र दाभाडे, श्री. नसीम खान, श्री. ज्ञानेश्वर जाधव व जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी वृंद उपस्थित होते.

८.१२ **भंडारा २५ ऑगस्ट २०१४ : कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर** :- भंडारा येथे आयोजित या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून समाज कल्याण सभापती श्री. अरविंद भावधरे, वै.सा.का. राजू गायकवाड, श्री. संजय घोडके, सहारे अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर आणि समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करुन १५५ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेल कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महात्मा गांधी सेवा संघाचे श्री. जितेंद्र दाभाडे, श्री. नसीम खान, श्री. ज्ञानेश्वर जाधव व जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी वृंद उपस्थित होते.

८.१३ **धुळे दि. १३ सप्टेंबर २०१४ : कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर** :- धुळे येथे आयोजित या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद सदस्य श्री. रुपसिंग चौधरी, देवीसिंग सोनवणे, प्रा. संजय पाटील, समाज कल्याण अधिकारीश्री. वासुदेव पाटील, अपंग कल्याण विभागाचे श्री. विजय पाटील उपस्थित होते. या शिबिरात अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करुन १०५ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आली असून ८३ गरजू विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. यामध्ये जयपूर फूट, कॅलिपर, व्हिलचेअर, ट्रायसिकल, क्रचेस, श्रवणयंत्र, अंध काठी, गॉगल, ब्रेल कीट व एम.आर. कीट इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात आले. तर इतर लाभार्थ्यांना रोजगार, स्वयंरोजगार, शैक्षणिकविषयाचे मार्गदर्शन करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

८.१४ **सिंधुदुर्ग दि. ३ डिसेंबर २०१४ : कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर** :- सिंधुदुर्ग येथे जागतिक अपंग दिनानिमित्त आयोजित या शिबिरासाठी विशेष अतिथी म्हणून जिल्हा परिषद सभापती श्री. अंकुश जाधव, वै.सा.का. श्री. यतिन अहिरे, फादर सीबीचेन जोसेफ, जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. संदेश सावंत, उपाध्यक्ष श्री. रणजित देसाई, जिल्हा परिषद सदस्य श्री. जनार्दन तेली, प्रभारी श्री. सुनिल रेडकर, श्री. अशोक भारती, सर्व शिक्षा अभियानच्या श्रीमती वैशाली देसाई उपस्थित होते. या शिबीरात अपंग लाभार्थ्यांची नोंदण व तपासणी करुन १०० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असुन ८१ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्याचे आले. जयपूर फुट, कॅलिपर, व्हिलचेअर, ट्रायसिकल, क्रचेस, श्रवणयंत्र, अंध काठी, गॉगल, ब्रेल कीट व एम.आर. कीट इत्यादी साहित्याचे वाटप

करण्यात आले. तर इतर लाभार्थ्यांना रोजगार, स्वयंरोजगार, शैक्षणिकविषयाचे मार्गदर्शन करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

८.१५ **मुंबई शहर, दि. ३ डिसेंबर २०१४ : कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर** :- मुंबई शहर येथे जागतिक अपंग दिनानिमित्त आयोजित या शिबिरासाठी प्रमुख अतिथी म्हणून प्रतिष्ठानचे सरचिटणी मा. श्री. शरद काळे, मुंबई अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. दत्ता बाळसराफ व समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर यांच्यासह श्री. अनिल चाळके, श्री. विजय कसबे, श्री. रमेश सांगळे, श्री. सुरेश पाटील, श्री. सुरज चव्हाण, श्री. उमाकांत जगदाळे उपस्थित होते. या शिबीरात एकूण ६० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असून ४३ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. जयपूर फूट, कॅलिपर, व्हिलचेअर, ट्रायसिकल, क्रचेस, श्रवणयंत्र, अंध काठी, गॉगल इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात आले. तर इतर लाभार्थ्यांना रोजगार, स्वयंरोजगार, शैक्षणिकविषयाचे मार्गदर्शन करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

८.१६ **रत्नागिरी दि. ५ डिसेंबर २०१४ : कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर** :- रत्नागिरी येथे आयोजित या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे वै.सा.का. श्री. कांबळे, मुख्याध्यापक श्रीमती ताटके, वै.सा.का. श्री. यतीन अहिरे, शिक्षक व विद्यार्थी लाभार्थी यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबीरात एकूण ७६ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असून ५४ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. जयपूर फूट, कॅलिपर, व्हिलचेअर, ट्रायसिकल, क्रचेस, श्रवणयंत्र, अंध काठी, गॉगल, ब्रेलकीट, एम.आर. कीट इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात आले. तर इतर लाभार्थ्यांना रोजगार, स्वयंरोजगार, शैक्षणिकविषयाचे मार्गदर्शन करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

८.१७ **दापोडी, जिल्हा पुणे दि. १२ डिसेंबर २०१४ : कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर** :- सांसद आदर्श गांव दापोडी (खा. सौ. सुप्रिया सुळे) जिल्हा पुणे येथे आयोजित या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे खा. सौ. सुप्रियाताई सुळे, प्रभारी समाज कल्याण अधिकारी, अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर व समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर उपस्थित होते. या शिबीरात एकूण ७५ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ४५ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध काठी, गॉगल, ब्रेलकीट, एम.आर. कीट इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात आले.

८.१८ **नागपूर दि. १५ डिसेंबर २०१४ : महाराष्ट्रातील अपंगांसाठी धोरण - चर्चासत्र** :- मुंबईचे अपंग हक्क विकास मंच, अपंग आर्थिक विकास महामंडळ, महात्मा गांधी सेवा संघ द्वारा संचलित जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, नागपूर आणि राष्ट्रीय विकलांग कल्याणकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ डिसेंबर २०१४ रोजी विदर्भ साहित्य संघ सभागृह, झाशी राणी चौक, सिताबर्डी, नागपूर येथे सायंकाळी महाराष्ट्रातील अपंगांसाठी धोरण - चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्राकरिता प्रमुख पाहुणे म्हणून आमदार बच्चू कडू, मा. आमदार श्री. हेमंत टकले, मा. न्यायमंत्री श्री. राजकुमार बडोले, महाराष्ट्र अपंग आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सुहास काळे, अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर, समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर, समन्वयक श्री. अभिजीत राऊत उपस्थित होते. या चर्चासत्रात १०० अपंगांनी सहभाग घेतला. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री. अभिजीत राऊत, श्री. गजानन वाघ, श्री. हनुमान तेलंग आणि कोअर ग्रुप आदींनी परिश्रम घेतले.

८.१९ **गळुंचे (पुणे) दि. २ जानेवारी २०१५ : कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर** :- आदर्श गांव गळुंचे, जिल्हा पुणे येथे आयोजित या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून खा. सौ. सुप्रियाताई सुळे, अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक

श्री. विजय कान्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करुन २९ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेल कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महात्मा गांधी सेवा संघाचे श्रीमती समृध्दी कान्हेकर, श्री. चांदोबा बिरगड, श्री. प्रभाकर वावरे कर्मचारी वृंद उपस्थित होते.

८.२० **ठाणे : दि. २७ व २८ फेब्रुवारी २०१५ : ठाणे जिल्हयातील कर्णबधीर मुलांना मोफत आधुनिक डिजिटल श्रवणयंत्र वाटप शिबीर** :- स्टारकी फाऊंडेरशन, अमेरिका, अपंग हक्क विकास मंच, मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे जिल्हयातील ११०० कर्णबधीर मुलांना मोफत श्रवणयत्र वाटप शिबीर डॉ. काशिनाथ घाणेकर सभागृह, ठाणे येथे दि. २७ व २८ फेब्रुवारी २०१५ रोजी संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी स्टारकी फाऊंडेशन, अमेरिका या संस्थेचे पदाधिकारी व स्वयंसेवक मिळून ३५ जणांची एक टीम अमेरिकेहून ठाण्यामध्ये उपस्थित होती. दि. २६.२.२०१५ रोजी स्टारकी फाऊंडेशनची टीम स्वतःच्या खास विमानाने सायंकाळी मुंबई विमान तळावर दाखल झाली. त्यावेळी त्यांचे डॉ. बिल ऑस्टिन व श्रीमती ऑस्टिन यांचे व त्यांच्या टीमचे स्वागत डॉ. कल्याणी मांडके, श्री. विजय कान्हेकर, श्री. सुहास तेंडुलकर, श्री. निलेश राऊत सह आदी स्वयंसेवक यांनी पाहुण्यांना गुलाबपुष्प देवून त्यांचे स्वागत केले. स्टारकीच्या सर्व पाहुण्यांच्या राहण्याची व्यवस्था हॉटेल रैनीसन, पवई, मुंबई येथे करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी पूर्व तयारी म्हणून सर्व स्वयंसेवकांना श्री. विजय कान्हेकर, श्री. सुहास तेंडुलकर, श्री. निलेश राऊत, श्री. सुबोध जाधव यांनी मार्गदर्शन केले.

दि. २७.२.२०१५ रोजी सकाळपासूनच निवड केलेल्या विशेष शाळा व त्यांचे कर्णबधीर विद्यार्थी डॉ. काशिनाथ घाणेकर सभागृहात येण्यास सुरुवात झाली. प्रत्येक शाळांनी त्यांचे विद्यार्थी ३ ते १४ वयोगटातील विद्यार्थी गट निहाय क्रमाने बसवले होते. आलेल्या प्रत्येक कर्णबधीर विद्यार्थ्यांला अगोदरच दिलेल्या व सविस्तर अशा फॉर्मसह त्यांच्या क्रमानुसार नोंदणी करण्यात आली. नोंदणी झालेले विद्यार्थ्यांचे कान स्वच्छ आहेत किंवा नाहीत याची पडताळणी करण्यात आली. तपासणी केलेल्या विद्यार्थ्यांच्या कानामध्ये शिल्लक असलेला मळ देखील ऐनवेळी काढण्याची व्यवस्था करण्यात आली होती. स्वच्छ केलेल्या कानामध्ये अगोदरच मोजमाप घेऊन तयार करण्यात आलेले कानाचे मोल्ड (कर्णसाचे) बसविण्यात आले. मोल्ड बसविण्यात आलेले विद्यार्थ्यांना हॉलमध्ये क्रमानुसार बसविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी कार्टुन फिल्मची व्यवस्था करण्यात आली. एक एक करुन विद्यार्थ्यांना स्टेजवर बोलावून त्यांना श्रवणयंत्र बसविण्यात येत होते. प्रत्येक श्रवणयंत्राची नीट तपासणी करुन विद्यार्थ्यांना दिले जात होते. या आधुनिक डिजिटल श्रवणयंत्राची निगा कशी राखावी, त्याचा वापर कसा करावा, त्याची स्वच्छता कशी करावी, वापर नसताना ते कशाप्रकारे ठेवावे याची माहिती तसशेष शिक्षकांच्या मदतीने विद्यार्थ्यांना देण्यात येत होती. संपूर्ण माहिती देऊन झाल्यावर विद्यार्थ्यांना शेवटी त्यांच्या श्रवणयंत्रासाठी आवश्यक असणारे पाऊच व पुढील सहा महिने पुरतील एवढे सेल त्यांना देण्यात आले होते. श्रवणयंत्र व्यवस्थित काम करत असलल्याची खात्री करुन पुस्तिका विद्यार्थ्यांना देण्यात येत होती. ठाणे जिल्हयाच्या कानाकोप-यातून आलेल्या विद्यार्थ्यांना जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. दुषित पाण्यामुळे कोणालाही त्रास होऊ नये याकरिता सर्वांना शुध्द पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. स्टारकीचे कर्मचारी असा वा शिक्षक, विद्यार्थी सर्वांना त्यांच्या जागेवर जेवण, चहा व पाणी मिळण्याची व्यवस्था सर्व स्वयंसेवकांनी यथोचित पार पाडली.

या शिबिराला मा. सौ. प्रतिभाताई शरद पवार यांनी भेट दिली. कार्यक्रमाच्या समारोपासाठी मा. खा. सुप्रियाताई सुळे आणि मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री. राजेश टोपे उपस्थित होते. यावेळी स्टारकीच्या सर्व कर्मचा-यांचे स्मृतीचिन्हे देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यकमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. जितेंद्र आव्हाड, सौ. ऋताताई आव्हाड यांचे ठाण्यातील सहकारी व कार्यकर्ते यांनी मोलाचे सहकार्य केले. महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबादचे कर्मचारी वृंद, स्वयंसेवक, नागपूर, मुंबई, पुणे विभागाचे कार्यकर्ते, स्वयंसेवकांची टीम, अपंग हक्क विकास मंचाचे कार्यकर्ते आदींनी परिश्रम घेतले.

८.२१ **अंध प्रवर्गासाठी चर्चासत्र** :- अपंग हक्क विकास मंच आणि ब्लाईंड ग्रॅज्युएट फोरम मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या दोन वर्षापासून नियमित दर महिन्याच्या चौथ्या शनिवारी अंध प्रवर्गासाठी चर्चासत्राचा उपक्रम राबविला जातो. या सत्रात

अंधांसाठी विविध क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञांना बोलावून त्यांच्या संबंधित विषयावर चर्चा केली जाते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षणातील झालेले बदल, नोकरीत, सामान्य जीवनात येणारे अडथळे अशा विषयांवर चर्चा केली जाते. यामुळे या प्रवर्गातील अपंगांना त्यांचे आयुष्य कसं सोप्या पध्दतीने जगता येऊ शकते याबद्दल विशेष मार्गदर्शन मिळते आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यास मदतही होते.

महाराष्ट्रातील विविध जिल्हयांमध्ये अपंग गरजू लाभार्थ्यांना जे साहित्य वाटप करण्यात आले त्याचा तक्ता पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | जिल्हा | विविध शिबीरांचे आयोजन | नोंदणी संख्या | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | सांगली | मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर | २८५ | १७० |
| २ | नाशिक | मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर | २०० | १५२ |
| ३ | मुंबई (उपनगर) | मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर | १०० | ७२ |
| ४ | कोल्हापूर | मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर | १४५ | ८१ |
| ५ | रायगड | मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर | ११० | ७५ |
| ६ | सोलापूर | मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर | १४० | ७५ |
| ७ | जालना | मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर | २०० | १५२ |
| ८ | सातारा | मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर | १५५ | ७९ |
| ९ | जळगांव | मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर | ३२० | २९६ |
| १० | पुणे | **मोफत आधुनिक डिजिटल श्रवणयंत्र वाटप** | – | १३०० |
| ११ | बारामती - पुणे | मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर | -- | ३६३ |
| १२ | भंडारा | मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर | – | १५५ |
| १३ | धुळे | मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर | १०५ | ८३ |
| १४ | सिंधुदुर्ग | मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर | १०० | ८१ |
| १५ | मुंबई | मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर | ६० | ४३ |
| १६ | रत्नागिरी | मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर | ७६ | ५४ |
| १७ | दापोडी - पुणे | मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर | ७५ | ४५ |
| १८ | नागपूर | **महाराष्ट्रातील अपंगांसाठी धोरण - चर्चासत्र** | – | १०० |
| १९ | गळुंचे - पुणे | मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर | -- | २९ |
| २० | ठाणे | **मोफत आधुनिक डिजिटल श्रवणयंत्र वाटप** | -- | ११०० |

## ९.९ वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान :-

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे 'वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान' हे पर्यावरण संवर्धन आणि शिक्षणासाठी उभारलेले व्यासपीठ आहे. खासदार सौ. सुप्रिया सुळे अभियानाच्या निमंत्रक आहेत. हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढीची समस्या आज संपूर्ण जगाला भेडसावत आहे. त्यांच्या दुष्परिणामांना मुंबईलाही सामोरे जावे लागणार आहे म्हणून हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढीची समस्या नीट समजून घेण्यासाठी आणि त्यांचा एकूणच पर्यावरण व मानवी जीवनावर होणारा परिणाम याबद्दल शालेय विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती व्हावी या उद्देशाने हवामान बदल विषयक शिक्षण व कृती प्रकल्पाची आखणी करण्यात आली होती. या प्रकल्पामध्ये विद्यार्थ्यांबरोबर स्थानिक पातळीवरील पर्यावरणीय उपाययोजना करण्याकरिता विद्यार्थी, शिक्षक आणि शाळांची तयारी करुन घेणे, स्थानिक प्रजातींच्या वनस्पतींचे संवर्धन करणे, वीज पाण्याच्या अपव्ययाचे ऑडीट करणे, देशी बियाण्यांची बँक स्थापन करणे, टाकाऊ कागदापासून नवा कागद निर्माण करणे,

स्थानिक बाग, जंगल, सागरकिनारा अशा नैसर्गिक स्थळांच्या क्षेत्रभेटी आयोजित करणे, यासारखे विविध कृतीशील उपक्रम वर्षभर राबविण्यात आले.

मागील शैक्षणि वर्षाच्या कालावधीमध्ये राबवलेल्या या प्रकल्पाचा समारोप समारंभ केंद्राच्या रंगस्वर सभागृहात सकाळी ९.३० ते १२.३० या वेळात पार पडला. या कार्यक्रमासाठी महानंद डेअरीच्या अध्यक्षा श्रीमती वैशालीताई नागवडे व बालसाहित्यिक श्री. अनंत भावे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रथम त्यांनी शाळांनी मांडलेल्या प्रकल्पांची पाहणी केली. त्यानंतर सहभागी आणि विजेत्या शाळांना प्रमाणपत्रे व सन्मानचिन्हे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. अनुक्रमे अनुदत्त विद्यालय, कांदिवली प्रथम क्रमांक, साने गुरुजी विद्यालय, दादर द्वितीय क्रमांक आणि आय.इ.एस. दिगंबर पाटकर विद्यालय, दादर तृतीय क्रमांक या सर्वोत्कृष्ट शाळा ठरल्या.

शैक्षणिक वर्ष जून २०१४ ते जानेवारी २०१५ या कालावधीमध्ये हवामान बदलास उत्तर म्हणून यशवंत औषधी वनस्पती संवर्धन प्रकल्पाची सुरुवात शिक्षकांसाठी एक दिवसीय शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळेने झाली. दि. २६ ऑगस्ट २०१४रोजी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेस मुंबईतील निवडक दहा शाळांमधील प्रत्येकी २ शिक्षक उपस्थित राहिले होते. पृथ्वीच्या वाढत्या तापमानावर सर्वात प्रभावी उपाय म्हणजे वृक्षसंवर्धन होय. एक वृक्ष प्रति वर्ष जवळजवळ १० किलो कार्बनडाय ऑक्साईड वायू शोषून घेतो. वातावरणात असहय उष्णता निर्माण करणा-या कार्बनडाय ऑक्साईड, नायट्रस ऑक्साईड आणि मिथेनसारख्या वायूंना आटोक्यात ठेवण्याबाबत जास्तीत जास्त जमीन वृक्षजगवडीखाली आणणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या मातीत वाढणा-या आणि बदलत्या तापमानात टिकून राहतील अशा वनस्पतींची लागवड आणि संवर्धन मोठया प्रमाणात घडवून आणणे हे वाढत्या तापमानाला आवर घालण्याचे थेट उत्तर आहे. औषधी वनस्पतींचे आपल्या जीवनातील स्थान कालातीत आहे. या सर्व गोष्टींचा समग्र विचार करुन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने 'यशवंत औषधी वनस्पती संवर्धन प्रकल्प' राबविण्याचा संकल्प केला आहे. शाळा परिसरात सावली देणा-या आणि औषधी गुणधर्म असणा-या वनस्पतींची लागवड करण्यात येणार आहे. महाराष्ट्राचे भवितव्य घडविणारी विद्यार्थी पिढी निसर्गरम्य आणि निरोगी वातावरणात वाढावी हे या प्रकल्पाचे अंतिम उद्दिष्ट आहे.

या कार्यशाळेचे उद्घाटन स्टेप बाय स्टेप या आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत असलेल्या व पायाभूत शिक्षणावर कार्य करणा-या संस्थेच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत झाले. स्टेप बाय स्टेप संस्थेच्या स्वीडन देशातील प्रतिनिधी श्रीमती जॅनेट रेनब्रांड व इंग्लंड मधील प्रतिनिधी श्रीमती आरती पंडया यांच्या हस्ते वृक्षारोपण करुन कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. या दोघींनी कार्यशाळेचे उद्घाटन करुन तेथे उपस्थित असलेल्या शाळांना इंग्रजी भाषा तसेच वर्ग नियमनावर शिक्षकांचे प्रशिक्षण हवे असल्यास मोफत उपलब्ध करुन दिले जाईल असे आश्वासन दिले. यानंतर श्रीमती संगीता खरात यांनी औषधी वनस्पतींचे महत्व या विषयावर स्लाईड शो घेतला. त्यानंतर स्लाईड शो वर आधारीत प्रश्नमंजुषा घेण्यात आली. शिक्षकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. विजेत्या शिक्षकांना लागलीच औषधी वनस्पती हे पुस्तक बक्षीस म्हणून देण्यात आले. यानंतर औषधी वनस्पतींच्या विविध उपयोगांची प्रात्यक्षिके उदा. अडुळशाचा काढा, कोरफडीचे सरबत, कुंडीत झाड कसे लावावे यासारखे उपक्रम घेतले गेले. हे सारे उपक्रम श्रीमती ज्योती खोपकर यांच्या मार्गदर्शनाखाली महर्षी दयानंद महाविद्यालयाचे विद्यार्थी जागृती गुरव, योगिता बासुतकर, अजय गुरव व श्रेयस खारकर यांनी करुन दाखविले.

भोजन विश्रामानंतर औषधी वनस्पतींबद्दल माहिती सांगणारा 'चला शोधू या गुप्त खजिना' हा खेळ घेण्यात आला व त्यानंतर नक्षत्र वनाची संकल्पना शिक्षकांना समजावून सांगण्यात आली. या प्रकल्पाची ध्येय व उद्दिष्टे काय आहेत. प्रकल्प कसा राबविला जाईल, तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणी प्रकल्पात सहभागी होणा-या शाळांच्या काय जबाबदा-या असतील याची मांडणी श्रीमती संगीता खरात यांनी केली. समारोपाच्या सत्राला पाहुणे म्हणून बदलापूरचे नगरसेवक श्री. श्रीधर पाटील हे लाभले होते. त्यांनी या प्रकल्पाचे कौतुक करुन त्यांच्या वतीने विविध प्रकारच्या औषधी वनस्पती उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिले. श्री. प्रशांत शिंदे यांनी आभार प्रदर्शन करुन कार्यशाळेचा समारोप केला.

या उद्देशाने शैक्षणिक वर्षाच्या कालावधीमध्ये शाळांच्या परिसरात सावली देणा-या आणि औषधी गुणधर्म असणा-या वनस्पतींची लागवड करण्यासाठी मुंबईतील १० व पुणे जिल्हयातील ४० शाळा निवडण्यात आल्या. त्यापैकी मुंबईतील १० शाळांमध्ये जागेची अडचण लक्षात घेऊन कुंडयांमध्ये कोरफड, अडुळसा व तुळस यांची प्रत्येकी १० म्हणजे एकूण ३० रोपांची

लागवड करण्यात आली. विद्यार्थ्यांनी या झाडांची नुसतीच काळजी घेतली नाही तर त्यापासून सर्दी खोकल्यावर उपयुक्त तुळस व अडुसळशाचा काढा, पित्त व कफ नाशक कोरफडीचा रस यासारख्या विविध उत्पादनेही बनविली. पुण्यामधील शाळांमध्येही वृक्षारोपणाची कामे सुरु आहेत.

या व्यतिरिक्त जानेवारी महिन्यातील महत्त्वपूर्ण घटना म्हणजे दि. २४ जानेवारी २०१५ रोजी पार पडलेली हवामान बदल विषयक विद्यार्थ्यांची परिषद, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व स्वीडन येथील क्लायमेट ॲक्शन व सृष्टीज्ञान संस्था यांनी या परिषदेचे आयोजन केले होते. मुंबईतील नऊ शाळा, एम. डी. कॉलेज व स्वीडन येतील ग्लोबल कॉलेज यांनी एप्रिल २०१४ ते डिसेंबर २०१४ या कालावधीमध्ये हवामान बदल विषयक विविध उपक्रम राबविले. क्लायमेट ॲबॅसॅटर्स मुंबई स्टॉकहोम नावाच्या या प्रकल्पाअंतर्गत विद्यार्थ्यांनी बियाणांची बँक, ग्लोबल वीज व पाण्याचे ऑडिट, वृक्षारोपण, जैवविविधतेचा अभ्यास असे अनेक उपक्रम राबविले होते. त्याचा समारोप या परिषदेने झाला. त्याकरिता स्वीडन येथील ग्लोबल कॉलेजचे २० विद्यार्थी व दोन शिक्षकही उपस्थित होते. खासदार सौ. सुप्रिया सुळे या परिषदेला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. सर्वप्रथम प्राणी बनलेल्या विद्यार्थ्यांचा मोर्चा समोर आला व त्यांनी घटत चाललेल्या अधिवासांबद्दल तक्रार करुन त्यांचे अस्तित्व सुरक्षित राखण्याचे निवेदन सुप्रिया सुळे यांना दिले. या परिषदेत विद्यार्थ्यांनी हवामान बदलाला उत्तर म्हणून मांडलेल्या प्रकल्प प्रदर्शनाचे उद्‌घाटन सुप्रियाताईंनी केले. त्यात त्यांना एम. डी. महाविद्यालयाचा हरिश्चंद्र निशाद याचा खराब झालेल्या मोबाईल बॅटरीपासून बनविलेला दिवा व सरस्वती मंदिर हायस्कूलचा तन्मय कोळी याचा रस्त्यावरील वाहून जाणा-या पावसाच्या पाण्याचे संचयन हे प्रकल्प विशेष आवडले.

सभागृहात आल्यावर स्वीडन येथील आयोजक संस्था क्लायमेट ॲक्शनच्या प्रतिनिधींनी परिषदेला पाठविलेला शुभेच्छा संदेश प्रसारीत करण्यात आला. त्यानंतर प्रकल्पात सहभागी शाळा, कॉलेज, विशेष उल्लेखनीय सहभाग असलेले शालेय विद्यार्थी, कॉलेजचे विद्यार्थी, शिक्षक व प्रकल्पात सर्वोत्कृष्ट ठरलेल्या तीन शाळा यांना सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आली. अशी परिषद ही महाराष्ट्रातील सर्वच महत्वाच्या शहरांमध्ये व्हावी व हवामान बदल या समस्येवर उपाययोजना करण्यात महाराष्ट्र आघाडीवर राहावा ही अपेक्षा सौ. सुप्रिया सुळे यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले. या परिषदेत प्रकाशित करण्यात आलेले 'हवामान बदलास आमचे उत्तर' हे पुस्तक राज्यातील सर्व पक्षाच्या नेत्यांकडे पोचवले जावे असेही त्यांनी सुचविले. त्यानंतर या परिषदेसाठी आमंत्रित केलेले खास वक्ते श्री. गिरीश राऊत व श्री. अभिजीत घोरपडे यांना भाषणासाठी बोलावण्यात आले. २६ जुलैच्या मुंबईतील जलप्रलयाच्या आधीपासून मिठी नदीच्या संरक्षणाबद्दल अत्यंत अभ्यासू आणि पोटतिडकीने मांडणी करणारे श्री. गिरीश राऊत खरे तर द्रष्टे पर्यावरणवादी म्हणावे लागतील. तर लोकसत्तामध्ये पर्यावरण विषयक भवताल हे दर लिहिणारे पत्रकार श्री. अभिजीत घोरपडे यांचे हवामान बदल आणि महाराष्ट्रातील पाणी प्रश्न हे विशेष अभ्यासाचे विषय आहेत. या दोघांनीही हवामान बदलाचे आव्हान या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दुस-या सत्रात फिल्म शो, चित्रकला, फेस पेंटींग, फॅशन शो असे विविध उपक्रम एकाचवेळी सुरु होते. या सर्व कार्यक्रमाचा आकर्षण आणि उत्कर्षबिंदू ठरला तो पर्यावरणस्नेही पारंपरिक वेशभूषेमध्ये विद्यार्थी व शिक्षकांनी सादर केलेला फॅशन शो, प्राणी बनलेले विद्यार्थी, नऊवारी, बंगाली, गुजराथी अशा विविध प्रकारच्या साडया तसेच पंजाबी सुट, अनारकली घातलेल्या मुली, शेरवानी, धोतर, पायजमा सदरा, जॅकेटस्, फेटे, गांधी टोप्या अशा वेशात असलेली मुले व त्यांच्याबरोबरीने उत्साहाने रॅम्पवर उतरलेले शिक्षक आणि ग्लोबल कॉलेजचे विद्यार्थी यांनी शेवटची १५ मिनिटे अक्षरशः भारुन टाकली होती.

समारोपाच्या कार्यक्रमाला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे कोषाध्यक्ष, आमदार श्री. हेमंत टकले हे पाहुणे म्हणून लाभले होते. त्यांनी केलेल्या भाषणात पर्यावरण या विषयामध्ये स्वीडन देशाने घेतलेला पुढाकार, त्यांच्या रस्त्यावर राखीव असलेले सायकल ट्रॅक, कचरा व्यवस्थापन, सर्व सामान्य लोकांमध्ये असलेली पर्यावरणाबद्दलची आस्था व त्यांची पर्यावरणस्नेही जीवनशैली याबद्दल बोलले. यापासून आपल्या विद्यार्थ्यांना शिकण्यासारखे बरेच असल्याने भारतीय विद्यार्थ्यांना त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली याबद्दल अभिनंदन केले व स्वीडनला प्रत्यक्ष जाण्याची संधी मिळावी अशा शुभेच्छा दिल्या.

**हवामान बदलास आमचे उत्तर :-** हवामान बदल रोखण्यासाठी केवळ विद्यार्थीच नव्हे तर समाजातील सर्वच नागरिक, संस्था आणि शासनाला आपापल्या पातळीवर पर्यावरणपूरक बदल आणावे लागणार आहेत. शहर असो की गाव किंवा बाई असो की राव, सर्वांनाच आपापल्या जीवनपध्दतीला पर्यावरणस्नेही बनवून हवामान बदल रोखण्याचे प्रयत्न करावे लागणार आहेत.

यासाठी मार्गदर्शक ठरेल अशा विविध उपक्रमांचे अत्यंत उपयुक्त संकलन या प्रकल्पाच्या निमित्ताने झाले आहे. हे संकलन पुस्तकाच्या रुपात प्रतिष्ठान आणि सृष्टीज्ञान संस्थेने आपल्यासमोर आणले आहे. हवामान बदल रोखण्यासाठी या पुस्तकाचा नक्की उपयोग होईल असा विश्वास आहे.

### ९.४ वाहतूक सुरक्षा अभियान :-

या वर्षीच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी एक लाख किलामीटर नवीन महामार्ग निर्माण करण्याची घोषणा केली आहे. नव्या आधुनिक भारताला त्याची आवश्यकता आहेच. दररोज सतत नवनवीन गतिमान वाहने रस्त्यावर येत आहेत. जीवनाची एकूणच गती वाढत असताना रस्त्यावरील अपघातांची संख्या त्याहून अधिक गतीने वाढत आहे. रस्त्यावरील मृत्यूचे तांडव सुरुच आहे. अगदी रोजच नव्हे तर दर तासाला ते सुरु आहे. अगदी साध्या सुध्या गोष्टी समाजात सगळयांचे लक्ष वेधून घेत असतांना हा एवढा गंभीर विषय दुर्लक्षित का राहतो याची खंत वाटल्यावाचून राहत नाही. दरवर्षी भारतात लक्षावधी आणि महाराष्ट्रात हजारो कुटुंबे आपली जीवा भावाची व्यक्ती अशा अपघातात गमावून दु:खाचे वाटेकरी होत असतात. एक क्षणात त्यांचे भविष्य उद्वस्त होऊन जाते. मात्र हे सर्व जणू काही निसर्गाचा प्रकोप आहे असे समजून आपण वागत असतो. खरं तर निसर्गाची अवकृपा अशी रोज होत नाही. तरीही आपण हा जीवघेणा खेळ शांतपणे पाहत राहतो. एका किल्लारीच्या भूकंपात जेवढी माणसं आपण गमावली त्याहून जास्त बळी दरवर्षी महाराष्ट्रातील रस्त्यांवर आपणा सर्वांच्या समोर जात असतात. महाराष्ट्रातील रस्त्यांवर दरवर्षी जवळपास ७० हजार अपघातात सुमारे १२ हजारांहून अधिक मृत्यू आणि ४० हजारांहून अधिक माणसे जखमी होत असतात. जखमींमधील जवळपास निम्मे लोक कायमचे अपंग होऊन बसतात. २०१४ या वर्षात रस्ते अपघातातील बळींची संख्या १४ हजारांवर पोहचली आहे तर देशपातळीवर हीच अपघातांची संख्या ३.५ लाखांवर असून त्यात जवळ जवळ १ लक्ष ४० हजार मृत्यू आणि सुमारे ५ लक्ष लोक जखमी होत असतात. या प्रकारे आपला देश या अपघातांची जबरदस्त किंमत मोजत आहे.

या विषयाचा अभ्यास करणा-या दिल्ली आय.आय.टी. व विविध विद्यापीठातील अभ्यासकांनी या अपघातांमुळे होणा-या आर्थिक नुकसनीचा अंदाज केला आहे. २०००-२००१ साली याचे मोल रु.५५,००० कोटी होते. जे तत्कालीन एकूण घरेलू उत्पन्नाच्या (जी.डी.पी.) ३ टक्के इतके भरते. २०१० साली या नुकसानीचे आर्थिक मूल्य एकूण रु.७५,०००/- कोटी झाले आहे. महाराष्ट्राच्याबाबतीत बोलायचे झाले तर आपण जवळपास रु.७,५००/- कोटींचे मोल या रस्त्यांवरील अपघातांच्यामुळे मोजत असतो आणि यातील अजून क्लेशदायक गोष्ट अशी की, राज्यातील १२००० मृत्यूपैकी जवळपास ६० टक्के मृत्यू हे १९ ते ४४ या वयोगटातील व्यक्तींचे असतात. एवढया मोठया संख्येने युवा पिढी यात जीव गमावते त्याचे मोल कोण व कसे करणार. त्यांच्या मृत्यूच्या दु:खाने ज्यांच्या काळजाना घरे पडलीत त्यात कुटुंबियांखेरीज इतरांना त्याची अनुभूती येणे कठीण आहे.

मात्र याबाबत राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाने १९९७ साली निवृत्त सचिव श्री. श. रा. तांबे यांच्या अध्यक्षतेखाली रस्ते आपघात प्रतिबंधक समिती स्थापन केली. श्री. तांबे सरांसारख्या संवेदनशील व अभ्यासू अधिका-यांमुळे समितीने ७.८ वर्षे खपून बारकाईने अपघातांच्या कारणांचा अभ्यास केला. राज्यभर दौरा करुन सर्व स्तरांवरील रस्त्यांचे अवलोकन केले. त्यातील दोष व त्रुटी शोधल्या. विविध क्षेत्रातील व्यक्तींशी संवाद साधला आणि २००५ साली आपला अहवाल अनेक उत्तम शिफारशींसह सादर केला. सार्वजनिक बांधकाम खात्याबरोबर गृह विभाग, शालेय शिक्षण विभाग, जनसंपर्क, महसूल व वन विभाग, नगरविकास विभाग, सहभाग विभाग तसेच अन्न व नागरी पुरवठा विभाग आणि वित्त विभाग यांच्यासाठी मार्गदर्शनपर सूचना या अहवालात समाविष्ट केल्या आहेत. मात्र सर्वात महत्वाच्या परिवहन विभागासाठीच्या मार्गदर्शक सूचना त्यात नाहीत. या सर्व संबंधित विभागांच्या जबाबदार अधिका-यांची संयुक्त समिती नेमून सदर शिफारशींची तातडीने कार्यवाही होणे गरजेचे आहे. केंद्रीय नियोजन आयोगाने देखील मे २००० मध्ये एक कार्यकारी गट स्थापन करुन या विषयाबावत अभ्यासपूर्ण अहवाल जुलै २००१ मध्ये प्रसिध्द केला आहे. श्री. श. रा. तांबे हेही त्या कार्यकारी गटाचे सदस्य होते. त्यात कार्यकारी गटाने राज्याने करावयाच्या अनेक आवश्यक व उपयुक्त गोष्टींची चर्चा केली आहे. त्यानुसार धोरणात्मक निर्णय व संस्थात्मक यंत्रणा यांची उभारणी होणे अत्यंत आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील अनेक व्यक्तींनी या विषयाचा सांगोपांग अभ्यास केला आहे. त्यात श्री. श. रा. तांबे जसे आहेत तसेच स्वतःच्या एकुलत्या एका मुलीच्या अपघाती मृत्यूने व्यथित होऊन घरात न बसता अपघात निवारण कार्यासाठी गेली दोन दशके सतत झगडणारे श्री. चांदमल परमार आहेत. निवृत्त पोलीस महानिरीक्षक डॉ. पसरिचा, श्री. विवेक फणसळकर, श्री. शेखर, श्री. मनोज पाटील आदी पोलीस अधिकारी आहेत. सार्वजनिक बांधकाम खात्यचे अपघात निवारण समितीचे प्रमुख श्री. पी. डी. ममदापुरे, परिवहन विभागात धडाडीने नाविन्यपूर्ण काम करणारे श्री. भरत कळसकर, श्री. योगेश बाग, श्री. वळवी यासह इतर अनेक मंडळी आहेत. विचारी, संवेदनशील, नागरी समाजातील श्री. अशोक दातार, श्री. पद्माकर हेळेकर, श्री. विनायक जोशी, श्री. सुनील पटवर्धन, श्री. नितीन डोसा, ए.आर.ए.आय.चे श्री. श्रीकांत मराठे, सी.आय.आर.टी.चे श्री. मिश्रा, राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे महासंचालक श्री. व्ही. आर, बी. संत अशा अनेक आजी-माजी अधिकारी, अभ्यासक, राजकीय नेते, पत्रकार व स्वयंसेवी संस्थंचे कार्यकर्ते यांच्या सहभागाने समिती गठीत करुन राज्याचे वाहतूक सुरक्षा धोरण तातडीने आखणे अत्यावश्यक आहे. त्यानुसार राज्यस्तरीय वाहतूक सुरक्षा परिषद व जिल्हा पातळीवर मंडळाची स्थापना करुन त्यासाठी विशेष निधीची व आवश्यक यंत्रणेची उभारणी केली पाहिजे. खासदार सौ. सुप्रिया सुळे यांनी याबाबत पुढाकार घेऊन संबंधितांच्या अनेक बैठका मुंबईतील चव्हाण सेंटरमध्ये घेतल्या. सर्व मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली एक नवीन वाहतूक सुरक्षा धोरण तयार केले. या धोरणाची प्रत दि. १४ जून २०११ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री मा. श्री. पृथ्वीराज चव्हाण व उपमुख्यमंत्री मा. श्री. अजित पवार यांनाही देण्यात आली. या संदर्भात सरकारबरोबर काही बैठकाही घेण्यात आल्या. पण निश्चित असे अजून काहीही साध्य झाले नाही. दरम्यानच्या काळात राज्य सरकार बदलले असल्याने वाहतूक सुरक्षा धोरणाची एक प्रत सध्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांनाही दि. १२ डिसेंबर २०१४ रोजी देण्यात आली आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ते सुरक्षा संबंधात सतत पाठपुरावा करत आहे.

**संपन्न झालेले कार्यक्रम :** २४ जानेवारी २०१५ : २६ व्या रस्ता वाहतूक सुरक्षा अभियाना अंतर्गत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व), आदित्य ज्योत फाऊंडेशन फॉर ट्विंकलिंग लिटील आईज् यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २४ जानेवारी २०१५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत मानखुर्द जकात नाका येथे वाहन चालकांसाठी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आदित्य ज्योत फाऊंडेशनच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमने १५० वाहनचालकांची नेत्र तपासणी करुन आवश्यकतेनुसार चष्मा वाटप करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांसोबत प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) चे रस्ता वाहतूक अधिकारी श्री. चव्हाण यांच्यासह त्यांच्या सहका-यांची उपस्थिती होती. हे नेत्र तपासणी शिबीर सुरु असताना उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (पूर्व) श्री. संजय ससाणे यांनी भेट देऊन उपस्थित डॉक्टर्स, समन्वयक श्री. उमाकांत जगदाळे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. या कार्यक्रमासाठी समन्वयक श्री. रमेश सांगळे, श्री. सूरज चव्हाण यांचे विशेष सहकार्य मिळाले.

१४ जानेवारी २०१५ : २६ व्या रस्ता वाहतूक सुरक्षा अभियाना अंतर्गत प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व), मुंबई पोलीस उपायुक्त, परिमंडळ ४, आदित्य ज्योत फाऊंडेशन, यशवंत सामाजिक केंद्र व जे जे. रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १४ जानेवारी २०१५ रोजी प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) येथील पटांगणात वाहन चालकांसाठी नेत्र व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

रस्त्यावर वाहन चालविताना नियमांचे आदेश चिन्हे, संदेश चिन्हे यांचे व्यवस्थित पालन झाले तर अपघात निश्चित कमी होती असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (पूर्व) श्री. संजय ससाणे म्हणाले. किल्लारी येथील भूकंपात जेवढे लोक मृत्यूमुखी पडले असतील त्यापेक्षा अधिक बळी रस्त्यावरील अपघातात जातात. वाहन चालकांनी कोणत्याही प्रकारचे व्यसन न करता वाहन चालवावे असे आवाहन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे कार्यक्रम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ यांनी केले.

रस्ता सुरक्षा अभियान केवळ पंधरवडा म्हणून मर्यादित न राहता, संपूर्ण वर्षभर विविध विभागात राबविला पाहिजे तसेच केवळ दंड भरुन वाहन नियम तोडण्याची मानसिकता बदलली पाहिजे असा संदेश मुंबई पोलीस उपायुक्त (परिमंडळ-४) श्री. अशोक दुधे यांनी दिला. याच प्रसंगी बोलताना श्री. बी. आय. आजरा प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) अधिकारी म्हणाले की, सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षा बाबत प्रबोधन केले पाहिजे. या कार्यक्रमाची

सुरुवात व्यसन विरोधी पथनाटय सादरीकरणाने करण्यात आली. या शिबिरात आदित्य ज्योत फाऊंडेशन फॉर ट्विंकलिंग लिटील आईज यांच्या तज्ञ डॉक्टर्सनी २५०-३०० साहन चालकांची नेत्र तपासणी केली तर जे. जे. रुग्णालय यांच्या डॉक्टरांनी १५०-२०० वाहन चालकांची आरोग्य तपासणी केली.

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईची विभागीय केंद्रे :-

### १०.१ पुणे विभागीय केंद्र :-

पुणे विभागीय केंद्राचे कामकाज प्रतिष्ठानचे विश्वस्त व केंद्राचे अध्यक्ष श्री. अजित निंबाळकर, सचिव श्री. अंकुशराव काकडे व खजिनदार श्री. शांतिलाल सुरतवाला यांचे मार्गदर्शनाखाली चालते.

**१.१ राजर्षी शाहू महाराज जीवन व कार्य** :- दरवर्षी केंद्रामार्फत एखाद्या लोकोत्तर नामांकित स्वच्छ चारित्र्याची व्यक्ती व कार्य यासंबंधाने विद्यार्थ्यांमध्ये जागृती करुन त्याबाबत इयत्ता ८वी व ९वी चे विद्यार्थी आणि विद्यार्थीनींच्या स्पर्धा भरवित असते. याकामी प्रतिष्ठानला वनराईचे सहकार्य मोठया प्रमाणात लाभत आहे. यापूर्वी महात्मा गांधी, यशवंतराव चव्हाण, लाल बहादूर शास्त्री यांचे वरील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा 'राजर्षी शाहू महाराज जीवन व कार्य' हा विषय घेण्यात आलेला आहे. त्यासाठी भिडे प्रतिष्ठानने विद्यार्थी व शाळा यांना पुस्तकांचे वाटप केले.

**१.२ कथाकथन कार्यशाळा** :- दि. २५ जुलै २०१४ रोजी शिक्षक, शिक्षिकांसाठी 'कथा कथनाची' कार्यशाळा आयोजित करुन त्यासाठी साने गुरुजी संस्कार साधना या संस्थेची मदत घेतली. मुलांवर मनोरंजनातून ज्ञान आणि संस्कार करता यावेत हा या कार्यशाळेचा हेतू होता. सेवाग्राम वर्धा येथील प्रमुख श्री. मठकर यांनी कार्यशाळेचे उद्‌घाटन करुन पर्यावरण व पाण्याबाबत आपण किती जागृत असणे गरजेचे आहे हे पोटतिडकीने सांगितले आहे. प्रा. गरुड यांचे कथाकथन, तंत्र आणि मंत्र या विषयावर सखोल व्याख्यान झाले.

**१.३ प्रश्नमंजुषा स्पर्धा** :- शाळांनी विद्यार्थ्यांसाठी राजर्षी शाहू महाराज जीवन व कार्य या विषयाबाबत महाराजांचे पुरोगामी विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे दृष्टीने १७ शाळांमध्ये इयत्ता ८वी व ९वी चे विद्यार्थ्यांसाठी अंदाजे ३४०० विद्यार्थ्यांपुढे प्रा. गरुड यांचे व्याख्यानाचे आयोजन केले. याच विषयावर विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. ४४ शाळांकडून २६४७ उत्तरपत्रिका आल्या. यापैकी ४३ शाळांतील १५५ विद्यार्थी व ५० निवडक शिक्षक / पालक यांच्यासाठी २२ नोव्हेंबर २०१४ रोजी मा. वसंतदादा पाटील विद्यानिकेतन येथे एक दिवसीय शिबीर घेतले. शिबिराचे संयोजन श्री. भिडे यांनी श्री. कदम व श्री. सरनाईक यांचे सहकार्याने केले.

**१.४ शिक्षक निबंध स्पर्धा व पारितोषिक वितरण** :- यामध्ये १९ शाळांकडून ३१ शिक्षक / शिक्षिकांचे शाहू महाराजांचे वरील निबंधातून प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ अशी एकुण ७ शाळांतील १० शिक्षक, शिक्षिकांना रु.४,०००/- ची पारितोषिके, दि. २२.११.२०१४ रोजी वाटण्यात आली. तसेच १६ शाळांच्या ८वीच्या ११ व ९वीच्या ११ विद्यार्थ्यांना प्रश्नमंजुषा स्पर्धेतील यशाबद्दल प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक विभागून व अन्य उत्तेजनार्थ पाच याप्रमाणे एकूण रु.५,३००/- ची पारितोषिके वाटली. परिक्षक म्हणून प्राचार्य डॉ. गरुड व अन्य यांनी काम पाहिले.

**१.५ वक्तृत्व स्पर्धा** :- त्याचप्रमाणे २६ शाळांतील ८वीच्या ६७ व ९वीच्या ५३ विद्यार्थ्यांनी वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेतला. परिक्षक म्हणून प्राचार्य गरुड, प्रा. प्रभाकर पंडित, श्री सूरज कुलकर्णी, शिक्षक व श्री देशपांडे, उपनिबंधक यांनी काम पाहिले. दि. २७ जानेवारी २०१५ रोजी विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ अशी केंद्राचे अध्यक्ष श्री अजित निंबाळकर यांचे हस्ते पारितोषिक तसेच स्पर्धेतील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना सहभागाची प्रमाणपत्रे ही वाटण्यात आली.




पाचव्या यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या उद्‌घाटन प्रसंगी श्री. अनुपम खेर यांना हिंदी चित्रपट क्षेत्रातील योगदानाबद्दल प्रतिष्ठानच्या वतीने गौरविताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार, सोबत उपाध्यक्ष श्री. अरुण गुजराथी, कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे, कोषाध्यक्ष श्री. हेमंत टकले व परदेशी चित्रपटांचे दिग्दर्शक श्री. मार्को पुसीकोणी.



पाचव्या यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या उद्‌घाटन समारंभापूर्वी श्री. तौफिक कुरेशी यांचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यांचा सत्कार करताना कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे.




पाचव्या यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ज्येष्ठ कलाकार श्री. अनुपम खेर, प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्याबरोबर सेल्फी काढताना. सोबत डावीकडून कोषाध्यक्ष श्री. हेमंत टकले, दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल, कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे, उपाध्यक्ष श्री. अरुण गुजराथी व परदेशी चित्रपटांचे दिग्दर्शक श्री. मार्को पुसीकोणी.



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २४ नोव्हेंबर २०१४ ते २६ नोव्हेंबर २०१४ पर्यंत मा. यशवंतराव चव्हाण यांच्या छायाचित्रांच्या जीवनदर्शन प्रदर्शनाचे उद्घाटन प्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार. सोबत सरचिटणीस श्री. शरद काळे.




मा. यशवंतराव चव्हाण यांच्या ३० व्या पुण्यतिथीनिमित्त व्यासपीठावर डावीकडून विश्वस्त श्री. दिलीप वळसे-पाटील, कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे, कोषाध्यक्ष श्री. हेमंत टकले, उपाध्यक्ष श्री. अरुण गुजराथी, राष्ट्रीय पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार, यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक विजेते श्री. शरद जोशी, मा. न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड पारितोषिक विजेते कर्नल (निवृत्त) श्री. अभिजीत कदम, सरचिटणीस श्री. शरद काळे व अंतर्नादचे संपादक श्री. भानू काळे.



महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या समग्र साहित्याच्या virashinde.com या संकेतस्थळाच्या उद्‌घाटन प्रसंगी डॉ. गो. मा. पवार व सौ. पवार यांचा सत्कार करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार, सोबत डॉ. अनिल काकोडकर व श्री. गिरीश कुबेर.




मा. यशवंतराव चव्हाण यांच्या देवराष्ट्रे, जिल्हा सांगली येथील जन्मघराच्या
उद्घाटन समारंभ प्रसंगी डावीकडून ग्रामविकास मंत्री श्री. जयंतराव पाटील, सिक्कीमचे राज्यपाल श्री. श्रीनिवास पाटील,
प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार, वने व पुनर्वसन मंत्री डॉ. पतंगराव कदम, गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील.




मा. यशवंतराव चव्हाण यांच्या देवराष्ट्रे, जिल्हा सांगली येथील जन्मघराच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी
भाषण करताना कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे.



मा. यशवंतराव चव्हाण यांच्या देवराष्ट्रे, जिल्हा सांगली येथील स्मारकात पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी पुस्तके भेट देत असताना सरचिटणीस श्री. शरद काळे व विद्यार्थी.




विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने लिहित्या स्त्रियांच्या तृतीय कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी बोलताना केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी.




विभागीय केंद्र कोकणच्या वतीने आयोजित लोकनृत्य स्पर्धेतील कलाविष्कार सादर करताना, विद्यार्थी.




प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा २०१४ च्या कार्यक्रम प्रसंगी सर्व सत्कारमूर्ती सोबत कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या श्रीमती नीला सत्यनारायण व सरचिटणीस श्री. शरद काळे.




विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने श्री. गणेश नायडू यांच्या अमृत महोत्सवारंभानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी.




विभागीय केंद्र लातूरच्या वतीने आयोजित केलेल्या समारंभात व्याख्यान देताना डॉ. सदानंद मोरे. सोबत केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे.




यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, स्वीडन येथील 'क्लायमेट ॲक्शन' ही संस्था व सृष्टीज्ञान संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या हवामान बदल विषयी विद्यार्थ्यांची परिषद प्रसंगी स्वीडन येथील ग्लोबल कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमवेत कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे व इतर मान्यवर.




प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा २०१४ च्या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक संघाचा सत्कार प्रमुख पाहुण्या श्रीमती नीला सत्यनारायण यांच्या हस्ते करताना.
सोबत सरचिटणीस श्री. शरद काळे.




महाराष्ट्र महिला व्यासपीठामार्फत पाककला स्पर्धेत भाषण करताना संयोजिका श्रीमती रेखा नार्वेकर.
सोबत कार्यकारी संयोजिका श्रीमती ममता कानडे व इतर.



महाराष्ट्र महिला व्यासपीठामार्फत सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमाप्रसंगी
डॉ. सुधीरकुमार गोयल, प्रधान सचिव, कृषि विभाग यांचा सत्कार करतांना
कार्यकारी संयोजिका श्रीमती ममता कानडे.



विभागीय केंद्र कराडच्या वतीने आयोजित केलेल्या 'करीयर गायडन्स व व्यक्तिमत्व विकास' या व्याख्यानाचे
उद्घाटन करताना ज्येष्ठ माध्यम तज्ञ व दैनिक सकाळचे माजी संपादक
श्री. संजीव लाटकर व केंद्राचे सचिव श्री. मोहनराव डकरे.




विभागीय केंद्र नाशिकच्या वतीने आयोजित केलेल्या 'साद' लघुनाटिका संग्रहाचे प्रकाशन करताना
दैनिक सकाळचे संपादक श्री. श्रीमंत माने व केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर.




विभागीय केंद्र नाशिकच्या वतीने आयोजित केलेल्या संगीत कार्यशाळेप्रसंगी सुप्रसिध्द गायक व संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी. सोबत केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर.



सृजन कार्यशाळेतील मुलांना मार्गदर्शन करताना श्री. राजीव तांबे



विधी साक्षरता कार्यशाळेत मार्गदर्शन करताना कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरमचे सचिव श्री. म. बा. पवार




शिक्षण विकास मंचने राष्ट्रीय शिक्षण दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या 'शालेय शिक्षणात माहिती व दूरसंचार तंत्रज्ञान याबाबतचे राष्ट्रीय धोरण' या राज्यस्तरीय परिषदेच्या वेळी डावीकडून बसलेले श्रीमती बसंती रॉय, सरचिटणीस श्री. शरद काळे, अध्यक्ष मा. शरदराव पवार, उभे असलेले कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे, श्री. दत्ता बाळसराफ, श्री. बसंत काळपांडे व इतर.

१.६ **व्याख्यानमाला** :- विद्यार्थ्यांना स्कील डेव्हलपमेंटच्या दृष्टीकोनातून सजग नागरिक मंचाचे श्री. विवेक वेलणकर यांची व डॉ. देवधर, सौ. उर्मिला भिडे यांची व्याख्याने खालीलप्रमाणे आयोजित केली.

| अ.क. | शाळा | विषय | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | डॉ. वसंतदादा पाटील विद्यानिकेतन | करियन गाईडन्स | २२.११.२०१४ |
| २ | लोणकर माध्यमिक विद्यालय | करियन गाईडन्स | ०६.१२.२०१४ |
| ३ | विद्यापीठ हायस्कूल | करियन गाईडन्स | १२.१२.२०१४ |
| ४ | डॉ. वसंतदादा पाटील विद्यानिकेतन | व्यसनमुक्ती | २२.११.२०१४ |
| ५ | डॉ. वसंतदादा पाटील विद्यानिकेतन | वयांत येताना | २२.११.२०१४ |

१.७ **दुसरी हरितक्रांती** :- दि. २ ऑगस्ट २०१४ रोजी माजी केंद्रीय मंत्री (कृषि) मा. श्री. शरद पवार यांच्या कारकिर्दीमध्ये झालेल्या भाषणाचा मराठी अनुवाद ग्रंथाचा प्रकाशन समारंभ अमेय प्रकाशनतर्फे मा. श्री. शरद पवार यांचे उपस्थितीत व डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे हस्ते बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे दिमाखात पार पडला. त्यास केंद्राचे पदाधिकारी उपस्थित होते.

१.८ **वारकरी, अल्पोपहार, चष्मे व औषधे वाटप** :- दरवर्षीप्रमाणे दि. २२ जून २०१४ रोजी पंढरपूरला जाणा-या पालख्यांचा व त्याबरोबर असलेल्या वारक-यांचा मुक्काम पुणे येथे असताना व्यासपीठातर्फे वारक-यांसाठी शिरा/उपमा/बिस्कीटे व स्पेशल चहाचे वाटप सकाळी ५.०० वाजल्यापासून दुपारी १.०० वाजेपर्यंत करण्यात आले. त्याबरोबरच सुरतवाला ट्रस्टच्या पुढाकाराने वारक-यांसाठी चष्मे व औषधे वाटपाचा कार्यक्रमही पार पडला. तसेच वारक-यांना न्याहरी ठेवता यावी म्हणून प्लॅस्टीकच्या टिफीन बॉक्सेसचेही वाटप करण्यात आले. प्रत्येक वारक-याला अगत्यपूर्वक अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन केंद्राचे अध्यक्ष श्री. अजित निंबाळकर, सचिव श्री. अंकुश काकडे व कोषाध्यक्ष श्री. शांतीलाल सुरतवाला यांनी केले. त्याला सर्वश्री रवी सरनाईक, राशिवडेकर, जगमोहन सुरतवाला, गणेश चव्हाण, प्रल्हाद तापकीर, सुनील खताळ, रमेश भांड, शशिकांत सिन्नरकर, संजय राळे, अशोक जाधव, प्रशांत सुरतवाला इत्यादींनी सहाय्य केले.

१.९ **मी पाहिलेले यशवंतराव** :- सहयाद्रीचा सुपूत्र या पुस्तकाचे लेखक व शिक्षण तज्ञ डॉ. न. म. जोशी यांचे 'मी पाहिलेले यशवंतराव' या विषयावर दि. १२ मार्च २०१५ रोजी भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे या ठिकाणी सायंकाळी ५.०० वाजता व्याख्यान आयोजित केले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री अंकुश काकडे यांनी केले. डॉ. गरुड यांनी वक्त्यांचा परिचय करुन दिला. आभर प्रदर्शन श्री शांतिलाल सुरतवाला यांनी केले तर सूत्रसंचालन श्री शं. त्रिं. भिडे यांनी केले. पुस्तकाच्या प्रत्येकी ५० प्रती शाळांच्या विनंतीनुसार शाळा प्रतिनिधींना, गुणवान विद्यार्थ्यांना वाटण्यासाठी डॉ. जोशींच्या हस्ते भेट देण्यात आल्या.

## १०.२ विभागीय केंद्र कराड :-

कराड विभागीय केंद्राचे कामकाज अध्यक्ष श्री. बाळासाहेब उर्फ शामराव पाटील व सचिव श्री. मोहनराव डकरे यांच्या मार्गदर्शनाखाली चालते.

२.१ **सौ. वेणूताई चव्हाण पुण्यतिथी दि. १ जून २०१५** :- सौ. वेणूताई चव्हाण यांच्या ३१ व्या पुण्यतिथीनिमित्त संस्कृती मंच, कराड प्रस्तुत पंडित प्रभाकर कारेकर यांची अभंग व नाटयसंगिताची सुरेल मैफल सौ. वेणूताई चव्हाण सभागृहात आयोजित केली. या संगीतातल्या विशेष कार्यक्रमासाठी आमदार श्री. बाळासाहेब पाटील, अध्यक्ष विभागीय केंद्र कराड संपूर्ण वेळ हजर होते. सौ. वेणूताई चव्हाण सांस्कृतिक सभागृह पूर्ण भरले होते.

२.२ **आदरणीय पी. डी. पाटील जयंती दि. १.७.२०१४** :- कराडच्या ऐतिहासिक दोन उंचच उंच मनो-याप्रमाणे मा. यशवंतरावजी चव्हाण व मा. पी. डी. पाटील उत्तुंग विभूती आहेत. या दोन्ही विविधांगी अशा व्यक्तिमत्वानी कराडच्या

लौकिकात मोलाची भर घातली. मा. पी. डी. पाटील कराडचे शिल्पकार तर मा. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे शिल्पकार होते. मा. पी. डी. पाटील यांचा ४२ वर्षे नगराध्यक्ष पदाचा बहुमान हा ग्रिनीच बुकात नोंदला गेला आहे. सहयाद्री साखर कारखाना, अनेक पाणी पुरवठा योजना, प्राथमिक शाळांच्या भव्य आर.सी.सी. इमारती, महाविद्यालयाच्या अतिभव्य इमारती, भुयारी गटार योजना, रुंद समांतर रस्ते अशा प्रकारची अनेक कामे मा. पी. डी. पाटील यांनी केली. त्यांच्या महान कर्तृव्याच्या अनेक खुणा कराडात आहेत. कराड नगरपालिकेची भव्य वास्तू ही त्यांच्या कतृत्वाची निशाणी आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

२.३ **स्वातंत्र्यदिन दि. १५.८.२०१४ :-** केंद्राचे सचिव श्री. मोहनराव डकरे यांच्या हस्ते सकाळी ७.३० वाजता राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. विभागीय केंद्राचे सर्व कर्मचारी या प्रसंगी आवर्जून उपस्थित राहतात. साहेबांच्यावर मनापासून प्रेम करणारे कांही लोक यावेळी हजर असतात.

२.४ **ती. विठामाता पुण्यतिथी, दि. १८ ऑगस्ट २०१४ :-** यावर्षी यशवंत एज्युकेशन सोसायटी, देवराष्ट्रे व विभागीय केंद्र, कराड याशिवाय देवराष्ट्रे स्मारक महाराष्ट्र साहित्य परिषद, फलटण, जिल्हा सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने देवराष्ट्रे येथे 'यशवंतराव चव्हाण विचारवंत एक सुवर्णठेवा' श्री अमर शेंडे यांच्या या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ श्री मोहनराव डकरे यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी श्री. रविंद्र बेडकीहाळ, सातारा जिल्हा प्रतिनिधी म. सा. परिषद पुणे, प्राचार्य, श्री. येवले यांचे सुश्राव्य व्याख्यान झाले. विठामातांच्या पुण्यतिथीनिमित्त फलटणवरुन २० लोक आले होते. त्यात कांहीजण साहेबांचे नातेवाईक होते. विभागीय केंद्र कराड मार्फत मुलांना केळी वाटण्यात आली. ग्रामस्थानी अगत्याने पाहुण्यांच्या जेवणाची व्यवस्था केली होती. विठामातांचे पुण्य स्मरणार्थ नामवंतांची व्याख्याने झाली.

२.५ **आदरणीय स्व. पी. डी. पाटील साहेब यांची पुण्यतिथी, दि. १७.९.२०१४ :-** विभागीय केंद्र कराड आणि सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने पुण्यस्मरण करण्यात आले. सौ. वेणूताई स्मारकात आदरणीय स्व. पी. डी. पाटील साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार व फुले वाहण्यात आली. संपूर्ण दिवसभर मोठया प्रमाणावर नागरिक बंधू-भगिनी, कराड नगरपालिकेच्या नगराध्यक्षा, नगरसेवक, नगरसेविका सौ. वेणूताई स्मारकातील प्रतिमेस अत्यंत आदराने अभिवादन करीत होते. सायंकाळी ६.३० ते ८.३० वाजेपर्यंत श्री व सौ. ताम्हणकर यांनी आयोजित केलेल्या संगीत भजनाचा कार्यक्रम झाला.

२.६ **करीयर गायडन्स व्यक्तिमत्व विकास या विषयावरील शिबीर, दि. २३.९.२०१४ :-** विभागीय केंद्र कराड आणि देवराष्ट्रे या ठिकाणी श्री संजीव लाटकर ज्येष्ठ माध्यम तज्ञ व दैनिक सकाळचे माजी संपादक यांचे ११ ते २ सुश्राव्य मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. या कार्यक्रमासाठी मुंबई प्रतिष्ठानचे अधिकारी श्री. संजय बनसोडे आवर्जून उपस्थित होते. यावेळी व्यक्तिमत्व विकासाबाबत सौ. शुभांगी लाटकर व मानसोपचार तज्ञ डॉ. राजेंद्र बर्वे यांच्या व्हिडीओ क्लीप दाखविण्यात आल्या. त्यांच्या मते प्रत्येकाने कोणतेही काम आत्मविश्वासाने केले पाहिजे. आपले व्यक्तिमत्व हे आपले बोलणे व चेह-यावरील हावभाव अशा एकूण ३२ फॅक्टरने तयार होते. वेळेचे नियोजन ही सर्वात महत्वाची गोष्ट आहे आणि योग्य आखणी करुन वेळेचा पुरेपूर वापर करा, आपले ध्येय ठरवा, आत्मविश्वासाने कामाला लागा असे मार्गदर्शन शाळेच्या मुलांना त्यांनी केले. कार्यक्रमाला ४०० मुले उपस्थित होती.

२.७ **बालदिन दि. १४.११.२०१४ :-** विभागीय केंद्र कराड यांच्या वतीने बालदिनाचे औचित्य साधून सौ. वेणूताई चव्हाण हॉलमध्ये अंधश्रध्दा निर्मूलन कार्यक्रम श्री नितीन शिंदे, श्री भास्कर सदाकळे व अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे श्री संजय बनसोडे यांनी सादर केला. या कार्यक्रमामध्ये इयत्ता ५ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांना अंधश्रध्दा व विज्ञानासंबधी सप्रयोग माहिती सांगितली. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी-विद्यार्थीनी फार मोठया प्रमाणात हजर होते. अंगात येते, भूतखेते यावर सप्रमाण माहिती सांगितली गेली. या कार्यक्रमासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे अधिकारी श्री. संजय बनसोडे उपस्थित होते.

२.८ **मा. यशवंतरावजी चव्हाण पुण्यतिथी दि. २५.११.२०११ :-** मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी दिनी मा. श्री. शरदराव पवार यांनी प्रीतिसंगमावरील यशवंतरावजींच्या समाधीचे दर्शन घेऊन पुष्पचक्र वाहून आपली आदरांजली वाहिली. सौ. वेणूताई चव्हाण सभागृहातील पुतळयास मान्यवरानी श्रध्दांजली वाहिली. सन्माननीय रामराजे नाईक निंबाळकर, शशिकांत शिंदे, देवराज पाटील, कराड विभागीय केंद्राचे अध्यक्ष आमदार, बाळासाहेब पाटील यांनी सर्वांचे स्वागत केले व आभारही मानले. त्यानंतर सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टची सभा झाली. सन्माननीय पवार साहेबांनी पत्रकार परिषद घेऊन मनोगत व्यक्त केले. पत्रकारांबरोबर सुसंवाद साधला.
सायंकाळी ४.३० वाजता सजविलेल्या रथामध्ये मा. चव्हाणसाहेबांची प्रतिमा ठेवून सौ. वेणूताई ट्रस्ट ते यशवंतराव समाधीस्थळ पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेत श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स सौ. वेणूताई कला वाणिज्य महाविद्यालय, ती. विठामाता हायस्कूल, शिवाजी हायस्कूल त्याचप्रमाणे शिक्षण मंडळ कराडच्या टिळक हायस्कूल, सारोटी कन्या शाळा, महिला विद्यालयमधील प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, प्राध्यापिका मोठया प्रमाणात सामील होत्या. समाधीस्थळी मान्यवरांनी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या आठवणी सांगितल्या.

२.९ **प्रतिष्ठानचे मा. अध्यक्ष श्री. शरदराव पवार यांचा अमृतमहोत्सव :-** मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त वर्षभर कार्यक्रम होणार आहेत (१२ डिसेंबर २०१४) या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून दि. १३.१२.२०१४ रोजी सायंकाळी ५ वाजता गच्चीवरील शेती कार्यक्रम (फक्त महिलांसाठी) आयोजित केला. श्री. प्रशांत शिंदे, मुंबई यांचे भाषण आयोजित केले होते. या कार्यक्रमासाठी प्रतिष्ठानचे कार्यक्रम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, अधिकारी श्री. संजय बनसोडे हजर होते. आजी माजी नगराध्यक्ष व नागरिक या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

२.१० **अपंग शिबीर दि. १४.१२.२०१४ :-** कराड शहर व परिसरातील अपंग, कर्णबधीर, अस्थिव्यंग्यासाठी हे शिबीर प्रतिष्ठानच्या वतीने सौ. वेणूताई चव्हाण स्मारक येथे आयोजित केले (सकाळी १० ते ५) या कार्यक्रमासाठी प्रतिष्ठानच्या वतीने अपंग हक्क विकास मंचचे प्रमुख श्री. विजय कान्हेकर व इतर ५ डॉक्टरांचे पथक जातीने हजर होते. तसेच मुंबईहून श्री. दत्ता बाळसराफ, श्री. संजय बनसोडे हजर होते. यावेळी २७ कर्णबधीर व १७ अपंग यांची तपासणी करण्यात आली. सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्टचे सदस्य श्री. नंदकुमार बटाणे, श्री. बाबूराव किवळकर आदी लोक हजर होते.

२.११ **प्रजासत्ताक दिन दि. २६ जानेवारी २०१५ :-** स्वतंत्र भारताच्या प्रजासत्ताक दिनानिमत्त मा. यशवंतराव चव्हाण यांचे निवासस्थान 'विरंगुळा' या ठिकाणी कराड केंद्राचे सचिव श्री मोहनराव डकरे यांचे हस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. तसेच सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या आवारातही ध्वजवंदन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विभागीय केंद्र कराड व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. झेंडा वंदनाच्या कार्यक्रमानंतर प्रीतिसंगमावर असणा-या मा. चव्हाणसाहेबांच्या समाधीवर पुष्पकार व फुले वाहण्यात आली. स्व. पी. डी. पाटील प्रतिष्ठान, कराडच्या वतीने राष्ट्रगीतांच्या स्पर्धा प्रीतिसंगम बागेत मा. यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या समाधी स्थळावर घेण्यात आल्या.

२.१२ **सौ. वेणूताई चव्हाण जयंती दि. २.२.२०१५ :-** सौ. वेणूताई यांच्या जयंतीनिमित्त सौ. वेणूताई स्मारक व भवनातील त्यांच्या पुतळयास पुष्पहार घालण्यात आले. महिला मंडळाचा हळदीकुंकू कार्यक्रम झाला.

२.१३ **अपंग शिबीर व कराड विभागीय केंद्राच्या कार्यकारिणी मंडळाची बैठक, दि. ६ फेब्रुवारी २०१५ :-**

विभागीय केंद्र कराडच्या कार्यकारिणी मंडळाची बैठक प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सौ. सुप्रियाताई सुळे व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक ट्रस्टच्या विश्वस्त यांच्या अध्यक्षतेखाली झाली. विविध विषयावर चर्चा झाली. कराड विभागीय केंद्राचे अध्यक्ष आमदार श्री. बाळासाहेब पाटील आवर्जून उपस्थित होते.

सौ. वेणूताई व मा. यशवंतरावजी यांच्या पुतळयासमोरील हॉलमध्ये अपंगाना व कर्णबधीर अशा लोकांना मोफत साधने दिली. त्यांची तपासणी १२ डिसेंबर २०१४ ला झाली होती. कराड परिसरातल्या ब-याच गरजू अपंगाना याचा फायदा झाला. मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या अमृतमहोत्सवी (७५) वाढदिवसाच्यानिमित्ताने हे अपंग शिबीर आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला मुंबईहून प्रतिष्ठानचे अधिकारी श्री. दत्ता बाळसराफ, श्री. संजय बनसोडे व श्री. विजय कान्हेकर उपस्थित होते.

२.१४ **यशवंतरावजी चव्हाणसाहेब जयंती (१०२), दि. १२ मार्च २०१५ :-** मा. यशवंतराव चव्हाणसाहेब यांच्या १०२ व्या जयंतीनिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने अनेक नवीन उपक्रम राबविण्यात आले. यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, सौ. वेणूताई चव्हाण कला, वाणिज्य महाविद्यालय, कराड, श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या श्री शिवजी विद्यालय, ति. विठामाता विद्यालय, महाराष्ट्र हायस्कूल कराड सर्व शिक्षक बंधूभगिनी, प्राचार्य याशिवाय शिक्षण मंडळ कराडची सर्व विद्यालये, महाविद्यालये यातील प्राचार्य व शिक्षण बंधूभगिनी या सर्वांनी मिळून सौ. वेणूताई चव्हाण स्मारक मंदिरापासून यशवंतरावजी चव्हाणसाहेबांच्या प्रीतिसंगावरील समाधीस्थळापर्यंत कराड शहरातील प्रमुख रस्त्यावरुन पदयात्रा काढली. सर्वांनी मा. यशवंतराव चव्हाणसाहेब यांना आदरांजली वाहिली. कराड शहरातील प्रमुख नागरिक, नगराध्यक्षा श्रीमती विद्याराणी साळुंखे, नगरसेवक, नगरसेविका त्याचप्रमाणे आमदार श्री. बाळासाहेब पाटील व सहयाद्री सहकारी साखर कारखान्याचे संचालक या पदयात्रेत सामिल झाले होते. मा. पी. डी. पाटील साहेब यांच्या नांवे असलेल्या पी. डी. पाटील प्रतिष्ठानच्या वतीने कराड शहरातील माध्यमिक शाळेतील बारा हजार विद्यार्थ्यांनी गीतसुमनांची आदरांजली वाहिली.

'यशवंतराव चव्हाण : बखर एका वादळाची' हा झी टीव्ही वरील सिनेमा रस्तोरस्ती सर्व नागरिकांनी साश्रूनयनानी पाहिला. डॉ. जब्बार पटेल यांची या सिनेमातील कामगिरी यशवंतरावाना अजरामर करुन गेली. कराड शहर व तालुक्यातील सर्व माध्यमिक शाळा व महाविद्यालयात मा. यशवंतराव चव्हाण यांची जयंती मोठया आदराने साजरी करण्यात आली.

## १०.३. विभागीय केंद्र नागपूर :-

नागपूर विभागीय केंद्राचे कामकाज केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली चालते.

३.१ **रंगबावरी इंदिरा - काव्यमय नजराणा - दि. २ एप्रिल २०१४ :-** विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने कवयित्री इंदिरा संत यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या कवितांचा काव्यमय नजराणा 'रंगबावरी इंदिरा' या कार्यक्रमाचे आयेजन करण्यात आले. हा कार्यक्रम डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती आशाताई बगे उपस्थित होत्या. कार्यक्रमाची संकल्पना व लेखन मनीषा साधू यांचे होते तर श्रीमती शुभदा फडणवीस, श्री. पराग घोंगे व श्रीमती वैशाली उपाध्ये यांचा प्रामुख्याने सहभाग होता. कार्यक्रमाचे संचालन डॉ. कोमल ठाकरे यांनी केले.

३.२ **कथासंग्रह प्रकाशन सोहळा - दि. १८ एप्रिल २०१४ :-** विभागीय केंद्र, नागपूर व दिव्यम् प्रकाशन, नवी दिल्लीच्या संयुक्त वतीने डॉ. दिनेश काळे यांच्या 'मन की तलाश' या हिंदी कथासंग्रहाचा प्रकाशन समारंभ व कथावाचन नागपूर येथे आयोजन करण्यात आले. हा प्रकाशन समारंभ अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली व दै. लोकमतचे संपादक समन्वयक श्री. कमलाकर धारप यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी दैनिक भास्करचे समुह संपादक श्री. प्रकाश दुबे व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हिंदी विभाग प्रमुख डॉ. वीणा दाढे हे वक्ते उपस्थित होते.

३.३ **सत्कार समारंभ - दि. २१ मे २०१४ :-** विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे भूतपूर्व कुलगुरु डॉ. एस. एन. पठाण यांची भारत सरकारच्या भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद कमिटीच्या (आय.सी.सी.आर.) उपाध्यक्ष पदावर नेमणूक झाली. यानिमित्ताने त्यांचा सत्काराचे आयोजन करण्यात आले. श्री. दत्ता मेघे वैद्यकीय अभिमत विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ वेदप्रकाश मिश्रा यांच्या शुभहस्ते व कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाचे

माजी कुलगुरु डॉ वेदप्रकाश मिश्रा यांच्या शुभहस्ते व कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. पंकज चांदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

३.४ **सभेचे आयोजन - दि. २८ मे २०१४ :-** विभागीय केंद्र नागपूर येथील कार्याचा आढावा घेण्यासंदर्भात तसेच केंद्राच्या पुढील उपक्रमाच्या संदर्भात विचारविनीमय करण्यासाठी दि. २८ मे २०१४ रोजी सायं. ५.०० वाजता विभागीय केंद्राच्या कार्यालयात डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेत कुठले कार्यक्रम व्हावेत (चर्चासत्र, व्याख्यान, स्पर्धा प्रदर्शने, सहकार, ग्रामीण समस्या, साहित्य, संगीत इत्यादी) त्याचे स्वरुप, रुपरेषा यावर विचार विमर्श करण्यात आला. एकूण केंद्राच्या कार्यक्रमांचे नियोजन व आखणी हा चर्चेचा मुख्य उद्देश होता.

३.५ **प्रकाशन समारंभ - दि. ६ जून २०१४ :-** विभागीय केंद्र नागपूर, संवेदना प्रकाशन, खापरखेडा, साहित्य विहार व मराठी बोली साहित्य मंडळ नागपूरच्या संयुक्त वतीने श्री. विठ्ठल लांजेवार यांच्या 'कागज की नाव' या हिंदी बाल कविता संग्रहाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला. हा प्रकाशन सोहळा साहित्य विहार नागपूरच्या श्रीमती आशाताई पांडे यांच्या शुभहस्ते व विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी श्री. पुष्पेंद्र फाल्गुन व डॉ. गणेश चव्हाण हे वक्ते म्हणून उपस्थित होते.

३.६ **कवि संमेलन - दि. २४ जून २०१४ :-** विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम श्रीमती माधुरी अशिरगडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या कार्यक्रमास नामवंत व नवोदित कवी सहभागी झाले होते. सूत्रसंचालन श्रीमती मेघना वाहोकर यांनी केले.

३.७ **प्रकाशन समारंभ - दि. ४ जुलै २०१४ :-** विभागीय केंद्र, नागपूर व नवदुर्गा प्रकाशन, कोल्हापूरच्या संयुक्त विद्यमाने डॉ. दिनेश काळे लिखित 'जावयाचं रामायण' या नाटकाचा प्रकाशन समारंभ आणि नाटयप्रवेश सोहळा नागपूर येथे सायं. ५.३० वाजता विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. ज्येष्ठ पत्रकार श्री. कमलाकर धारप समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून होते. श्री. किशोर आयलवार (ज्येष्ठ रंगकर्मी), डॉ. सुनिल रामटेके (एनएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई) व प्र. संयुक्ता थोरात (ललितकला विभाग - नाटक) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांनी या प्रसंगी पुस्तकावर आपले विचार व्यक्त केले.

३.८ **नाटय स्पर्धा - दि. १४ सप्टेंबर २०१४ :-** विभागीय केंद्र, नागपूर, राष्ट्रभाषा परिवार, नागपूर व अस्तित्व, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'कल्पना एक आविष्कार अनेक' या विषयावरील नाटय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

३.९ **'इच्छामरण' - एक परिचर्चा - दि. १९ सप्टेंबर २०१४ :-** विभागीय केंद्र, नागपूर व अभिव्यक्ती वैदर्भीय लेखिका संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'इच्छामरण एक परिचर्चा' या एका आगळयावेगळया व संवेदनशील विषयावरील विचारमंथन कार्यक्रमाचे आयोजन अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत व डॉ. कुमार शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी डॉ. शिशिर पळसापुरे, ॲड. वृषाली प्रधान, माधुरी साकुळकर हे सहभागी झाले.

३.१० **नाना ढाकुळकर यांना भावपूर्ण श्रध्दांजली - दि. २४ सप्टेंबर २०१४ :** ज्येष्ठ नाटककार नाना ढाकुळकर यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. विदर्भ साहित्य संघात मनोहर म्हैसाळकर यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभेचे आयोजन झाले. विभागीय केंद्र नागपूर, विदर्भ साहित्य संघ व अखिल भारतीय मराठी नाटय परिषद यांच्या संयुक्तपणे आयोजित केलेल्या या सभेत डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, डॉ. रविंद्र शोभणे, वामन तेलंग, मदन गडकरी, प्रमोद भुसारी व प्रफुल्ल फरकसे व्यासपीठावर उपस्थित होते. मनोहर म्हैसाळकर यांनी अध्यक्षीय समारोप केला. सभेचे शेवटी सर्व उपस्थितांनी मूक उभ राहून नानांना श्रध्दांजली अर्पण केली.

**३.११ प्रातःस्वर - २०१४ - दि. २९ ऑक्टोबर २०१४ :** विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने दिवाळीनिमित्त 'प्रातःस्वर' या थाट रंगावर आधारित थाटांच्या आश्रयरागांची मैफल कार्यक्रम दि. २१ ऑक्टोबर २०१४ रोजी सकाळी ६.०० वाजता श्री. समीर सराफ, श्री. प्रेमबाबू लुनावत व डॉ. प्रमोद मुनघाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी साधना शिलेदार, सुगंधा लातूरकर, मिलींद इंदूरकर, अथर्व भालेराव हे कलाकार उपस्थित होते. कार्यक्रमाची संकल्पना सौ. साधना शिलेदार, संगतकार श्री. सचिन बक्षी (तबला) आणि श्री. संदीप गुरुमुले (संवादिनी), निवेदन श्रीमती रजनी हुद्दा यांचे होते.

**३.१२ पुरस्कार वितरण समारंभ - दि. २१ ऑक्टोबर २०१४ :** महाराष्ट्रातील प्रख्यात कवयित्री स्व. अरुणाताई पवार-चवरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त विदर्भस्तरीय काव्यलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला नवोदितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ विभागीय केंद्र, नागपूर व युवा स्पंदन सामाजिक व सांस्कृतिक, साहित्य सेवा संस्था, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथे आयोजित करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्राचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी व प्रा. जैमिनी कडू हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

**३.१३ मा. यशवंतराव चव्हाण यांची ३० वी पुण्यतिथी - दि. २५ नोव्हेंबर २०१४ :-** आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व संयुक्त महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांच्या ३० व्या पुण्यतिथीदिनानिमित्त 'यशवंतराव चव्हाण यांची साहित्यिक व सामाजिक दृष्टी' या विषयावर विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी श्री. धनराज वंजारी, निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. डॉ. गिरीश गांधी हे अध्यक्षस्थानी होते.

**३.१४ गंधर्वगीते - दि. १ डिसेंबर २०१४ :-** विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने दिवंगत ना. बा. उपाख्य नानासाहेब गोखले यांच्या प्रथम मासिक स्मृतिदिनानिमित्त बालगंधर्वांच्या अजरामर नाटयपदांचा 'गंधर्वगीते' या कार्यक्रमाचे आयोजन नागपूर येथे करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी व श्रीमती नीला फडणवीस हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच श्री. विवेक गोखले, श्रीमती रुपाली बक्षी (अकोला), डॉ. साधना शिलेदार, श्रीमती विशाखा मंगदे हे कलाकार उपस्थित होते.

**३.१५ सुवाच्य हस्ताक्षर स्पर्धा - दि. २५ डिसेंबर २०१४ :-** विभागीय केंद्र नागपूर, शिक्षण उपसंचालक, महापालिका शिक्षण विभाग, रायसोनी ग्रुप, रामन विज्ञान केंद्र आणि अक्षरभूषण मधुकर भाकरे प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचा परितोषिक वितरणाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाला महापौर श्री. प्रविण दटके, अभिनेत्री राधिका देशपांडे, तरुण भारताचे मुख्य संपादक श्री गजानन निमदेव, नगरसेवक बंडू राऊत, रशमी फडणवीस, रामन विज्ञान केंद्राचे प्रकल्प संचालक श्री. विश्वनाथ जोशी, प्रतिष्ठानचे अध्यक्ष अण्णाजी मेंडजोगे, नारायण समर्थ, हेमंत सोनारे, राजाभाऊ चिटणीस उपस्थित होते. यावेळी सरस्वती विद्यालयाच्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका श्रीमती जानकी गणेशन यांचा शिक्षक जीवन गौरव पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. त्यांना २१ हजार रोख, शाल, श्रीफळ व मानपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संजय भाकरे यांनी केले तर अभय भाकरे यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले.

या स्पर्धेतील पारितोषिक विजेते पुढीलप्रमाणे गट अ वर्ग ८ ते १० अमिषा कारेमोरे (केशवनगर माध्यमिक शाळा), साक्षी तल्हार (जामदार हायस्कूल, रेशिमबाग) ऐश्वर्या संजय झाडे (साऊथ पॉईंट स्कूल) आकांक्षा मनोज वैद्य (केशवनगर माध्यमिक शाळा), हर्षल प्रदीप बोरकर (विश्वास माध्यमिक शाळा), रुपशुक पाटील (भारतीय विद्या भवन, सिव्हील लाईन्स), मार्गी निमदेव (सोमलवार हायस्कूल), तन्वी लोखंडे (राजेंद्र हायस्कूल), माध्यमिक गट वर्ग ५ ते ७ - यश लोही (केशवनगर माध्यमिक शाळा), दिशा जिभकाटे (सोमलवार रामदास पेठ), अनुष्का पाटील (पं. बच्छराज व्यास विद्यालय), श्रुती नाकाडे (सेंट झेवियर्स), कस्तुरी बेलन (सोमलवार हायस्कूल, रामदास पेठ), अथर्व प्रशांत अहिरराव (केशवनगर माध्यमिक शाळा), श्रुती गजभिये (बी.जी.एम गर्ल्स हायस्कूल), कल्याणी सिरसाम (जाईबाई चौधरी ज्ञानपीठ शाळा), प्राथमिक गट वर्ग १ ते ४ - विभूती

वंजारी (नवयुग प्राथमिक शाळा), अनुष्का मोहुर्ले (यशोदा मराठी प्रा. शाळा), गोविंद जावळे (नवयुग प्राथमिक शाळा, श्लोक आनंद गांधी (बी.पी. विद्या भवन्स), अनिरुध्द मुठाळ (भारती कृशन विद्या विहार व प्राची हांडे (यशोदा प्रा. मराठी शाळा).

**३.१६ लिहित्या स्त्रियांची तृतीय कार्यशाळा - दि. २७ व २८ डिसेंबर २०१४ :-** माहेर संस्थेद्वारा प्रकाशित 'आकांक्षा' मासिक आणि विभागीय केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विदर्भस्तरीय लिहित्या स्त्रियांची तृतीय द्विदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

**३.१७ लेखन-प्रकाशन व्यवहार कार्यशाळा - दि. ६ जानेवारी २०१४ :-** विभागीय केंद्र नागपूर आणि स्नातकोत्तर मराठी विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने लेखन-प्रकाशन व्यवहार कार्यशाळेचे आयोजन नागपूर येथे करण्यात आले. कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ कवी श्री. प्रभू राजगडकर व कार्यशाळा मार्गदर्शक श्री. श्याम पेठकर ज्येष्ठ लेखक व संपादक उपस्थित होते.

**३.१८ 'चालता-बोलता वर्षारंभ अंक' - दि. ९ जानेवारी २०१५ :-** अभिव्यक्ती वैदर्भीय लेखिका संस्था व विभागीय केंद्र नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने २०१५ या वर्षाचे स्वागत 'चालता-बोलता वर्षारंभ अंक' या एका अभिनव कार्यक्रमाने करण्यात आले. विशेषांकात असणारी सर्व सदरे व्यासपीठावरुन सादर करण्याचा हा आगळावेगळा उपक्रम होता. केंद्राचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांनी या प्रसंगी व्यासपीठावरुन शुभेच्छा संदेश दिला. 'शहीद एक सामाजिक भान' या विषयावरील श्रीमती अनुराधा फडणवीस यांचे स्वानुभवावर आधारित विचार प्रकटन हे या अंकाचे प्रमुख आकर्षण होते. शिवाय शर्मिला महादेवकर यांची खुसखुशीत व-हाडी कथा शुभा साठे यांनी सादर केल्या. पुनः प्रत्ययाचा काव्यानंद, श्रीमती साठे यांची मिश्किली तर माला केकतपुरे लिखित पथ्य ही नाटयछटा अशी विविध सादरे सादर केली. अंकाचे मुखपृष्ठ पूर्वा गंगाखेडकर तर मलपृष्ठ योगाभ्यासी मंडळ नागपूर यांच्या सौजन्याने सजलेले होते. या अंकाचे संपादन सुप्रिया अय्यर यांचे व संयोजन हेमा नागपूरकर यांचे तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व संकल्पना स्वाती सुरंगळीकर यांची होती.

**३.१९ मराठी भाषाविषयक धोरणावरील चर्चासत्र - दि. ११ फेब्रुवारी २०१५ :-** मराठी भाषा विभाग व भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासन स्नातकोत्तर मराठी विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर व विभागीय केंद्र नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र शासनाच्या भाषा सल्लागार समितीने राज्य शासनास सादर केलेल्या मराठी भाषाविषयक धोरणाच्या मसुद्यावर 'मराठी भाषाविषयक धोरण' या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. मराठी राज्यात मराठी भाषेची चिंताजनक स्थिती असून यासाठी शासनाचे ठोस धोरण असावे. भाषाविषयक समस्या का निर्माण झाली. यासाठी जबाबदार कोण, मराठी भाषा सर्व व्यवहाराचे माध्यम कशी होईल, सल्लगार समितीने वेगवेगळया क्षेत्रात काय केले पाहिजे इत्यादी बाबींचा ऊहापोह चर्चासत्रात करण्यात आला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समीक्षक डॉ. वि. स. जोग होते. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. अक्षयकुमार काळे, अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी, डॉ. प्रमोद मुनघाटे उपस्थित होते. चर्चासत्रात १९६१ पासूनच्या डॉ. वि. भि. कोलते यांच्या सल्लागार मंडळापासून २०१० पर्यंत विविध धोरणांचा आढावा घेण्यात आला. चर्चासत्रात प्राथमिक वर्गापासूनच मराठी भाषा अनिवार्य करण्याची सूचना डॉ. संध्या अमृते यांनी केली. कायदा असूनही औषधांच्या वेष्टनावर मराठी सूचना नोंदविल्या जात नसल्याकडे श्री. दिवाकर रावते यांनी लक्ष वेधले. प्रास्ताविक डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी केले.

**३.२० साहित्यिक चर्चा व काव्य प्रस्तुती - दि. २५ फेब्रुवारी २०१५ :-** विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने दि. २५ फेब्रुवारी २०१५ रोजी नागपूर येथे दिल्ली येथील प्रसिध्द कवि व अखिल भारतीय सर्वभाषा संस्कृती समन्वय समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष

मा. पंडित सुरेश नीरव यांच्या उपस्थितीत 'वर्तमान हिंदी साहित्यावर चर्चा व काव्य-प्रस्तुती' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे संयोजक डॉ. सागर खादीवाला उपस्थित होते.

**३.२१ समकालीन मराठी वास्तव - दि. २७ फेब्रुवारी २०१५ :-** २७ फेब्रुवारी कविवर्य कुसुमाग्रजांचा जन्मदिन मराठी भाषा गौरवदिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून स्नातकोत्तर मराठी विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर आणि विभागीय केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'समकालीन मराठी वास्तव' या राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन नागपूर येथे करण्यात आले. प्रथम सत्र दि. २७ फेब्रुवारी २०१५ रोजी सकाळी ९.३० वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. विनायक देशपांडे यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. याप्रसंगी मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील प्राध्यापक डॉ. राजन गवस हे अध्यक्षस्थानी होते तर डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे हे वक्ते म्हणून उपस्थित होते. द्वितीय सत्र सकाळी ११ ते दुपारी १.०० वा. 'बृहन्महाराष्ट्रातील समकालीन मराठी वास्तव' या विषयावरील चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी प्राध्यापक व माजी मराठी विभाग प्रमुख विक्रम विश्वविद्यालय उज्जैन (म.प्र.) चे डॉ. शशिकांत सावंत होते. याप्रसंगी मराठी विभाग महा. सयाजीराव गायकवाड विद्यापीठ, बडोदा, गुजरात येथील डॉ. संजयकुमार करंदीकर प्राध्यापिका डॉ. वनिता ठाकूर, प्राध्यापक मराठी विभाग, गुलबर्गा विद्यापीठ, कर्नाटक येथील डॉ. विजया तेलंग यांचा सहभाग होता.

चर्चासत्राचा समारोप दुपारी २ ते ४.३० वा. 'समकालीन मराठी मानस : भाषा वाङ्.मय, कला व संस्कृती' या विषयावरील चर्चासत्राने करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्षस्थानी संत गाडगेबाबा महाविद्यालय, मूर्तिजापूर, जिल्हा अकोला येथील प्राचार्य डॉ. श्रीकांत तिडके, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, डॉ. नंदकुमार मोरे, सहायक प्राध्यापक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, स्नातकोत्तर मराठी विभाग डॉ. शैलेंद्र लेंडे, मराठी विभाग, एम. बी. पटेल महाविद्यालय साकोली, जिल्हा भंडारा, डॉ. अनिल नितनवरे हे याप्रसंगी सहभागी होते.

**३.२२ अमृतमहोत्सवारंभ : दि. २८ फेब्रुवारी २०१५ :-** ज्येष्ठ रंगकर्मी श्री. गणेश नायडू यांच्या पंच्याहत्तरीत पदार्पणानिमित्ताने त्यांचा सत्कार सोहळा शनिवार दि. २८ फेब्रुवारी २०१५ रोजी विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने आयोजित करण्यात आला. हा सत्कार सोहळा माजी खासदार श्री. दत्ताभाऊ मेघे यांच्या शुभहस्ते, माजी मंत्री श्री. अनिलबाबू देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत व विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी विदर्भ साहित्य संघ, नागपूरचे अध्यक्ष श्री. मनोहर म्हैसाळकर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. या सत्कार प्रसंगी सर्वश्री श्री. रमेश अंभईकर, प्रमोद भुसारी, डॉ. विलास चिंतामण देशपांडे यांनी श्री. नायडूंच्या कर्तृत्वाचा आलेख मांडला.

**३.२३ मा. यशवंतराव चव्हाण यांची १०२ वी जयंती - दि. १२ मार्च २०१५ :-** आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व संयुक्त महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांच्या १०२ व्या जयंतदिनानिमित्त नागपूर शहरातील विविध क्षेत्रांत ज्या मान्यवर महिलांनी सामाजिक बांधिलकी स्वाकारुन दैदीप्यमान कार्य केले आहे अशा ज्येष्ठ महिलांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करता यावी यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, नागपूरच्या काही मान्यवर महिलांचा सत्कार सोहळा आयोजित केला आहे. हा सत्कार सोहळा ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. यशवंत मनोहर यांच्या शुभहस्ते आणि डॉ. श्रीकांत तिडके यांच्या अध्यक्षतेखाली व विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

याप्रसंगी डॉ. श्रीमती सीमाताई साखरे, डॉ. श्रीमती रुपाताई कुलकर्णी, श्रीमती नलिनीबाई लडके, डॉ. श्रीमती कविताताई शनवारे, श्रीमती आशाताई सावदेकर, श्रीमती आशाताई बगे, डॉ. श्रीमती सुहासिनीताई वंजारी, श्रीमती रझिया हसीब सिद्दीकी, श्रीमती आईशा बेगम, श्रीमती व्हिक्टोरिया सायमन, श्रीमती कुंदाताई विजयकर, प्रा. श्रीमती शाहिना खतीब, श्रीमती झेबुन्नीसा शेख, श्रीमती शांताबाई गवई, श्रीमती वासंतीताई सरदार हया ज्येष्ठ महिलांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले.

३.२४ **गजलसम्राट सुरेश भट स्मृतीदिनानिमित्त मराठी गजल दिवस - दि. १५ मार्च २०१५ :-** वनराई, विभागीय केंद्र नागपूर, प्ले बॅक म्युझिकल प्रॉडक्शन, गंधर्व संगीत महाविद्यालय, नागपूर व सम्यक साहित्य मंच, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने गजलसम्राट सुरेश भट स्मृती दिनानिमित्त रविवार दि. १५ मार्च २०१५ रोजी 'मराठी गजल दिवसाचे' आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ कवी आणि आंबेडकरी विचारवंत डॉ. यशवंत मनोहर यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी विभागीय केंद्र नागपूरचे व वनराई फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी हे अध्यक्षस्थानी होते. माजी संचालक, नाटय व गीत विभाग, नवी दिल्ली डॉ. नीलकांत कुलसंगे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहिले. संगीत निर्देशन श्री. सुमंत गहाणकर, संकल्पना प्रा. हृदय चक्रधर, ताराचंद चव्हाण यांचे होते.

३.२५ **अनुराधा पाटील यांच्या कविता - दि. २५ मार्च २०१५ :-** लक्ष दीपांच्या झगझगाटापासून अलिप्त राहून मंद दिव्यांच्या वातीप्रमाणे जळताना अवघा आसमंत उजळणा-या अनुराधा पाटलांची आत्मलक्ष्यी कविता समकालीन कविता आपल्या सत्त्वसंपन्न पृथगात्मतेने आपले लक्ष वेधून घेते. परंपरा स्वीकारुन सहजपणे परंपरेच्या पलीकडे जाणारी दु:सह एकाकीपण सोसून ते प्रत्ययाच्या पातळीवर नेणारी विलक्षण भावगर्भ कविता अनुराधाबाईंनी लिहिली. स्त्रीचे सोशिकपण तिची संवेदनशीलता, तिचा अखंड आत्मशोध प्रकट करताना मानवी जीवनाचा एक समग्र दु:खाकार त्यांच्या कवितेने साकार केला. ग्रामीण संस्कृतीचा वसा या कवितेने घेतला असला तरी तिचे स्वरुप ग्रामीण किंवा शहरी अशा प्रदेशविशिष्टतेने किंवा वर्गविशिष्टतेने विभागलेला नाही किंवा कोणत्याही वाद प्रवाहाचा जाणीवपूर्वक स्वीकार करणारे नाही. तिच्या स्वतंत्र, अभिजात व आशयसंपृक्त वृत्तिविशेषांनी आणि अनोख्या पतिमासृष्टीमुळे डवरुन सौंदर्य ती रसिकांना कलात्मक आनंदाचा प्रत्यय देते आणि समीक्षासमोर नवी आव्हाने उभी करते. तिचे बहुआयामी अंतरंग सहृदयपणे समजून घेण्याकरिता हे चर्चासत्र दि. २५ मार्च २०१५ रोजी विभागीय केंद्र नागपूर व स्नातकोत्तर मराठी विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथे आयोजित करण्यात आले.

## १०.४ विभागीय केंद्र कोकण :-

कोकण विभागीय केंद्राचे कामकाज केंद्राचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांच्या मार्गदर्शनाखाली चालते.

४.१ **वसुंधरा दिन कार्यक्रम :-** विभागीय केंद्र कोकण जिल्हा समिती रत्नागिरी व समाजभान ग्रुप रत्नागिरी यांचे संयुक्त विद्यमाने दि. ३० एप्रिल २०१४ रोजी 'वसुंधरा दिनाचे' औचित्य साधून चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचेवेळी 'पश्चिम घाटाचे संरक्षण व संवर्धन' या विषयावरील सौ. आरती कुलकर्णी यांनी तयार केलेली चित्रफित दाखवून लांजा महाविद्यालयाचे प्रा. डॉ. विक्रांत वेर्डे यांनी चर्चा घडवून आणली. यावेळी कोकण विभागीय समितीचे उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर, फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे जनसंपर्क अधिकारी श्री. अशोक तातुगडे, नवनिर्माण कॉलेजचे संस्थापक श्री. अभिजित हेगशेटये, माहेर संस्थेचे श्री. सुनिल कांबळे व इतर मान्यवरांनी या चर्चासत्रामध्ये सहभाग घेतला.

पर्यावरणाकडे केलेले दुर्लक्ष व त्याकडे पहाण्याची उदासिनता यामुळे निसर्गाची होणारी हानी याचा विचार करता पृथ्वीवरील तापमान वाढण्याचे दृष्टीने भयानक परिणाम सर्व प्राणीमात्रांना भोगावे लागत आहेत. यावर विचार करुन जांगलतोड ज्या प्रमाणात झाली आहे. त्यामानाने वृक्ष लागवड झालेली नाही. त्यामुळे जंगलातील पशुपक्षांच्या अनेक प्रजाती नष्ट व्हायच्या मार्गावर आहेत प्रत्येक प्राणी मात्राच्या संरक्षणाच्या दृष्टीने आपण सर्व संस्थांनी मिळून प्रयत्न करुया व त्यादृष्टीने कार्यक्रम आखणी करुन विविध ठिकाणी पर्यावरण विषयक कार्यक्रम यशस्वी करुया असे डॉ. श्रीरंग कद्रेकर यांनी विचार व्यक्त करताना सांगितले. त्याचप्रमाणे पूज्य नानाधर्माधिकारी यांच्या प्रबोधनाच्या बैठका ठिकठिकाणी होत असतात. या बैठकांना लाखो अनुयायी असतात. वृक्ष लागवड करण्याचे दृष्टीने यांना सहभागी करुन घेतले तर वृक्षलागवडीसाठी मोठा लाभ होईल असे मा. उपाध्यक्ष डॉ. कद्रेकर यांनी सांगितले.

फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे जनसंपर्क अधिकारी श्री. अशोक तातुगडे यांनी आपलेविचार व्यक्त करताना, फिनोलेक्स इंडस्ट्रीज दरवर्षी मोठया प्रमाणावर रोपे खरेदी करुन ती शाळा, कॉलेज, अनेक संस्थांना लागवडीसाठी देवून पर्यावरणाचे दृष्टीने कार्यक्रम राबवित आहे. तसेच समाजभानमध्ये अनेक संस्थांची लोकं आहेत. प्रत्येकजण आपापल्या संस्थेत कार्यरत आहेत.

प्रत्येकजण आपापल्या संस्थेत कार्यरत आहेत. विभागीय केंद्र कोकण व समाजभान ग्रुप यापुढेही कार्यक्रमासाठी एकत्र येऊन अनेक कार्यक्रम यशस्वीपणे राबवू शकतो असा विश्वास व्यक्त केला.

४.२ **पर्यावरण दिन कार्यक्रम** :- विभागीय केंद्र कोकण, जिल्हा समिती रत्नागिरी व समाजभान ग्रुप रत्नागिरी व ट्रीज् फॉर द फ्युचर इंडिया - लांजा या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने दि. ५ जून 'जागतिक पर्यावरण दिन' रत्नागिरी येथे विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी भाटये समुद्र किना-याची स्वच्छता करण्यात आली. तसेच जनजागृतीपर पथनाटयातून पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला.

शहरातील कचराकुंडया, नालेसफाई, गटारांची दुरावस्था तसेच रस्त्याच्या दुतर्फा असणा-या झाडांवर लावण्यात आलेले फलक यामुळे एक प्रकारे पर्यावरणाचा -हास होत असतो. यावेळी संस्थांनी पर्यावरणाचा होणारा -हास रोखण्यासाठी जिल्हाधिकारी श्री. राधाकृष्णन बी. यांना निवेदन दिले. पर्यावरण दिनानिमित्त जागृतीबाबतचे पथनाटय लांजा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थ्यांनी सादर केले. रत्नागिरी बसस्थानक, रेल्वेस्टेशन व भाटये बीच् या ठिकाणी दु. ३ वाजता पासून हे पथनाटय सादर करण्यात आले. शहरामध्ये विविध ठिकाणी पर्यावरण जागृतीचे फलक प्रदर्शित केले होते. पथनाटयातील सहभागी मुलांचा व डॉ. मराठे यांचा सत्कार कोकण विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, भाटये गावच्या सरपंच सौ. श्रध्दा सुर्वे, उपसरपंच श्री. जावेद होडेकर यांचे हस्ते करण्यात आला.

४.३ **कृषी दिन कार्यक्रम** :- विभागीय केंद्र कोकण, जिल्हा समिती रत्नागिरीचे वतीने १ जुलै 'कृषी दिन' कार्यक्रम चिपळूण येथे संपन्न झाला. यावेळी विभागीय समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर, कृषीभूषण श्री. चंद्रशेखर भडसावळे, उपविभागीय कृषी अधिकारी श्री. अे. जी. शहा आदी मान्यवर उपस्थित होते.

मा. वसंतराव नाईक व मा. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. जिल्हा समिती सदस्य श्री. सुचयअण्णा रेडीज यांचे हस्ते पुष्पगुच्छ देवून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. श्री. सुचयअण्णा रेडीज यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. यावेळी त्यांनी केंद्राच्या वतीने होणा-या कार्यक्रमांची माहिती दिली. यावेळी कृषीतज्ञ मा. श्री. चंद्रशेखर भडसावळे व उपविभागीय अधिकारी श्री. अे. जी. शहा यांचा केंद्राच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देवून विभागीय अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

श्री. चंद्रशेखर भडसावळे यांनी उपस्थितांना स्लाईड शोच्या माध्यमातून 'क्रांतिकारी भात लागवड व कृषी पर्यटन' या विषयावर मार्गदर्शन केले. कृषी पर्यटन म्हणजे काय व त्याचे ध्येय कोणते हे त्यांनी समजून सांगितले. शेतक-यांच्या अंगी अनोळखी पाहुण्यांची सेवा करण्याची वृत्ती असेल तरच कृषी पर्यटनाचा हेतू साध्य होईल असेही सांगितले. कृषी पर्यटनाची व्याख्या करताना, आपल्या शेतावर आयोजित केलेले आनंददायी शिक्षण व मौज म्हणजे कृषी पर्यटन असे त्यांनी सांगितले. तसेच अन्न निर्मिती करण्यासाठी शेतावर कुणीतरी येवून प्रोत्साहन देणे, मित्र मिळवणे हे कृषी पर्यटनाचे मुख्य ध्येय आहे. भविष्यात अन्नाचा तुटवडा निर्माण होणार असल्याने अन्नाला सोन्याचा भाव मिळणार आहे म्हणून शेतक-याने अन्न निर्मितीचे काम थांबवता कामा नये असेही सांगितले. क्रांतीकारी भात लागवड याविषयी मार्गदर्शन करताना त्यांनी पारंपारिक चिखलणी व लावणी न करता भातशेती करण्याच्या एस. आर. टी. या बहुगुणी तंत्राची माहिती दिली. एस.आर.टी. म्हणजे 'सगुणा राईस तंत्र' हे भातशेतीशी संबंधित उखळणी, चिखळणी व लावणी न करता कायमस्वरुपी गादीवाफ्यावर टोकणणी करुन उत्तम भात पिकवण्याचे नवे तंत्र असल्याचे सांगितले. या तंत्राचे फायदे कोणते व वेगळेपण काय आहे हे ही विषद केले. उपविभागीय अधिकारी श्री. अे. जी. शहा यांनी उपस्थितांना 'शेतक-यांसाठी असणा-या शासकीय योजना' या विषयावर मार्गदर्शन केले. शेतक-यांनी एकत्रितपणे शेतीचा कायापालट करण्याच्या कृतीला मिशन असे म्हटले जाते. शेतीचे उत्पन्न वाढावे यासाठी सरकारने शेतक-यांचे मदतीसाठी कांही योजना राबविल्या आहेत. त्या योजनांचा लाभ गरजू शेतक-यांना मिळणे महत्वाचे आहे. कोणतीही योजना राबविताना प्रथम उद्देश ठरविला पाहिजे असे सांगितले. बचतगटासाठी असणा-या आय.आर.डी.ए. च्या योजना, फुलशेती व फळबाग करण्यासाठी असणा-या योजना तसेच एम.आय.डी.एच. मध्ये नारळ बोर्डाच्या असणा-या सर्व योजनांची माहिती त्यांनी दिली.

अध्यक्षीय भाषणामध्ये विभागीय समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांनी सांगितले की, श्री. शहा साहेबांनी आपल्या योजना तुमच्यापर्यंत पोहचवल्या आहेत. त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी विचाराला कृतीची जोड दिलीत तर ख-या अर्थाने मा. वसंतराव नाईक यांची जयंती साजरी झाली असे म्हणता येईल. उपस्थित शेतक-यांना मान्यवरांचे हस्ते आवळयाची रोपे वाटप करण्यात आली. शेवटी जिल्हा समिती सदस्य श्री. संदीप लवेकर यांनी उपस्थित मान्यवरांचे व शेतक-यांचे आभार मानले.

४.४ **वक्तृत्व स्पर्धा** :- विभागीय केंद्र कोकण, जिल्हा समिती रत्नागिरीचे वतीने दि. १ ऑगस्ट २०१४ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त पूर्ण प्राथमिक शाळा गोळप सडा, जिल्हा परिषद रत्नागिरी येथे वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. इयत्ता पहिली ते चौथीच्या सुमारे २५ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला.

४.५ **रक्षाबंधन कार्यक्रम** :- विभागीय केंद्र कोकण, जिल्हा समिती रत्नागिरीचे वतीने गतवर्षीप्रमाणे यावर्षीही दि. १२ ऑगस्ट २०१४ रोजी क्षत्रिय मराठी मंडळाचे मजगाव रोड येथील सभागृहात रक्षाबंधनाचा कार्यक्रम घेण्यात आला. एकमेकींबद्दलचा स्नेह, विश्वासार्हता जपणे या भावनेने महिलांनी एकमेकींना राख्या बांधल्या. प्रसंगाच्या वेळी एकमेकींच्या मदतीसाठी धावून जाणे. एकजूट दाखविणे हा या कार्यक्रमामागील उद्देश आहे. आजच्या सामाजिक परिस्थितीमध्ये महिलांनीच एकमेकींच्या मदतीला धावणे आवश्यक आहे म्हणूनच केंद्राच्या वतीने महिलांनीच महिलांना राख्या बांधण्याचा कार्यक्रम घेतला जातो. यावेळी बचतगटातील व इतर महिला उपस्थित होत्या.

४.६ **शिक्षक दिन कार्यक्रम** :- विभागीय केंद्र कोकण, जिल्हा समिती रत्नागिरीचे वतीने दि. १० सप्टेंबर २०१४ रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून खरे ढेरे महाविद्यालय, गुहागर येथे शिक्षकांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी लोकमान्य टिळक स्मारक वाचनालय, चिपळूणचे अध्यक्ष श्री. प्रकाश देशपांडे यांना निमंत्रित करण्यात आले होते. उपस्थित मान्यवरांचे हस्ते दिपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. डॉ. अनिल जोशी यांचे हस्ते मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. केंद्राच्या जिल्याध्यक्षा यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. महाविद्यालयातील शिक्षक श्री. बाळासाहेब दबडे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. श्री. प्रकाश देशपांडे यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे शेवटी जिल्हा समिती सदस्य डॉ. अनिल जोशी यांनी उपस्थित मान्यवरांचे व शिक्षकांचे आभार मानले. तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खरे ढेरे महाविद्यालयाच्या कर्मचा-यांनी केलेल्या सहकार्याबद्दलही आभार मानले. जिल्हा समितीचे सदस्य श्री. विराज महाजन यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाला बहुसंख्य शिक्षक उपस्थित होते.

४.७ **ज्येष्ठ नागरिक दिन** :- विभागीय केंद्र कोकण व रत्नागिरी शहर ज्येष्ठ नागरिक संघ यांचे संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून रविवार दि. १२ ऑक्टोबर २०१४ रोजी 'ज्येष्ठ नागरिक आनंद मेळावा' संपन्न झाला. यादिवशी सकाळी ६.३० वा. ज्येष्ठ नागरिकांकरिता चालण्याची स्पर्धा घेण्यात आली. कोकण विभागीय समितीचे उपध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर यांनी हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेचे उद्घाटन केले. या स्पर्धेचे पुरुष गट व महिला गट असे दोन गट करुन तीन विजयी क्रमांक काढण्यात आले. खेडशी हायस्कूल, रत्नागिरीचे क्रीडा शिक्षक श्री. सुभाष पाटील व पटवर्धन हायस्कूल, रत्नागिरीचे क्रीडा शिक्षक श्री. राजेंद्र कांबळे यांनी व त्यांचे सहकारी क्रीडा शिक्षकांनी पंच म्हणून काम पाहून सहकार्य केले. या स्पर्धेमध्ये ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

चालण्याचे स्पर्धेचा बक्षिस समारंभ व ज्येष्ठ नागरिकांसाठी मनोरंजनाचा कार्यक्रम सायंकाळी ४ वा. राणी लक्ष्मीबाई सभागृह, टिळक आळी येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाला ९९ वर्षीय श्री. महादेव बांदरकर गुरजी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, विभागीय समितीचे उपाध्यक्ष तथा रत्नागिरी शहर ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर, जिल्हा समिती अध्यक्षा, ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्यवाह श्री. सुभाष थरवळ आदी मान्यवर व्यासपीठावर होते. जिल्हाध्यक्षानी उपस्थितांचे गुलाबपुष्प देवून स्वागत केले. जिल्हा समिती सदस्य यांनी

कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्यवाह श्री. सुभाष थरवळ यांनी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री. महादेव वांदरकर गुरुजी यांची ओळख करुन दिली. विभागीय समिती अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांचे हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देवून श्री. वांदरकर गुरुजी यांचा सत्कार करण्यात आला. विभागीय समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, विभागीय समितीचे उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर यांनी आपले विचार व्यक्त करतांना सांगितले की, ९९ वर्षीय वांदरकर गुरुजींचा आजचा उत्साह तरुणांना लाजवणारा असाच आहे. त्यांच्याकडून खूप कांही शिकण्यासारखे आहे असे सांगितले. ज्येष्ठ नागरिकांचे मनोरंजनाकरिता श्री. मनोज ठीक यांचा हिंदी व मराठी गाण्यांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. उपस्थित कांही ज्येष्ठ नागरिकांनी नाटयगीते व भजनही सादर केले.

४.८ **ग्रामीण पुनर्रचना शिबीर** :- डी.बी.जे. महाविद्यालय, चिपळूणच्या राष्ट्रीय सेवायोजना (अधिक दोन स्तर) यांचे सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त ग्रामीण पुनर्रचना शिबीर कार्यक्रम दि. २२ ते २८ नोव्हेंबर २०१४ या कालवधीत मोडक वाडी कान्हे, तालुका चिपळूण येथे आयोजित करण्यात आले होते. सदर एनएसएस कॅम्पने कान्हे हे गांव दत्तक घेऊन विविध उपक्रम राबविले. सलग सात दिवस व्याख्यान, उपासना, आरोग्य शिबीरे, संस्कार, विद्यार्थ्यांच्या संघर्षकथा, प्रतिथयश लेखा शिक्षकांचे मार्गदर्शन, कथाकथन, सांस्कृतिक कार्यक्रम वगैरे भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. तसेच या कालावधीत जलसाक्षरता, पर्यावरण जागृती, लेक वाचवा व जनजागरण, आपत्ती व्यवस्थापन, रस्ते तयार करणे, अंधश्रध्दा निर्मूलन यासारखे विशेष कार्यक्रम राबविण्यात आले. त्या अनुषंगाने दि. २३ नोव्हेंबर २०१४ रोजी विभागीय केंद्र कोकण - जिल्हा समिती रत्नागिरीचे वतीने महिला व विद्यार्थीनीसाठी मेळावा व विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावेळी ग्रामीण भागातील महिलांसाठी विविध मसाले तयार करण्याचे प्रशिक्षण प्रत्यक्षिकासह देण्यात आले. तसेच महिलांसाठी स्पॉट गेम्स विद्यार्थीनींसाठी प्रश्नमंजुषा हे कार्यक्रम घेण्यात आले. कान्हे या ग्रामीण भागातील वयोवृध्द महिलांनीही प्रश्नमंजुषा या कार्यक्रमात उत्साहाने भाग घेवून बक्षिसे मिळवली. अतिशय उत्साहाच्या वातावरणात सदरचा कार्यक्रम पार पडला. विभागीय केंद्राने अतिशय सुंदर कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल डी.बी.जे. महाविद्यालयातर्फे विभागीय केंद्राचे स्मृतीचिन्ह देवून आभार मानण्यात आले.

४.९ **पुण्यतिथी कार्यक्रम** :- मा. यशवंतराव चव्हाण यांच्या ३० व्या पुण्यतिथीनिमित्त कोकण विभागीय केंद्राचे कार्यालयात त्यांचे प्रतिमेला पुष्पहार घालून श्रध्दांजली वाहण्यात आली. यावेळी विभागीय समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर, इतर मान्यवर व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी प्रतिमेला पुष्पांजली वाहिली.

४.१० **व्याख्यान व महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण स्पर्धापरीक्षा बक्षिस वितरण कार्यक्रम** :- मा. यशवंतराव चव्हाण यांच्या ३० व्या पुण्यतिथीनिमित्त कोकण विभागीय समिती व जिंदाल समूह, जयगड यांचे संयुक्त विद्यमाने पालघर, ठाणे, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयातुन कांही निवडक माध्यमिक शाळातील इयत्ता आठवी व नववीतील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. यासाठी विद्यार्थ्यांना मा. चव्हाणसाहेबांचे जीवनावरील पुस्तके वाचण्याकरिता देण्यात आली. सदर पुस्तकांवर प्रश्नपत्रिका तयार करुन सहभागी शाळांतील विद्यार्थ्यांकडून सोडवून घेण्यात आली. रत्नागिरी, सिंधुदुर्ग व पालघर या जिल्हयातून एकूण २३ शाळांनी सहभाग घेतला. या २३ शाळांमधून ५५० विद्यार्थी स्पर्धा परीक्षेला बसले होते.

या स्पर्धा परीक्षेची प्रश्नपत्रिका काढण्याकरिता पदवीधर शिक्षक संघटनेचे राज्याचे माजी अध्यक्ष श्री. कृ. आ. पाटील, रत्नागिरी जिल्हा पदवीधर शिक्षक संघटनेचे माजी सरचिटणीस तसेच रोटरी क्लब रत्नागिरीचे अध्यक्ष श्री. विनायक हातखंबकर व स. रा. देसाई, अध्यापक विद्यालय, रत्नागिरीचे प्रा. श्री. संदेश रावराणे यांची समिती नेमण्यात आली होती. या स्पर्धेचा बक्षिस वितरण कार्यक्रम दि. २७ नोव्हेंबर २०१४ रोजी कीर सभागृह, पटवर्धन हायस्कूल, रत्नागिरी येथे करण्यात आला. या कार्यक्रमाला देवरुख येथील प्रा. डॉ. सुरेश जोशी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर विभागीय समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, रोटरी क्लब रत्नागिरीचे अध्यक्ष श्री. विनायक हातखंबकर, पटवर्धन हायस्कूलचे मुख्याध्यापक आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांचे हस्ते विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. विजेत्यांना रोख रक्कम, प्रशस्तीपत्र व

सह्याद्रीचा सुपुत्र हे पुस्तक देण्यात आले. तसेच ज्या शिक्षकांनी स्पर्धा परिक्षेकरिता सहकार्य केले त्यांचाही यावेळी मान्यवरांचे हस्ते सत्कार करण्यात आला. प्रमुख अतिथी प्रा. डॉ. सुरेश जोशी यांनी उपस्थितांना मा. यशवंतराव चव्हाण यांचा संक्षिप्त जीवनपट सांगितला. विभागीय समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मानसी चव्हाण यांनी केले तर आभार श्री. सुभाष पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला शिक्षक व विद्यार्थी वर्ग मोठया संख्येने उपस्थित होता.

४.११ **चित्रकला स्पर्धा** :- केदारनाथ विद्यामंदिर, रामनगर, ठाणे, यशवंतराव चव्हाण स्मृती संस्था, ठाणे व विभागीय केंद्र कोकण यांचे संयुक्त विद्यमाने दि. ३ जानेवारी २०१५ रोजी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त मा. यशवंतराव चव्हाण यांचे जीवनावर आधारित चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांचे हस्ते प्रशस्तीपत्रक व बक्षिसे देण्यात आली. यावेळी आमदार श्री. निरंजन डावखरे, कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, ठाणे वैभव संपादक श्री. मिलींद बल्लाळ, शिक्षणाधिकारी श्री. बेलदार, कोकण विभागीय समितीचे सदस्य तथा यशवंतराव चव्हाण स्मृती संस्था, ठाणेचे अध्यक्ष श्री. विलास निकम, श्री. भागवत, श्री. गायकवाड, सौ. फाल्गुनी राजपूत इ. मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी मुलांना मनोरंजनात्मक गोष्टी सांगितल्या.

४.१२ **परिसंवाद कार्यक्रम** :- कोकण विभागीय केंद्राचे वतीने कोकण विभागीय समितीचे पहिले अध्यक्ष स्व. भाऊसाहेब नेवाळकर यांचे जन्मशताब्दी वर्षानिमित्त दि. १२ जानेवारी २०१५ रोजी वसई विरार मधील वि. वा. इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, शिरगांव येथे इंजिनिअरिंग शिकणा-या विद्यार्थ्यांसाठी 'असा घडतो उद्योजक' या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कोकण विभागीय समितीचे सदस्य तथा ख्यातनाम उद्योजक श्री. सुनिल शिर्के व वसईतील सुप्रसिध्द उद्योजक श्री. पुरुषोत्तम पवार यांनी विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधून उद्योग क्षेत्रातील अनुभव व आठवणी सांगून विद्यार्थ्यांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी व वि. वा. इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्राचार्य ॲड. अनिलकुमार व श्री. शशांक पाटील यांनीही या परिसंवादामध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. सदर कार्यक्रमाचा १८० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. या कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी कोकण विभागीय समितीच्या पालघरच्या सदस्या सौ. फाल्गुनी राजपूत यांनी उत्तमरित्या पार पाडली.

४.१३ **परिसंवाद कार्यक्रम** :- कोकण विभागीय केंद्राचे वतीने नवकोकण संस्था, चिपळूणचे डी.बी.जे. महाविद्यालय येथे दि. १५ जानेवारी २०१५ रोजी स्व. भाऊसाहेब नेवाळकर यांचे जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'असा घडतो उद्योजक' या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. उद्योजक श्री. सतीश साठे, श्री. मोरे व श्री. सुनिल शिर्के यांनी परिसंवादामध्ये भाग घेतला. यावेळी व्यासपीठावर नवकोकण संस्थेचे अध्यक्ष श्री. सुचयअणा रेडिज, डी.बी.जे. महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. श्याम जोशी आदी मान्यवर उपस्थित होते. कमी शिक्षण असले तरीही उद्योजक होता येते. हे कमी शिक्षण घेतलेल्या श्री. मोरे यांनी विद्यार्थ्यांना स्वतःच्या उदाहरणावरुन पटवून दिले. श्री. सुनिल शिर्के यांनीही कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थीही उद्योजक बनू शकतात असे अनेक उदाहरणावरुन पटवून दिले. महाविद्यालयातील ७० ते ८० विद्यार्थ्यांनी या परिसंवादाचा लाभ घेतला. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना उद्योजकांनी उत्तरे दिली.

४.१४ **लोकनृत्य स्पर्धा** :- सोनोपंत दांडेकर कला क्रीडा अकादमी, पालघर व कोकण विभागीय केंद्र - जिल्हा समिती पालघर यांचे संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांच्या लोकनृत्य स्पर्धा दि. १४ फेब्रुवारी २०१५ रोजी लायन्स क्लब ऑफ पालघरच्या सभागृहात आयोजित करण्यात आली. ही स्पर्धा प्राथमिक व माध्यमिक अशा दोन गटात घेण्यात आली. यावेळी कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, सोनोपंत दांडेकर कला क्रीडा अकादमी, पालघरचे अध्यक्ष श्री. प्रकाश पाटील, विभागीय समितीचे सदस्य श्री. प्रल्हाद कदम व श्रीमती फाल्गुनी राजपूत आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी दोनही गटातील पहिल्या चार क्रमांकाना व उत्तेजनार्थ विजेत्यांना रोख रकमांच्या पारितोषिकांचे वितरण सर्वश्री राजाभाऊ लिमये,

सोनोपंत दांडेकर कला क्रीडा संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रकाश पाटील, श्री. प्रल्हाद कदम व श्रीमती फाल्गुनी राजपूत यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी अनेक संस्थांच्या पदाधिका-यांनी लोकनृत्याच्या माध्यमातून सादर केलेल्या कलेचे अभिनंदन केले.

४.१५ **छायाचित्र प्रदर्शन** :- विभागीय केंद्रचे वतीने पालघर जिल्हयातील वसई येथे दि. ११ मार्च २०१५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ सायन्स अॅन्ड अॅड. गुरुनाथ कुलकर्णी कॉलेज ऑफ कॉमर्स वसईच्या आवारामध्ये मा. यशवंतराव चव्हाण यांच्या रेखाचित्रांचे प्रदर्शन संपन्न झाले. या कार्यक्रमाचे उद्घाटन कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांचे हस्ते करण्यात आले. विभागीय समिती पालघरच्या सदस्या सौ. फाल्गुनी राजपूत यांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमामध्ये माजी शिक्षण सभापती नगरसेवक राजाराम मुळीक, महाविद्यालयाचे संस्थापक श्री. विनोद गायकवाड, ज्युनिअर कॉलेज असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी श्री. अनिल देशमुख पुर्णपात्रे सर इ. मान्यवर उपस्थित होते. संपूर्ण दिवसभरात झालेल्या या चित्र प्रदर्शनासाठी सुमारे ३५० मुलांनी उपस्थिती दर्शविली.

४.१६ **मा. यशवंतराव चव्हाण यांची जयंती** :- कोकण विभागीय केंद्र रत्नागिरी व समन्वय प्रतिष्ठान तसेच यशवंतराव चव्हाण स्मृती सेवा संस्था, ठाणे यांचे संयुक्त विद्यमाने दि. १२ मार्च मा. यशवंतराव चव्हाणसाहेबांची १०२ वी जयंती ठाणे येथे साजरी करण्यात आली. यादिवशी सकाळी ९ वा. विद्याप्रसारक शिक्षण संस्था, बाळकूम, ठाणे या शाळेतील विद्यार्थ्यांची ढोल लेझीम पथकासह प्रभातफेरी काढण्यात आली. सदर प्रभातफेरी मिरवणूकीने बाळकूम नाक्यावरील मा. यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या भव्य पूर्णाकृती पुतळयाला मान्यवरांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी विभागीय समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, कोकण पदवीधर मंचचे आमदार श्री. निरंजन डावखरे, ठाण्याचे विभागीय समिती सदस्य श्री. विलास निकम व इतर मान्यवर उपस्थित होते. ठाणे महानगरपालिका हद्दीतील आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांसाठी 'यशवंतराव चव्हाण आज असते तर' या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये ८० शाळांतील ४०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. पहिल्या क्रमांकाने विजयी झालेल्या प्रत्येक शाळेतील उपस्थित विद्यार्थ्याला रोख रु.२५०/- चे बक्षिस मान्यवरांचे हस्ते देण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

४.१७ **जागतिक महिला दिन कार्यक्रम** - महिलांनी बनविलेल्या मालाचे प्रदर्शन व विक्री कार्यक्रम :- कोकण विभागीय केंद्र जिल्हा समिती रत्नागिरी व फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि. रनपार रत्नागिरी यांचे संयुक्त विद्यमाने ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून बचत गटातील व इतर उद्योगिनी महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे विक्री व प्रदर्शन कार्यक्रम दि. १३ ते १६ मार्च २०१५ या कालावधीत साई मंगल कार्यालय, जे. के. फाईल्स, रत्नागिरी येथे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन विभागीय समितीचे उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी बचतगट स्टॉलधारक सौ. देशपांडे यांचे हस्ते दिपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रथम उपस्थित मान्यवरांचे गुलाबपुष्प व नारळ देवून स्वागत करण्यात आले. विभागीय समितीचे उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर यांचे हस्ते नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष श्री. प्रकाश काणे यांचे पुष्पगुच्छ व श्रीफळ तसेच प्राईड वुमन पुरस्कार विजेत्या सौ. युगंधरा राजेशिर्के यांचा स्मृतीचिन्ह, पुष्पगुच्छ व रोपांची कुंडी देवून सत्कार करण्यात आला.

दि. १३ ते १६ मार्च २०१५ या चार दिवसांमध्ये महिलांसाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यामध्ये दि. १३ मार्च रोजी दुपारी महिलांसाठी पारंपारिक वेशभूषा स्पर्धा व लायन्स क्लबचे वतीने महिलांचे मेडीकल चेकअप करण्यात आले. दि. १४ मार्च रोजी टाकाऊ साहित्यापासून कलाकृती निर्माण करणे व पाककला स्पर्धा घेण्यात आल्या. दि. १६ मार्च रोजी 'ग्राहक हक्क व संरक्षण' या विषयावर अॅड. विनय परांजपे यांचे सोबत मार्गदर्शन व प्रश्नोत्तराचा कार्यक्रम घेण्यात आला. तसेच मुकुल माधव फाऊंडेशनच्या सौ. राधा करमरकर यांनी 'लहान मुलांचे लैंगिक शोषण' या विषयावर महिलांशी चर्चा केली. यावेळी महिलांनी चर्चेत सहभाग घेवून आपल्या शंकांचे निरसन केले. यानंतर महिलांसाठी फनी गेम्स घेण्यात आले. दि. १६ मार्च रोजी 'सहयाद्रीचा सुपुत्र' या पुस्तकावर आधारित स्टॉलधारक महिलांची २५ गुणांची लेखी परीक्षा घेण्यात आली. या स्पर्धेतून तीन विजयी क्रमांक काढण्यात आले. सायंकाळी ४ वा. सर्व स्पर्धांचा बक्षिस वितरण व समारोप कार्यक्रम आयोजित

करण्यात आला. यावेळी विभागीय समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आशुतोष मुळये, श्री. मुकुल माधव फाऊंडेशनच्या श्रीमती मेरी बेंजामीन आदी मान्यवरांचे हस्ते विजयी स्पर्धकांना बक्षिसे देण्यात आली.

यानंतर चिपळूण तालुक्यातील सावर्डे येथील सहयाद्री ग्रुपच्या महिलांचा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी त्यांनी महिला संतांच्या रचना, गीते व स्त्रीभूण हत्या रोखण्यासाठी महिला काय करु शकते हा संदेश नाटीकेतून दिला. तसेच पोटच्या बाळाला पाठीशी बांधून इंग्रजांशी झुंज देणा-या झाशीच्या राणीचे सुरेख सादरीकरण केले. प्रदर्शनाच्या उद्घाटन व समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अनघा निकम - मगदूम यांनी केले. चार दिवसांच्या सर्व कार्यक्रमांना महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सहयाद्री ग्रुपने सादर केलेल्या कार्यक्रमाचे केंद्राच्या वतीने विशेष कौतुक केले गेले. बचतगटातील महिलांनीही यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानला धन्यवाद दिले.

४.१८ **वसई येथील महिला दिन कार्यक्रम** :- कोकण विभागीय केंद्र व वुमन्स नीड गीव्हन सपोर्ट (विंगस्) फाऊंडेशनच्या वतीने महिला दिनाचे औचित्य साधून दि. १५ मार्च २०१५ रोजी महिलांसाठी एक दिवसाचे मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले. यावेळी सुप्रसिध्द व्याख्याते मार्गदर्शक श्री. अभय कमलाकर बाग यांनी महिलांमधील सुप्त गुणांचा शक्तीचा विकास होण्याकरिता विविध विषयावर सर्वकष मार्गदर्शन केले. महिलांचा व्यक्तीमत्व विकास, सकारात्मक विचार, मेंदूची प्रगल्भता वाढविणे. सुसंवाद कौशल्य, सांघिक कार्य, संभाषण चातुर्य, वेळेचे महत्व / मूल्यांकन, तणावमुक्ती, व्यासपीठ गाजविणे याबाबत मार्गदर्शन केले साता-याचे सुप्रसिध्द डॉ. नांदोस्कर यांचे सहकारी श्री. आशुतोष गोखले यांनी आरोग्याची काळजी घेणे व आपले उपाय स्वतः करुन आपण कसे सतेज व आनंददायी राहू शकतो याबाबत बहुमोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे शेवटी सुप्रसिध्द श्रीमती सूचना शेट्टी यांचा झुम्मा डान्स करण्यात आला. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन पालघरच्या विभागीय समिती सदस्या सौ. फाल्गुनी राजपूत यांनी केले.

## १०.५ विभागीय केंद्र नाशिक :-

नाशिक विभागीय केंद्राचे कामकाज केंद्राचे अध्यक्ष श्री. विनायकराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चालते.

५.१ **'दिशा दहावी नंतरची' या विषयावर कार्यशाळा - 'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत दोन दिवशीय कार्यशाळेचे आयोजन दि. ५ व ६.४.२०१४** :- विभागीय केंद्र नाशिक, सृजन कन्सल्टन्टस् नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक , विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत 'दिशा दहावी नंतरची' या विषयावरील दोन दिवशीय कार्यशाळेत विद्यार्थ्यांना सृजन कन्सल्टंटस्चे श्री. शंतनु गुणे यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळा केंद्राच्या सभागृहात संपन्न झाली. माहिती, तंत्रज्ञान, विज्ञान, वैद्यकीय, बँकींग अशा क्षेत्रातील संधी युवकांना दिशा देत आहेत. अभ्यासातील सातत्य, एकाग्रता ही यशस्वीतेची गुरुकिल्ली आहे. अवांतर वाचन, आवडीच्या विषयांविषयी माहिती जाणून घेणे इत्यादी गोष्टी महत्त्वपूर्ण आहेत. यावेळी श्री. शंतनु गुणे यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे विद्यार्थ्यांना माहिती दिली.

५.२ **'चित्रपट चावडी' - 'द स्पिरिट ऑफ द बिहाईव्ह - स्पॅनिश भाषेतील चित्रपट दि. १९.४.२०१४** :- विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत चित्रपट रसिकांसाठी दर महिन्याला जागतिक व भारतीय भाषांतील अभिजात व कलात्मक चित्रपट दाखविण्यात येत आहेत. यावेळेस सुप्रसिध्द दिग्दर्शक व्हिक्टर इराईस (स्पेन) यांचा 'द स्पिरिट ऑफ द बिहाईव्ह' हा स्पॅनिश भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

**५.३ कॅलिग्राफी (सुलेखन) कार्यशाळा - मार्गदर्शक - सुप्रसिध्द कॅलिग्राफर, चित्रकार नंदू गवांदे-दि. २४ ते २७.४.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक , विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम., व विश्वास लॉन्स यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिध्द कॅलिग्राफर, चित्रकार श्री. नंदू गवांदे यांच्या कॅलिग्राफी (सुलेखन) कार्यशाळेचे आयोजन केंद्राच्या सभागृहात करण्यात आले आहे. यावेळी अक्षरांचा उगम, आकार याविषयी तसेच रेषा / आकार व्यायाम, स्वरलेखन शुध्दलेखन टिप्स, व्यंजन लेखन, शब्द वाक्यलेखन, अखरसंहिता सादरीकरण, स्ट्रोक्स या विषयावर तसेच संगीत व अक्षर, चित्र व अक्षर या विषयावर प्रात्यक्षिकांसह चित्रकार श्री. नंदू गवांदे यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेस मोठया संख्येने शिबिरार्थी सहभागी झाले होते.

**५.४ संगीत कार्यशाळा - मार्गदर्शक - सुप्रसिध्द गायक व संगीतकार डॉ. सलिल कुलकर्णी - दि. १० ते ११.५.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक व गॅलेक्सी इव्हेंट ऑर्गनायझर्स यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. सलिल कुलकर्णी यांच्या संगीत कार्यशाळेचे आयोजन केंद्राच्या सभागृहात करण्यात आले होते. सदर कार्यशाळेत ६५ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. श्री. प्रदीप पेशरकार यांनी संयोजकांच्या उपक्रमाचे कौतुक करुन सहभागी प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा दिल्या. श्री. विश्वास ठाकूर म्हणाले की, संगीत क्षेत्रात कलाकारांना खूप मोठा वाव आहे व त्याकरिता अशा शिबीरांची नितांत आवश्यकता आहे. कुठल्याही शहराची ओळख ही तेथील सांस्कृतिक, सामाजिक चळवळींवर अवलंबून असते तीच ओळख नाशिक शहराने जपली आहे.

दैनिक सकाळचे श्री. अतुल बापट, गंगापूर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शंकरराव काळे, माऊली कॅटरर्सचे श्री. अतुल कुलकर्णी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संगीत कार्यशाळेला मिळालेल्या भरघोस प्रतिसादाबद्दल ओंकार शौचे यांनी सर्व सहकार्य करणारे आणि प्रशिक्षणार्थी यांना धन्यवाद दिले. पियुष देसाई यांनी उपस्थितींचे आभार मानले. पं. भूषण शुक्ल यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सलील कुलकर्णी यांचा परिचय गॅलेक्सी इव्हेंट ऑर्गनायझर्सच्या खजिनदार श्रीमती रुचा दीक्षित यांनी करुन दिला. डॉ. सलील कुलकर्णी यांना स्मृतीचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ देऊन गॅलेक्सी इव्हेंट ऑर्गनायझर्सचे अध्यक्ष श्री. ओंकार शौचे, सचिव श्रीमती रसिका नातू, उपाध्यक्ष शौनक जाखडी, मुग्धा कुलकर्णी यांनी त्यांचे स्वागत व सत्कार केला.

**५.५ अभिनय व व्यक्तिमत्व विकास शिबीर - मार्गदर्शक - सुप्रसिध्द नाटयदिग्दर्शक डॉ. प्रशांत वाघ - दि. १२ ते २२.५.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक , विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'सृजन' उपक्रमांतर्गत आयोजित 'अभिनय व व्यक्तिमत्व विकास' शिबीराच्या समारोपाप्रसंगी अखिल भारतीय मराठी नाटय परिषद नाशिक शाखेचे कार्यवाह श्री. सुनिल ढगे, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सुप्रसिध्द नाटयदिग्दर्शक डॉ. प्रशांत वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्राच्या सभागृहात हे शिबीर संपन्न झाले. ९ ते १७ वर्ष वयोगाटातील मुला-मुलींच्या शिबिरास उदंड प्रतिसाद लाभला. लहान मुलांच्या सुप्त गुणांना व्यासपीठ उपलब्ध करुन देणे हा या मागचा उद्देश आहे. यावेळी सहभागी शिबिरार्थींना श्री. सुनील ढगे यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांनी सई परांजपे लिखित 'झाली का गंमत' व धनंजय सरदेशपांडे लिखित 'चम चज चमको' या नाटिका सादर केल्या. शिबिरार्थींच्यावतीने कादंबिनी ठाकूर व सानिका बलपाठक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. पालकांच्या वतीने डॉ. सुधीर संकलेचा यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, स्पर्धेच्या युगात मुलांच्या जडणघडणीसाठी अशी शिबिरे मोलाची भूमिका बजावत असतात व त्यांच्या कलागुणांना वाव देत असतात. याप्रसंगी नाटय कलावंत दत्ता नागपुरे, जयदेव ठाकूर तसेच पालक व रसिक मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रशांत वाघ यांनी केले.

**५.६ 'चित्रपट चावडी' ॲशेस ॲंड डायमंडस् पोलीस भाषेतील चित्रपट दि. १७.५.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत चित्रपट रसिकांसाठी दर महिन्याला जागतिक व भारतीय भाषांतील अभिजात व

कलात्मक चित्रपट दाखविण्यात आले. यावेळेस सुप्रसिध्द दिग्दर्शक आंद्रे वायदा (पोलंड) यांचा 'ॲशेस ॲंड डायमंडस्' हा पोलीस भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲंड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

**५.७ 'क्षमता संवर्धन' या विषयावर कार्यशाळा 'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत कार्यशाळेचे आयोजन दि. २६.५.२०१४ ते १.६.२०१४ :-** मुलांमधील सुप्त गुणांची ओळख करुन देण्यासाठी त्यांना आवडीचे व्यासपीठ उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. त्यांच्यातील बहुआयामी बुध्दीमत्तेचा शोध घेण्यासाठी विविध प्रोजेक्टमध्ये त्यांना सहभागी करुन घ्यावे, त्यातुनच मुलांच्या गुणवत्तेचा शोध घेता येतो असे प्रतिपादन सृजन कन्सल्टन्टचे श्री. शंतनु गुणे यांनी केले. विभागीय केंद्र नाशिक, सृजन कन्सल्टन्टस, नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत 'क्षमता संवर्धन' या विषयावरील आयोजित कार्यशाळेत विद्यार्थ्यांना सृजन कन्सल्टन्टचे श्री. शंतनु गुणे यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळा प्रतिष्ठानच्या सभागृहात संपन्न झाली. यावेळी त्यांनी पॉवर प्रेझेंटेशनद्वारे विद्यार्थ्यांना माहिती दिली. विद्यार्थ्यांमधील उपजत कौशल्याला दिशा मिळावी व त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळावी या उद्देशाने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

**५.८ शिक्षणकट्टा उपक्रमांतर्गत 'करिअरच्या दिशा' या विषयावर व्याख्यान मार्गदर्शक - सुप्रसिध्द समुपदेशक डॉ. अशोक चोपडे (पुणे) दि. २८.५.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, उत्क्रांती प्रतिष्ठान नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई, विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत 'करिअरच्या दिशा' या विषयावरील डॉ. अशोक चोपडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन प्रतिष्ठानच्या सभागृहात करण्यात आले होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक उत्क्रांती प्रतिष्ठानच्या प्राची कोठावदे यांनी केले. याप्रसंगी भुजबळ नॉलेज अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य विजय वाणी, रवींद्र अमृतकार तसेच पालक व पाल्य मोठया संख्येने उपस्थित होते.

**५.९ शिक्षणकट्टा उपक्रमांतर्गत 'सॉफ्टवेअर क्षेत्रातील करिअर संधी' या विषयावर व्याख्यान मार्गदर्शक - संजीव भामरे दि. १३.६.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, अनुभूती फाऊंडेशन नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई, विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत प्रतिष्ठानच्या सभागृहात संपन्न झालेल्या 'सॉफ्टवेअर क्षेत्रातील करिअर संधी' या विषयावरील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसमधून निवृत्त झालेले श्री. संजीव भामरे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक श्री. राजेश हिवरे यांनी केले.

**५.१० 'चित्रपट चावडी' किंग्ज स्पीच - ब्रिटिश भाषेतील चित्रपट दि. १३.६.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत यावेळेस सुप्रसिध्द दिग्दर्शक टॉप हूपर (ब्रिटन) यांचा 'किंग्ज स्पीच' हा ब्रिटिश भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲंड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

**५.११ शिक्षणकट्टा उपक्रमांतर्गत 'इंजिनिअरिंगमधील करिअर संधी व करिअर निवडीची पध्दत' या विषयावर व्याख्यान मार्गदर्शक - संजीव भामरे दि. २८.६.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, अनुभूती फाऊंडेशन नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई, विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी

रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत प्रतिष्ठानच्या सभागृहात संपन्न झालेल्या 'इंजिनिअरिंगमधील करिअर संधी व करिअर निवडीची पध्दत' या विषयावरील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसमधून निवृत्त झालेले श्री. संजीव भामरे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक राजेश हिवरे यांनी केले. कार्यक्रमास दीडशेहून अधिक विद्यार्थी उपस्थित होते.

**५.१२ लोकसंवाद उपक्रमांतर्गत 'शेती आणि शेतक-यांना सहाय्यभूत होणा-या जागतिक संधी' या विषयावर व्याख्यान मार्गदर्शक - विनयदादा पाटील दि. १.७.२०१४ :-** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व हरितक्रांतीचे प्रणेते स्व. वसंतराव नाईक यांनी आपल्या अभ्यासपूर्ण कार्यशैलीतून व दूरदृष्टीतून विकासाची गगा आणली. हरितक्रांतीचा ध्यास घेऊन प्रत्यक्षात आणण्यातही ते यशस्वी ठरले. जनसामान्यांच्या मूलभूत प्रश्नांची जाण आणि ते सोडविण्यासाठी असलेली तळमळ यामुळेच त्यांचे कार्य समाजासाठी आदर्शव्रत व प्रेरणादायी आहे, त्याची जोपासना सर्वांनी करावी असे प्रतिपादन विनायकदादा पाटील यांनी केले. ते पुढे म्हणाले की, आजच्या जागतिकीकरणाच्या काळात नवनवीन आव्हानांचा सामना करण्यासाठी शेतक-यांनी सज्ज व्हावे, शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करुन शेती उत्पादनात वाढ करावी असेही ते म्हणाले. यावेळी त्यांनी वसंतराव नाईक यांच्या सहवासातील आठवणी कथन केल्या. वसंतराव नाईक यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त विभागीय केंद्र नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई, विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'लोकसंवादा' उपक्रमांतर्गत कार्यक्रमात ते बोलत होते. कृषि उत्पन्न बाजार समिती सभागृह, निफाड येथे सदर कार्यक्रम संपन्न झाला. नाफेडच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल नानासाहेब पाटील यांचा सत्कार विनायकदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक, सूत्रसंचालन केंद्राचे सदस्य संजय नागरे यांनी केले. कार्यक्रमास निफाडचे सरपंच अनिल पाटील कुंदे, उपसरपंच दिलीप कापसे तसेच बबनराव सानप, शिवाजीराव ढेपले, प्रमोद शिंदे, मधुकर शेलार आदी मान्यवर तसेच परिसरातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

**५.१३ अपंग व्यक्तींना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर दि. ५ व ६.७.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, अपंग हक्क विकास मंच, समाजकल्याण विभाग, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय - भारत सरकार, महात्मा गांधी सेवा संघ, समाज कल्याण विभाग, विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. व संकल्प बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीराचे आयोजन कुसुमाग्रज स्मारक येथे करण्यात आले होते. याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे अपंग कल्याण आयुक्त श्री. ज्ञानेश्वर राजूरकर हे उपस्थित होते.

स्वागत व प्रास्ताविक करताना श्री. विजय कान्हेकर यांनी केले. यावेळी केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर उपस्थित होते. कार्यक्रमात अपंग बांधवांना तीन चाकी सायकली, कॅलिपर्स, श्रवणयंत्रे, कुबडया, व्हील चेअर्स इत्यादींचे वाटप करण्यात आले. समाजकल्याण विभागाचे श्री. पी. यू. पाटील यांनी अपंगांच्या विविध अडीअडचणी सांगितल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. विनायक रानडे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. सुहास तेंडूलकर यांनी केले.

**५.१४ शिक्षणकट्टा उपक्रमांतर्गत 'क्षमता संवर्धन' या विषयावर कार्यशाळा - शंतनु गुणे दि. ५ व ६.७.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, सृजन कन्सल्टंट, नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई, विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत 'क्षमता संवर्धन' या विषयावरील दोन दिवशीय कार्यशाळेचे श्री. शंतनु गुणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन केले होते. सदर कार्यशाळा प्रतिष्ठानच्या सभागृहात संपन्न झाली.

**५.१५ 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत 'समांतर सिनेमा आणि भारतीय चित्रपटसृष्टी' सादरकर्ते सुप्रसिध्द चित्रपट समीक्षक गणेश मतकरी दि. १२.७.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, विश्वास को. ऑप. बँक लि.,

नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत 'समांतर सिनेमा आणि भारतीय चित्रपटसृष्टी' या विषयावरील गणेश मतकरी यांच्या दृकश्राव्य व्याख्यानाचे आयोजन प्रतिष्ठानच्या सभागृहात संपन्न झाले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक श्री. राजेश हिवरे यांनी केले. गणेश मतकरी यांचा परिचय श्री. रघुनाथ फडणीस यांनी केला तर सन्मान डॉ. श्याम अष्टेकर यांनी केला. कार्यक्रमास चित्रपट रसिक मोठया संख्येने उपस्थित होते.

५.१६ **'आपणही जिंकू शकतो' सादरकर्ते सुप्रसिध्द कवी प्रसाद कुलकर्णी दि. १९.७.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने मनातला आत्मविश्वास जागवणा-या 'आपणही जिंकू शकतो' या प्रसाद केलकर्णी यांचा लोकप्रिय प्रेरणादायी कार्यक्रम केंद्राच्या सभागृहात संपन्न झाला. श्री. प्रसाद कुलकर्णी यांचा सन्मान श्री. विश्वास ठाकूर यांनी केला तर श्री. राजेश हिवरे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास नाशिककर श्रोते मोठया संख्येने उपस्थित होते.

५.१७ **'चित्रपट चावडी' द पॅसेज ऑफ नाईट - पोर्तुगीज भाषेतील चित्रपट दि. २७.७.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' यावेळेस सुप्रसिध्द दिग्दर्शक लुई फिलिप रोया (पोर्तुगाल) यांचा 'द पॅसेज ऑफ नाईट' या पोर्तुगीज भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

५.१८ **फिल्म मेकिंग कार्यशाळा - मार्गदर्शक - दिग्दर्शक व लेखक समीर रावसाहेब, रोहन शिवलकर, सुनील देव, देवेन कापडणीस, निलेश घुमरे दि. २६.७.२०१४ ते ४.०८.२०१४ :-** चित्रपट लघुपटांच्या माध्यमातून समाजातील रोजचे मूलभूत प्रश्न मांडून मनोरंजनाबरोबरच प्रबोधनात्मक जाणीवेतून संदेश द्या व वास्तव्याचे ज्वलंत प्रश्न मांडा, त्यातून चांगले बदल घडवा असे प्रतिपादन केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर यांनी केले.

विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम., श्रीराज फिल्म्स व मॅजिक माऊस फिल्म यांच्या संयुक्त विद्यमाने सहाव्या राष्ट्रीय फिल्म मेकिंग कार्यशाळेत आयोजन केले होते.

५.१९ **'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत तीन लघुपटांचे सादरीकरण दि. २.८.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत प्रतिष्ठानच्या सभागृहात तीन बहुचर्चित लघुपटांचे सादरीकरण करण्यात आले व दिग्दर्शकांशी रसिकांनी संवाद साधला. शॉर्ट फिल्म म्हणजे गंभीर काही तरी, उपदेशाचे डोस वगैरे असा काहीसा अनेकांचा समज झालेला आहे. मात्र, जे कांही सांगायचे आहे ते थोडक्यात आणि आटोपशीर सांगत रसिकांपर्यंतही ते व्यवस्थितपणे पोहोचवण्याचे हे उत्तम माध्यम असल्याचे तीनही लघुपटांनी दाखवून दिले. त्यातही 'डोह' हा लघुपट रसिकांच्या विशेष पसंतीस उतरला. यानंतर या तीनही लघुपट दिग्दर्शकांनी रसिकांशी संवाद साधत त्यांच्या शंकांचे निरसन केले. नाशिककर रसिक लघुपट बघण्यासाठी मोठया संख्येने उपस्थित होते.

५.२० **स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला 'युवा स्वातंत्र्य ज्योती रॅली' चे आयोजन दि. १४.८.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, नवमहाराष्ट्र युवा अभियान, मुंबई, विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला 'युवा स्वातंत्र्य ज्योती रॅली' चे आयोजन करण्यात आले होते. युवकांमध्ये राष्ट्रभावना जागृत होण्यासाठी व स्वातंत्र्याविषयी आदराची भावना जागृत

होण्यासाठी 'युवा स्वातंत्र्य ज्योती रॅली' चे आयोजन करण्यात येते. रॅलीमध्ये नाशिक शहरातील सर्व महाविद्यालयातील युवक-युवती, स्थानिक संस्था, संघटना, राजकीय पक्ष, ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, प्रशासकीय अधिकारी तसेच सर्वसामान्य नागरिक सहभागी झाले होते. सजवलेल्या बग्गीत अक्षता वाघ ही भारतमातेच्या वेषभूषेत होती. रॅलीचा प्रारंभ मॉडर्न एज्युकेशन सोसायटी संचलित माध्यमिक विद्यालय, शिवाजी चौक, जुने सिडको, नाशिक येथून होऊन अशोकवन कॉलनी - गोपालकृष्ण चौक - सप्तश्रृंगी चौक - भाजी मंडई - शिवाजी चौक - महात्मा फुले चौक - औदुंबर कॉलनी - राणाप्रताप चौक - शिवाजी चौक मार्गे रॅलीचा समारोप मॉडर्न एज्युकेशन सोसायटी संचलित माध्यमिक विद्यालय, शिवाजी चौक, जुने सिडको येथे करण्यात आला. समारोपानंतर केंद्राचे सदस्य श्री. विनायक रानडे यांनी उपस्थितांकडून संविधानाचे वाचन करुन घेतले. सूत्रसंचालक राजेश हिवरे यांनी केले. रॅलीच्या यशस्वीतेसाठी केंद्राच्या सदस्या श्रीमती दीपाली मानकर यांनी संयोजन केले.

**५.२१ 'चित्रपट चावडी' योल (द रोड) - तुर्की भाषेतील चित्रपट** दि. २.८.२०१४ :- विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत यावेळेस सुप्रसिध्द दिग्दर्शक यिलमाझ गुने (टर्की) यांचा 'योल' (द रोड) हा तुर्की भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

**५.२२ शिक्षणकट्टा उपक्रमांतर्गत व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा** दि. २३.८.२०१४ :- विभागीय केंद्र नाशिक, विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा' संस्थेच्या गंगापूर रोड येथील सभागृहात संपन्न झाली. सदर कार्यशाळेत व्यक्तिमत्व विकासाची संकल्पना स्पष्ट करताना तज्ज्ञ प्रशिक्षक श्री. राजेश हिवरे यांनी सांगितली. कार्यक्रमाच्या समारोपाप्रसंगी केंद्राच्या सदस्या श्रीमती दीपाली मानकर उपस्थित होत्या. त्यांनी सर्व प्रशिक्षणार्थींचे अभिनंदन करुन कार्यशाळेत मिळालेले ज्ञान, कौशल्य व दृष्टीकोन सामाजिक विकासासाठी वापरावे असे आवाहन केले. त्यांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रे वाटप करण्यात आले. कार्यशाळेत १५ प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदविला.

**५.२३ 'जमिनीवरचे तारे' माहितीपटाचे स्क्रिनिंग** दि. ५.९.२०१४ :- विभागीय केंद्र नाशिक, विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, दिशा शैक्षणिक उपक्रम, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'जमिनीवरचे तारे' हया माहितीपटाचे स्क्रिनिंग संस्थेच्या गंगापूर रोड येथील सभागृहात संपन्न झाले. यावेळी दीडशेचे वर विद्यार्थी - विद्यार्थीनी व शिक्षक उपस्थित होते.

**५.२४ 'चित्रपट चावडी' द बँडस व्हिजिट - इस्त्रायली भाषेतील चित्रपट** दि. १३.९.२०१४ :- विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत यावेळेस सुप्रसिध्द दिग्दर्शक एरान कोलीरीन यांचा 'द बँडस् व्हिजिट' हा इस्त्रायली भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी अँड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

**५.२५ शिक्षणकट्टा उपक्रमांतर्गत 'संवाद कौशल्य' कार्यशाळा** दि. २०.९.२०१४ :- विभागीय केंद्र नाशिक, विश्वास को. ऑप. बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत 'संवाद कौशल्य' कार्यशाळा संस्थेच्या गंगापूर रोड येथील सभागृहात संपन्न झाली. सदर कार्यशाळेत सहभागी प्रशिक्षणार्थींना संवाद कलेची संकल्पना संवाद तज्ज्ञ श्री. राजेश हिवरे यांनी समजून सांगितली. संवाद चांगला होण्यासाठी दुसऱ्यांचे ऐकून घेणे महत्वाचे आहे. आपले नेतृत्व वृद्धिंगत करण्यासाठी आवश्यक संवाद कौशल्य

आणि व्यापक दृष्टीकोन निर्मिती, बोलण्यातील अडथळयांचा चिकित्सक अभ्यास करुन ते सोडविण्याचे कौशल्य आत्मसात करुन विषयांची चौफेर व प्रभावी मांडणी करता आली पाहिजे. आत्मविश्वासपूर्वक संवाद साधल्यास विषय लवकर समजून येत असल्याची माहिती श्री. हिवरे यांनी दिली. माहितीपट, खेळ, पोस्टर्स, चर्चासत्र अशा वेगवेगळया माध्यम सत्रांचा वापर करुन संवाद कौशल्याचे धडे देण्यात आले. देहबोली, आवाज, भाषा, मांडणी, संवेदनशीलता अशा संवाद व संभाषण कौशल्यातील महत्त्वाच्या मुद्दयांवर प्रशिक्षणार्थींची मते जाणून घेण्यात आली. मनातील भीती व पूर्वग्रह नष्ट करुन प्रभावी संवाद साधण्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

**५.२६ शिक्षणकट्टा उपक्रमांतर्गत 'मुलांच्या अंगी असलेल्या टॅलेंटची जोपासना' व्याख्यान मार्गदर्शक - संजीव भामरे दि. २७.९.२०१४ :-** विद्यार्थ्यांमधील टॅलेंटची जोपासना करण्यासाठी पालकांनी त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी त्यांना स्वतंत्रपणे विचार करु द्यावा. बदलते भाषिक पर्यावरण, माहिती व तंत्रज्ञान, शिक्षणाची भाषा व रोजच्या व्यवहारातली भाषा, जगण्यातील रोजचे अनुभव यातून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होत असतो. गतिमान जीवनशैलीमुळे विद्यार्थ्यांच्या आवडी इतक्याच करिअरच्याही संधी निर्माण होत आहेत. त्यासाठी पालकांनी त्यांच्यात आत्मविश्वास जागविण्याचे काम करावे असे प्रतिपादन टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसमधून निवृत्त झालेले श्री. संजीव भामरे यांनी केले. विभागीय केंद्र नाशिक, अनुभूती फाऊंडेशन, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, विश्वास को. ऑप. बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत 'मुलांच्या अंगी असलेल्या टॅलेंटची जोपासना' या विषयावर केंद्राच्या सभागृहात श्री. संजीव भामरे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक महेश रसाळ यांनी केले. कार्यक्रमास मोठया संख्येने पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

**५.२७ 'चित्रपट चावडी' वाजदा - अरेबिक भाषेतील चित्रपट दि. २७.९.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत यावेळेस सुप्रसिध्द दिग्दर्शक हैफा अल् मन्सूर यांचा 'वाजदा' हा अरेबिक भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

**५.२८ 'चित्रपट चावडी' द अनबरीड मॅन - हंगेरियन भाषेतील चित्रपट दि. ११.१०.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द दिग्दर्शक मार्ता मेस्झारोस यांचा 'द अनबरीड मॅन' हा हंगेरियन भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

**५.२९ सुलेखन कार्यशाळा सादरकर्ते - सुप्रसिध्द कॅलिग्राफर (सुलेखनकार) व चित्रकार अच्युत पालव दि. ३०.१०.२०१४ ते ०२.११.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने श्री. अच्युत पालव यांच्या मार्गदर्शनाखाली चार दिवसीय कॅलिग्राफी कार्यशाळेचे आयोजन केंद्राच्या सभागृहात करण्यात आले होते. श्री. अच्युत पालव यांनी अक्षर लेखनातील बदलत्या शैली, प्रयोगशीलता, माध्यमे यांचा आढावा घेतला. अक्षरांतील चित्रांचे, भावनांचे, अक्षरातला आशय आपल्या प्रात्यक्षिकांतून प्रभावीपणे दाखवत अच्युत पालव यांनी कलारसिकांना सुलेखनाची अपूर्व भेट दिली. 'पाऊस' या शब्दांतील पावसाचे विभ्रम, 'लता' या शब्दांतील सुरांची तरलता, 'सुंदर' शब्दातील देखणेपण अशा अनेक रोजच्या व्यवहारातील अक्षरांना चित्ररुप दिले. कॅलिग्राफीतून मनातल्या भावनांचे रुपच नकळतपणे व अभिनवपणे समोर आले. चित्र-संगीत-नृत्य अशा त्रिवेणी संगमातून कॅलिग्राफीचा प्रयोगशील अविष्कार उपस्थितांना अचंबित करुन गेला. जय शारदे वागेश्वरी, ललाटी भंडारी, नाम

विठोबाचे घ्यावे अशा गीतांतून व नृत्यांतून श्री. अच्युत पालव यांनी कॅलिग्राफीची अभिव्यक्ती पेश केली. कॅलिग्राफीसाठी शुध्द मनाचा रियाझ, शब्दांमधले नाद-माधुर्य व ऊर्जा हे महत्वाचे घटक असल्याचे प्रात्यक्षिकातून सादर केले. कार्यशाळेस मोठया संख्येने शिबीरार्थी सहभागी झाले होते.

**५.३० 'चित्रपट चावडी' तुलपान (टयुलिप) - कझाक (रशियन) भाषेतील चित्रपट दि. ०१.११.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द दिग्दर्शक सर्गेई डॉरटसेव्हाय यांचा 'तुलपान (टयुलिप)' हा कझाक (रशियन) भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

**५.३१ 'फुले वेचिता' भ्रमणध्वनीवर काढलेल्या निवडक छायाचित्रांचे प्रदर्शन - दि. ०८.११.२०१४ ते १६.११.२०१४ :-** आर्थिक परिस्थिती चांगली नसलेले तसेच मार्गदर्शन आणि संधी मिळत नसल्याने अनेक गुणवंत उपेक्षित राहतात. अशा मुला-मुलींचे सुप्तगुण ओळखून त्यांना सहकार्य आणि प्रोत्साहन दिले तर त्यांचा आत्मविश्वास वाढतो असे प्रतिपादन वनाधिपती व केंद्राचे अध्यक्ष श्री. विनायकदादा पाटील यांनी केले.

सातपूरच्या जनता विद्यालयात इयत्ता नववीत शिकणारी छायाचित्रकार रवीना दत्तू मौळे या आदिवासी कोकणा विद्यार्थीनीने भ्रमणध्वनीवर काढलेल्या निवडक छायाचित्रांचे प्रदर्शन 'फुले वेचिता' या शिर्षकाने विभागीय केंद्र नाशिक व कुसुमाग्रज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने कुसुमाग्रज स्मारक येथे आयोजित करण्यात आले होते. दैनिक सकाळचे छायाचित्रकार व नाशिक प्रेस फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. सोमनाथ कोकरे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. प्रदर्शनास रवी गुरनानी, तंत्रज्ञ योगेश गामणे, दीपक बहादूरे, कविता गायकवाड यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. यावेळी सर्वश्री लोकेश शेवडे, संजय नागरे, विनायक रानडे, प्राचार्य आहेर, दत्तू मौहे, यमुना मौळे तसेच नाशिककर कलारसिक मोठया संख्येने उपस्थित होते.

**५.३२ शिक्षणकट्टा उपक्रमांतर्गत 'जागर अभ्यासाचा' या विषयावर कार्यशाळा मार्गदर्शक - शंतनु गुणे दि. ९.११.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, सृजन कन्सल्टन्टस् नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, विश्वास को. ऑप. बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत 'जागर अभ्यासाचा' या विषयावरील कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री. शंतनु गुणे बोलत होते. सदर कार्यशाळा प्रतिष्ठानच्या सभागृहात संपन्न झाली. यावेळी शंतनु गुणे यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे विद्यार्थ्यांना माहिती दिली.

**५.३३ यशवंतराव चव्हाण यांच्या ३० व्या पुण्यतिथीच्या पूर्वसंध्येला सुप्रसिध्द चित्रपट समीक्षक अनिल झणकर यांचे व्याख्यान दि. २४.११.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, सृजन कन्सल्टन्टस् नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, विश्वास को. ऑप. बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत महाराष्ट्राचे थोर शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाण यांच्या ३० व्या पुण्यतिथीच्या पूर्वसंध्येला 'चित्रपटातील शहरं' या विषयावर ख्यातनाम चित्रपट समीक्षक आणि दिग्दर्शक श्री. अनिल झणकर यांचे दृकश्राव्य व्याख्यानाचे आयोजन केंद्राच्या सभागृहात करण्यात आले. श्री. अनिल झणकर यांचा परिचय श्री. राजेश हिवरे यांनी करुन दिला. तर त्यांचा सन्मान केंद्राचे सचिव व उपमहापौर श्री. गुरुमित बग्गा यांनी केला. यावेळी केंद्राचे कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर, डॉ. शोभा बच्छाव, विजय अहलुवालिया, संतोष पाटील, दिलीप पाटील, शरद पुराणिक, रघुनाथ सावे तसेच नाशिककर रसिक मोठया संख्येने उपस्थित होते.

**५.३४ शिक्षणकट्टा उपक्रमांतर्गत 'जागर अभ्यासाचा' या विषयावर कार्यशाळा मार्गदर्शक - शंतनु गुणे दि. २७.११.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, सृजन कन्सल्टन्टस् नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, विश्वास को. ऑप. बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत 'जागर अभ्यासाचा' या विषयावरील कार्यशाळा श्री. शंतनु गुणे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्राच्या सभागृहात संपन्न झाली. प्रभावी अभ्यासाचे आव्हान विद्यार्थी व पालक यांनी मिळून पेलावे व नुसते मार्कार्थी न होता प्रभावी अभ्यास आनंदाने करीत गुण आणि गुणवत्ता वाढवावी असा मंत्र श्री. शंतनु गुणे यांनी दिला. यावेळी त्यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटशनद्वारे विद्यार्थ्यांना माहिती दिली.

**५.३५ शिक्षणकट्टा उपक्रमांतर्गत 'जादू वैदिक गणिताची' या विषयावर कार्यशाळा मार्गदर्शक - ललित डांगरे दि. २७.११.२०१४ ते ३०.११.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, विश्वास को. ऑप. बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द गणिततज्ज्ञ श्री. ललित डांगरे यांच्या 'जादू वैदिक गणिताची' या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन केंद्राच्या सभागृहात करण्यात आले होते. कार्यशाळेस विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने सहभाग नोंदवला.

**५.३६ 'चित्रपट चावडी' लस्ट फॉर लाईफ (इंग्रजी) भाषेतील चित्रपट दि. २९.११.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द दिग्दर्शक व्हिन्सेन्टी मिनेली (युनायटेड स्टेटस) यांचा 'लस्ट फॉर लाईफ' हा इंग्रजी भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

**५.३७ शिक्षणकट्टा उपक्रमांतर्गत 'जागर अभ्यासाचा' या विषयावर कार्यशाळा मार्गदर्शक - शंतनु गुणे दि.३०.११.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, सृजन कन्सलटन्टस् नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, विश्वास को. ऑप. बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत 'जागर अभ्यासाचा' या विषयावरील कार्यशाळेचे श्री. शंतनु गुणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन केले होते. सदर कार्यशाळा केंद्राच्या सभागृहात संपन्न झाली. यावेळी त्यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे विद्यार्थ्यांना माहिती दिली.

**५.३८ शिक्षणकट्टा उपक्रमांतर्गत 'जादू वैदिक गणिताची' या विषयावर कार्यशाळा मार्गदर्शक - ललित डांगरे दि. १.१२.२०१४ ते ५.१२.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, विश्वास को. ऑप. बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द गणिततज्ज्ञ श्री. ललित डांगरे यांच्या 'जादू वैदिक गणिताची' या विषयावरील पाच दिवसांच्या कार्यशाळेचे आयोजन केंद्राच्या सभागृहात करण्यात आले होते. कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने सहभाग घेतला.

**५.३९ 'स्वतःचा विकास कसा साधावा' या विषयावर कार्यशाळा मार्गदर्शक - राजेश हिवरे दि. ७.१२.२०१४ :-** विभागीय केंद्र नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, विश्वास को. ऑप. बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने तज्ज्ञ प्रशिक्षक श्री. राजेश हिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वतःचा विकास कसा साधावा' या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन केंद्राच्या सभागृहात करण्यात आले होते. कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने सहभाग नोंदविला.

५.४० **'चित्रपट चावडी' मिस्टर लाझार (फ्रेंच) भाषेतील चित्रपट दि. १३.१२.२०१४** :- विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' सुप्रसिध्द दिग्दर्शक फिलिप फॅलार्डू (कॅनडा) यांचा 'मिस्टर लाझार' हा फ्रेंच भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

५.४१ **लोकसंवाद उपक्रमांतर्गत 'चित्रकलेतील सौंदर्य' या विषयावर दृकश्राव्य व्याख्यान व्याख्याते - सुप्रसिध्द चित्रकार आशुतोष आपटे दि.१९.१२.२०१४** :- विभागीय केंद्र नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, विश्वास को. ऑप. बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'लोकसंवाद' उपक्रमांतर्गत 'चित्रकलेतील सौंदर्य' या विषयावरील ख्यातनाम चित्रकार श्री. आशुतोष आपटे यांचे व्याख्यान केंद्राच्या सभागृहात आयोजित केले होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर यांनी केले. श्री. आपटे यांचा सन्मान विश्वास को. ऑप. बँकेचे जनसंपर्क संचालक श्री. मंगेश पंचाक्षरी यांनी केला तर सूत्रसंचालन श्री. रघुनाथ फडणीस यांनी केले. व्याख्यानास मोठया संख्येने विद्यार्थी व कलारसिक उपस्थित होते.

५.४२ **'चित्रपट चावडी' द सर्चर्स (इंग्रजी) भाषेतील चित्रपट दि. २७.१२.२०१४** :- विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द दिग्दर्शक जॉन फोर्ड (यू.एस.ए.) यांचा 'द सर्चर्स' हा फ्रेंच भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

५.४३ **'चित्रपट चावडी' डक सिझन (स्पॅनिश) भाषेतील चित्रपट दि. १०.१.२०१५** :- विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द दिग्दर्शक फर्नांडो ॲम्बक (मेक्सीको) यांचा 'डक सिझन' हा फ्रेंच भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

५.४४ **'जाणीव सामाजिकतेची' उपक्रमास प्रारंभ दि. १४.१.२०१५**:- अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मूलभूत गरजांसोबतच शिक्षण ही देखील अतिमहत्वाची गरज आहे. शिक्षण हा मानवाचा तिसरा डोळा मानला जातो. त्यामुळे वंचित, दुर्लक्षित व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना प्राथमिक शिक्षण मिळाले तर त्यांचा शिक्षणासंदर्भातील दृष्टीकोन व्यापक होण्यास मदत होते व शिक्षणाविषयी ओढ निर्माण होऊन त्यांचे भवितव्य उज्ज्वल घडू शकते. यासाठी या विषयावर संवेदनशीलतेने काम करण्याची गरज लक्षात घेऊन रेडिओ विश्वास ९०.८ या समुदाय रेडिओतर्फे 'जाणीव सामाजिकतेची' या उपक्रमाच्या माध्यमातून रेडिओची माहिती, उपकरणे, कार्यक्रम, निर्मिती प्रक्रिया इत्यादीबाबतची माहिती सामाजिक व शैक्षणिक संस्थांना प्रात्यक्षिकांद्वारे 'रेडिओ विश्वास ९०.८' तर्फे देण्यात येत आहे. त्यात यावेळी महानॅब स्कूल फॉर दि ब्लाईंड, सातपूर, नाशिक व मॉडर्न एज्युकेशन सोसायटी संचलित माध्यमिक विद्यालय, अशोक नगर, सातपूर, नाशिक या शाळेतील विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या. यावेळी विश्वास शेरीकर, हेमंत गवळे, पराग कानडे, प्रशांत बाविस्कर, ओवी जोशी यांनी रेडिओ विश्वासच्या विविध विभागांची माहिती दिली. या उपक्रमास मनपा शाळा क्र. ५६ मुले व मनपा शाळा क्र. ६७ - मुली (फुले नगर, नाशिक), आनंद निकेतन (पाईपलाईन रोड, गंगापूर रोड, नाशिक), नूतन प्राथमिक विद्यालय (गरवारे, अंबड, नाशिक, दिशा उपक्रम (विश्वास लॉन्स, सावरकर नगर, गंगापूर रोड, नाशिक), पाच बंगला प्राथमिक शाळा (खांडरे मळा, नाशिक रोड) व मनपा शाळा क्र. ७ - मुली व मनपा शाळा क्र. २९ - मुले (मखमलाबाद नाका, नाशिक) या शाळा सहभागी झाल्या.

५.४५ **'चित्रपट चावडी' द गोल्डन ड्रीम (स्पॅनिश) भाषेतील चित्रपट दि. २४.१.२०१५** :- विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द दिग्दर्शक दिएगो केमाडा डिएझ (ग्वाटेमाला) यांचा 'द गोल्डन ड्रीम' हा स्पॅनिश भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

५.४६ **'साद' लघुनाटिका संग्रहाचे प्रकाशन - दि.०९.०२.२०१५** :- विभागीय केंद्र नाशिक, विश्वास को. ऑप. बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने सुरेखा बो-हाडे (गायखे) यांच्या 'साद' या लघुनाटिका संग्रहाचा प्रकाशन समारंभ केंद्राच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. आजच्या गतिमान माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात बालसंस्काराचा प्रयोग अत्यंत परिणामकारकपणे 'साद' या पुस्तकातून आला आहे. मुलांमधील अभिरुची घडविण्याची प्रक्रिया यातून आली आहे. लहान मुलांमध्ये भाषेच्या विविध अविष्कारांची जोपासना कशी करावी तसेच विज्ञानाची शिकण्याची वाट सोप्या पध्दतीने दाखविण्याची किमया प्रत्येक पानापानात आली आहे. वाढता चंगळवाद व भौतिक सुखाचे आकर्षण यासारख्या आव्हानातूनही वाचन संस्कृती टिकविण्याची जबाबदारी 'साद' सारख्या पुस्तकातून होत असते असे प्रतिपादन दैनिक सकाळचे संपादक श्रीमंत माने यांनी केले. यावेळी बोलताना मराठी विद्या प्रसारक समाजाच्या सचिव नीलिमाताई पवार म्हणाल्या की, समाज घडविण्याची कास घेऊन तळमळीने शिकविणा-या शिक्षकांची आज समाजाला खरी गरज असून शिक्षणाच्या अनुभवातून निर्मितीची प्रेरणा समाजाला दिशादर्शक म्हणूनच उपयुक्त आहे. लेखनातून व शिक्षणातून येणारा विचार सर्वदूर व दीर्घकाळ परिणाम करणारा असतो. नानासाहेब बोरस्ते म्हणाले की, संस्कारक्षम पिढी घडविण्याची जबाबदारी शिक्षकांसोबतच पालकांनी स्वीकारायला हवी. अशा पुस्तकातून ही जबाबदारी पेलणे सोपे जाईल. केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर म्हणाले की, मुलांच्या घडणा-या प्रक्रियेत आईचा मोलाचा सहभाग असतो. शिक्षण क्षेत्रातून मुलांच्या अनुभवाचे संचित 'साद' या पुस्तकातून प्रभावीपणे आले आहे. केंद्राचे सदस्य संजय नागरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रतिष्ठानच्या विविध उपक्रमांची त्यांनी माहिती दिली. पुस्तकाच्या लेखिका श्रीमती सुरेखा बो-हाडे (गायखे) यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन श्रीमती जयश्री बस्ते यांनी केले व आभार योगेश बस्ते यांनी मानले.

५.४७ **'चित्रपट चावडी' द लास्ट सपर (स्पॅनिश) भाषेतील चित्रपट दि. १४.२.२०१५** :- विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द दिग्दर्शक तोमास अलीया यांचा 'द लास्ट सपर' हा स्पॅनिश भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

५.४८ **'सृजन' उपक्रमांतर्गत सृजन बालचित्रपट महोत्सव दि. १६.२. ते २१.२.२०१५** :- सिनेमातून आपल्या मनातील भावनांचे प्रतिबिंब उमटत असते. आजूबाजूचे रोजचे विषय चित्रपटाच्या माध्यमातून आपल्या जगण्याशी समांतर नातं सांगत असतात. त्यातून प्रबोधन होतेच व मनोरंजनातून सकारात्मक संदेशही मिळत असतो. तोच संदेश विचार जीवनाची अभिरुची वाढवत असतो असे प्रतिपादन विभागीय केंद्र नाशिकचे अध्यक्ष श्री. विनायकदादा पाटील यांनी केले. विभागीय केंद्र नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, चिल्ड्रन फिल्म सोसायटी ऑफ इंडिया, विश्वास को. ऑप. बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'सृजन' उपक्रमांतर्गत 'सृजन बालचित्रपट महोत्सवा' चे उद्‌घाटन विजयानंद थिएटर (भद्रकाली रोड, गाडगे महाराज पुतळयाजवळ, नाशिक) येथे झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावप्रसंगी अभिनेते, दिग्दर्शक सचिन शिंदे, केंद्राचे कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर, अखिल भारतीय नाटयपरिषद नाशिक शाखेचे अध्यक्ष प्रा. रवींद्र कदम, वाय.डी. बिटको गर्ल्स हायस्कूलचे उपमुख्याध्यापक बाळकृष्ण रायजादे व पर्यवेक्षिका मेघना गायधनी आदी मान्यवर उपस्थित होते. महोत्सवाचे उद्घाटन विद्यार्थीनींच्या हस्ते क्लॅप दाबून झाले व शुभारंभ क्रांती कानडे दिग्दर्शित 'महक मिर्झा' या बालचित्रपटाने करण्यात आला. सचिन शिंदे म्हणाले की, मुलांच्या सृजनशीलतेला, कल्पकतेला व्यासपीठ देण्यासाठी चित्रपट माध्यम प्रभावीपणे काम करते. यातील आविष्कार नवे जग तर दाखवतोच त्याचबरोबर चित्रपटाची भाषा प्रत्येकाला आपलीशी वाटते हे या माध्यमाचे यश आहे. विविध चॅनेल्सने मुलांसाठी दर्जेदार कार्यक्रमांची निर्मिती करावी असेही ते म्हणाले.

विश्वास ठाकूर म्हणाले की, प्रतिष्ठानतर्फे मुलांमधील अंगभूत गुणांना, कलाकौशल्याला निश्चित दिशा देण्यासाठी अभिरुची संपन्न पिढी घडवण्यासाठी प्रबोधनपर बालचित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. माहिती व तंत्रज्ञानाला कला माध्यमाची जोड देणे म्हणजे सृजनशीलतेला नवी दिशा देणारे आहे. महोत्सवात १७.२.२०१५ रोजी अपूर्व किशोर बीर दिग्दर्शित 'बाजा' (माऊथ ऑर्गन), १८.२.२०१५ रोजी अजय कार्तिक दिग्दर्शित 'करामती कोट', १९.२.२०१५ रोजी अरुण खोपकर दिग्दर्शित 'हाथी का अंडा', २०.२.२०१५ रोजी श्रीधर रंगायन दिग्दर्शित 'ये है यकूड बकूड बंब बो' व २१.२.२०१५ रोजी जयश्री कनाल दिग्दर्शित 'कट्ट कट्ट कड कट्टू' हे चित्रपट दाखविण्यात आले.

**५.४९ सृजन बालचित्रपट महोत्सव 'सिनेमाची भाषा' या विषयावर कार्यशाळा - व्याख्याने सुप्रसिध्द दिग्दर्शक सुधीर कुलकर्णी दि. १८.२.२०१५ :-** विभागीय केंद्र नाशिक, विश्वास को. ऑप. बँक लि. नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, चिल्ड्रन फिल्म सोसायटी ऑफ इंडिया, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'सृजन' उपक्रमांतर्गत सृजन बालचित्रपट महोत्सवात 'सिनेमाची भाषा' या विषयावरील कार्यशाळा मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमास सुप्रसिध्द दिग्दर्शक श्री. सुधीर कुलकर्णी उपस्थित होते. त्यांनी अवलोकन, निरीक्षण, अनुभव मांडण्याची कलात्मक शैली हे दिग्दर्शकाचे यश असते. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात चित्रमाध्यमात अनेक बदल झाले असून मनातील घटना पडद्यावर जसेच्या तसे मांडता येते असेही श्री. कुलकर्णी म्हणाले. यावेळी त्यांनी कथा, पटकथा, सिन्स, शुटींग याविषयी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. त्याला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी कॅमेरामन श्री. ज्ञानेश्वर गांगुर्डे यांनी कॅमेरा व छायाचित्रण याविषयी माहिती दिली. स्वागत व प्रास्ताविक मुख्याध्यापिका श्रीमती निर्मला शेलार यांनी केले. श्री. दर्शन उशिरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. परिचय श्री. अनिल माळी यांनी करुन दिला. आभार श्री. ऋषभ निकम यांनी मानले.

**५.५० सृजन बालचित्रपट महोत्सव 'सिनेमाचे तंत्र व छायाचित्रण' या विषयावर कार्यशाळा - व्याख्याने सुप्रसिध्द दिग्दर्शक व कॅमेरामन प्रवीण पगारे दि. २०.२.२०१५ :-** सिनमाचे तंत्र हे चित्रपटाच्या आशयाला पूरक अशी प्रक्रिया असून त्या माध्यमातून सिनेमाचा विषय व त्यातील परिणामकारकता रसिकांना कथानकातून नवाविचार देते असे प्रतिपादन सुप्रसिध्द दिग्दर्शक व कॅमेरामन श्री. प्रवीण पगारे यांनी केले. विभागीय केंद्र नाशिक, विश्वास को. ऑप. बँक लि. नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, चिल्ड्रन फिल्म सोसायटी ऑफ इंडिया, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'सृजन' उपक्रमांतर्गत 'सृजन' बालचित्रपट महोत्सवात 'सिनेमाचे तंत्र व छायाचित्रण' या विषयावरील कार्यशाळेत मार्गदर्शन करताना केले. एकलव्य रेसीडेन्शीअल स्कूल, पेठ रोड, नाशिक येथे सदर कार्यशाळा संपन्न झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. सदाशिव गावीत यांनी केले. सन्मान प्राचार्य श्री. अशोक बच्छाव यांनी केला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री. भालचंद्र नंदन व शिककवर्गाने परिश्रम घेतले.

**५.५१ 'जाणीव सामाजिकतेची' उपक्रमांतर्गत विदेशी विद्यार्थ्यांमार्फत परिसंवाद दि. २१.२.२०१५ :-** आयसेक या आंतरराष्ट्रीय संस्थेमार्फत चीनमधील एप्रिल, डॉन व व्यॅग, इटलीची एलेना, तुर्कमेतिस्तान येथील डोरॉन, मंगोलिया देशातील

उद्रख व इजिप्तमधील ऍन्टॉन्गा या विद्यार्थ्यांनी (इंटर्नस २) उपस्थितांना त्यांनी अनुभवलेली भारतीय संस्कृती व त्यांच्या देशातील संस्कृती यासंदर्भाची माहिती तसेच नाशिकमधील विविध समुदायांसमवेत काम करीत असताना त्यांना आलेले अनुभव या विषयावर संवाद साधला. प्रतिष्ठानच्या सभागृहात विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ समुदाय रेडिओ नाशिक तर्फे 'जाणीव सामाजिकतेची' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. आयसेक या आंतरराष्ट्रीय संस्थेचे नाशिक विभागातील आयुष केडिया यांनी सर्वप्रथम आयसेक या संस्थेविषयीची माहिती स्पष्ट केली आणि अधिकाधिक भारतीय विद्यार्थ्यांनी आयसेकमध्ये सहभागी होऊन जगातील विविध देशांचा अभ्यास करण्यासाठी पुढाकार घ्यावा असे मत मांडले. दिशा उपक्रमाच्या श्रीमती सुधा मेहता व नूतन प्राथमिक विद्यामंदिर येथील श्रीमती उषा कर्पे यांनी उपक्रमासंदर्भात आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी समुदायामार्फत सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन उपस्थितांसाठी करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संस्थेचे कार्यक्रम समन्वयक श्री. राजेश हिवरे यांनी केले.

५.५२ **सृजन बालचित्रपट महोत्सव 'सिनेमा कसा तयार होतो' या विषयावर कार्यशाळा - व्याख्याने सुप्रसिध्द दिग्दर्शक व कॅमेरामन प्रवीण पगारे दि. २१.२.२०१५** :- विभागीय केंद्र नाशिक, विश्वास को. ऑप. बँक लि. नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, चिल्ड्रन फिल्म सोसायटी ऑफ इंडिया, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'सृजन' उपक्रमांतर्गत 'सृजन' बालचित्रपट महोत्सवात 'सिनेमा कसा तयार होतो' या विषयावरील कार्यशाळेत मार्गदर्शन करताना केले. मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, अशोकनगर, सातपूर, नाशिक येथे सदर कार्यशाळा संपन्न झाली. याप्रसंगी सुप्रसिध्द दिग्दर्शक व कॅमेरामन श्री. प्रवीण पगारे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सन्मान मुख्याध्यापिका श्रीमती स्मिता गायधनी यांनी केला. श्री. भगवान चोरमले यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षकवर्गाने परिश्रम घेतले.

५.५३ **'चित्रपट चावडी' सेंट्रल स्टेशन (पोर्तुगीज) भाषेतील चित्रपट दि.** २८.२.२०१५ :- विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द दिग्दर्शक वॉल्टर सॅल्स (ब्राझील) यांचा 'सेंट्रल स्टेशन' हा पोर्तुगीज भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

५.५४ **लोकसंवाद उपक्रमांतर्गत 'आधुनिक तंत्रज्ञान - जग व भारत' या विषयावर दृकश्राव्य व्याख्यान - व्याख्याते सुप्रसिध्द पत्रकार व लेखक निळू दामले दि.११.३.२०१५** :- जगभरात सर्वच क्षेत्रात तंत्रज्ञान वेगाने विकसित होत असुन माहिती व ज्ञान यांच्या संयुगातून एक नवे जग त्यातून निर्माण होत आहे. आर्थिक श्रीमंतीत वाढ होत असून जगातल्या सर्व संस्कृतीचा समन्वयाचा मार्गही माहिती तंत्रज्ञानाने साधला जात आहे. या आधुनिकतेच्या स्पर्धेत टिकण्यासाठी, आव्हान स्वीकारण्यासाठी भारतातील जनतेने आपली मानसिकता तयार करावी तसेच त्यासाठी सोशल इन्फ्रास्टेक्चर उभे करावे असे प्रतिपादन सुप्रसिध्द पत्रकार व लेखक श्री. निळू दामले यांनी केले.

महाराष्ट्राचे थोर शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाण यांच्या १०२ व्या जयंतीच्या पूर्वसंध्येला विभागीय केंद्र नाशिक, विश्वास को. ऑप. बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'लोकसंवाद' उपक्रमांतर्गत 'आधुनिक तंत्रज्ञान - जग व भारत' या विषयावर केंद्राच्या सभागृहात आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. ते पुढे म्हणाले भारतातील शिक्षण व्यवस्था व विद्यापीठीय पातळीवरील शिक्षण यात अमूलाग्र बदल होण्याची गरज आहे. तंत्रज्ञानाचा विकास हा सर्वसामान्यांचा मूलभूत विकासाचा पर्याय म्हणून रुजवण्याची गरज आहे. औद्योगिकीकरणाने क्रांती झाली व त्यातून अर्थकारण बदलले पण कामगारांमध्ये कौशल्यपूर्णता किती आली याचेही मूल्यमापन होणे आवश्यक आहे. नजिकच्या काळात नॅनो टेक्नॉलॉजी क्षेत्रात मोठया प्रमाणावर क्रांती होणार असून आरोग्यविषयक संशोधनात अभूतपूर्व बदल घडणार आहेत. यावेळी श्री. दामले यांनी वैज्ञानिकांनी काही वर्षांपूर्वी वर्तवलेल्या

संशोधनाच्या विकासाची दृकश्राव्य माध्यमाद्वारे माहिती दिली. रोजच्या जगण्यातील घटनांकडे जाणीवपूर्वक बघण्याची गरज असून पर्यावरण संतुलनाकडेही लक्ष पुरवण्याची गरज आहे असेही ते म्हणाले. तंत्रज्ञानाचा वापर विधायक आणि सकारात्मकतेसाठी व्हावा. जागतिकीकरणामुळे आव्हानांचा सामना करण्यासाठी सक्षम होण्यावरही त्यांनी भाष्य केले. कृषी विकासासाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करुन उत्पादनात वाढ करावी तसेच बदलत्या हवामानाची वेध घेणारी यंत्रणा उभी करावी. विविध पिके आणि त्यातून मिळणारी अर्थप्राप्ती याकडेही त्यांनी लक्ष वेधले. शेतीसाठी अवजार यंत्रे, बियाणे यावर संशोधनात्मक चिंतन होण्यावरही त्यांनी आपल्या भाषणात भर दिला. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आधुनिक शेतीचा प्रयोग करण्याचेही श्री. दामले यांनी आवाहन केले. श्री. निळू दामले यांचा सन्मान केंद्राचे अध्यक्ष श्री. विनायकदादा पाटील यांनी केला. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर यांनी केले. परिचय सदस्य श्री. संजय नागरे यांनी करुन दिला तर सूत्रसंचालन श्री. रघुनाथ फडणीस यांनी केले. कार्यक्रमास डॉ. यशवंत बर्वे, कर्नल आनंद देशपांडे, डॉ. सुधीर संकलेचा, डॉ. मनोज शिंपी, प्रा. एस. एस. काळे, प्रा. बाळासाहेब पवार, श्री. माधव पळशीकर, श्री. श्रीकांत वाबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

५.५५ **'चित्रपट चावडी' मारिया फुल ऑफ ग्रेस (स्पॅनिश) भाषेतील चित्रपट दि. १४.३.२०१५ :-** विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द दिग्दर्शक जोशुआ मार्सटन (कोलंबिया) यांचा 'मारिया फल ऑफ ग्रेस' हा स्पॅनिश भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी अ‍ॅन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

५.५६ **'चित्रपट चावडी' फाऊंड मेमरीज (स्पॅनिश) भाषेतील चित्रपट दि. २८.३.२०१५ :-** विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द दिग्दर्शक ज्युलिया मुरात (अर्जेंटिना) यांचा 'फाऊंड मेकरीत' हा स्पॅनिश भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी अ‍ॅन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

## १०.६. विभागीय केंद्र लातूर :-

लातूर विभागीय केंद्राचे कामकाज केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली चालते.

६.१ **महावीर जयंती** :- विभागीय केंद्राच्या वतीने महावीर जयंतीच्या निमित्ताने प्रसिध्द ज्येष्ठ पत्रकार श्री. जयप्रकाश दडगे यांनी महात्मा महावीर यांचे अहिंसेबद्दलचे विचार या विषयावर सविस्तर विचार मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर येथील सुप्रसिध्द चार्टर्ड अकाऊटंट श्री. सुनिलजी कोचेटा हे होते.

६.२ **महात्मा बसवेश्वर जयंती** :- विभागीय केंद्राच्या वतीने महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त आपला भारत देश एकसंघ ठेवायचा असेल तर जाती व आंतरधर्मीय विवाहाचे महत्व काय आहे याबद्दलच्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. जे. एम. वाघमारे होते. प्राचार्य नागोराव कुंभार, प्राचार्य रमेश दापके इ. भाग घेतला.

६.३ **आजच्या जिराईत शेतक-यांसमोरील आव्हाने - दि. ११ एप्रिल, २०१४ :-** महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त कॉक्सिट कॉलेज लातूर येथे आजच्या जिराईत शेतक-यांसमोरील आव्हाने या विषयावर प्रख्यात शेतीविषयी ज्ञान असलेले प्राचार्य डॉ. संजय वाघमारे यांनी आपले मौलिक विचार मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉक्सिट कॉलेजचे प्राचार्य डॉ. एम. आर. पाटील हे होते. या कार्यक्रमाला शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

६.४ **दि. १४ एप्रिल, २०१४ :-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विभागीय केंद्राच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

६.५ **महाराष्ट्र दिन - दि. १ मे, २०१४ :-** हिंगोली येथे शिवाजी महाविद्यालयात महाराष्ट्र दिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. या प्रसंगी 'लोकनेते यशवंतराव चव्हाण यांचे योगदान' या विषयावर अनेकांनी आपले विचार मांडले. उस्मानाबाद येथे जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला.

६.६ **दि. ११ जून, २०१४ :-** साने गुरुजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त विभागीय केंद्र लातूरच्या वतीने ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान, बुधोडा, ता. औसा येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात प्रसिध्द विचारवंत प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे हे होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. धनराज सुरवसे (सहाय्यक प्रा. राष्ट्रीय फॅशन टेक्नॉलॉजी, मुंबई) व श्री. संजय जाधव (महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, लातूर) हे लाभले होते.

६.७ **दि. १७ जून, २०१४ :-** राष्ट्रमाता जिजाऊसाहेब यांची पुण्यतिथी पिपल्स कॉलेज, नांदेड येथे साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एन. इंगोले हे होते.

६.८ **दि. २६ जून २०१४ :-** छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त विभागीय केंद्र लातूरच्या वतीने शाहू चौक येथील महाराजांच्या पुतळयास पुष्पहार घालून जाहीर सामूहिक अभिवादन करण्यात आले. यावेळी अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

६.९ **दि. २८ जून २०१४ :-** शिवाजी महाविद्यालय, हिंगोली येथे शिवाजी महाविद्यालय व विभागीय केंद्र लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीच्या कार्यक्रमानिमित्त राजर्षी शाहू महाराज व आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाण या दोन महामानवाच्या जीवनावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. श्रीराम कराळे मराठी विभाग प्रमुख नांदेड विद्यापीठ व इतर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळराव सोंडगे हे होते.

६.१० **दि. २९ जून २०१४ :-** आखाडा बाळापूर, जिल्हा हिंगोली येथे स्वातंत्र्यसेनानी दिपाजी पाटील यांची २३ वी पुण्यतिथी केंद्राच्या वतीने साजरी करण्यात आली. यावेळी प्रा. महेश मोरे लिखित 'स्वातंत्र्यसेनानी दिपाजी पाटील हिरवे रान व पाऊस काळ' या पुस्तकाचा लोकार्पण सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. सु. ग. चव्हाण, साहित्यिक नरेंद्र नाईक यांची भाषणे झाली. अध्यक्षस्थानी स्वातंत्र्यसेनानी भिमराव बोढारे हे होते.

६.११ **१ जुलै २०१४ डॉक्टर्स डे :-** विभागीय केंद्राच्या वतीने लातूर येथे डॉक्टर्स डे साजरा करण्यात आला. याप्रसंगी आजच्या प्रदुषणावर काय उपाय शोधावे या विषयावर अनेक मान्यवर, डॉक्टरांनी आपले विचार मांडले. विभागीय केंद्राच्या वतीने काही सेवाभावी डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला.

६.१२ **दि. १२ जुलै २०१४ :-** गुरुपौर्णिमेनिमित्त कांही सेवाभावी प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षक, अध्यापक या मान्यवरांचा विभागीय केंद्राच्या वतीने सत्कार करण्यात आला.

**६.१३ दि. १ ऑगस्ट २०१४ :-** लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे या दोन्ही महामानवांना विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी काही विद्यार्थी विद्यार्थीनींनी आपले विचार मांडले.

**६.१४ दि. ९ ऑगस्ट २०१४ :-** भारतीय स्वातंत्र्याच्या क्रांतीदिनानिमित्त देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून हौतात्म्य पत्कारलेल्या थोर स्वातंत्र्यसैनिकांना विभागीय केंद्राच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

**६.१५ दि. १५ ऑगस्ट २०१४ :-** भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने भारतीय स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला.

**६.१६ दि. १० सप्टेंबर २०१४ :-** महाराष्ट्रातील थोर समाजवादी विचारवंत श्री. पन्नालालजी सुराणा यांचे विभागीय केंद्राच्या वतीने व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष तथा प्रसिध्द विचारवंत माजी खा. डॉ. जे. एम. वाघमारे हे होते. कार्यक्रमाचा विषय 'यशवंतराव चव्हाण यांचे व्यापक राजकारण आणि निवडणूक सुधारणा' हा होता. अध्यक्षपदावरुन बोलताना डॉ. वाघमारे म्हणाले की, यशवंतराव हे अत्यंत व्यापक विचाराचे होते. व्यापक दृष्टीकोनाशिवाय आपणास समाज सोडून जातीय ऐक्य टिकवणे हे कदापी शक्य नाही असा त्यांचा ठाम निर्धार होता. सहकारासह शिक्षणावर त्यांचा अधिक जोर होता. शिवाय सत्तेच्या विकेंद्रीकरणालाही त्यांनी विशेष गती दिल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे यांनी केले तर श्री. गणपतराव तेलंगे यांनी सूत्रसंचालन केले. श्री. रामकुमार रायवाडीकर यांनी आभार प्रदर्शन केले.

**६.१७ मराठवाडा मुक्तीसंग्राम दिवस - दि. २७ सप्टेंबर २०१४ :-** विभागीय केंद्राच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वातंत्र्यसेनानी व ज्येष्ठ पत्रकार श्री. जीवनधर शहरकर हे होते. याप्रसंगी मराठवाडा मुक्तीसंग्रामात काम केलेल्या अनेक स्वातंत्र्यसैनिकांचा विभागीय केंद्राचे अध्यक्ष खा. डॉ. जनार्दन वाघमारे, सिचव श्री. हरिभाऊ जवळगे व इतरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**६.१८ ज्येष्ठ नागरिक आनंद उत्सव - हिंगोली :-** दि. २ ऑक्टोबर २०१४ रोजी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त थोर स्वातंत्र्यसेनानी श्री. दादासाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे हे उपस्थित होते.

दुपारचे सत्र : गांधी विचारावर आधारित कार्यक्रम घेण्यात आला. हा कार्यक्रम विभागीय केंद्र लातूर व महात्मा गांधी रिसर्च फाऊंडेशन, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला. या सत्रातच पुढील ज्येष्ठ बंधू भगिनींचा सत्कार करण्यात आला. (१) श्री. नागोराव इंगोले, (२) श्री. एम. एम. नरवाडे, (३) श्री. मा. आ. गलांडे, (४) श्री. नागोराव लोखंडे, (५) श्री. नारायणराव बांगर व (६) श्रीमती फुलाबाई वावळे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विभागीय केंद्राचे हिंगोली जिल्हा प्रमुख ज्येष्ठ संचालक प्राचार्य डॉ. गोपाळराव सोंडगे तसेच प्रा. किशोर इंगोले, प्रा. आर. बी. भाकरे यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

**६.१९ स्वयंरोजगार निर्मिती कार्यशाळा - हिंगोली :-** दि. ८ ऑक्टोबर २०१४ रोजी विभागीय केंद्र लातूर व दर्पण सेवाभावी महिला संस्था हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने स्वयंरोजगार मेळावा कार्यशाळा शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित शिवाजी महाविद्यालय येथे घेण्यात आली. वरील संदर्भात या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्री. अशोक कुमार (उपसंचालक, एम.एस.जी.सी.एम. इंडिया) हे लाभले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेविका श्रीमती विद्याताई पवार या होत्या. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी उपस्थिती म्हणून विभागीय केंद्राचे सचिव व नांदेड जिल्हयाचे डॉ. व्ही. एन. इंगोले, प्र. उत्तम सुर्यवंशी हे लाभले होते.

**६.२० दि. २ ऑक्टोबर २०१४ :-** विभागीय केंद्राच्या वतीने महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री या दोन्ही महामानवांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

**६.२१ परिसंवाद : लोकनेते यशवंतराव यांचा स्मृतीदिन :-** दि. २५ नोव्हेंबर २०१४ रोजी मा. यशवंतराव चव्हाणसाहेबांचा स्मृतीदिन विभागीय केंद्राच्या वतीने 'भारतातील सध्याची राजकीय परिस्थिती' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राच्या सचिवानी केले. याप्रसंगी त्यांनी प्रतिष्ठानच्या माध्यमातून राबविण्यात येणा-या कार्यक्रमाची सविस्तर माहिती मांडली. प्रमुख वक्ते म्हणून ॲड. मनोहरराव गोमारे होते. दुसरे वक्ते म्हणून श्री. त्र्यंबकदास झंवर यांनी मा. यशवंतरावांनी लोकशाहीचे विकेंद्रीकरण करुन चांद्यापासून बांद्यापर्यंत एकसंघ महाराष्ट्र घडविला. तसेच आजच्या राजकीय परिस्थितीत यशवंतरावांच्या विचारांच्या स्मृतीचा जागर करणे खूप गरजेचे आहे असे विचार मांडले. याप्रसंगी वक्ते श्री. विठ्ठल मोरे यांनी हा देश संविधानाच्या चौकटीनुसार मार्गक्रमण करतो. मात्र चौकटीबाहेर व्यवस्था जात आहे असे लक्षात येताच जनतेने सत्तांतरण केले आहे असे मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी मा. गोपाळराव पाटील यांनी २०१४ च्या निवडणुकीत मोदींनी सर्व प्रकारच्या शक्यतांना व समज यांना मुठमाती दिली व राजकीय तज्ञांच्या आकलनाबाहेरचे यश संपादन केले. याचे कारण स्वातंत्र्यवादी विचार करणा-या तरुणाला भावेल असे आवाहन त्यांनी केले व सत्तांतरण घडवून आणले अशी भावना व्यक्त केली.

अध्यक्षीय समारोपप्रसंगी डॉ. जनार्दन वाघमारे यांनी सद्य राजकीय परिस्थिती बदललेली असून एकाच विचारसरणीवर युवक विश्वास ठेवतील असे नाही. तर समुद्राच्या लाटा ज्याप्रमाणे बदलत असतात तशाच पध्दतीने विचारसरणी बाबतीत सातत्याने परिवर्तनशीलता दिसून येत असते. ही परिवर्तनशीलता राजकीय पक्ष व कार्यकर्त्यांसाठी गरजेची असते. मोदीच्या वाटचालीसंदर्भात बोलताना सबका साथ सबका विकास, श्रमवेय जयते इ. विचारांचा सकारात्मक उल्लेख करुन ३७० कलम, राम मंदीर, समान नागरी कायदा या जाहीरनाम्यातील मुद्यांकडे दुर्लक्ष केल्याचे प्रतिपादन केले. शेवटी आभार श्री. फ. म. शहाजिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. विक्रम कदम व श्री. अरविंद कांबळे यांनी केले. याप्रसंगी शहरातील विविध स्तरातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

**६.२२ मा. यशवंतराव चव्हाण यांची पुण्यतिथी :-** विभागीय केंद्र लातूरच्या वतीने मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त नांदेड येथे दि. २६ नोव्हेंबर २०१४ रोजी लालबहादूर शास्त्री हॉल नांदेड येथे पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी डॉ. भगवान अंजनीकर यांनी मुलांसाठी 'आदर्श लोकनेता - यशवंतराव चव्हाण' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे प्रा. भु. द. वाडीकर हे होते. प्रास्ताविक प्रा. उत्तम सूर्यवंशी यांनी केले तर आभार श्री. निर्मलकुमार यांनी मानले.

**६.२३ महात्मा ज्योतिबा फुले यांना विनम्र अभिवादन :-** विभागीय केंद्र लातूरच्या वतीने महामानव सामाजिक क्रांतीचे आद्य प्रणेते ज्योतिबा फुले यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्र लातूरचे कळंब तालुका संपर्क प्रमुख श्री. सुभाषराव टेकाळे हे होते.

**६.२४ दि. १२ डिसेंबर २०१४ :-** लोकनेते मा. श्री. शरदचंद्रजी पवारसाहेब यांचा ७४ वा वाढदिवस विभागीय केंद्र लातूर व शरद कृषि फाऊंडेशन, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने एक अत्यंत सद्यस्थितीत लोकोपयोगी असा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचा विषय : 'आजच्या अल्पभूधारक कोरडवाहू शेतक-यांचे प्रश्न'. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शरद कृषि फाऊंडेशनचे अध्यक्ष ॲड. श्रीधरराव जाधव हे होते. तर प्रमुख वक्ते म्हणून माजी खासदार तथा या विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे हे लाभले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव श्री. हरिभाऊ जवळगे यांनी केले.

**६.२५ पारंपारिक शेतीसोबत जोड व्यवसाय काळाची गरज :-** विभागीय केंद्र लातूर व मराठवाडा जनता विकास परिषदेच्या वतीने आखाळा बाळापूर, नांदेड येथे दि. १४.१२.२०१४ रोजी 'दुष्काळाशी मुकाबला - शेतक-यांच्या आत्महत्या आणि लोकप्रतिनिधींशी संवाद' या विषयावर परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत बोलताना खा. राजीव सातव यांनी पारंपारिक शेतीमुळे शेतक-यांना उत्पन्नाचा फटका बसतो, या शेतीबरोबर जोडव्यवसाय ही काळाजी गरज आहे असे प्रतिपादन केले. यावेळी आमदार डॉ. संतोष टारफे, आ. रामराव वडकुले आणि माजी आमदार विजय खडसे यांची भाषणे झाली. स्वातंत्र्यसैनिक श्री. भिमराव बोंढारे हे अध्यक्षस्थानी होते. प्रा. उत्तमराव सुर्यवंशी यांनी प्रास्ताविक केले.

**६.२६ साने गुरुजी जयंती उत्सव :-** दि. २४ डिसेंबर २०१४ रोजी विभागीय केंद्राच्या वतीने लातूर येथे विद्यार्थी विद्यार्थीनीकडून साने गुरुजी कथामालेचे सामुदायिक वाचन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी या कथामालेचे प्रचार प्रसार प्रा. श्याम आगळे यांनी विभागीय केंद्राला मोलाचे सहकार्य केले.

**६.२७ आरोग्यविषयक मार्गदर्शन शिबीर :-** विभागीय केंद्र लातूर व उस्मानाबाद येथील बील गेटस् महाविद्यालयातील विद्यार्थीनीसाठी स्त्रीरोग तज्ञ डॉ. मीना जिंतूरकर यांचे आरोग्यविषयक मार्गदर्शन शिबीर उस्मानाबाद येथे आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. सौ. चंद्रिका परमार या होत्या. प्रा. सौ. विद्यादेवी गायकवाड, प्रा. कु. सुप्रिया शेटे, प्रा. कु. शिल्पा पारवे त्याचबरोबर मोठया संख्येने विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

**६.२८ दि. ३१ डिसेंबर २०१४ :-** विभागीय केंद्र लातूर व अंधश्रध्दा निर्मूलन समिती जिल्हा शाखा लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने २०१४ या वर्षाला निरोप व २०१५ या नववर्षाचे स्वागत या निमित्ताने लातूर शहरातून अनेक शाळा, महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, इतर सेवाभावी संस्था सोबत घेऊन शहरातून रात्री भव्य अशी रॅली काढण्यात आली. या रॅलीत अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव श्री. माधव बावगे, लातूर जिल्हयाचे अध्यक्ष प्राचार्य अनिरुध्द जाधव तसेच विभागीय केंद्राचे सचिव तथा अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे लातूर जिल्हा उपाध्यक्ष श्री. हरिभाऊ जवळगे इ. मान्यवर सहभागी झाले होते. याप्रसंगी रॅलीमध्ये व्यसन मुक्तीवरील घोषवाक्य शहरभर विद्यार्थ्यांच्या तोंडून ऐकावयास मिळत होते.

**६.२९ नववर्षाचे स्वागत :-** विभागीय केंद्र लातूर व शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित शिवाजी महाविद्यालय येथे दोन्हीही समाजसेवी संस्थेच्या वतीने हिंगोली येथे रक्तदान शिबीर घेण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. शिवाजीराव पवार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय केंद्राचे सचिव व नांदेड जिल्हा प्रमुख श्री. व्ही. एन. इंगोले हे होते. यादिवशी अगदी उत्स्फुर्तपणे अनेकांनी या रक्तदान शिबीरात सहभाग नोंदवला.

**६.३० क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त मुलगी ही दोन्हीही घरची उद्धारकर्ती कशी :-** या विषयावर हिंगोली येथे परिसंवाद घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य श्रीमती मंगलाताई वावळे या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री. रंगनाथराव मुंडे हे होते.

**६.३१ साक्षर महिला प्रगतीचे पहिले पाऊल व्याख्यान :-** विभागीय केंद्र लातूर शाखा उस्मानाबाद तर्फे ३ जानेवारी २०१५ रोजी सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त 'साक्षर महिला प्रगतीचे पहिले पाऊल' या विषयावर प्रा. रविंद्र घाडगे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला विभागीय केंद्राचे सचिव तसेच विभागीय केंद्राचे ज्येष्ठ सदस्य ॲड. मनोहरराव गोमारे हे लाभले होते. सर्वांचे स्वागत उस्मानाबाद शाखा प्रमुख श्री. रमेशराव दापके यांनी केले.

**६.३२ १२ जानेवारी २०१५ :-** विभागीय केंद्र लातूर शाखा उस्मानाबाद तर्फे बील गेटस् महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र उस्मानाबाद येथील व्यवस्थापन शास्त्र विभागाचे प्रा. विक्रम शिंदे यांचे 'युवकापुढील आव्हाने आणि उपाय' या विषयावर उस्मानाबाद येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

**६.३३ १४ जानेवारी २०१५ :-** विभागीय केंद्र लातूर शाखा उस्मानाबाद तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त विद्यापीठाच्या उपकेंद्रातील इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. जी. व्ही. कोकणे यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी उस्मानाबादचे नगरसेवक श्री. पृथ्वीराज चिलवंत, प्रा. रजवी त्याचबरोबर मोठया संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

**६.३४ १९ जानेवारी २०१५ :-** विभागीय केंद्र लातूर शाखा उस्मानाबाद तर्फे 'यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान' या विषयावर उस्मानाबाद येथील केकस्थळवाडी येथे उस्मानाबादचे नगरसेवक श्री. सय्यद खलील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी विद्यापीठ सिनेट सदस्य श्री. नितीन बागल, पंचायत समितीचे माजी सभापती श्री. रामचंद्र पाटील, उस्मानाबाद शाखेचे अध्यक्ष डॉ. रमेश दापके, प्रा. रजवी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी मोठया संख्येने विद्यार्थी, प्राध्यापक व इतर कर्मचारी, गावातील नागरिक उपस्थित होते.

**६.३५ १९ जानेवारी २०१५ - शेतक-यांच्या आत्महत्या : चिंता व चिंतन या विषयावर चर्चासत्र :-** विभागीय केंद्र लातूर शाखा उस्मानाबाद तर्फे सामाजिक चळवळीचे कार्यकर्ते व गाढे अभ्यासक प्रा. अर्जुन जाधव यांचे 'शेतक-यांच्या आत्महत्या : चिंता व चिंतन' या विषयावर उस्मानाबाद येथे चर्चासत्र आयोजित करण्यात आले. यावेळी उस्मानाबाद शाखेचे अध्यक्ष डॉ. रमेश दापके यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला प्रा. रजवी, प्रा. कुंभार, प्रा. जमाले, प्रा. अमोल राऊत तसेच मोठया संख्येने नागरिक उपस्थित होते.

**६.३६ १ फेब्रुवारी २०१५ :-** शिवछत्रपती यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी महाराजांना विनम्र अभिवादन.

**६.३७ ११ मार्च २०१५ :-** विभागीय केंद्र लातूरच्या वतीने मा. यशवंतराव चव्हाण यांच्या १०२ व्या जयंतीनिमित्त अखिल भारतीय अध्यापक सभेचे नियोजित ८८ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा. श्री. सदानंद मोरे यांचा सत्कार व त्यांचे 'महात्मा फुले, टिळक यांच्या विचारामुळेच महाराष्ट्राची जडणघडण व यशवंतराव चव्हाण' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी कुलगुरु डॉ. जनार्दन वाघमारे होते. यावेळी व्यासपीठावर माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील, ज्येष्ठ समाजवादी नेते ॲड. मनोहरराव गोमारे, केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे, शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. सदानंद मोरे म्हणाले की, स्वातंत्र्य चळवळीचा पाया हा लोकमान्य टिळक यांनी रचला. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांनी रंगून ते लाहोर आणि कोलंबो ते अमृतसर असा प्रवास करुन सारा देश ढवळून काढला होता. तत्कालीन काँग्रेसचे स्वरुप हे पोस्टमन सारखे होते. जनतेला काय वाटते ते सरकारपर्यंत पोहचविण्याचे काम काँग्रेस करीत होती. ती काँग्रेस ही उच्चवर्णीयांची होती. काँग्रेस ही बहुजनाची झाली पाहिजे यासाठी टिळक आग्रही होते. त्यांनीच काँग्रेसला दिशा दिली. माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील, ॲड. मनोहरराव गोमारे, श्री. हरिभाऊ जवळगे, डॉ. एस. बी. पाटील यांनी यावेळी मार्गदर्शन केले. यावेळी नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

## १०.७ यशवंतराव चव्हाण जन्मस्थळ स्मारक देवराष्ट्र :-

सांगली जिल्हयातील देवराष्ट्रे येथील यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मघर स्मारकाचे पालकत्व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईने स्वीकारल्यानंतर २६ जून २०१४ पासून मोठया संख्येने पर्यटकांनी व कित्येक मान्यवरांनी स्मारकास भेट दिली आहे. विविध शाळा विद्यार्थ्यांच्या सहली घेऊन या स्मारकास भेट देतात. उद्घाटन समारंभापासून आतापर्यंत सुमारे ४४७६ पर्यटकांनी स्मारकास भेट दिल्याच्या नोंदी असून अतिशय उत्कृष्ट अभिप्राय दिलेले आहेत. याच काळात आजूबाजूच्या परिसरातील २१ शाळांनी स्मारकास भेट दिली आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने स्मारकामध्ये छायाचित्र प्रदर्शनाबरोबरच विविध सामाजिक उपक्रम हाती घेतले आहेत. प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे यांनी सांगितल्याप्रमाणे स्मारकात, अद्ययावत स्पर्धा परीक्षा केंद्र बनविण्याच्या

संकल्पाचे पहिले पाऊल म्हणून विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय सुरु करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना नाममात्र रु.२००/- फी घेऊन विविध विषयांवरील ग्रंथ उपलब्ध करुन दिले आहेत. त्याचबरोबर नाशिकच्या कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या सहकार्याने त्यांच्या 'ग्रंथ तुमच्या दारी' योजनेंतर्गत एक सार्वजनिक ग्रंथालय सुरु करण्यात आले आहे. मा. चव्हाणसाहेब यांनी लिहिलेली व त्यांच्यावर इतरांनी लिहिलेली विविध पुस्तके उदा. कृष्णकांठ, सहयाद्रीचे वारे, ऋणानुबंध, भूमिका, वादळमाथा, शब्दांचे सामर्थ्य तसेच गोविंद तळवलकर यांचे यशवंतराव चव्हाण : व्यक्तित्व आणि कर्तृत्व हे पुस्तक, पर्यटकांसाठी १० टक्के सवलतीच्या दरात उपलब्ध केली आहेत. याचबरोबर यशवंतरावजी यांनी मराठी, हिंदी, इंग्रजीतून दिलेल्या भाषणांची सीडी आणि यशवंतराव चव्हाण : एक साठवण ही दोन भागातील ई-बुक ही विक्रीस उपलब्ध आहेत.

**यशवंतराव चव्हाण जन्मस्थळ स्मारक देवराष्ट्रे उद्घाटन सोहळा :-** मा. यशवंतरावजी चव्हाण यांचे जन्मस्थळ देवराष्ट्रे, जिल्हा सांगली येथील त्यांच्या जन्मघर स्मारकाचा उद्घाटन सोहळा दि. २६ जून २०१४ रोजी प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. शरद पवार यांच्या हस्ते पार पडला. या उद्घाटन सोहळयास सिक्कीमचे राज्यपाल श्री. श्रीनिवास पाटील, गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील, प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे, ग्रामविकासमंत्री श्री. जयंत पाटील, वन व पुनर्वसन मंत्री श्री. पतंगराव कदम, मंत्री संजय सावकारे, पाटबंधारे मंत्री श्री. शशिकांत शिंदे इ. मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरद पवारसाहेब यांनी सामान्य कुटुंबातही कर्तृत्ववान माणसं जन्माला येऊ शकतात ही गोष्ट यशवंतरावांच्या जन्मघराकडे पाहिल्यावर लक्षात येते. त्यामुळे हे स्मारक महाराष्ट्रातील आणि बाहेरील तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरेल असे उद्गार काढले. ते म्हणाले की, कृष्णाकाठच्या मातीने अनेक कर्तृत्ववान माणसं जन्माला घातली. यात याशवंतरावांचे कार्य देशाला दिशादर्शक आहे. औद्योगिक शेती, सहकार, शिक्षण, सामाजिक परिवर्तन अशा सर्वच क्षेत्रांना त्यांनी नवी दिशा दिली.

प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सौ. सुप्रियाताई सुळे म्हणाल्या की, यशवंतरावांचे कार्य समाजा पुढे ठेवण्याचे कार्य प्रतिष्ठानच्या माध्यमातून सुरु आहे. प्रतिष्ठानच्या माध्यमातून जन्माघराच्या ठिकाणी अद्ययावत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात येणार आहे. या गावाचा मुलगा देशाचा उपपंतप्रधान झाला. त्याच्या स्मृती जपण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असून त्या मोठया कामाची ही छोटीशी सुरुवात आहे. यावेळी श्रीनिवास पाटील, श्री. जयंत पाटील, श्री. आर. आर. पाटील, श्री. पतंगराव कदम, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष श्री. अरुण गुजराथी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास मंत्री श्री. शशिकांत शिंदे, श्री. हसन मुश्रीफ, श्री. मानसिंगराव नाईक, श्री. बाळासाहेब पाटील, श्री. दीपक चव्हाण, श्री. मकरंद पाटील, श्री. विक्रमसिंअ पाटणकर, श्री. जयदेव गायकवाड, श्री. पृथ्वीराज देशमुख, श्री. मोहनरा कदम, श्री. विलासराव शिंदे, आयुक्त श्री. प्रभाकर देशमुख, एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष श्री. जीवन गोरे, माजी जिल्हाधिकारी श्री. दिपेंद्रसिंह कुशवाह यांच्यासह ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. प्रतिष्ठानचे कार्यक्रम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ यांनी या सोहळयाचे सूत्रसंचालन केले. सरचिटणीस श्री. शरद काळे यांनी आभार मानले.

**विठामाता चव्हाण स्मृतिदिन - १८ ऑगस्ट २०१४ :-** देवराष्ट्रे केंद्र, कराड केंद्र आणि यशवंत एज्युकेशन सोसायटी, देवराष्ट्रे व यशवंतराव चव्हाण स्मृती प्रतिष्ठान, फलटण व महाराष्ट्र साहित्य परिषद, फलटण शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी मा. यशवंतरावजींच्या जन्मघर स्मारकात स्व. विठामाताच्या प्रतिमेचे पूजन झाले. यावेळी श्री. अमर शेंडे (फलटण) यांच्या 'विचारराव चव्हाण विचारधन एक सुवर्णठेवा' या पुस्तकाचे प्रकाशन कराड केंद्राचे सचिव श्री. मोहनराव डकरे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी उपसभापती श्रीख मोहनराव मोरे होते. ज्येष्ठ पत्रकार श्री. रविंद्र बेडकिहाळ, श्री. दत्ताजीराव बेडके, सरपंच सौ. रेखा महिंद, मुख्याध्यापक श्री. सतीश बनसोडे उपस्थित होते. श्री. रविंद्र बेडकिहाळ म्हणाले की, आजही यशवंतरावांच्या विचारवरच राज्याची जडणघडण सुरु आहे. श्री. अमर शेंडे यांनी यशवंतरावांच्या जन्मभूमीत पुस्तकाचे प्रकाशन झाल्याची बाब गौरवास्पद असल्याचे सांगितले.

देवराष्ट्रे केंद्रातर्फे स्व. विठामाता चव्हाण स्मृतिदिनानिमित्त देशभक्तीपर गायन स्पर्धा आणेजित करण्यात आली होती. श्री. बाळासाहेब शिंदे यांच्या उपस्थितीत व शाळेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य श्री. माणिक मोरे यांच्या हस्ते स्व विठामाता

यांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. या स्पर्धेत कुंभार गाव, मोहिते वडगाव तसेच आसपासच्या गावातील विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. समूह गायन व वैयक्तिक गायन या प्रकारात छोटा गट आणि मोठा गट अशा स्तरावर ही स्पर्धा घेण्यात आली.

**करियर गायडन्स व व्यक्तिमत्व विकास शिबीर - दि. २२ सप्टेंबर २०१४ :-**

दि. २२.९.२०१४ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या देवराष्ट्रे केंद्रातर्फे 'करिअर गायडन्स व व्यक्तिमत्व विकास शिबीर' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मा. यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या जन्मघर स्मारकाच्या उद्घाटन सोहळयानंतर देवराष्ट्रे केंद्रातर्फे हा पहिला कार्यक्रम. या शिबिराला प्रमुख मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ माध्यम तज्ज्ञ आणि दैनिक सकाळाचे माजी संपादक श्री. संजीव लाटकर उपस्थित होते.

इयत्ता १० वी ते इयत्ता १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. देवराष्ट्रे, मोहिते वडगाव, रामापूर इ. शाळांमधील सुमारे ४५० विद्यार्थी या शिबिरास उपस्थित होते. शिबिराचे प्रास्ताविक श्री. बाळासाहेब शिंदे यांनी केले. श्री. संजीव लाटकर यांनी मार्गदर्शन करताना वेळेचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. तसेच सकारात्मक दृष्टीकोन व आत्मविश्वासाने करिअर घडविण्याचा सल्ला दिला. यासाठी अविरत कष्ट करण्याला पर्याय नसल्याचेही त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला. विशेषत: प्रश्नोत्तराच्या सत्रात विद्यार्थ्यांनी मोकळेपणाने मते मांडली. इयत्ता १० वी तील एका विद्यार्थ्यांने केलेल्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाचा समारोप झाला. या कार्यक्रमाला मुंबईहून श्री. संजय बनसोडे उपस्थित होते.

**हसत खेळत विज्ञान - बाल आनंद मेळावा दि. १४ नोव्हेंबर २०१४ :-**

दि. १४ नोव्हेंबर २०१४ हा पंडीत नेहरु यांचा जन्मदिन. हा दिन बालदिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या देवराष्ट्रे केंद्रातर्फे 'बाल आनंद मेळावा' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी प्रा. नितीन शिंदे, श्री. संजय बनसोडे व प्रा. भास्कर सदाकळे यांनी प्रमुख मार्गदर्शन केले.

या मेळाव्यात हसत खेळत विज्ञान या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना जादूटोणा, बुवाबाजी त्यामागील हातचलाखी या गोष्टींमागे असणारे विज्ञान उलगडून दाखवण्यात आले. तसेच स्लाईड शो व डीव्हीडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आकाश दर्शनाची सफर घडवण्यात आली. आकाशगंगा सौरमाला चंद्र पृथ्वी यांची मनोरंजनपर उपयुक्त माहिती या कार्यक्रमात देण्यात आली. विशेष म्हणजे सुनिता विल्यम्स या मूळच्या भारतीय असलेल्या शास्त्रज्ञ अंतराळ विरांगनेचा अंतराळयानातील निवास आणि दैनंदिनीचा व्हिडीओ दाखवण्यात आला. यावेळी अंधश्रध्दा यापासून दूर राहून विज्ञानाची कास धरण्याचे मान्यवरांनी मार्गदर्शन मुलांना केले.

**मा. यशवंतरावजी चव्हाण यांची पुण्यतिथी दि. २५ नोव्हेंबर २०१४ :-**

मा. यशवंतरावजी चव्हाण यांच्या जन्मघर स्मारकात चव्हाणसाहेबांच्या ३० व्या पुण्यतिथीचा कार्यक्रम देवराष्ट्रे केंद्रातर्फे पार पडला. कडेगाव पलूसचे प्रांताधिकारी श्री. दादासाहेब कांबळे, तहसिलदार श्री. हेमंत निकम यांनी प्रतिमा पूजन करुन अभिवादन केले. सोनहिरा कारखान्याचे चेअरमन श्री. मोहनराव कदम यांनीही मा. यशवंतरावजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी माजी उपसभापती श्री. मोहन मोरे, सोनहिरा कारखान्याचे संचालक श्री. पोपट महिंद, सरपंच सौ. रेखाताई महिंद, श्री. बी. के. शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. संध्याकाळी श्री हनुमान भजनी मंडळातर्फे भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. श्री. बळीनाना महिंद व त्यांच्या सहका-यांनी विविध संतांची भजने यावेळी सादर केली.

**शेतीशाळा - दि. १३ डिसेंबर २०१४ :-** देवराष्ट्रे केंद्रातर्फे 'शेतीशाळा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण भागातील शेतक-यांचा, प्रगतीशील शेतकरी श्री. शंकर खोत यांच्याशी संवाद हे या कार्यक्रमाचे स्वरुप होते. कराड

तालुक्यातील वाजेवाडी येथील प्रगतीशील शेतकरी श्री. शंकर खोत यांनी याप्रसंगी शेतक-यांना संबोधित केले. कार्यक्रमाला देवराष्ट्रे येथील शेतकरी वर्ग उपस्थित होता. भात व आले मिश्र पिकाचे महत्त्व सांगतानाच त्यांनी पिकांच्या उत्पादन वाढीसाठी बहुमोल माहिती शेतक-यांना दिली. तसेच त्यांनी केलेल्या शेतीमधील असंख्य प्रयोगांविषयी सविस्तरपणे शेतक-यांशी चर्चा केली. काही शेतक-यांनी याप्रसंगी आपली मते मांडली. एकत्र कुटुंब पध्दतीद्वारे शेतीची गरज असल्याचे सांगतानाच यातूनच कुटुंबाचा विकास व रोजगार निर्मिती साध्य होणार असल्याचे सांगितले. यावेळी काही शेतक-यांनी केळीच्या पिकाचे क्षेत्रवाढत असल्याचे सांगून त्याविषयीचा विशेष कार्यक्रम घेण्याविषयी सुचविले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. बाबासाहेब शिंदे यांनी केले व समारोप श्री. दत्ता बाळसराफ यांच्या भाषणाने झाला. त्यांनी अशा प्रकारच्या शेतक-यांशी थेट संवाद साधणा-या कार्यक्रमाची गरज असल्याचे सांगितले. या कार्यक्रमास प्रतिष्ठानचे अधिकारी श्री. संजय बनसोडे उपस्थित होते.

**केळी पिकाविषयी मार्गदर्शन - दि. ६ फेब्रुवारी २०१५ :-** देवराष्ट्रे केंद्रातर्फे 'केळीपिकाविषयी मार्गदर्शन' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सौ. सुप्रियाताई सुळे उपस्थित होत्या.

जैन इरिगेशनचे श्री. सुरेश मगदूम व श्री. गुलदगड यांनी यावेळी प्रमुख मार्गदर्शन केले. क्रांती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री. अरुण आण्णा लाड यांची यावेळी विशेष उपस्थिती होती.

प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सौ. सुप्रियाताई सुळे यांनी कार्यक्रमापूर्वी यशवंतरावजींच्या जन्मघर स्मारकास भेट दिली व देवराष्ट्रे केंद्राचे कामकाज जाणून घेतले. त्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी त्यांनी काही सूचनाही केल्या. त्यानंतर कार्यक्रम स्थळावर जाऊन त्यांनी स्मृतीन्यास परिसरातील मा. यशवंतरावांच्या पूर्णाकृती पुतळयाला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. नंतर त्यांनी जैन इरिगेशनच्या स्टॉलची पाहणी केली.

सौ. सुप्रियाताई सुळे यांनी अध्यक्षीय भाषणात स्व. यशवंतरावजी चव्हाण यांचे जन्मघर ही ऐतिहासिक वास्तू असून ती जतन करण्याची गरज असल्याचे नमूद केले व यासाठी मा. मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करणार असल्याचे सांगितले. तसेच प्रतिष्ठानच्या माध्यमातून घेण्यात येणारे कार्यक्रम समाजातील प्रत्येक घटकास उपयोगी पडावे यासाठी नागरिकांना सूचना करण्याचे आवाहन त्यांनी केले.

त्यानंतर श्री. सुरेश मगदूम यांनी केळीपिकाविषयी विस्तृत मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी बियाणे, खते, पिकावरील रोग यासंबंधी चर्चा केली. यावेळी जैन इरिगेशनच्या संशोधनाविषयी माहिती दिली. तसेच उत्पादन वाढीसाठी काही महत्वपूर्ण सूचनाही केल्या. यावेळी श्री. गुलदगड यांनी ठिंबक सिंचनाविषयी माहिती दिली. श्री. सुरेश मगदूम यांनी यावेळी शेतकरी वर्गाच्या सर्व प्रश्नांची सविस्तर उत्तरे दिली व त्यांच्या शंकांचे निरसन केले. त्यामुळे शेतकरीवर्गाच्या केळिपिकाविषयीच्या अडचणी दूर झाल्या. त्याबद्दल शेतकरी मित्रांनी समाधान व्यक्त केले.

श्री. बी. के. शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले व कार्यक्रमाचा समारोप झाला. यावेळी सर्व शेतकरी मित्रांना अल्पोपहार व चहा देण्यात आला.

**योग शिबीर - दि. ७ मार्च २०१५ ते १२ मार्च २०१५ :-** यशवंतरावजींची १०२ वी जयंती. या निमित्ताने देवराष्ट्रे येथे प्रथमच योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ७ मार्च ते १२ मार्च या कालावधीत हे शिबीर पार पडले. पहाटे ५.३० ते ७.३० या वेळेत असलेल्या या शिबिरात १०० हून अधिक लोकांनी सहभाग नोंदविला. यात महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. पलूस येथील योगाचार्य श्री. पांडुरंग गुरुजी यांनी या शिबीरास मार्गदर्शन केले. विविध प्रका योगासने, अनेक व्यायाम प्रकार, घरगुती औषधोपचार आणि रोजच्या आयुष्यातील ताणतणाव दूर करण्यासाठी तसेच निरोगी आयुष्यासाठी प्राणायाम या सर्व मुद्दयांवर श्री. गुरुजीनी मार्गदर्शन केले. समारोपाच्या दिवशी दि. १२ मार्चला पहाटे ५ वाजता मा. यशवंतरावजींच्या पुतळयास अभिवादन करण्यात आले व पुष्पहार अर्पण करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देवराष्ट्रे केंद्रातील सर्व कर्मचारी व श्री. बाबासाहेब शिंदे सर तसेच स्थानिक पत्रकार श्री. दत्ता सपकाळ यांनी परिश्रम घेतले.

**मा. यशवंतरावजीं जयंती - १२ मार्च २०१५ :-** मा. यशवंतरावजींच्या जन्मघर स्मारकात चव्हाणसाहेबांच्या १०२ व्या जयंतीचा कार्यक्रम देवराष्ट्रे केंद्रातर्फे पार पडला. या प्रसंगी कडेगाव पलूसचे प्रांताधिकारी श्री. दादासाहेब कांबळे, तहसिलदार श्री. हेमंत

निकम यांनी प्रतिमा पूजन करुन अभिवादन केले. सोनहिरा कारखान्याचे चेअरमन श्री. मोहनराव कदम यांनीही स्व. यशवंतरावजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी माजी उपसभापती श्री. मोहन मोरे, सोनहिरा कारखान्याचे संचालक श्री. पोपट महिंद, सरपंच सौ. रेखाताई महिंद, श्री. बी. के. शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

मा. यशवंतरावजींच्या जयंतीनिमित्त 'यशवंत कवि संमेलनाचे' आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ कवि व विडंबनकार श्री. प्रभाकर साळेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली हे कवि संमेलन पार पडले. कडेगाव व खानापूर तालुका साहित्य परिषदेचे अध्यक्ष श्री. आनंदराव पाटील, मानवलोकचे कार्यवाह श्री. अनिकेत लोहिया तसेच कडेगावचे अंधकवी श्री. चंद्रकांत देशमुख यांच्यासह इतर अनेक कवींनी आपल्या रचना सादर केल्या. प्रभाकर साळेगावकरांचे विडंबन काव्य, सत्याप्रेम लगट यांच्या वात्रटिका व अरुण पवारांची 'अफू' कवितेने संमेलनात विशेष रंग भरले. प्रा. विश्वनाथ गायकवाड यांची घोटाळयावर केलेली कविताही श्रोत्यांना हसवून गेली. अंबेजोगाई येथील मानवलोक संस्थेच्या वतीने शेतक-यांसाठी आधार यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या यात्रेचा प्रारंभ मा. यशवंतरावजींच्या जन्मघर स्मारकात करण्यात आला. यावेळी योगाचार्य पांडुरंग गुरुजी यांचा सत्कार करण्यात आला.

**********

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची विक्रिसाठी असलेली प्रकाशने

| | | किंमत रुपये |
|---|---|---|
| १) | यशवंतराव चव्हाण : विधिमंडळातील निवडक मराठी भाषणे - भाग -१ संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| २) | वाय बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस - विधिमंडळ - भाग -२ संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ३) | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट - वाय बी. चव्हाण - खंड १ ते ४ संपादक : राम प्रधान | प्रत्येकी २५०.०० |
| ४) | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन - ना. धों. महानोर | १०.०० |
| ५) | सह्याद्रीचे वारे - यशवंतराव चव्हाण | २५०.०० |
| ६) | म. जोतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन - प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ७) | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास - संपादक - वि. स. पागे | ३५.०० |
| ८) | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन - संपादन : अण्णासाहेब शिंदे | २००.०० |
| ९) | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन - शरदराव पवार - भाषणसंग्रह - संपादन : दादासाहेब रूपवते | ७५.०० |
| १०) | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास - संपादन पी. बी. पाटील | १००.०० |
| ११) | नवभारत : परिवर्तनाची दिशा - संपादन : पी. बी. पाटील | १००.०० |
| १२) | विमुक्तायन : महाराष्ट्रतील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास संशोधन / लेखक - लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३) | महिलांसंबधीचे धोरण : स्वयंसिध्दतेकडे वाटचाल - डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४) | यशवंतराव चव्हाण - चरित्र-लेखक - अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५) | शब्दाचे सामर्थ्य - संपादन : राम प्रधान | ३७५.०० |
| १६) | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी) (यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७) | बाउंटीफुल बनियान - डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र - खंड ४ (इंग्रजी) बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १८) | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९) | अजिंठा - (काव्यसंग्रह) लेखक : ना. धों. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०) | ई बुक (मराठी/इंग्रजी) (यशवंतराव चव्हाण यांचे साहित्य व फोटो) | १५०.०० |
| २१) | यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र - कृष्णाकांठ | ३००.०० |
| २२) | यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व आणि कर्तृत्व - श्री. गोविंदराव तळवळकर | ५००.०० |
| २३) | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २४) | शैक्षणिक गुणवत्ता : आव्हान आणि आवाहन - डॉ. वसंत काळपांडे | २००.०० |
| २५) | हवामान बदल आणि महाराष्ट्र | ५०.०० |
| २६) | उपक्रम : वेचक -वेधक - डॉ. वसंत काळपांडे | १००.०० |
| २७) | स्त्री रत्न सावित्रीबाई फुले - श्रीनिवास भालेराव | २०.०० |
| २८) | स्त्रियांचे कायदे, आरोग्य आणि योजना -सुप्रिया सुळे | २०.०० |
| २९) | 'संवादिनी' सुप्रिया सुळे | २०.०० |
| ३०) | Appraising Schools - डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००.०० |
| ३१) | 'शाळांचे प्रगतिपुस्तक'-डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकार | २००.०० |
| ३०) | Yashwantrao Chavban an Autobiography | ३९५.०० |
| ३३) | शिक्षणव्रती - डॉ. कुमुद बन्सल | २००.०० |
| ३४) | शिक्षणकट्टा - बसंती रॉय | २००.०० |
| ३५) | वाटचाल ई-शिक्षणाची - बसंती रॉय | २००.०० |
| ३६) | हवामान बदलास आमचे उत्तर | १००.०० |

## डीव्हीडी व व्हिडिओ कॅसेट्स

३७) मी एस. एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट

३८) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट

३९) प्रवासी पक्षी : सुप्रसिध्दि साहित्यक कुसुमाग्रज यांचा जीवनपट

४०) पु. ल. वृत्तान्त : पु. ल. देशपांडे यांचा जीवनपट

वरील चारही व्हिडिओ कॅसट्सची निर्मिती दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी पार पाडली.

४१) कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शक - श्री. राम गबाले

४२) ऐस आय ॲम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट, दिग्दर्शक - विनय नेवाळकर

४३) 'बशर नवाज : ख्वाब, जिंदगी और मै' माहितीपट, दिग्दर्शक - जयप्रद देसाई

४४) 'जागर हा जाणीवांचा ..... लघुपट, दिग्दर्शक - चंद्रकांत कुलकर्णी''



यशवंतराव चव्हाण कृषि औद्योगिक समाज रचना / व्यवस्थापन प्रशासन राज्यस्तरीय पारितोषिक २०१४ चे विजेते श्री. शरद जोशी यांचा सन्माने करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार. सोबत डॉ. अनिल काकोडकर व 'अंतर्नाद' मासिकाचे संपादक श्री. भानू काळे.



मा. यशवंतराव चव्हाण यांच्या देवराष्ट्रे, जिल्हा सांगली येथील जन्मघराचे उद्घाटन करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार. सोबत सिक्कीमचे राज्यपाल श्री. श्रीनिवास पाटील, वने व पुनर्वसन मंत्री डॉ. पतंगराव कदम, कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे, गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील, ग्रामविकास मंत्री श्री. जयंत पाटील व श्री. रावसाहेब शिंदे.

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

जन. जगन्नाथराव भोसले मार्ग,

मुंबई - ४०० ०२१

दूरध्वनी क्र. २२०२८५९८, २२०४५४६०, २२८५२३४५.

फॅक्स : २२८५२०८१, २२८५२०८२

**Email: ybchavan100@gmail.com**

**Visit us: ybchavanpratishthan.org**